# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक ०७ नोव्हेंबर १९९८ ते दिनांक ३१ मार्च१९९९**

**रजिष्टर क्र. ०७**

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**शनिवार, दि. ०७/११/९८ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेस महापालिका मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात "वंदे मातरम्" गिताने सुरुवात झाली. या बैठकीस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. डॉ. कऱ्हाड भागवत | उपमहापौर |
| २) | मा. श्री. ओक जयवंत केशवराव | स. सभासद |
| ३) | मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव | --//-- |
| ४) | मा. श्री. अफसरखॉन यासिनखॉन | --//-- |
| ५) | मा. सौ. लोखंडे रुख्मिणीबाई खंडेराव | --//-- |
| ६) | मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ७) | मा. सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ८) | मा. श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ९) | मा. श्री. ॲड. गणेश किसनराव वानखेडे | --//-- |
| १०) | मा. सौ. जोशी रजनी रमेश | --//-- |
| ११) | मा. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| १२) | मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक | --//-- |
| १३) | मा. श्री. नरेंद्र यादव पाटील | --//-- |
| १४) | मा. श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १५) | मा. श्री. बैनाडे कंवरसिंग किशनसिंग | --//-- |
| १६) | मा. सौ. शिंदे पद्मा बाबुराव | --//-- |
| १७) | मा. श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| १८) | मा. श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| १९) | मा. श्रीमती पांचाळ चंपाबाई विश्वनाथ | --//-- |
| २०) | मा. सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २१) | मा. सौ. फरहत बानो मो. नवाज | --//-- |
| २२) | मा. श्री. फजलउल्ला खॉन अजमत खॉन | --//-- |
| २३) | मा. श्रीमती आबेदा बेगम मो. मुश्ताफा | --//-- |
| २४) | मा. श्रीमती नुरजहॉं बेगम अ. रहेमान | --//-- |
| २५) | मा. श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| २६) | मा. श्री. हाजी मोहसीन अहमद हाजी बशिर अहमद | --//-- |
| २७) | मा. श्री. मुजीब आलमशा मिर आलमशहा | --//-- |
| २८) | मा. सौ. मोहसिना बिल्कीस विखोराद्दिन | --//-- |
| २९) | मा. श्री. जावेद रज्जाक | --//-- |
| ३०) | मा. श्री. जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| ३१) | मा. श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३२) | मा. सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३३) | मा. श्री. तुळशिबागवाले किशोर बाबुराव | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३४) | मा. श्रीमती गंगवाल पुष्पाबाई सुरेशचंद्र | --//-- |
| ३५) | मा. श्री. हमीदउद्दीन ताबा | --//-- |
| ३६) | मा. श्री. म.अ.रऊफ अ. माबुद | --//-- |
| ३७) | मा. श्री. स.अ. इकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन | --//-- |
| ३८) | मा. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| ३९) | मा. श्री. स. अली मिरा सलामी | --//-- |
| ४०) | मा. श्री. लाहोट रमेश दिपचंद | --//-- |
| ४१) | मा. श्री. संजय किसनराव केनेकर | --//-- |
| ४२) | मा. सौ. दलाल लता श्रीनिवास | --//-- |
| ४३) | मा. श्रीमती अलका रमेश पाटील | --//-- |
| ४४) | मा. सौ. शकुंतला हरीदास धांडे | --//-- |
| ४५) | मा. श्री. अब्दुल रशिद खॉन (मामू) | --//-- |
| ४६) | मा. सौ. सविता संजय आव्हाड | --//-- |
| ४७) | मा. सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ४८) | मा. श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | --//-- |
| ४९) | मा. श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | --//-- |
| ५०) | मा. श्री. गाडे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५१) | मा. श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ५२) | मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ५३) | मा. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | --//-- |
| ५४) | मा. श्री. संजय रामदास जोशी | --//-- |
| ५५) | मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव | --//-- |
| ५६) | मा. श्री. राजकुमार बचाटे | --//-- |
| ५७) | मा. सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ५८) | मा. श्री. जाधव विठ्ठल किसन | --//-- |
| ६९) | मा. श्री. मेहेर विजयकुमार गजानन | --//-- |
| ६०) | मा. सौ. काळुसे मंदा धनंजय | --//-- |
| ६१) | मा. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ६२) | मा. श्री. घडामोडे भगवान देविदास | --//-- |
| ६३) | मा. श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

**संवाद** :

मा. महापौर : कोरम अभावी सभा एक तास तहकूब करण्यात येते. वेळ ११=०० वाजता. पुन्हा सभेला सुरुवात १२=०० वाजता.

श्री. अफसरखॉन :अतिक्रमण हटाव मोहिमेच्या वेळी मंदिर, मस्जीद इ. संबंधी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करावयास पाहिजे. दिल्लीगेट या भागात झालेल्या अतिक्रमण हटाव मोहिमे अंतर्गत टपऱ्या हटवितांना जी माती तसेच धार्मिक स्थळांची अतिक्रमण हटवितांना काहींच्या अंगावर पडली व कुणासही न जुमानता अतिक्रमण हटाव मोहिमेतील ति कर्मचाऱ्यांनी अतिरेक केला त्या विरुध्द निलंबनाची कार्यवाही व्हावी.

श्री. अविनाश कुमावत : शहरातील कोणत्याही धार्मिक स्थळाला पूर्व परवानगी शिवाय हात न लावता अतिक्रमण मोहिम राबवावी. कुणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत याची दक्षता घेणे जरुरीचे आहे. दिल्ली गेट येथे झालेल्या घटने बाबत संबंधितांवर कार्यवाही करण्याचे आदेशित करावे. कबरीचे / दर्गाहचे जे नुकसान झाले त्याचे म.न.पा. तर्फे बांधकाम करावे. (याच वेळी सभागृहात या प्रकरणावर प्रचंड आवाज होत असतो आपसात आवाज घुमतांना दिसतो. काहीही ऐकू येत नाही.)

मा. महापौर : सर्व स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सभागृहात शांतता राखावी.

श्री. अफसरखॉन : सभागृहात मागणी केल्या नुसार दिल्लीगेट येथील अतिक्रमण हटाव मोहिमेतील तिन कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निलंबनाची कार्यवाही करण्याचे बाबतीत आदेश व्हावा.

श्री. अ. रशिद (मामू) : सभागृह नेता व विरोधीपक्ष नेता यांनी सूचना केल्याप्रमाणे सभागृहात अतिक्रमणातील ज्या तिन कर्मचाऱ्यांनी दिल्लीगेट येथील जागे बाबत जी मोहिम हाती घेतली ती नियमबाह्य असल्याने त्यांच्यावर कार्यवाही करण्याचे प्रशासनाला आदेशित करावे.

मा. महापौर : सर्व स. सदस्यांना पुन्हा विनंती करण्यात येते की, सर्वांनी आप आपल्या जागेवर बसून घ्यावे व शांतता बाळगावी. (याच वेळी सभागृहात पुन्हा आरडाओरड स. सदस्य करतात. अतिक्रमण हटाव पथकातील तिन कर्मचाऱ्यांवर कार्यवाही व्हावी.)

मा. महापौर : स. सदस्य व विरोधी पक्षनेता यांनी जे निवेदन केले त्या बाबत दिल्लीगेट येथील कोणत्याही धार्मिक स्थळाला धक्का न लावता अतिक्रमण हटवितांना काळजीपूर्वक हटवावे व सभागृहातील भावना लक्षात घेता अतिक्रमण हटाव पथकातील तिन कर्मचाऱ्यांबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. आता इतर विषयांवर सभागृहात चर्चा न करता इतिवृत्तातील विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. १३५/१ :** मा. आयुक्त यांचे मंजुरी नुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका ८ डिसेंबर १९८२ रोजी अस्तितवात आली. महानगरपालिकेच्या एकत्रित असा कर्मचारी आकृतीबंध तयार करण्यासाठी एक सदस्य समिती महानगरपालिकेने स्थापन केली होती. सदर समितीने आपला अहवाल तयार करून प्रशासनास सादर केला होता सदर अहवाल १९९८ मध्ये सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीसाठी सादर करण्यात आला. सदर अहवालाबाबत चर्चा होऊन त्यातील तिन पदे मंजूर करून अन्य पदाबाबत फेर विचार करून सुधारित करण्याबाबत निर्णय झाला. त्यानुसार आता सुधारित कर्मचारी आकृतीबंध तयार करून सादर करण्यासाठी मुख्य लेखा परिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची समिती नेमण्यात आली.

सदर समितीने वेळोवेळी बैठका घेऊन कर्मचारी आकृतीबंधा बाबत सविस्तर चर्चा केली तसेच शासनाने नेमलेल्या मा. झा समितीच्या शिफारशीचा विचार करून सुधारित आकृतीबंध अंतिमरित्या तयार करण्यात आला. मा. झा समितीच्या शिफासरशीनुसार व अस्थापना खर्चाचे प्रमाण हे महसूली उत्पन्नाशी निगडीत न ठेवता एकूण खर्चा पैकी ३५% खर्च हा अस्थापनेवर व्हावा ही प्रमुख शिफारस आहे. सुधारित आकृतीबंधात या बाबीवर कटाक्षाने भर देण्यात आला. आहे.

महानगरपालिकेच्या आर्थिक स्त्रोत मजबूत करण्यासाठी कराच्या वसुलीसाठी व्यापक मोहिम राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक तेवढी कर्मचारी वृंद असेण आवश्यक आहे. तसेच महानगरपालिकेच्या उत्पन्नातून खर्च होणारा प्रत्येक पैसा हा नागरिकांना द्यावयांच्या सोयी सुविधांवर योग्य रितीने खर्च व्हावा या साठी योजना राबविणाऱ्या विभागाकडे आवश्यक तितका कर्मचारी वर्ग असावा हे सुत्र समितीने विचारात घेतले आहे. ढोबळ मानाने सुधारित आकृतीबंधाची रचना खालील प्रमाणे आहे.

| सध्या अस्तित्वात असलेली पदे | नविन मंजुर करावयाची पदे | एकूण पदे | वाढीव खर्च रु. ७.७५ कोटी |
|---|---|---|---|
| वर्ग-१ (विभाग प्रमुख) १२ | - | १२ | |
| वर्ग-१ (दर्जा प्राप्त) २१ | ४ | २५ | |
| वर्ग-२ - ३७ | ३० | ६७ | |
| वर्ग-३ १४९६ | ५६३ | २०५९ | |
| वर्ग-४ १६७९ | १२६२ | २९४१ | |
| एकूण | ३२४५ | ५१०४ | |

सध्या अस्तित्वात असलेल्या अस्थापने वरील वेतन व भत्त यांचा एकूण खर्च रुपये २०.०० कोटी आहे. तसेच दैनंदिन वेतना वरील कर्मचाऱ्यांचा खर्च रु. ७.७५ कोटी इतका धरल्यास एकूण खर्च रु. २७.७५ कोटी इतका होईल. सन १९९८-९९ मध्ये एकूण वार्षिक उत्पन्न रुपये ९२.३५ कोटी इतके अपेक्षित असून खर्च रु. ९२.२५ कोटी इतका होईल. नविन आकृतीबंध मंजूर केल्यामुळे अस्थापनेवर होणारा एकूण खर्च रु. २७.७५ कोटी हा सन १९९८-९९ च्या एकूण अंदाजित खर्चाच्या ३०.०८% इतका राहील. पाचवा वेतन आयोग लागू झाल्यास वेतनावरील खर्चाचत साधारणपणे १५% वाढ गृहीत धरल्यास एकूण अंदाजित खर्चाच्या ३४.६०% इतका राहिल त्यामुळे हा खर्च मा. ज्ञा. समितीच्या शिफारशीनुसार एकूण खर्चाच्या ३५% या मयाथ्दत राहतो.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद** :

श्री. अविनाश कुमावत : महानगरपालिकेतील स. सभासदांतून कमिटी स्थापन करून, कमिटीने दिलेल्या अहवालानुसार कर्मचारी आकृतीबंधावर निर्णय घेण्यात यावा.

श्री. अफसर खॉन : कर्मचारी आकृतीबंध या प्रस्तावात अगोदर स. सदस्यांच्या भावना लक्षात घ्याव्या व या प्रस्तावावर किती आर्थिक बोजा पडणार आहे याचा स. सदस्य अभ्यास करूनच निर्णय घेतील, यासाठी स. सदस्यांची समिती गठित करून निर्णय घेण्याचे सभागृहात निवेदन करावे.

श्री. जावेद रज्जाक : यापूर्वीही अनेकदा प्रकरणी समित्यांचे गठण करण्यात आलेले होते, त्या समित्यांचे काहीही झालेले नाही व त्यामुळे अशी समिती मला मान्य नाही.

श्री. हमीद उद्दिन ताबा : सध्या महाराष्ट्र शासनाने ५ वा वेतन आयोग लागू केलेला आहे त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सभागृहात प्रस्ताव ठेवावा लागेल. ज्यामुळे महापालिकेवर आर्थिक बोजा पडण्याची शक्यता आहे. त्यातच आता

कर्मचारी आकृतीबंध हा प्रस्ताव ठेवून पुन्हा महापालिकेची आर्थिक स्थितीत भर पडेल यापेक्षा यावर जादा चर्चा न करता सभागृहात एक समिती गठीत करूनच निर्णय घ्यावा.

श्री. नरेंद्र पाटील : माझ्या माहिती प्रमाणे कर्मचारी आकृतीबंध हा प्रस्ताव दानदा सभागृहात ठेवण्याची पुस्तिका तयार केलेला दिसून येतो. या मुळेंही बराचसा पैसा खर्च होतो. या आकृतीबंध पुस्तिकेत वेगवेगळ्या विभागची किती पदे आहेत व किती जादा पदे लागतात याची माहिती यात नमूद केलेले आहे. जास्तीत जास्त कर्मचारी यांची नविन पदे भरणेची प्रस्तावित आकृतीबंध केलेले आहे. ज्यामुळे महापालिकेवर आर्थिक बोजा पडेल. यासाठी स. सदस्यांची एक समिती गठीत करून पुन्हा फेरविचार होण्यास व काही दुरुस्ती होण्यास सदरची समिती विचार करेल व निर्णय घेईन.

श्री. गिरजाराम हाळनोर : सभागृहानेता व विरोधपक्षनेता यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यास आमचे अनुमोदन आहे. सभागृहात समितीची स्थापना करून त्यांना वेळेचे बंधन घालण्याचे आदेशित करावे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : या आकृतीबंध प्रस्तावित आराखड्यामुळे महापालिकेवर किती बोजा पडेल सध्या महाराष्ट्र शासन ५ वा वेतन आयोग लागू केलेला आहे त्याची अंमलबजावणी करावी लागणार आहे. या सर्व बाबींचा विचार लक्षात घेता आकृतीबंधात किती प्रमाणात पदांचा भरणा नविन पदांसाठी केलेला आहे याचा सारासार विचार करावा लागेल. बऱ्याच प्रकरणात प्रशासनाने आकृतीबंधाच्या नावाने पदे निर्माण करून भरणाही केलेले आढळून येते. सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज संशोधन केंद्र व इतर नवीन योजना बाबत तयार करीत असतांना काही पदे भरली आहेत व त्यावर फार मोठ्या प्रमाणात खर्च येत आहे. वास्तवित पाहता या संशोधनावरील खर्च हा शासनाकडील पैशाचा असावयास पाहिजे परंतु महापालिका फंडातून खर्च केल्या जातो. त्यामुळे शहरातील इतर विकास कामांवर खर्च अपुरा पडतो. या सर्वाबाबत विचार करणे अत्यंत जरुरीचे आहे. त्यामुळे प्रस्तावित आकृतीबंधा मुळेही म.न.पा. वर प्रचंड आर्थिक बोजा पडणार आहे.

सौ. लता दलाल : सध्या झोन निहाय साफसफाई व गटारीची लांबी / रुंदी किती प्रमाणात एका मजूराने दैनंदिन काम करावे. याचा अहवाल घेऊन एकंदरित त्या परीने किती कर्मचारी लागतील व शहराचे क्षेत्रफळ लक्षात घेऊन झोननिहाय लागणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सर्वांचा तपशिल द्यावा त्याच प्रमाणे ५ वा वेतन आयोग लागू होणार आहे. त्याची मनपा वर आर्थिक बोजा पडणार आहे. या सर्व बाबींचा विचार करून किती प्रमाणात मनपा वर आर्थिक बोजा पडणार याची माहिती सभागृहात द्यावी. लोकनियुक्त स. सदस्य यांची या प्रस्तावा बाबत समिती गठण करून निर्णय व्हावा व त्यास कालमर्यादा ठेवावी.

श्री. अशफाक सलामी : आकृतीबंध प्रस्ताव तयार करीत असतांना प्रशासनाने बाहेरी तज्ञ व्यक्तींचा सल्ला न घेता तयार केलेला आहे, ज्या समितीच्या नांवाने कर्मचारी आकृतीबंध तयार केलेला आहे तो "झा समितीचा" अहवाल महापालिकेकडे आलेला आहे काय? जर "झा समितीचा" अहवाल प्राप्त झालेला असल्यास सभागृहात सादर करावा. कोणत्या आधारे आपण प्रस्ताव तयार केलेला आहे. याबाबत पायाभूत मांडणी करणेसाठी सभागृहात माहिती

प्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सशोधन केंद्रामध्ये नियोजित ठिकाणी नव्याने कर्मचारी भरती केलेली आहे. कोणत्याही प्रकारचे मुलाखती न घेता नियुक्त्या केलेल्या आहेत ही बाब योग्य नसून प्रशासन दिशाभूल करीत आहे. त्याच प्रमाणे मागील महिन्यात आरोग्य विभागात जी भरती केलेली आहे. त्यामध्ये सेवायोजन / समाज कल्याण विभाग किंवा ट्राईब या विभागातील यादी न मागविता परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्दी देवून अर्ज मागवून मुलाखती घेतल्या. यासाठी अस्थापना हा विभाग प्रमुख असतांनाही त्यांनाही विश्वासात न घेता, मुलाखती घेऊन परस्पर आदेश काढले ही बाब गंभीर असून प्रशासन डोळेझाक करीत आहे, याबाबत आम्ही अन्यायाच्या विरोधात न्यायालयात जाणार आहोत व प्रशासन कसे दिशाभूल करते याकडे लक्ष देऊन कार्यवाही करण्यास भाग पाडणार आहोत.

श्री. भगवान घडमोडे : आतापर्यंत तीन वेळेस कर्मचारी आकृतीबंध सभागृहात विचारार्थ मांडला गेला. सदरील प्रस्ताव काही लोकाच्या हितसंबधाने ठेवलेला आहे. त्यामुळे महापालिकेवर आर्थिक बोजा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच ५ वा वेतन आयोग लागू होत आहे, त्यामुळे मनपाची आर्थिक स्थितीचा विचार करून या संदर्भात स. सदस्यांची एक समिती तयार करून त्यावर निर्णय घ्यावा व सुधारित आकृतीबंध दुरुस्तीसह ठेवावे.

श्री अ. रशिद (मामू) महाराष्ट्र शासनाचे जी. आर. काढलेला आहे की, भरतीवर बंदी आहे, त्यामुळे कर्मचारी आकृतीबंध प्रस्तावावर जादा चर्चा न करता समिती गठीत करून निर्णय घ्यावा.

श्री. मोहसिन अहेमद : कर्मचारी आकृतीबंध प्रस्तावावर एकंदर किती खर्च येतो याची माहिती द्यावी. तसेच यावर्षी आवश्यक किती पदे लागतील याची मंजुरी द्यावी व बाकी इतर पदांबाबत समितीची स्थापना करून सभागृहाच्या मंजुरीने निर्णय घ्यावा.

श्रीमती अलका पाटील : आकृतीबंध प्रस्तावामुळे महापालिकेवर आर्थिक किती पडणार आहे. सध्या दिवाळीच्या काळात जकातीची वसूली व्यवस्थित झालेली नाही, त्यामुळे ७७.०० लाखाची घट झालेली आहे. व मनपाचे नुसान झाले दैनिक वेतनावर बऱ्याच विभागात कर्मचाऱ्यांच्या नेमणूका केल्या जातात हे सभागृहाला माहीत नसते आणि आकृतीबंध प्रसतावा बाबत सर्वांना विश्वासात घेऊन कार्यवाही करावयास पाहिजे. परंतु प्रशासन याकडे डोळेझाक करीत आहे.

श्री. संजय केनेकर : ३५% च्या वर मनपावर आर्थिक बोजा पडणार नाही याची या प्रस्तावा संबंधात प्रशासनाने हमी द्यावी महानगरपालिकेत विविध ठिकाणी वेगवेगळी पदे रिक्त आहेत. ती प्रशासनाने कशी भरावी, या ठिकाणी महापालिकेकडे सिडको हस्तांतरण झाल्यानंतर लागणारा एकंदरित कर्मचारी वर्गाचा विचार करावा लागेल. काही उप-अभियंता व कनिष्ठ अभियंताचे पदे अस्थापनवेर रिक्त जागी भरणा केलेली आहे. ती कशी याची माहिती द्यावी.

डॉ. विजयकुमार मेहेर : सभागृहात सर्व संमतीने आकृतीबंध मंजुरीस्तव समितीची गठण करूनच निर्णय घ्यावा.

श्री. जावेद रज्जाक : माझ्या माहितीप्रमाणे आतापर्यंत चार वेळेस आकृतीबंध प्रस्ताव प्रशासनाने मांडलेला दिसून येतो. याच अनुषंगाने काही ठिकाणी कर्मचाऱ्यांची भरती केलेली आहे. आरोग्य विभागात बरीच पदांची नियुक्ती

केलेली आहे. प्रशासन काही बाबी अंधारात ठेवून कार्यवाही करते. यासाठी आकृतीबंध प्रस्ताव हा प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी ठेवलेला आहे. त्यामुळे सभागृहात संमती न देता सर्व नियुक्त समितीची गणना करावयाची झाल्यास पक्षपात न करता समिती नेमावी व समितीने अहवाल सभागृहा पुढे तातडीने सादर करावा.

श्री. गंगाधर गाडे : आकृतीबंध प्रस्तावातील जी आवश्यक पदे मागणी नुसार आहेत त्या बाब प्रशासनाने पदनिहाय जाणीवपूर्वक फुगवून आडे ठेवले आहेत. त्यामुळे आर्थिक बोजा मनपा वर पडणार आहे. ही बाब योगयण नाही. यापूर्वी सुध्दा याच संदर्भात कमिटीची स्थापना केलेली होती. त्याचे काय झाले याची माहिती मिळालेली नाही. यासाठी आकृतीबंध प्रस्तावांचा पुर्नविचार करून सर्व संमतीने समितीची स्थापना करून निर्णय घ्यावा कारण महानगरपालिकाची सध्याची आर्थिक परिस्थिती ठिक नाही. याचा विचार करणे जरुरीचे आहे. दिवाळीच्या काळात महानगरपालिकेने ७५ लाख जकात वसुली कमी केली आणि कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंध प्रस्तावातील खर्च मात्र ७.७५ कोटीची दाखवून ३५% खर्च अस्थापने वरील दाखविलेला आहे. त्याचप्रमाणे ५ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करावयाची झाल्यास त्याची ही बोजा मनपास पडले दिवाळीच्या महिन्यात काही दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांनी कामे केलेली असतांनाही त्यांना पगार मात्र दिलेला नाही, ही परिस्थिती महानगरपालिकेची असतांना कर्मचारी आकृतीबंध प्रस्तावचा बोजा मनपा सहन करणार काय? याचा सारासार विचार करूनच निर्णय घ्यावा.

श्री. प्रदिपकुमार जैस्वाल : महाराष्ट्र शासनाने "रमाकांत झा" महापालिका आयुक्त पुणे यांची सर्व आयुक्तांचे परिषदेतील आयुक्तांची समिती गठीत करून त्या समितीची प्रमुख पदी श्री. "झा" यांची निवड केली व त्यानुसार सर्व महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांची आकृतीबंध योजना तयार करून झा समितीच्या आधारे शासनाकडे शिफारस करण्याचे आदेशित केले. त्यानुसार या महानगरपालिकेने मा. आयुक्त यांच्या आदेशानुसार मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखाधिकारी, उप-आयुक्त (प्र.) उप-आयुक्त (म.) यांची समिती गठण करून व स. सदस्य यांचेशी चर्चा करून आठ दिवसात निर्णय घेऊन पुढील बैठकीत फेर प्रस्ताव सादर करावा.

श्री. जयवंत ओक : गेल्या १२ वर्षापासून महानगरपालिकेच्या आस्थापनवेर विविध पदांवर अनेक कर्मचारी कार्यरत आहेत, परंतु सर्व जाती धर्माच्या लोकांना नौकर भरतीत प्राधान्य असावे असा निष्कर्ष प्रशासनाने केला आहे काय? सिडको हस्तांतर काही दिवसात होणार आहे. या बाबतचा समावेश आकृतीबंधात केलेला आहे काय? महापालिकेतील एकूणच सर्व विभागात कशा प्रकारचे पदनिहाय कर्मचारी असावेत या बाबतचा अहवाल आहे काय? इतर महापालिकांमध्ये जसे आहेत तसे या शहराच्या सर्वांगिण विकासासाठी पाणी पुरवठा व जलनिस्सारण, विद्युत, यांत्रिकी तसेच विधी विभागाची पूर्णपणे व स्वतंत्र विभाग असणे अत्यंत गरजेचे आहे, आणि त्यामध्ये सर्व समाजातील स्तरांना नौकरीतील कर्मचाऱ्यांना प्राधान्य द्यावयास पाहिजे अशा प्रकारचा अभ्यास पूर्ण अहवाल पंधरा दिवसात पूर्ण करून समिती समोर ठेवून त्यावर

निर्णय झाल्यानंतर प्रशासनाने सभागृहाने मंजुरी दिल्यानंतरच कार्यवाही करावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : आकृतीबंध प्रस्तावामुळे महापालिका अस्थापनेतील खर्चाचा बोजा हा ३५% च्या वर जाणार नाही काय याची माहिती द्यावी. (या वेळेस अचानकपणे पत्रकार कक्षातील पत्रकार उठून निघून जात असतात.)

मा. महापौर : पत्रकार बंधुना विनंती की, त्यांनी पत्रकार कक्षाच्या बाहेर जावू नये, काही चूक झालेली असल्यास माफी करावी.

श्री. मनमोनहसिंग ओबेरॉय, श्री. गंगाधर गाडे : पत्रकार अचानकपणे कक्ष सोडून बाहेर जात आहेत. काय झाले आहे त्या बाबतची विचारणा करावी परंतु न विचारणा करता माफी मागणे म्हणजे सर्व शहराने माफी मागितली असे होईल.

श्री. गिरजाराम हाळनोर : पत्रकार कक्षातून पत्रका उठून जाणे बाबत काही घडलेले आहे काय? या बाबतची अगोदर माहिती घ्यावी. (याच वेळी काही स. सदस्य सभागृहाबाहेर जाऊन पत्रकारांशी चर्चा करून येतात)

श्रीमती फरहत बानो : कर्मचारी आकृतीबंध प्रस्ताव सध्या तरी मंजूर करू नये कारण त्यामुळे महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार आहे. अगोदर शहराच्या विकासाच्या बाबींसाठी महापालिकेकडे बजेट नाही त्यात लाईट व पाणी पुरवठ्याची आलेली देयकांची बिले भरण्यासाठी महापालिकेकडे पुरेसा निधी नाही तर मग आृकतीबंधामुळे महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार आहे. पर्यायाने नागरिकांवर बोजा पडणार आहे. याबाबत सविस्तर विश्लेषण घेणे जरुरीचे आहे.

श्री. अ. रशिद खान (मामू) : असे समजले की, जे पत्रकार सर्व सभेतील पत्रकार कक्षातून बाहेर जात आहेत त्यांना आजच्या बैठकतीतील विषयानुसार आकृतीबंध पुस्तिका जनसंपर्क विभगाने दिलेली नाही. प्रशासनाची ही भूमिका योग्य नसून यापूर्वीही अनेकदा असेच प्रकार जनसंपर्क विभागाचा झालेला आहे. सध्या जनसंपर्क विभाग अकार्यक्षम असून संबंधित अधिकाऱ्याची इतर विभागात बदली करावी व त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री. जयवंत : संबंधितांवर अशा चुकांमुळे सक्त ताकिद द्यावी. बदली करू नये.

श्री. अ. रशिदखान (मामू) जनसंपर्क अधिकाऱ्यांची अकार्यक्षमतेमुळे त्यांची इतरत्र बदली करावी सक्त ताकिद दिल्याने काहीही होत नाही.

मा. महापौर : प्रशासनाने तातडीने कडक कार्यवाही करावी.

श्रीमती फरहत बानो : आकृतीबंध कर्मचाऱ्यांसाठी प्रस्ताव ठेवलेला आहे. जो अयोग्य आहे. सध्या पाणी पुरवठ्यासाठी व लाईटचे पैसे देणेसाठी महापालिकेकडे पैसे नाहीत. महापालिकेची आर्थिक स्थिती नाजूक आहे. महापालिकेच्या एन-८ येथील दवाखान्यात पुरेशी यंत्र सामुग्री व औषधी पुरवठा होत नाही याबाबत लोकहित लक्षात घेऊन कार्यवाही करावी.

श्री. नरेंद्र पाटील : आता पर्यंत महापालिकेत पदनिहाय किती कर्मचाऱ्यांना नेमणूका दिल्या गेल्या याची माहिती द्यावी त्या प्रमाणे सिडको हस्तांतरण झाल्यानंतर या बाबतचा आकृतीबंधात समावेश आहे काय, नसल्यास का नाही, यासर्व अंतर्भूत प्रकरणी माहिती द्यावी.

श्री. जावेद रज्जाक : झोन-३ चे विभाजन होणार आहे. त्यानुसार किती कर्मचारी लागणार आहेत व झोनचे विभाजन अद्यापही का झालेले नाही. याचीही माहिती द्यावी.

सौ. पद्मा शिंदे : सिडको येथील काम करणारे कर्मचारी आहेत त्यांना सिडको हस्तांतरानंतर महापालिकेत अस्थापनेवर सामावून घेतले जावे व आकृतीबंध या पदाचा समावेश असावा.

मा. आयुक्त : प्रत्येक शहराची भौगोलिक व सामाजिक परिस्थिती विकासाची दिशा पाहुन महाराष्ट्र शासनाने महानगरपालिकेच्या त्या क्षेत्रातील एरियानुसार अस्थापनेवरील कर्मचारी यांच्या संबंधात काही नॉर्मस आकृतीबंधाच्या रुपात तयार करून "झा" समितीच्या माध्यमाने शासनाकडे पाठवावे असे निर्देश दिले आहेत. पुणे महानगरपालिकेचे आयुक्त श्री. रमाकांत झा यांच्या अध्यक्षतेखाली झा समिती शासनाने नियुक्त करून अहवाल सादर करावयाचे ठरले. या समितीत औरंगाबाद महानगरपालिकेचा सहभाग आहे सध्याची अस्थापना व त्यावरील खर्च आणि शहराचा विकास त्यासाठी लागणारा खर्च व लागणारे कर्मचारी ई. "झा" समितीने अहवाल दिला आहे. हा अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे. कर्मचारी आकृतीबंध व अस्थापनेवरील खर्चा बाबतचा संपूर्ण अहवाल हा समितीने नॉर्मस प्रमाणे आकृतीबंध तयार करून "झा" समितीने शासनाकडे पाठविला आहे. सदरचा अहवाल शासनाने अद्याप मंजूर केलेला नाही.

सभागृहाच्या काही स. सदस्यांनी या कर्मचारी आकृतीबंधा बाबत आक्षेप घेतलेले आहेत व काहींनी सुचनाही केलेल्या आहेत. सदरील आकृतीबंध प्रस्तावाच्या रुपाने कोणत्या विभागात किती व कशा प्रकारे कर्मचारी वर्ग असावयासा पाहिजे याचा सारासार तपशिलवार विचार व पडताळणी करूनच हा प्रस्ताव मंजुरीस्तव ठेवलेला आहे. यामध्ये शहराच्या विकासावरील खर्च व नव्याने पाचव्या वेतन आयोगाची शिफारस परिस्थितीची जाणीव लक्षात घेऊनच सभागृहात अत्यंत साधक बाधक चर्चा झाली सभागृहाने अनुभवी स. सदस्यांची एक समितीचे गठण करण्यास एक मुखाने मागणी केली. तत्पूर्वी वस्तुस्थिती अशी की, महापालिकेचे एकूण महसूली उत्पन्न ७९ कोटी रुपयाचे १९९८-९९ या आर्थिक वर्षात होईल असे अपेक्षित आहे. यात अस्थापनेवर २० कोटी रुपये खर्च गृहित धरलेला आहे. दैनिक / ठराविक वेतनावरील कर्मचाऱ्यांचा खर्च रुपये १.७७ कोटी येतो. असा एकूण २१.७७ काटी रुपये वार्षिक खर्च हा अस्थापनेवर होणारा आहे. सध्या महसूली उत्पन्नाच्या २७.८१% खर्च अस्थापनेवर होत आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मा. प्रशासक यांनी आकृतीबंधा बाबतची माहिती दिली आहे. पदाधिकारी / अधिकारी यांचा वाहनावरील पेट्रोलचा व इतर खर्च तसेच स. नगरसेवक यांचा मानधन इ. सर्व खर्च एकूण ४०% येऊ शकतो. प्रशासनाने या ठिकाणी २७.८१% खर्च होईल असा खुलासा केलेला आहे. "आकृतीबंध" मंजूर करण्यात येईल व भविष्यात विकासाच्या कामासाठी आर्थिक बाबींना सामोरे जावे लागेल. प्रशासनाने अपेक्षित खर्च धरलेला आहे तो चुकीचा आहे. योग्य तो खुलासा करावा.

मा. महापौर : मा. प्रशासनास खुलासा करू द्यावा नंतरच स. सदस्यांनी आपले म्हणणे मांडावे.

मा. आयुक्त : रुपये २७.८१% च्या खर्चात आकस्मित खर्च, वाहनावरील खर्च, निवृत्तीवेतन, स्टेशनरी इ. गृहित धरून ३५% पर्यंत खर्च होईल आकृतीबंधात ३२४५ पदे सध्या कार्यरत असून १८५९ नविन पदे असे सर्व मिळून ५१०४

कर्मचाऱ्यांची गरज अस्थापनेवर लागणार आहेत. अस्थापनेवर वाढीव कर्मचाऱ्यांचा खर्च ७.७५ कोटी खर्च होणार आहे. असा एकूण मिळून ४२% च्या आत शासनाच्या मापदंडाप्रमाणे आहे. ५ व्या आयोगाची कर्मचाऱ्याची वेतनवाढ लक्षात घेता १५ ते २०% संभाव्य वाढ अपेक्षित आहे. उत्पन्नाच्या दृष्अीने व अस्थापनेवर होणाऱ्या खर्चाचा विचार करून महसूली उत्पन्नातून ३५ कोटी इतका खर्च हा विकास कामासाठी राहू शकतो., कर्मचारी आकृतीबंधामध्ये "झा" समितीच्या मार्गदर्शक व तत्वानुसार ५०० चौ.मी. मध्ये एक सफाई कामगार असावा, ७०० रनिंग मीटर गटार सफाईसाठी एक मजूर, ४० सार्वजनिक (संडास) शौच्छालयाच्या शिट्स आहेत. त्यासाठी १ सफाई मजूर असावा. शहरातील सफासफाईचे एकूण क्षेत्र ३६,४५,००० चौ. मी. असून गटार लांबी ३,४०,००० रनिंग मिटर असून या क्षेत्रात एकूण १४७२ संडास / मुत्री आहेत. यापैकी २१८ सार्वजनिक संडास आहेत कचरा उचलून वाहून नेणाऱ्या ३२ गाड्या वरील दोन पाळीतील लागणारे मंजूर याचाही या कर्मचारी आकृतीबंधामध्ये समावेश केलेला आहे.

या ठिकाणी आकृतीबंध प्रस्ताव दुसऱ्या वेळेस सादर केलेला आहे. फरेतपासणी करून हा आकृतीबंध तयार केलेला आहे. स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी प्रशासनाने दैनिक वेतनावर किती कर्मचारी लावले याची माहिती द्यावी अशी विचारणा केली तर स. सदस्य श्री. अशफाक सलामी यांनी आरोगय विभागातील अस्थापनेवर जे कर्मचारी घेतले ते योग्य प्रकारे घेतलेले नाहीत. यासाठी समाजकल्याण, सेवायोजन कार्यालय व ट्राईब कार्यालयातून यादी मागविण्यात आलेली होती व मेडिलकलचे डिन यांना मुलाखतीसाठी बोलावून नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. यात कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. कटकट गेट येथील दवाखाना करीता लागणारा कर्मचारी यांचा समावेश आकृतीबंधात केलेला आहे व आकृतीबंध मंजूर होऊन शासनाकडे पाठविला जाईल व मंजूर झाल्यानंतर पुढील कार्यवाही शासनाकडे दिलेल्या नॉमर्स प्रमाणे करता येईल. सध्या शहरात विकसीत विविध उद्याने आहेत तयासाठी कर्मचारी लागणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय, मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्र यासाठी कर्मचारी लागणार आहे. शहरातील विकसित आयलंड व त्याची देखभाल करण्यासाठी कर्मचारी लागणार आहेत. विद्युत दिवे बसविणेसाठी लाईनमन, प्रत्येक झोनसाठी सफाई कर्मचारी या सर्व बाबींचा विचार करून लागणाऱ्या खर्चाचा मापदंड नजरेस ठेवून आकृतीबंध तयार केलेला आहे. स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनी सूचना केल्याप्रमाणे प्रशासनातील पाणीपुरवठा व जलनिस्सारण तसेच लाईट यांत्रिकी व विधी विभाग हा स्वतंत्र असावयास पाहिजे या सर्व सन्माननीय सदस्यांच्या सूचना व मागण्या लक्षात घेता त्या प्रमाणात खर्चही वाढला जातो. जायकवाडी प्रकल्प सध्या महापालिकेकडे हस्तांतरीत आहे. यासाठी मेंटेनन्स किती येतो याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्या ठिकाणेच प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांचा कालावधी संपल्यानंतर व प्रशासनातील अधिकारी यांना पूर्ण पणे माहिती व प्रशिक्षण झाल्यानंतर त्यांना त्यांच्या विभागात परत पाठविले जाईल व

महानगरपालिकेच्या अधिकारी यांची नेमणूक केली जाईल. या सर्व बाबींचा विचार करून सभागृहाने प्रस्ताव मंजूर करावा अशी शिफारस करण्यात येते.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : अस्थापनेवरील खर्च ३५% ऐवजी ४२% खर्च अपेक्षित आहे. आणि ५ व्या वेतन आयोगामुळे पुन्हा १५ ते २०% असे मिळून एकूण ६५% बोजा महापालिका प्रशासनावर पडणार आहे. इतर महापालिका प्रमाणे या ठिकाणी सुध्दा लाईट / पाणीपुरवठा व जलनिस्सारण रस्ते इ. विभाग वेगळेच आहेत. ज्यांना रु. ८.०० कोटीचा खर्च एका कार्यकारी अभियंता यांचेकडील कक्षात येतो. त्यासाठी एका कार्यकारी अभियंताची नेमणूक करता येते. शहराचा विकास होणेसाठी अस्थापनेवरील खर्च ४२% च्या वर न जाता मर्यादित असणे आवश्यक आहे. नसता शहराच्या विकासाकरिता १०० कोटीच्या निधीची मदत मागणी करावी लागेल.

श्री. प्रदिप जैस्वाल : स. सदस्य श्री. ओबेरॉय यांनी सुचविले की, अस्थापनेवरील खर्च ४२% च्या वर होणार आहे. तेंव्हा शासनाचे सुचना व मार्गदर्शक याचा विचार करता प्रशासनाला ४२% च्या वर खर्च करता येणार नाही. सध्या छत्रपती शिवाजी महाराज पुराणवास्तू संग्रहालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्रासाठी किती खर्च येणार याची माहिती द्यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सध्या संशोधन केंद्रासाठी लागणारा खर्च हा महानगरपालिकेच्या प्रशानाने न करता शासनाकडून निधी मागवून करावयास पाहिजे होता.

श्री. जयवंत ओक : औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर आहे. शहराचा केंद्रबिंदू लक्षात घेता या ठिकाणी वास्तू होणे आवश्यक आहे.

सौ. नुरजहाँ बेगम : प्रथमतः शहराचा विकास होणे आवश्यक आहे. त्यासाठी इतरत्र खर्च न करता विकास कामसाठी प्रशासनाने खर्च करावा.

श्री. नरेंद्र पाटील : "झा" समितीने पुणे महानगरपालिकेचा कार्यभार डोळ्यासमोर ठेवून आपला अहवाल तयार केलेला आहे व तो शासनाकडे पाठविला आहे. झा समितीच्या सूचना आहेत त्या सर्व महानगरपालिकांनी पाळल्या पाहिजे आकृतीबंध म्हणजे मिनी आयुक्तालय तयार करणार आहेत. आणि यासाठी आकृतीबंधावरील खर्च ३५% ऐवजी ४२% होत आहे तो ५२% होणार, १२०० चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गाचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवला त्याचा समावेश आकृतीबंधात आहे काय? व शासनाकडे पाठविलेला आहे काय याची माहिती द्यावी. सिडको हस्तांतरण झाल्यानंतर सिडको बाबतीत लागणारा खर्चाचा समावेश यात आहे काय?

मा. आयुक्त : सिडको हस्तातर बाबतचा आकृतीबंध समावेश करण्यात आलेला नाही. तो हस्तांतर झाल्यानंतर सभागृहाने ठरविल्यानंतरच करण्यात येईल.

श्री. स.अली. मिरा सलामी : आकृतीबंध तयार करीत असतांना बाहेरील तज्ञ व्यक्तींना पाचारण करावयास पाहिजे होते. जसे सेवानिवृत्त आय.ए.एस श्री. इंगुळकर, श्री. दहाट, श्री. प्रा. म्हस्के अशा लोकांची समिती नेमून आकृतीबंध तयार करावयास पाहिजे होता. परंतु प्रशासनाने एकाच ठिकाणी बसून आकृतीबंध तयारकेलेला आहे. आरोग्य विभागात बेकायदेशीर भरती करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता कोणत्याही प्रकारची भरती ही प्रशासनाच्या आस्थापनेतून नियमाप्रमाणे होत असते तशी झालेली नाही. यामध्ये फार

मोठ्या प्रमाणात सावळा गोंधळ झालेला असून भ्रष्टाचार झालेला आहे. याबाबतची स्वतंत्र चौकशी व्हावी. व नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

श्री. मुजीब आलमशहा खान : आस्थापनेवरील खर्च ३५% येणार आहे असे नमूद असतांना मा. आयुक्त यांनी तर ४२% खर्च अस्थापनेवर येणार आहे असे सांगितले तसेच सिडको हस्तांतरण झाल्यानंतर त्या ठिकाणी काम करणारे कर्मचार वर्गाना महानगरपालिका सामावून घेणार काय? याची माहिती द्यावी. अस्थापनेवरील खर्च ४२% या शिवाय ५ व्या वेतन आयोगामध्ये २०% खर्च वाढ असे गृहित धरता ६२% खर्च होणार आहे हे प्रशासकीय दृष्ट्या योग्य वाटते काय? सध्या शहरातील मालमत्ता व पाणीपट्टी वसुली अल्पशी असून याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

मा. महापौर : आकृतीबंध प्रस्ताव संदर्भात बरीच चर्चा झालेली आहे व स. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे सभागृहनेता व विरोधी पक्ष नेता यांनी दोन्हीही पक्षाकडील पांच पांच सदस्यांची नांवे जाहिर करावी त्याच सोबत महापौरांच्या अध्यक्षतेखाली उप-महापौर, सभापती, स्थायी समिती, सभागृह नेता व विरोधी पक्षनेता यांच्या सहित दहा इतर स. सदस्य यांची समिती गठीत करण्यात येते व त्यांनी १५ दिवसांत निर्णय घेऊन सभागृहाच्या मंजुरीस्तव सादर करावे.

**ठराव क्र. १३५/१ :** प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेली चर्चा विचारात घेता महानगरपालिका कर्मचारी आकृतीबंध बाबत सविस्तर अभ्यास करण्यासाठी एक उपसमिती गठीत करण्यात यावी. या उपसमितीमध्ये महानगरपालिका पदाधिकारी व मा. सभागृहनेता व मा. विरोधी पक्षनेता यांचे तर्फे सुचविण्यात येणारे प्रत्येकी पाच स. नगरसेवक यांचा समावेश राहील. उपसमितीचे अध्यक्ष मा. माहापौर राहतील असे सर्वानुमते ठरले. उपसमितीसाठी सूचविण्यात येणाऱ्या स. नगरसेवकांची नांवे मा. सभागृहनेता व मा. विरोधी पक्षनेता यांनी मा. महापौर यांचेकडे सुचवावीत.

याच बरोबर "जन-गण-मन" या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १९/११/९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**गुरुवार, दि. १९/११/९८ रोजी सकाळी ११.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात" "वंदे मातरम्" गिताने सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकारी व खालीलप्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. डॉ. कऱ्हाड भागवत | उपमहापौर |
| २) | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स. सभासद |
| ३) | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्माणराव | --//-- |
| ४) | स.स.श्री. अफसरखॉन यासिनखॉन | --//-- |
| ५) | स.स.श्री. लोखंडे रुख्मिणीबाई खंडेराव | --//-- |
| ६) | स.स.श्री. विधात प्रभाकर सिताराम | --//-- |
| ७) | स.स.सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ८) | स.स.श्री. म. सलीम म. हनीफ | --//-- |
| ९) | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| १०) | स.स.श्री. ॲड. गणेश किसनराव वानखेडे | --//-- |
| ११) | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | --//-- |
| १२) | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| १३) | स.स.श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १४) | स.स.श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --//-- |
| १५) | स.स.श्री. नरेंद्र यादव पाटील | --//-- |
| १६) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १७) | मा. श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १८) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| १९) | स.स.श्री. बैनाडे कंवरसिंग किशनसिंग | --//-- |
| २०) | स.स.सौ. शिंदे पद्मा बाबुराव | --//-- |
| २१) | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २२) | स.स.श्री. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २३) | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २४) | स.स.सौ. फरहत बानो भ्र. मो. नवाज | --//-- |
| २५) | स.स.श्री. फजलउल्ला खॉन अजमत खॉन | --//-- |
| २६) | स.स.श्री. अजिज खॉन गणी खॉ | --//-- |
| २७) | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो. मुश्ताफा | --//-- |
| २८) | स.स. श्रीमती नुरजहॉं बेगम अ. रहेमान | --//-- |
| २९) | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| ३०) | स.स.श्री. हाजी मोहसीन अहमद हाजी बशिर अहमद | --//-- |
| ३१) | स.स.श्री. मुजीब आलमशा मिर आलमशहा | --//-- |
| ३२) | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखोराद्दिन | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३३) | स.स.श्री. अ. जावेद रज्जाक | --//-- |
| ३४) | स.स. जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| ३५) | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३६) | स.स.श्री. तुळशिबागवाले किशोर बाबुराव | --//-- |
| ३७) | स.स. श्रीमती गंगवाल पुष्पाबाई सुरेशचंद्र | --//-- |
| ३८) | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा | --//-- |
| ३९) | स.स.श्री. म.अ.रऊफ अ. माबुद | --//-- |
| ४०) | स.स.श्री. स.अ. इकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन | --//-- |
| ४१) | स.स.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| ४२) | स.स.श्री. स. अली मिरा सलामी | --//-- |
| ४३) | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | --//-- |
| ४४) | स.स.श्री. संजय किसनराव केनेकर | --//-- |
| ४५) | स.स.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ४६) | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | --//-- |
| ४७) | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | --//-- |
| ४८) | स.स.सौ. शकुंतला हरीदास धांडे | --//-- |
| ४९) | स.स.डॉ.कु. माया लिंबाजी लाडवाणी | --//-- |
| ५०) | स.स.सौ. सविता संजय आव्हाड | --//-- |
| ५१) | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ५२) | स.स.श्री. अ. रशिद अ. सत्तार | --//-- |
| ५३) | स.स.श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | --//-- |
| ५४) | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ५५) | स.स.श्री. गाडे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५६) | स.स.श्री. मनमोहनसिंग करमसिंग ओबेरॉय | --//-- |
| ५७) | स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | --//-- |
| ५८) | स.स.श्री. संजय रामदास जोशी | --//-- |
| ५९) | स.स.सौ. हिवराळे जोत्सना दौलतराव | --//-- |
| ६०) | स.स.श्री. राजकुमार बचाटे | --//-- |
| ६१) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ६२) | स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ६३) | स.स.श्री. जाधव विठ्ठल किसन | --//-- |
| ६४) | स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | --//-- |
| ६५) | स.स.सौ. काळुसे मंदा धनंजय | --//-- |
| ६६) | स.स.सौ. कोल्हे सुनंदा उत्तमराव | --//-- |
| ६७) | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ६८) | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | --//-- |
| ६९) | स.स.श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

**संवाद** :

जावेद रज्जाक : स्व. राष्ट्रमाता इंदिरागांधी यांची आज जयंती निमित्त सभागृहात २ मिनिटे आदरांजली अर्पण करण्यात यावी.

श्री. अविनाश कुमावत : तसेच स. नगसेविका सौ. दलाल लता यांच्या सासूबाई रुख्मीणीबाई पंढरीनाथ दलाल यांचे ही दुखःद निधन झाल्यामुळे त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे. स्व. राष्ट्रमाता इंदिरा गाधी यांना सभागृहात आदरांजली, तसेच स. नगरसेविका सौ. लता दलाल यांच्या सासूबाई रुख्मीणीबाई पंढरीनाथ दलाल यांचे दुःखद निधना निमित्त सभागृहात ०२ मिनिटे स्तबध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात येते.

सभागृहात २.०० मिनिटे स्तब्ध उभे राहू श्रध्दांजली वाहण्यात आली.

श्री. अफसर खॉन : सभेची वेळ ११.०० वाजता आयोजित केलेली असते. परंतु नेहमीच सभा सुरु होण्यास वेळ होतो. यापुढे सभा दु. ११.३० वाजता आयोजित करावी.

मा. महापौर : ठिक आहे, यापुढे सभेचे आयोजन ११.०० ऐवजी ११.३० वाजता करण्यात येईल.

श्री. प्रदिपकुमार जैस्वाल : महापालिका प्रशासनाकडे १० दिवसांपूर्वी दोन प्रश्नांचे उत्तर मागविले होते. परंतु अद्याप पर्यंत मला उत्तर मिळालेले नाही. याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : मा. आयुक्त खुलासा करतील.

श्री. अफसरखान, श्रीमती नुरजहाँ बेगम : मागच्या बैठकीत दिल्लीगेट येथील धार्मिक स्थळ तीन कर्मचाऱ्यांनी कोणालाही न जुमानता मोडतोड केलेली होती. त्या संदर्भाने चर्चा होती. सदर कर्मचाऱ्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात येईल. असे आदेश दिले होते.

श्री. व्ही.व्ही. देशमुख : सभागृहात स. सदस्यांनी ज्यांच्या ज्यांच्या नावाची दुःखद निधनाबद्दल श्रध्दांजली अर्पण करण्याबातची सूचना केल्यावरच सभागृहात श्रध्दांजली अर्पण करण्यात येऊन तसा ठराव पारीत व्हावयास पाहिजे. परंतु काही स. सदस्यांनी अशी नावे सुचविण्या अगोदरच सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यात येते. जसे हैद्राबाद मुक्ती संग्रामातील स्व. श्री. विनायकराव चारठाणकर तसेच श्री. बेडेकर यांचे दुःखद निधानानिमित्त सभागृहात श्रध्दांजली अर्पण करावयास पाहिजे होती. यापुढे स. सदस्यांनी दुःखद निधन झालेल्यांची पण माहितीसह नावे सुचविल्यानंतरच एकत्रिक श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे. यापुढे असे होणार नाही. स. सदस्यांनी विचारलेल्या दोन प्रश्नाबाबत मा. आयुक्त खुलासा करतील.

मा. आयुक्त : मा. माजी खासदार यांचे दोन प्रश्नांपैकी एका प्रश्नांचे उत्तर दिलेले आहे. व एका प्रश्नांच्या उत्तरास उशीर झालेला आहे. त्याबद्दल प्रशासन दिलगिरी व्यक्त करीत आहे. परंतु त्याही प्रश्नांचे उत्तर सध्या प्रशासनाकडे तयार आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : महापालिकेच्या नियमाप्रमाणे १० दिवसांच्या आत माझ्या प्रश्नांचे उत्तर मिळावयास पाहिजे होते ते अद्यापही मला मिळालेले नाही. या ठिकाणी स. सदस्य सभा सुरु होण्या अगोदर मला उत्तर मिळावयास पाहिजे होते. ते मिळालेले नाही, आजही सभा तहकूब करावी.

श्री. गौतम खरात, श्री. गंगाधर गाडे, श्री. जावेद रज्जाक :स. सदस्य यांनी विचारलेल्या दोन प्रश्नांबाबतची उत्तरे प्रशासनाने द्यावी. पहिल्यांदा प्रश्न काय याचा खुलासा करावा.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री. गौतम खरात : महिला महापौर असतांना सभागृहात ---- असे शब्द बोलणे योग्य आहे का? सदर शब्द वगळून टाकावा. नियमाप्रमाणे प्रशासनाने उत्तर द्यावयास पाहिजे यास मीही सहमत आहे.

[या वेळी सभागृहात स.स. मोठमोठ्याने बोलतात स.स. जैस्वाल यांनी शब्द मागे घ्यावा असा आग्रह धरतात.]

सहा. संचालक नगररचना : स. नगरसेवक श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांनी विचारलेले प्रश्न असे की, ------

१) दिनांक १६/१०/१९९८ मध्ये संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये महापालिका प्रशासनामार्फत न.भु.क्र. १७८०४ मो. जयहिंद प्रेस कॉलनी, पैठणगेट येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेबाबत तडजोडीसाठीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव कोणत्या नियमाप्रमाणे स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला.

२) स्थायी समिती सभेत असे प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार आहे काय? असल्यास कोणत्या निमाप्रमाणे नसल्यास प्रशासनामार्फत असे प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्याचे प्रोव्हीजन काय? याबाबतची माहिती अभिप्रायसह अहवाल सभागृहात सादर करावा. अशी माहिती मागवलेली आहे.

मा. महापौर : मा. आयुक्त खुलासा करतील. माझ्याकडे सदर प्रश्नांची उत्तरे आलेली नाहीत.

श्री. प्रदिप जैस्वाल : मा. आयुक्तांनी खुलासा करु नये, आपण खुलासा करावा.

मा. महापौर : ३० मिनिटांसाठी सभा तहकबू करण्यात येऊन त्या वेळात प्रश्न सोडवून नंतर सभा सुरू करण्यात येईल. (वेळ अंदाज ११.४५ वाजता, सभेला सुरुवात १२.१५ वाजता.)

श्री. गौतम खरात : सभागृहात वेळ वाया घालवू नये, संबंधित अधिकारी यांनी उत्तर न दिल्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता यांनी सभागृहात योग्य शिस्त लागेल याची दक्षता घ्यावी.

मा. महापौर : सर्व स. सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

सौ. पद्मा शिंदे : आजच्या सभेला महिला आघाडीतर्फे बहिष्कार टाकण्यात येत आहे.

(याच वेळी काही महिला नगरसेविका या आजच्या सभेला बहिष्कार टाकण्यात येत आहे. असे मोठमोठ्याने बोलत होते. काही ही ऐकू येत नव्हते.)

मा. महापौर : आजची सभा तहकूब करण्यात येते.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्र गीताने सभा सपंल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ०३/१२/९८ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**दिनांक. १९/११/९८ रोजी तहकूब करण्यात आलेली सभा गुरुवार दिनांक ०३/१२/९८ रोजी दुपारी २.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात" "वंदे मातरम्" गिताने सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते. स. सभासदांची नावे हजेरी रजिष्टर प्रमाणे.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. डॉ. कऱ्हाड भागवत | उपमहापौर |
| २) | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स. सभासद |
| ३) | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्माणराव | --//-- |
| ४) | स.स.श्री. अफसरखॉन यासिनखॉन | --//-- |
| ५) | स.स.श्री. लोखंडे रुख्मिणीबाई खंडेराव | --//-- |
| ६) | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ७) | स.स.सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ८) | स.स.श्री. म. सलीम म. हनीफ | --//-- |
| ९) | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| १०) | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | --//-- |
| ११) | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| १२) | स.स.श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १३) | स.स.श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --//-- |
| १४) | स.स.श्री. भालेराव अभिमन्यू रामभाऊ | --//-- |
| १५) | स.स.श्री. नरेंद्र यादव पाटील | --//-- |
| १६) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १७) | मा. श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १८) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| १९) | स.स.श्री. बैनाडे कंवरसिंग किशनसिंग | --//-- |
| २०) | स.स.सौ. शिंदे पद्मा बाबुराव | --//-- |
| २१) | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २२) | स.स.श्री. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २३) | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २४) | स.स.सौ. फरहत बानो भ्र. मो. नवाज | --//-- |
| २५) | स.स.श्री. फजलउल्ला खॉन अजमत खॉन | --//-- |
| २६) | स.स.श्री. अजिज खॉन गणी खॉ | --//-- |
| २७) | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो. मुश्ताफा | --//-- |
| २८) | स.स.श्रीमती नुरजहाँ बेगम अ. रहेमान | --//-- |
| २९) | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| ३०) | स.स.श्री. हाजी मोहसीन अहमद हाजी बशिर अहमद | --//-- |
| ३१) | स.स.श्री. मुजीब आलमशा मिर आलमशहा | --//-- |
| ३२) | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखोराद्दिन | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३३) | स.स.श्री. अ. जावेद रज्जाक | --//-- |
| ३४) | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| ३५) | स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३६) | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३७) | स.स.श्री. तुळशिबागवाले किशोर बाबुराव | --//-- |
| ३८) | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा | --//-- |
| ३९) | स.स.श्री. म.अ.रऊफ अ. माबुद | --//-- |
| ४०) | स.स.श्री. स.अ. इकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन | --//-- |
| ४१) | स.स.श्री. धिरज खाकोरडिया | --//-- |
| ४२) | स.स.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण | --//-- |
| ४३) | स.स.श्री. स. अली मिरा सलामी | --//-- |
| ४४) | स.स.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ४५) | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | --//-- |
| ४६) | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | --//-- |
| ४७) | स.स.सौ. शकुंतला हरीदास धांडे | --//-- |
| ४८) | स.स.श्री. अब्दुल रशीदखॉन (मामू) | --//-- |
| ४९) | स.स.सौ. सविता संजय आव्हाड | --//-- |
| ५०) | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ५१) | स.स.श्री. अ. रशिद अ. सत्तार | --//-- |
| ५२) | स.स.श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | --//-- |
| ५३) | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ५४) | स.स.श्री. गाडे गंगाधर सुखदेव | --//-- |
| ५५) | स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ५६) | स.स.श्री. मनमोहनसिंग करमसिंग ओबेरॉय | --//-- |
| ५७) | स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे | --//-- |
| ५८) | स.स.श्री. संजय रामदास जोशी | --//-- |
| ५९) | स.स.श्री. गिरजाराम नानासाहेब हाळनोर | --//-- |
| ६०) | स.स.सौ. हिवराळे जोत्सना दौलतराव | --//-- |
| ६१) | स.स.श्री. राजकुमार बचाटे | --//-- |
| ६२) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ६३) | स.स.श्री. जाधव विठ्ठल किसन | --//-- |
| ६४) | स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | --//-- |
| ६५) | स.स.सौ. काळुसे मंदा धनंजय | --//-- |
| ६६) | स.स.सौ. कोल्हे सुनंदा उत्तमराव | --//-- |
| ६७) | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ६८) | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | --//-- |
| ६९) | स.स.श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

**संवाद** :

श्री. अविनाश कुमावत : गणपूर्ती पूर्ण होत नसल्याने सभा तहकूब करण्यात यावी.

श्री. गंगाधर गाडे : सभागृहात गणपूर्ती पूर्ण तर नाहीत याच बरोबर अधिकारी वर्ग पण नाहीत. महत्वाच्या प्रश्नांवर सभागृहात खुलासा करण्यासाठी अधिकारी वर्ग यांची आवश्यकता आहे. यात फक्त मा. आयुकत यांची उपस्थिती आहे.

मा. महापौर : यापुढे सभा सुरू होण्याच्या अगोदर अधिकारी वर्ग यांनी सभागृहात उपस्थित राहण्याची दखल घ्यावी. गणपूर्ती अभावी सभा ३० मिनिटे तहकूब करण्यात येते. (वेळ २.१० वा. सभेला सुरुवात २.४५ वा.)

स. विद्यमान नगरसेविका श्रीमत नुरजहाँ बेगम यांच्या आई पै. श्रीमती गौसिया बेग अ. शकूर यांच्या दु:खद निधन निमित्त ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करावी.

सुचक : श्रीमती आबेदा बेगम

अनुमोदक : श्री. रशिद खॉन (मामू)

यावेळी विद्यमान नगरसेविका श्रीमती नुरजहाँ बेगम यांच्या आई पै. श्रीमती गौसिया बेगम अ. शकूर यांना सभागृहात ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री. हमीउद्दीन ताबा : स. सभासद श्री. प्रदिपजी जैस्वाल यांनी मागील बैठकीत कोणत्या प्रश्नाबाबत माहिती मागविलेली होती. त्याचा खुलासा करावा. तसेच केवळ प्रश्नउत्तरोच्या वादावरून सभा तहकूब करता येते काय? याचा खुलासा व्हावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : स. सदस्य श्री. हमीद ताबा यांना प्रश्नाबाबत खुलासा पाहिजे की, प्रश्नांच्या उत्तराबाबतचा खुलासा पाहिजे. की, मागील बैठक तहकूब का झाली याबाबतचा खुलासा पाहिजे.

श्री. नरेंद्र पाटील : इतर स. सभासदांनी मध्ये बोलू नये. मा. महापौर यांना कशाच्या बाबतीत खुलासा करावयाचा हे माहित आहे.

श्री. अविनाश कुमावत : मागील बैठकीत ज्या प्रश्नांचा खुलासा विचारण्यसात आला होता त्या प्रश्नांच्या अनुषंगाने या बैठकीत चर्चा करू नये सदर तहकूब करण्यात आलेली बैठक केवळ खुलासां न दिल्यामुळे तहकूब करण्यात आलेली नाही.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

सहा. संचालक : स. सभासद श्री. जैस्वाल यांनी मागील बैठकीत विचारलेले प्रश्न.

१) दिनांक १६/१०/१९९८ च्या स्थायी समिती सभेमध्ये महापालिका प्रशासनामार्फत न.भु.क्र. १७८०४ मो. जयहिंद प्रेस कॉलनी, पैठणगेट येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेबाबत तडजोडीसाठीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव कोणत्या नियमाप्रमाणे स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला.

२) स्थायी समिती सभेत असे प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार आहे काय? असल्यास कोणत्या निमाप्रमाणे नसल्यास प्रशासनामर्फत असे प्रस्ताव सभेत ठेवण्याचे प्रोव्हीजन काय? याबाबतची माहिती विचारलेली होती त्या अनुषंगाने प्रशासन असे उत्तर देऊ इच्छिते की,

१) सदरचा प्रस्ताव न्यायप्रविष्ठ असून न्यायालया लागणारा कालावधी व अंतिम निर्णय या अनुषंगाने महापालिकेडे सादर केलेला तडजोडीचा प्रस्ताव काही विधी तज्ञाचा सल्ला घेऊन न.भु.क्र. १७८०४ मो.

जयहिंद प्रेस कॉलनी पैठणगेट येथील जागे बाबतचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ कलम ४८१ ग व ह अन्वये मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर सादर केलेला आहे.

२) वरील नियमाच्या तरतूद अंतर्गत सदरच्या प्रस्तावास मान्यता दिली.

३) वरील १ प्रमाणे स्थायी समितीस मंजूर करण्याचे अधिकार आहे.

श्री. नरेंद्र पाटील : स. सभासद यांनी दिलेल्या पत्रावरील दिनांक व संबंधित अधिकारी यांना खुलाशाबाबत दिलेल्या पत्राची दिनांक बाबतचा खुलासा करावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : सदर प्रश्न विचारणारे स. सभासद सभागृहात नाहीत ते प्रश्न व त्या प्रश्नाबाबतचा खुलासा विचारण्याचा अधिकार फक्त त्यांना आहे. तसेच आजची सभा ही तहकूब सभा असून मागील विषयावर चर्चा करू नये.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी प्रश्नाबाबतचा खुलासा केलेला आहे. दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री. अविनाश कुमावत : संबंधित अधिकारी यांनी खुलासा केलेला असून विषय क्र. १ वर चर्चा करावी.

याच वेळी आघाडीतील काही स. सभासदांनी विषय क्र. १ वर चर्चा करू नये. अगोदर सभागृहात स. सभासद यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबतचा खुलासा व्हावा असा आग्रह धरतात. मोठमोठ्याने बोलणे चालू असते काहीही एकू येत नाही.

मा. महापौर : सर्व स. सभासदांनी आपआपल्या जागेवर बसावे. नसता सभासदत्व रद्द करण्यात येईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : गेल्या दोन दिवसांपासून दै. सामना वृत्तपत्रा मध्ये महापालिका भूखंड घोटाळा बाबतचे खूप काही छापून येत आहे. हे कितपत सत्य आहे प्रशासनाने खुलासा करावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : नागरिकांच्या विकास कामा बाबत ज्या समस्या आहे, त्यावर चर्चा करावी विनाकारण कुण्याही प्रश्ना बाबतचा खुलासा विचारण्यात येऊ नये.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स. सभासद यांनी सभागृहात विचारलेल्या प्रश्नाबाबतचा खुलासा होणे गरजेचे आहे.

याच वेळी सभागृहात स. सभासदाचे मोठमोठ्याने बोलणे चालू असते. काही ऐकू येत नाही.

मा. महापौर : सर्व स. सभासदांनी आपआपल्या जागेवर बसावे. चर्चेसाठी नंतर अर्धा तसाचा वेळ देण्यात येईल. पहिल्यांदा विषय पत्रकावरील विषयावर चर्चा करावी.

**विषय क्र. १३६/१ :** दिनांक १७/१०/९८, २७/१०/९८, ०५/११/९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभाचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**संवाद :**

श्री. गिरजाराम हाळनोर : दि. ०५/११/९८ च्या इतिवृत्तातील पान क्र.३७ वर विषय क्र. १२५/४ मध्ये गेल्या बैठकीमध्ये सदरच्या विषयास मंजुरी देऊन प्रस्ताव मा. आयुक्ताकडे निर्णय झालेला होता. अशी दुरुस्ती इतिवृत्तांत करण्यात यावी.

श्री. हमीदउद्दन ताबा : सदरचा प्रस्ताव मंजूर करून प्रशासनाने कार्यवाही करण्याबाबतची दुरुस्ती करण्यात येऊ नये. नियमात कोणतेही टॅक्स माफ करण्याचे अधिकार नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीप्रमाणे चारीटेबल कामासाठीचे अधिकारी मा. आयुक्तांना आहे.

मा. महापौर : मा. आयुक्त यांनी या संबंधात आवश्यक ती कार्यवाही करावी अशी दुरुस्ती करण्यात येते.

श्रीमती. फरहत बानो : दिनाक ०५/११/९८ च्या सभेत माझा एक विषय स्थगित ठेवला होता त्यास मंजुरी देण्यात यावी.

श्री. अ. रशिद खॉ (मामू) दिनांक ०५/११/९८ च्या इतिवृत्तातील पान क्र. ३८ वरील विषयक क्र. १२६/५ त्यावेळी सूचक सभागृहात नसल्याने स्थगित ठेवण्यात आला होता त्यास मंजुरी देण्यात यावी.

मा. महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १३६/१ :** दिनांक ०५/११/९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील स्थगित ठेवण्यात आलेल्या विषय क्र. १२६/५ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रहेमानिया कॉलनी अंतर्गत किराडपुरा प्रा.शा. क्र. १ च्या मागील हबीब कॉलनी व फत्तेसिंगपुरा, भागात रोज मजुरी करून राहणाऱ्या चारेश नागरिकांची वस्ती असून या भागातील घरांना कर आकारणी ही करण्यात येत आहे. या भागात ड्रेनेज लाईनची व्यवस्था नसल्याने गरीब वस्तीत मानवता दृष्टीकोन महापालिकेतर्फे ड्रेनेज लाईन टाकण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

वरील दुरुस्तीसह दि. १७/१०/९८, २७/१०/९८ व ०५/११/९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३७/२ :** दिनांक ०१/०१/९८ रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार महापालिकाचे सचिव या पदावर नियुक्ती करण्यासाठी निवड समितीचे गठण करण्यात आले. निवड समितीने उमेदवाराचे अर्ज मागवून अहवाल तयार केलेला आहे. सदरील अहवाल मान्यतेस्तव सादर.

## <u>नगर सचिव रिक्त जागा भरणे बाबत निवड समितीच्या बैठकीचा अहवाल.</u>

नगर सचिव पदासाठी महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येऊन नामनिर्देशनद्वारे सदरचे पद भरण्यासाठी निवड समिती समोर इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखतीसाठी एकूण ६ उमेदवार उपस्थित होते. नामनिर्देशनाद्वारे भरण्यात यावयाच्या पदासाठी

१) कला, वाणिज्य विज्ञान आणि विधी शाखेची मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी.
२) अधिक्षक दर्जाच्या हुद्दाच्या जागेवर किंवा तत्सम संवर्ग नोकरीचा १० वर्षा पेक्षा कमी नसेल इतका अनुभव अशी पात्रता असणे आवश्यक आहे.

मुलाखतीस उमदेवार उपस्थित असलेल्या उमेदवारांपैकी :-

| | |
|---|---|
| १) श्री. पठाण एम. ए. - | अनुभवाची अट पूर्ण करत नाही. तांत्रिक संवर्गातील असून प्रशासकीय कामाचा व सेवा भरती नियमानुसार अनुभव नाही. |
| २) सौ. ज्ञानदा कुलकर्णी - | कामाचा अनुभव हा पदाशी समकक्ष नाही. |
| ३) श्री. बी. एफ पैठणपगारे- | अनुभ्व फक्त तीन वर्षाचा आहे. |
| ४) श्री. पी. के. खोब्रागडे - | अनुभवाची अट पूर्ण होत नाही. |
| ५) श्री. ओ. सी. शिरसाठ - | -//- |
| ६) श्री. विजय आनंदराव इंगळे | -//- |

अशा प्रकारे उपरोक्त सहा उमेदवारांपैकी एकही उमेदवार नगरसचिव या पदावर नेमणूक करण्यास योग्य नाही. असे निवड समितीचे मत आहे. त्यामुळे सध्या विभागीय अधिकारी या संवर्गात काम करीत असलेल्या अधिकाऱ्यांपैकी शैक्षणिक पात्रता व अनुभव अट पूर्ण करीत असलेल्या उमेदवारामधून सदरचे पद बदलीने नेमणूक देवून भरावे असे निवड समितीचे मत आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे दोन उमेदवार पात्र ठरतात.

| | | |
|---|---|---|
| १) श्री. पी. यु. तुर्कमाने, | बी.ए.पास | ७ वर्षाचा अनुभव |
| २) श्री. डी. ए. गिरी, | बी. कॉम. पास | ३१/०५/९१ पासून ३०/०८/९४ पासून ४ वर्षाचा अनुभव |

उपरोक्त दोन अधिकाऱ्यापैकी सेवा जेष्ठतेने व अनुभवाने श्री. पी. यु. तुर्कमाने, जेष्ठ ठरत असल्याने नगर सचिव या पदावर बदलीने त्यांची नेमणूक करण्याची समिती शिफारस करीत आहे.

**ठराव क्र. १३७/२ :** प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेली चर्चा विचारात घेता नगरसचिव या पदावर महानगरपालिका कर्मचाऱ्यामधून पात्र उमेदवार उपलब्ध होत नसल्यास त्यामधून हे पद भरण्यात यावे अन्यथा बाहेरील उमेदवाराची मागणी करण्यात यावी. तोपर्यंत विद्यमान सचिव श्री. एम. ए. पठाण यांनी नगरसचिव म्हणून काम पाहावे यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३८/३ :** सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रसताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता कामाक्षी लॉज ते लोटाकारंजा चौक या रस्त्याने बाधित होणाऱ्या न.भु.क्र. ६३९९/१ च्या मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहे. सदर मिळकतीचे एकूण क्षेत्र १९३.१५ चौ. मी. असून पैकी ८०.०० चौ. मी. क्षेत्र वरिल रस्त्यांने बांधित आहे.

महाराष्ट्र प्रोदशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना असल्याने सहा महिन्यात जमिन भुसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. सहा महिन्यात कार्यवाही झाली नाही तर सदर मिळकत आरक्षणातून वगळली जाते.

करिता रस्तयाने बांधित होणारे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादन करणेस आणि सदर प्रकरणात होणाऱ्या भूसंपादन खर्चास मंजुरी देणे योग्य. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. १३८/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार कामाक्षी लॉज ते लोटाकारंजा चौक या ५०' रुंद रस्त्यात बाधित होणारी न.भु.क्र. ६३९९/१ ची मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी ८० चौ.मी. क्षेत्र म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३९/४ :** सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव दिला आहे की, मो. विद्यापीठ गेट ते मकाई गेट हा रस्ता मंजूर विका योजना औरंगाबाद नुसार १२ मी. (४०) होता तो प्रारुप विका योजनेनुसार (१००) ३० मी रुंद करण्यात आला व प्रारुप विकास योजना शासनास मंजुरीसाठी सादर करतांना हा रस्ता (१०) २४ मीटर रुंद करण्यात आला आहे.

मकाईगेट ते विद्यापीठ गेट हा रस्ता भूसंपादन करून विकसित करणे आवश्यक आहे. औरंगाबाद शहरास भेट देणाऱ्या पर्यटकांची रहदारी याच रस्त्यावरून आहे. पानचक्की ते बिबिका मकबरा करीत मकाई गेट ते विद्यापीठ गेट हा रस्ता प्रारुप विकास योजनेनुसार विकसित करणे करिता जागा संपादित करण्यासाठीचा भूसंपादना करिता लागणाऱ्या खर्चाच्या मंजुरीसह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र. १३९/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार विद्यापीठ गेट ते मकाईगेट रस्त्यात बाधित होणाऱ्या मिळकतीचे भूसंपादन करून रस्ता विकसित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४०/५ :** सहाय्यक संचालक, नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ५०' फुट रुंद रस्ता देवडी बाजार ते लोटाकारंजा या रस्तयाने बाधित होणाऱ्या न.भु.क्र. ६५१२, ६५१२ व ६५१४ च्या मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहे. सदर मिळकती एकमेकास लागून आहेत व सदर मिळकतीच्या दोन्ही बाजू कडील मिळकती महानगरपालिकेने यापूर्वीच संपादन केलेल्या आहेत. सदर मिळकतीचे एकूण क्षेत्र  व संपादन करावयाचे क्षेत्र (अंदाजे) खालीलप्रमाणे आहे.

| न.भु.क्र. | एकूण क्षेत्र | रस्त्याने बाधित होते. |
|---|---|---|
| ६५१२ | १३८.९० चौ.मी. | ६८.७५ चौ.मी. |
| ६५१३ | १०३.३० चौ.मी. | ८८.५० चौ.मी. |
| ६५१४ | ८६.९० चौ.मी. | ८०.६२ चौ.मी. |

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना असल्याने सहा महिन्यात भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचकडे पाठविणे आवश्यक आहे. सहा महिन्यात कार्यवाही झाली नाही तर सदर मिळकत आरक्षणातून वगळली जाते.

करिता रस्त्याने बाधित क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादन करणेस आणि सदर प्रकरणात होणाऱ्या भूसंपादन खर्चास मंजुरी देणे योग्य. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. १४०/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार देवडीबाजार ते लोटाकारंजा या ५०' रुंद रस्त्यात बाधित होणाऱ्या न.भु.क्र. ६५१२, ६५१४

या मिळकतीपैकी खालील दर्शविल्यापमाणे म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| न.भु.क्र. | रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र |
|---|---|
| ६५१२ | ६८.७५ चौ.मी. |
| ६५१३ | ८८.५० चौ.मी. |
| ६५१४ | ८०.६२ चौ.मी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४१/६ :** सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ५०' रुंद रस्ता कामाक्षी लॉज ते लोटाकारंजा चौक ह्या रस्त्याने बाधित होणाऱ्या न.भु.क्र. ६४२१ व ६४२२ च्या मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहे. सदर मिळकतीचे एकूण क्षेत्रापैकी ७२.७५ चौ.मी. क्षेत्र वरील रस्त्याने बाधित आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना असल्याने सहा महन्यात जमीन भूसंपादन प्रसताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. सहा महिन्यात कार्यवाही झाली नाही तर सदर मिळकत आरक्षणातून वगळली जाते.

करिता रस्त्याने बाधित होणरे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ भुसंपादन करणे आणि सदर प्रकरणात होणाऱ्या भूसंपादन खर्चासह मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री. रशिद खॉन (मामू) : प्रस्तावावर सविस्तर माहिती द्यावी.

सहा. संचालक नगररचना : सदर प्रस्तावातील न.भु.क्र. ६४२१ व ६४२२ मिळकत धारकाने मु.प्रा.व.न. १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहेत. सहा महिन्याच्या आत जमीन भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. नसता सदर मिळकत आरक्षणातून वगळली जाते.

श्री. रशिदखॉन मामू :सदर प्रस्तावामध्ये खरेदी दाराची नावे दर्शविण्यात आलेली नाही असे अर्धवट प्रस्ताव सभागृहात प्रशासनाने ठेवू नये.

मा. महापौर : यापुढे संबंधित विभागातील अधिकारी यांनी पुरेपुर महितीसह प्रस्ताव ठेवावे. प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १४१/६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार कामक्षी लॉज ते लोटाकारंजा या ५०' विकास रस्त्यात बाधित होणाऱ्या न.भु. ६४२१ व ६४२२ या मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी ७२.७५ चौ. मी. क्षेत्र म.प्रा.व.र. अधिनियम १४६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४२/७ :** सहाय्यक संचालक, नगररचना यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराचे वाढीव हद्दी करिता मंजूर केलेल्या विकास योजना मध्ये मो. हर्सूल स.नं. २ ही शासकीय मालकीची जमीन ना विकास क्षेत्रात आहे. ह्या जमिनी पैकी उपलब्ध १

एकार २० गुंठे जमीन महानगरपालिकेस देण्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांनी सहमती दर्शविली आहे.

गावठाणा लगत व मुख्य हमरस्ता जळगांव राज्य मार्गालगत असलेली ही जमीन लगतचा विकास गावठाणातील भविष्यातील विका विचारात घेता मुलांना खेळण्यासाठी असणारी क्रीडांगणाची गरज पाहता क्रीडांगणाचे वापरासाठी आरक्षित ठेवण्याचा व त्या अनुषंगाने मंजूर विकास योजना (वा.ह.) मध्ये किरकोळ फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयोच कार्यवाहीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर महाराष्ट्र पादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाची कार्यवाही व प्रस्ताव शासनाकडे अंतिम मान्यतेसाठी सादर करण्याकरिता ठरवून दिलेल्या कार्यपध्दती नुसार जनतेकडून आक्षेप / सूचना / हरकती मागविण्याचे व प्राप्त आक्षेप / सूचना / हरकती करिता संबंधितास सुनावणीची संधी देवून त्यावर निर्णय घेण्याबाबतचे पत्र व्यवहाराचे सर्व अधिकार मा. आयुक्तांकडे देण्यात यावेत असेही प्रस्तावित करण्यात येते.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**
मा. महापौरः शाळा क्रीडांगण, अशी दुरुस्ती करून मंजूर करण्यात येते.

**ठराव क्र. १४२/७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचे वाढीव हद्दिकरिता मंजूर केलेल्या विकास योजनेमध्ये शासकीय मालकीची हर्सूल गावठाणालगत व मुख्य हमरस्ता जळगांव राज्य मार्गालगत असलेल्याना विकास क्षेत्रातील शासकीय जमिनीची स.नं.२ मधील एक एकर २० गुंठे जमीन मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी महानगरपालिकेस देण्यासाठी सहमती दर्शविली आहे. मौजे हर्सूल भागचा भविष्यातील विकास विचारात घेता शाळा व क्रीडांगणाचे वापराकरिता आरक्षित ठेवण्यास आणि त्या अनुषंगाने मंजूर विकास योजने (वाढीव हद्द) मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच वरील अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेत करण्यात येणाऱ्या किरकोळ फेरबदलाबाबत ठरवून दिलेली कार्यपध्दती आणि त्यावर निर्णय घेऊन पत्र व्यवहार करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४३/८ :** सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ५६ प्राथमिक शाळेत वाढ करणे व प्रारुप विकास योजनेत आरक्षण क्र. ४७ "खेळाचे मैदान" मध्ये न.भु.क्र. ८१६५ व ८१६६ ह्या पूर्णतः बाधित होतात. त्यांचे क्षेत्र अनुक्रमे १२१.९० चौ. मी. व ५८२.५० चौ.मी. असे आहे. ह्या न.भु. क्रमांकाचे मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिलेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना असल्याने सहा महिन्यात जमीन भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. सहा महिन्यात कार्यवाही झाली नाही तर सदर मिळकत आरक्षणातून वगळली जाते.

करिता रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादन करणेस आणि सदर प्रकरणत होणाऱ्या भूसंपादन खर्चास मंजुरी देणे योग्य. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. १४३/८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ५६ प्रा. शाळेत वाढ करणे व प्रारुप विकास योजनेत आरक्षण क्र. ४७ खेळोच मैदान मधील न.भु.क्र.८१६५ व ८१६६ या मिळकतचे अनुक्रमने १२१.९० चौ.मी. व ५८२.५० चौ. मी. क्षेत्र म.प्रा.न. र. अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४४/९ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगपुरा भाजी मंडई समोर महानगरपालिकेच्या दुकानावर पहिला मजला बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन १९९७-९८ च्या जिल्हा दरसूची नुसार रक्कम रु. २५,८७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त महोदय यांनी प्रत्यक्ष अनुदान प्राप्तीअंती कार्यादेश देण्यात येईल या अटीवर दिनांक ०४/०८/९८ रोजी मान्यता दिलेली आहे.

सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान २० कोटी अंतर्गत प्रस्तावित करण्यात येईल. तरी उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुप. २५,८७,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. कुमावत अविनाश : अधिकारी यांनी माहिती द्यावी

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी सविस्तर माहिती द्यावी.

शहर अभियंता: औरंगपुरा भाजी मंडई समोर महानगरपालिकेच्या ३१ दुकांनावर पहिला मजला बांधणेचा हा प्रस्ताव असून सदर बाजूला रस्ता रुंदीकरणामध्ये काही लोकाचे दुकान काढण्यात येणार असून त्यांना या होणाऱ्या नविन दुकान देण्याची कार्यवाही करण्यांत येईल. सदर बांधकाम हे प्राप्त होणाऱ्या अनुदानातून करण्यात येईल.

श्री. अविनाश कुमावत : कोणत्या अनुदानातून सदरचे कामा बाबतची कार्यवाही होणार आहे.

श्री.स.अली. मीरा सलामी, श्री. गंगाधर गाडे, अफसर खान :

शासनाकडून येणाऱ्या अनुदानातून सदर बांधकाम करणार आहे. शासनाने विचारलेल्या मागील वर्षिच्या ४ कोटीचा हिशोब प्रशासनाने का दिला नाही. याची माहिती द्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : मा. मुख्यमंत्री यांनी महानगरपालिका विकास कामासाठी ५ कोटीचे अनुदान मंजूर केले आहे. परंतु महानगरपालिका प्रशासनाने मागील ४ कोटीचे होणाऱ्या खर्चा बाबतचा हिशोब दिलेला नाही. म्हणून ५ कोटी रु. महानगरपालिकेला मिळालेले नाही. दुर्दैव आहे अशा बाबीचा ही खुलासा या ठिकाणी प्रशासनाच्या कक्षात आणून द्यावा लागतो.

सौ. लता दलाल : सध्या अस्तित्वात असलेल्या दुकानाचा मूळ पाया पक्का असेल तर पहिला मजल्यावरील दुकाने काढण्याची कार्यवाही करण्यात यावी. जेणेकरून पुढे भविष्यात प्राण हानी होणार नाही. याबाबत खुलासा करावा.

शहर अभियंता : पहिल्या मजल्यावरील जी दुकाने काढण्यात येणार आहे, सद्य परिस्थिती असलेल्या दुकानाच्या सर्व बाजूने कन्स्ट्रक्शन करण्यात येणार असून प्रस्तावित बांधकाम खाली असलेल्या मजल्यास काहीही लोड येणार नाही.

श्री. मुजीब आलमशा खॉन : शासनाने दिलेले ४ कोटी रुपये कोठे खर्च केले याचा खुलासा व्हावा या अगोदर अधिकारी यांनी सभागृहाला याबाबत माहिती दिलेली नसून शासनाकडेही विकास कामावर खर्च केले की नाही याची माहिती दिली नाही. यास जबाबदार कोण? शासनाने ५ कोटी रुपये देण्याबाबतचाही खुलासा द्यावा.

श्री. नरेंद्र पाटील : शासनाने दिलेले चार कोटी रुपये हे ज्या हेड खाली खर्च करावयाचे पाहिजे होते, त्यानुसार खर्च केलेले नाही. दुसऱ्याच कामावर खर्च झालेले आहे. त्यामुळे प्रशासन खुलसा करू शकत नाही.

मा. महापौर : ४ कोटी रु. खर्चाच्या बाबींवर नंतर चर्चा करण्यात यावी. विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. १४४/९ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगपुरा भाजी मंडी समोरील महानगरपालिकेच्या दुकानावर पहिला माला बांधण्याच्या कामासाठी रक्म रु. २५,८७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४५/१० :** अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, संस्थान गणपती ते हरी मस्जिद, नवाबपुरा, गौरीपुरा येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामसाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकामा खात्याचे डी.एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रुप १०,७८,६००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "पुर्नडांबरीकरण" या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १४५/१० :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संस्थान गणपती ते हरी मस्जीद नवाबुपरा, गौळीपुरा, येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रुपये १०,७८,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४६/११ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, देवा नगरी ने प्रतापनगर स्मशानभूमी पर्यंत खडी रस्ता व नाल्यावर पाईप कल्वहर्ट बांधणेच्या कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये १५,००,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च सन १९९८-९९ च्या शासकीय अनुदान (भांडवली रस्ते) नवीन खडी रस्ते मधून करण्यात येईल.

करिता प्रस्ताव मंजुरीसतव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. मनमोहसिंग ओबेरॉय : प्रतापनगर व देवानगरी या जागेचे मिळकत धारक यांनी महानगरपालिकेला बेटरमेंट चार्जेस दिलेले नाहीत. सदरचा भाग सेल्फ डेवहलपमेंट करण्याबाबतचे संबंधितांनी अंडरटेकींग दिलेले आहे. सदर प्रस्ताव मध्ये दर्शविलेल्या कामासाठी महानगरपालिकेने शासकीय अनुदानातून पैसा खर्च करणे योग्य वाटत नाही. स्मशान भूमी ही दोन्ही ले

आऊटच्या मध्ये आलेल्या असून संबंधित ले-आऊट धारकांनी या कामावर खर्च करावा तो प्रस्ताव मंजूर न करता पुढच्या बैठकीत संपूर्ण माहिती घ्यावी तूर्त स्थगित ठेवावा.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी सविस्तर माहिती द्यावी तूर्त स्थगित ठेवावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : दोन्ही कन्वर्ट ले-आऊट मध्ये नाहीत प्रस्ताव मंजूर करावा.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

अति. शहर अभियंता : सदरील रस्ता डी.पी.चा आहे का? याबाबत नकाशा बघून ५ मिनिटाने उत्तर देण्यात येईल.

(याच वेळी सभागृहात मोठमोठ्याने स. सभासद यांचे बोलणे चालू असते. काही ऐकू येत नाहीत याच वेळात....)

**ठराव क्र. १४६/११ :** सर्वानुमते असे ठरले की, सदरचा प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात येतो. सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**विषय क्र. १४७/१२ :** "फेर प्रस्ताव"

सर्वसाधारण सभा कामकाजाच्या तरतूदीनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-२ अंतर्गत नियम क्र. १(ज) अन्वये सर्वसाधारण सभा दिनांक १७/०७/९७ नुसार महानगरपालिका हद्दितील चिकलठाणा व स्टेशन रोड, औद्योगिक वसाहतीतील (लघू उद्योजकांसाठी) त्या उद्योग प्रक्रीया करून जॉबवर्क, लेबर चार्ज बेसीसवर करतांना प्रक्रीया झाल्यावर परत मुळ उद्योजकांकडे उक्त प्रक्रीया झालेला माल परत करतांना, अशा लघू उद्योजकांसाठी सर्वसाधारण समेत ठराव क्र. ६३/०८ दि. १७/०७/९७ अन्वये खालीलप्रमाणे ठराव पारीत केला आहे.

औरंगाबाद महानगरपालिका जकात नियमांत केवळ प्रक्रीयासाठी महानगरपालिका हद्दित येणाऱ्या व प्रक्रीयेनंतर परत हद्दिबाहेर जाणाऱ्या मालाला जकात करातून सुट देण्याची तरतूद "आर फार्म" द्वारा करावी ज्यामुळे महानगरपालिकेचे जकात व मालमत्ता करामुळे उत्पन्न वाढेल ही जकात आकारणी जकात टक्केवारी ०.१०% दराने आकारण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी ठरावातं सूचित केल्याप्रमाणे वैधानिक कार्यवाहीसाठी प्रशासनामार्फत प्रस्तावाची छाणणी करून खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

औरंगाबाद महानगरपालिका जकात नियम १९८४ अंतर्गत दुरुस्ती करणे अनिवार्य असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४९,४५४,४६४ अंतर्गतची पूर्तता करण्यांच्या दृष्टीने स्थानिक वर्तमानपत्रातून जाहीर प्रगटन देऊन पंजीकृत लघू उद्योजकाकडून "आर फार्म" ची कार्यपध्दती आणि नमूना व त्या संबंधी नियम, अटी व शर्तीच्या प्रारुप मसुद्यावर व कार्यपध्दतीवर जाहीर प्रगटनाद्वारे हरकती व सूचना मागविल्या होत्या, प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांची दि. १५/१०/९८ रोजी सुनावणी घेण्यात आली असून त्या सुनावणीचे अनुषंगाने प्रशासनाने छाननी करून सर्वसाधारण सभेच्या ठरावाप्रमाणे प्रक्रीयासाठी आयात होणाऱ्या मालावर जकात आकारणी, जकात टक्केवारी ०.१०% आकारणे ऐवजी एकूण जकातीच्या १०% सेवाशुल्क जकात आकारणी करावी असे प्रस्तावित केले आहे. जेणे करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही. या दृष्टीकोनातून जकात नियम क्र. १६ मध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या नियमामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणे योग्य होईल.

१६(आय) प्रक्रीयेसाठी आयात करून प्रक्रीयोत्तर निर्यात करणाऱ्या मालावर जकात आकारणी करणे.

माल प्रक्रीयेसाठी आयात केलयावर निर्मिती प्रक्रीयेद्वारे किंवा अन्य कोणत्या ही पध्दतीने मालाच्या किंवा अन्य कोणत्याही पध्दतीने माकाच्या मूह स्वरुपात, स्थितीमध्ये, आकारमानात, बाह्यस्वरुपात गुणर्धात कोणताही बदल झालेला नाही. अशा प्रकारच्या आयात केलेल्या व प्रक्रीयेनंतर निर्यात केलेल्या मालावर सोबत जोडलेल्या आर फॉर्म नियम व अटीच्या अधीन राहून जकात कराची आकारणी "आर फार्म" द्वारे करण्यासाठी सविस्तर प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर. (सोबत आर फार्मच्या मसुदा नियमावली जोडली आहे.)

**संवाद :**

श्री. नरेंद्र पाटील : सदरचा प्रस्ताव दि.१७/०७/९७ च्या सर्वसाधारण सभेत मंजूर झालेला होता. परंतु सभागृहाने काही नॉमर्स बदल म्हणून सूचना केली व या आजच्या बैठकीत छोट्या उद्योजकांना आर फॉर्म नुसार उशीरा का होईना सवलत देण्याची कार्यवाही केलेली असून सदर प्रस्ताव मंजूर झाला म्हणून काही उद्योग संघटाकांनी स. सदस्यांना अम्बेसेडर हॉटेल येथे सत्कार करण्यात आला होतो. परंतु आजच्या सभेत खऱ्या अर्थाने या ठरावास मंजुरी मिळालेली आहे. परंतु भविष्यात अशा चुकीच्या माध्यमातून सत्कार करणे हे योग्य वाटत नाही. याची इतिवृत्तात नोंद घ्यावी.

श्री. रशिदखॉन (मामू) त्यावेळी महापौरांचा सत्कार झाला. महापौरांचा मान म्हणजे सभागृहाचा मान होता.

मा. महापौर : प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १४७/१२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दितील लघुउद्योग कडून प्रक्रियेसाठी बाहेर पाठविण्यात आलेल्या मालावर मालाच्या मूळ स्वरुपात स्थिती मध्ये आकारमानात बाह्य स्वरुपात, गुणधार्मात कोणताही बदल न करता प्रक्रियेनंतर निर्यात केलेल्या मालावर सर्वसाधारण सभा इराव क्र. ६३/१८ दि. १७/०७/९७ अन्वये लागू करावयाच्या "आर फॉर्म" नियम व अटीच्या अधीन राहून ०.१०% ऐवजी एकूण जकातीच्या १०% सेवाशुल्क आकरणी करण्यास आणि जकात नियम क्र. १६ मध्ये अस्तित्वात असलेल्या नियमामध्ये १६(आय) प्रक्रीयेसाठी आयात करून प्रक्रियेनंतर निर्यात करणाऱ्या मालावर जकात आकारणी करणे अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## आर फार्मची नियमावली खालीलप्रमाणे

## "आर फॉर्म" सवलत नियम व अटी, शर्ती

१) आर फॉर्म सवलतीचे नियम व अटी वरतील आयात केलेल्या मालावर महानगरपालिकेच्या हद्दित प्रक्रीया केल्यानुसार मालाची निर्यात करतांना मालाच्या मूळ स्वरुपात, मुळ गुणधर्मात, मुळ आकारमानात, मुह स्थितीत बाह्य स्वरुपात बदल होणार नाहीत, असाच लघू उद्योजकांना "आर फॉर्म" ची सवलतीची परवानगी देण्यात येईल. मुंबई जकात कर नियम १९६६ मधील "आर फॉर्म" सवलत नियम (७) [अ] (ब) मधील तरतुदीप्रमाणे त्याचा आधार घेऊन "आर फॉर्म" सवलतीचा परवाना देण्याचे अधिकार आयुक्तांना राहतील, यासाठी

आयुक्तांना वाटल्यास प्रक्रीया उद्योगाची पाहणी करून सक्षम प्रक्रीया पाहण्याचा किंवा कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करून पाहण्याचा अधिकार राहील. त्याची खात्री पटल्यावरच तो परवाना देण्यात येईल.

याच तरतूदीच्या आधारे महानगरपालिका औरंगाबाद मध्ये खालील प्रक्रीया उद्योजकांना ही सवलत लागू होईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | रंगवणी | २ | रासायनिक द्रव्याने सफेद करणे |
| ३. | रंग देणे | ४. | छपाई |
| ५. | शेवटच्या सफाईच हात देणे | ६. | ताठ/खणखणीत करणे |
| ७. | नक्षीकरण | ८. | डब्लींग |
| ९. | पीलवटणे | १०. | धातुरूप देणे. |

गरज वाटल्यास आधौगिक विभागाकडून वरील बाबीचे प्रमाणपत्र मागविण्यात येईल.

२) अर्जदाराने परवानगी देण्यात आलेल्या मुदतीत म्हणजेच ९० दिवसांच्या आंत मालाची प्रक्रीयोत्तर निर्यात करावी लागेल, अन्यथा विहित कालावधीनंतर आयातीच्यावेळी ठेवण्यात आलेली तात्पुरती अनामत रक्कम (९०%) किंवा कायम अनामत रक्कम जकात कराच्या रक्कमेपोटी महानगरपालिकेत जमा करण्यात येईल.

३) महानगरपालिकेच्या हद्दिमध्ये फक्त प्रक्रीयेसाठी पाठवणाऱ्या उद्योजकानेच पक्रीयोत्तर माल महापालिकेच्या हद्दिबाहेर न्यावा लागेल. किंवा ज्या उद्योजकाकडून प्रक्रीयेसाठी माल आयात केला गेला असेल, त्या उद्योजकाकडे माल परत निर्यात करावा लागेल. म्हणजेच प्रक्रीयेसाठी आयात करणाऱ्या उद्योजकाला किंवा पाठविणाऱ्या उद्योजकाला महानगरपालिकेच्या हद्दित मालकी हक्क बदलता येणार नाही. किंवा प्रक्रीयोत्तर त्या मालाची परस्पर खरेदी, विक्री महानगरपालिकेच्या हद्दित करता येणार नाही.
असे निदर्शनास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३९८ प्रमाणे दोन्ही उद्योजक दंडनीय कारवाईस पात्र राहतील, आणि संबंधितास "आर फॉर्म" सवलतीची परवानगी पुढील काळासाठी रद्द करण्यात येईल.
याबाबत वाद निर्माण झाल्यास आयुक्तांचा निर्णय अंतिम राहील.

४) औरंगाबाद महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या केलेले नियम दोन्ही उद्योजकांवर (प्रक्रियेसाठी पाठविण्याच्या आणि प्रक्रिया करणाऱ्या) बंधनकारक राहतील त्या जरी महानगरपालिका हद्दिच्या बाहेर असला तरीही संबंधितांवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ची कलम ३९८ प्रमाणे जकात कर चुकविण्यास सहकार्य केल्याबद्दल जबाबदार धरून कार्यवाहीस पात्र राहतील.

५) प्रक्रीयेसाठी आयात होणारा माल व प्रक्रीयोत्तर निर्यात होणारा माल हा मध्यवर्ती जकात नाक्यावर नोंद करूनच आयात / निर्यात होईल मालाची आयात करतेवेळी आणि निर्यात करतेवेळी मालाच्या मूळ गुणधर्म मूळ स्वरुपात , मुळ स्थितीत, मुळ आकारमानात जकात नाक्यावर जकात अधिक्षक / सहाय्यक जकात अधिक्षकद्वारे खात्री केली जाईल. यामध्ये काही वाद उद्भवल्यावर आयुक्तांचा निर्णय अंतिम असेल.

६) अपवादात्मक परिस्थितीत विहित मुदतीचे (९० दिवस) बंधन शिथील करण्याचा अधिकार वाढीव ३० दिवसापर्यंत आयुक्तांकडे राखील असेल. यासाठी अर्जदाराने लेखी परवानगी अर्ज विहित ९० दिवसांची मुदत संपण्यापूर्वीच करावा लागेल.

७) "आर फॉर्म" सवलत या तरतुदीच्या अधिन राहून तयार केलेल्या "आर फॉर्म" नमुन्यामध्ये अर्जदारास अर्ज करावा लागेल.

८) अर्जदारास माल प्रक्रीयेसाठी अयात करतांना जकात कराएवढी रक्कम तात्पुरती अनामत ठेऊन मध्यवर्ती जकात नाक्यावर भरावी लागेल. त्या मध्ये विहित मुदतीच्या आत प्रक्रीयोत्तर माल निर्यात केल्यास १०% रक्कम "प्रक्रिया सेवा शुल्क" म्हणून वजा करून उर्वरित ९०% रक्कम प्रक्रियोत्तार निर्यात करतेवळी परत करता येईल.

**किंवा**

अर्जदाराने लेखी विनंती केल्यास प्रक्रियेसाठी आयात व प्रक्रीयोत्तर निर्यात करतांना जितकी ९० दिवसांत जेवढी उलाढाल होईल तितकी रक्कम किंवा रुपये ५,०००/- जी जास्त असेल अशी रक्कम कायम "अनामत ठेव" म्हणून मध्यवर्ती नाक्यावर ठेवावी लागेल. विहित कालावधीच्या आंत जर मालाची निर्यात झाली नाही तर मात्र मालाच्या जकात कराएवढी रक्कम जकात करापोटी महानगरपालिकेमध्ये जमा करण्यात येईल

मात्र कमी झालेली अनामत रक्कम ही पुन्हा तेवढ्या रकमेची ठेव म्हणून संबंधित उद्योजकास भरावी लागेल. त्यानंतरच पुढील "आर फॉर्म" सवलत लागू होईल.

९) वरील बाबती काही वाढ उद्‌भवल्यास आयुक्तांचा निर्णय अंतिम राहील.

**विषय क्र. १४८/१३ :** कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिल्लीगेट येथील जलकुंभ ते मकाई गेट पर्यंत ४५० मी. मी. व्यासाची एम.एस. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदरच्या ठिकाणी जी जुनी आर.सी.सी. जलवाहिनी आहे ती जवळपास ३० वर्षा पूर्वीची असून, बऱ्याच ठिकाणी तुटलेली आहे. त्यामुळे जलवाहिनी गळती होवून पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवर परिणाम होतो. त्यामुळे नवीन ४५० मी. मी. व्यासाची एाक.एस. जलवाहिनी टाकवयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन १९९७-९८ च्या दरसूचीनुसार रक्कम रुपये ३८,७०,०००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रस्तुत कामाचा खर्च हा शासकीय अनुदानातून करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपय ३८,७०,०००/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री. अविनाश कुमावत : कोणती पाईप लाईन टाकणार या बाबत खुलासा करावा.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलवाहिनीसाठी ४५० मी.मी. व्यासाची एम.एस. पाईप टाकण्यात येणार आहे.

मा. महापौर : प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १४८/१३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्लीगेट जलकुंभ ते मकाई गेट पर्यंत ४५० मी.मी. व्यासाची एम.एस. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रुपये ३८,७०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ***पुरवणी विषय***

**विषय क्र. १४९/१ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका ही एका सार्वजनिक संस्था असून महापालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये व महानगरपालिकेतील कर्मचारी व अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार करू नये म्हणून मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. अध्यक्ष, स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, व सर्व स. सदस्य यांनी कोणत्याही कामाबद्दल मागितलेली माहिती शासनाचे धोरणाप्रमाणे १५ दिवसांचे आंत संबंधिताना देण्यात यावे. तसेच वरील प्रमाणे पदाधिकाऱ्यांना किंवा स. नगरसेवकांना ज्या ठिकाणी व ज्या कामी भ्रष्टाचार झालेल्या ठिकाणी कोणत्याही अधिकाऱ्यांना स्थळ पाहणीसाठी संबंधित पदाधिकारी किंवा संबंधित नगरसेवक बरोबर जाऊन अहवाल सादर करण्यात यावे. अधिकाऱ्यांचे नाव संबंधित पद अधिकाऱ्यांनी किंवा स. नगरसेवकांनी सुचविणे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. अफसर खॉन
अनुमोदक - श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय
दिनांक - १२/१०/९८

**संवाद :**

मा. महापौर : सचिव यांन प्रस्ताव वाचून दाखवाव (मा. सचिव प्रस्ताव वाचून दाखवतात.)
मा. महापौर : प्रस्ताव रद्द करण्यता येतो.

**ठराव क्र. १४९/१ :** सर्वानुमते असे ठरले की, सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**विषय क्र. १५०/२ :** औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद हि सार्वजनिक संस्था असून या संस्थेत आपल्या महानगरपालिकेमध्ये नियम नियमावली बाबतचे अधिकार या संस्थेला असल्यामुहे वर्ग-३, वर्ग-४ मध्ये सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचारी, त्यांचे जागी त्यांचे नातेवाईकांना सेवेत कायम करणे बद्दल शासनाची ही सवलत फक्त वर्ग-४ मध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांना दिलेल्या आहे. वर्ग-३ चे सेवा निवृत्त होणारे कर्मचाऱ्यांना नातेवाईकांना त्यांचे जागी सेवेत कायम करण्याची तरतूद नाही. म्हणून या महानगरपालिकात शासनानी केलेल्या ६० वर्षे वयोमान सेवा निवृत्त ऐवजी ५८ वर्ष वय वयोमाना सेवा निवृत्त करण्याचा प्रस्ताव पारीत झालेला आहे. त्याच अनुषंगाने ५८ वर्षानंतर सेवा निवृत्त झालेल्या वर्ग-३ चे कर्मचाऱ्यांचा नातेवाईकांना त्यांचे जागी अनुकंपा धर्तीवर कायमस्वरुपी नौकरी देण्यात यावी. करिता मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्रीमती मोहसिना बिल्कीस
अनुमोदक - श्री. अफसर खॉन, श्री. हमीउद्दीन ताबा
दिनांक - १०/१२/९८.

**संवाद :**

सौ. लता दलाल :

१) नगरसचिव यांनी खुलासा करावा की, हा ठराव होऊ शकतो काय?

२) असे प्रस्ताव विषय पत्रिकेवर घेता येतात काय? खुलासा करावा.

श्री. आफसरखॉन, श्री. रशीद खॉन (मामू) मा. महापौर यांच्या सहीनिशी मा. नगरसचिव यांच्याकडे करावा. असे प्रस्ताव घेणे अगर न घेणे या बाबतचा निर्णय महापौर यांचा असतो.

मा. महापौर : मा. आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : सदर प्रस्ता अशासकीय रित्या ठेवण्यात आला असून त्यावर चर्चा करणे अयोग्य होईल.

मा. महापौर : प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**ठराव क्र. १५०/२ :** सर्वानुमते असे ठरले की, सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**विषय क्र. १५१/३ :** मो. बुरहानी कॉलनी ते हलाल कॉलनी वॉर्ड नं. ५ मध्ये सदरील मो. नदी (नाला) त्या लगत गोर गरीब नागरिकांचे लहान लहान व कच्चे मातीत बांधलेले घरे आहे. गेल्या काही दिवसापूर्वी पावसाळ्याच्या दिवसात फार जास्त प्रमाणावर पाऊस पडल्यानमुळे मा. जिल्हाधिकारी व मा. तहसिलदार यांनी नाला जवळील रहिवासी यांना त्वरित तेथून हलविण्याचे आदेश दिले होते. कारण की, सदरील नाल्यालगत कोणत्याही प्रकारची भिंत बांधलेली नाही.

तरी मो. बुराहनी कॉलनी ते हलाल कॉलनी वॉर्ड क्र. ५ मध्ये ज्या ज्या घरापर्यंत सदरील नाला वाहात जात आहे त्या ठिकाणी नाला रिट्रनिंग वॉल बांधण्यात यावा, प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. म. सलीम हनिफ कुरैशी,

अनुमोदक - श्रीमती अलका पाटील, श्रीमती आबेदा बेगम.

दिनांक - निरंक

**संवाद :**

श्री. अविनाश कुमावत, प्रफुल्ल मालानी : प्रस्तावात दर्शविलेली नदी आहे की नाल तसेच अधिकृत की अनाधिकृत वस्ती आहे याबाबत खुलासा करावा.

मा. महापौर : संबधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता : सदरील प्रस्ताव हा अशासकीय असून नाला नसून खाम नदी आहे. त्याव हर्सूल तलाव असून नदीच्या बाजूला अनाधिकृत वस्ती झालेली आहे.

मा. महापौर : सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**ठराव क्र. १५१/३ :** सर्वानुमते असे ठरले की, सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**विषय क्र. १५२/४ :** मो. रेल्वेस्टेशन वॉर्ड क्र. ६१ चौरस्त्यावर हायमास्ट लावण्या बद्दल संबंधित विभागात फार दिवसापासून प्रकरण विलंबित आहे. कारण सदरील स्थळ एतिहासिक दृष्टीने व सर्व प्रथम भारताचे बाहेरून हि येणाऱ्या नागरिकांच्या ह्या औरंगाबाद ऐतिहासिक शहराकडून स्वागत प्रसंगी व एका बाजूस मोठमोठे कार्यालय व एका बाजूस शासनाने मान्य केलेला उडान पुल या सर्व दृष्टीकोणातून सदरील चौरस्त्यावर एका

हायमास्ट स्ट्रीट लाईट खांब सह त्वरित लावण्यासाठी सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. अ. रशिद अ. सत्तार
अनुमोदक - श्री. नरेंद्र पाटील
दिनांक - २९/१०/९८

**संवाद** :

मा. महापौरः सुचक हजर नसल्याने प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**ठराव क्र. १५२/४ :** सर्वानुमते असे ठरले की, सदरचा प्रस्ताव स्थगित करण्यात यावा.

**विषय क्र. १५३/५ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, फैज ए आम ट्रस्ट तर्फे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब नागरिक जे कॅन्सर या रोगाने पिडीत आहेत त्यांच्यावर उपचार करण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत माणूसकीच्या दृष्टीकोनातून जातीभेद न मानता केली जाते.

अशा या संस्थेस कॅन्स पिडीत लोकांना मदत म्हणून महानगरपालिकेतील स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येकी रुपये २०००/- (रुपये दोन हजार फक्त) देध्यात यावेत करीत प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - १) श्री. डॉ. भागवत कराड
२) श्री. अविनाश कुमावत
अनुमोदक - १) श्री. जयवंत ओक
२) श्री. अफसर खॉन
३) श्री. सय्यद अली मिरा सलामी.
दिनांक - ३०/१०/९८

**संवाद** :

श्री. नरेंद्र पाटील : मागील एका बैठकीत असे ठरले की, ज्यांना ज्यांना ज्या ज्या कामासाठी स्वेच्छानिधी देण्याची इच्छा असेल त्यांनी त्यांच्या लेटर पॅडवर सर्व माहितीसह स्वेच्छा निधी देण्यात यावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मागील एका बैठकीत अशाच प्रकारची आर्थिक मदत म्हणून २ लाख रुपये देण्यात आले ते कसे देण्यात आले याचा खुलासा करावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : ज्या स. सदस्यांची इच्छा असेल त्यांनी अशा प्रकारचा निधी देण्यासाठी मा. प्रशासनाकडे सर्व माहितीसह पत्र देवून निधी घेण्यात यावा.

मा. महापौर : ज्या स. सदस्यांची इच्छा असेल व त्यांच्या निधीमध्ये रक्कम असेल त्यांचा निधी देण्याची प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव क्र. १५३/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दुर्बल व गरीब नागरिकांना कॅन्सर उपचारासाठी आर्थिक मदत करणाऱ्या "फैज ए आम" ट्रस्टला ज्या स. नगरसेवकांची इच्छा असेल त्या स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून रु. २०००/- या प्रमाणे आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५४/६ :** औरंगाबाद नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा दिनांक १५/०१/८२ रोजी मा. श्री. अलफखॉन हुसैनखॉन, अध्यक्ष, नगरपरिषद औरंगाबाद यांच्या अध्यक्षते खाली संपन्न

झालेल्या सभेत कै. राजाराम बसैय्ये, लोकप्रिय सामाजिक कार्यकर्ते यांना श्रध्दांजली वाहण्यात आली होती.

"आमदार शालीग्राम राजाराम बसैय्ये" यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम निधीतून कैलासनगर, कैलास स्मशानभूमीच्या आवारात बांधण्यात येत असलेल्या सभागृहास "स्वर्गीय राजाराम दादूराम बसैय्ये श्रध्दांजली सभागृह" असे नांव देण्यात यावे प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. व्ही. व्ही. देशमुख
अनुमोदक - श्री. नरसिंग ढगे
दिनांक - ११/११/९८

**ठराव क्र. १५४/६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमदार शालीग्राम राजाराम बसैय्ये यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम निधीतून कैलासनगर स्मशानभूमी येथे बांधण्यात येत असलेल्या सभागृहास "स्वर्गीय राजाराम दादूराम बसैय्ये श्रध्दांजली सभागृह" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५५/७ :** भारताला स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झालीत या स्वातंत्र्याकरिता अनेकांना आपले रक्त सांडावे लागले. अनेकजण शहीद झालेत. ज्यांनी या स्वातंत्र्यासाठी लढा दिला त्यांचा स्वातंत्र्य सैनिक म्हणून सन्मान / सत्कार होत आहे तसेच त्यांना शासनातर्फे विविध सुख सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

परंतु स्वातंत्र्य मिळवितांना जे शहीद झालेत त्यांचे स्मारक औरंगाबाद शहरात असावे या दृष्टोकोनातून भारतीय माजी सैनिक संघटना नगर नाका समोरील चौकात स्मारक उभारण्यासाठी प्रयत्न करीत आहे. या भव्य स्मारकासाठी रुपये १० लाख (दहा लाख) खर्च येणर आहे. एवढा निधी जमा करण्याचे काम माजी सैनिक संघटना तिन वर्षांपासून करीत आहे. परंतु अद्याप पर्यंत ते सदरील निधी उभा करून शकले नाही. ज्या ठिकाणी स्मारक उभारण्यात येत आहे ती जागा शहराच्या आगमन स्थळी असून त्या ठिकाणी भव्य स्मारक उभारण्यासाठी महानगरपालिकेतर्फे मदत मागविली आहे.

तरी यासाठी सर्व स. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येकी रुपये ५०००/- (रुपये पाच हजार फक्त) सदरील स्मारक उभारण्यासाठी मदत म्हणून देण्यात यावे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - १) डॉ. भागवत कराड
- २) श्री. अविनाश कुमावत
अनुमोदक - १) श्री. अ. रशिद खॉन (मामू)
२) श्री. जयवंत ओक
३) श्री. गौतम खरात
दिनांक - ०६/११/९८

**संवाद :**

श्री. अविनाश कुमावत : नगरसेवकांच्या स्वेच्दा निधीतून न घेता महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत करावी.

श्री. रशिदखॉन (मामू) : जे सैनिक म्हणून भारतीय सेवेत होते. त्यांचे सेवेत असंताना मृत्यू झाला जसे. श्री. कुलकर्णी, श्री. अ. हमीद यांच्या स्मारक उभारण्यासाठी निधी देण्यास हरकत नाही.

श्री. अविनाश कुमावत : महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत देण्यात यावी.

मा. महापौर : महानगरपालिकेतर्फे २ लाख रु. अनुदान स्वरुपात देण्यात येते.

**ठराव क्र. १५५/७ :** प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेली चर्चा विचारात घेता भारतीय माजी सैनिक संघटना यांचे तर्फे नगरनाका येथे उभारण्यात येणाऱ्या स्मारकासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे रक्कम रु. २,००,०००/- निधी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५६/८ :** औरंगाबाद महानगरपालिका हद्दित विविध प्रभागामध्ये माजी सैनिकांना स्वतःची घरे बांधलेली असून सैन्य दलामधील प्रदिर्घ सेवेनंतर निवृत्त झालेले माजी सैनिक यांचे घरात स्वतः रहात आहेत. माजी सैनिकांनी त्यांचे घरांना महानगरपालिकेने आकारलेला मालमत्ता व इतर कर पूर्णतः माफ करणे बाबत विनंती केली आहे. माजी सैनिकापैकी काही सैनिक मृत्युमूखी पडलेले असून देशाच्या सीमेचे रक्षण करतांना काही धारातिर्थी पडलेले आहेत या सैनिकांनी त्याचे सेवा काळात देशासाठी दिलेले योगदान विचारात घेता त्यांनी शहराचे विविध भागात उभारलेल्या घरकुलांना महानगरपालिके मार्फत पूर्णतः मालमत्ता व इतर कर मु करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीसताव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. अविनाश कुमावत |
| अनुमोदक | - | श्री. कचरू नवपुते |
| | | श्री. वसंत देशमुख |
| दिनांक | - | १६/११/९८ |

श्री. गिरजाराम हाळनोर : प्रस्ताव मंजूर करून शासनाकडे पाठवावा.

श्री. हमीदोद्दिन ताबा : या अगोदर ही असे प्रकारचे प्रस्ताव कर माफ करण्याबाबत आलेले होते. त्यास मंजुरी देण्यात आलेली नाही. या प्रस्तावास मंजुरी देऊ नये.

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर करून शासनाकडे पाठवण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी.

**ठराव क्र. १५६/८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दित स्वतःची घरे बांधून राहणाऱ्या सैन्य दलातील माजी सैनिकांना त्यांचे घरावर महानगरपालिका तर्फे आकारण्यात आलेल्या मालमत्ता व इतर कर पूर्णतः माफ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. माजी सैनिकांना त्यांचे घरावरील मालमत्ता व इतर कर पूर्णतः माफ करण्याबाबत नियमाप्रमाणे शासनाची मंजुरी घेण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५७/९ :** सिडको एन-२, प्रबोधनकार ठाकरेनगर या भागात वाचनालयाची कुठलीही सुविधा नाही. या भागात वाचनालय सुरू करणे बाबत रहिवाशी सारखी मागणी करीत आहेत. तेथील रहिवाशांची गैरसोय विचारात घेता प्रबोधनकार ठाकरेनगर मधील सी-सेक्टर व डी-सेक्टर येथील खुल्या जागेवर महानगरपालिकतर्फे सुसज्ज व अद्यावत अभ्यासिक केंद्र बांधून सुरू करणे बाबत ठराव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

सुचक - सौ. मंदा काळुसे,

श्री. अविनाश कुमावत
अनुमोदक - सौ. सुनंदा कोल्हे
दिनांक - १६/११/९८

**ठराव क्र. १५७/९ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रबोधनकार ठाकरेनगर भागातील नागरिकांची मागणी लक्षात घेता सी-सेक्टर व डी-सेक्टर येथील खुल्या जागेवर महानगरपालिकतर्फे सुसज्ज व अद्यावत अभ्यासिका केंद्र सुरू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५८/१० :** औरंगाबाद शहरातील गारखेडा परिसाराचा झपाट्याने विस्तार होत आहे. याच बरोबर बीड बायपास रोडला जोडणारा १०० फुटी रस्ता आणि श्री. गजानन महाराज मंदिरातील दर्शनासाठी येणारा भाविक वर्ग यामुळे गजानन महाराज मंदिरातील चौकात भाविक व वाहनांची एकच गर्दी होत आहे. याचा विचार करता गजानन महाराज मंदिर चौकात पुणे येथील डेक्कन जीम खान्याजवळील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ असलेल्या पादचारी वाहतुक व्यवस्थेप्रमाणे भुयारी रस्ता तयार करण्यात यावा यात भुयारी रस्त्याच्या कडेला काही प्रमाणात छोटी-छोटी दुकाने काढता येतील काय याचाही विचार व्हावा. हा भुयारी रस्ता तयार करण्यासाठी बजाज / गरवारे या सारख्या कंपन्याकडून अर्थ सहाय्य मिळवता येईल का? याचा विचार व्हावा. प्रसताव विचाराथ व मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. राजकुमार बचाटे (मामा)
अनुमोदक - श्री. संजय जोशी.
दिनांक -

**संवाद :**

श्री. नरेंद्र पाटील : गारखेडा परिसारत नागरीकांनी महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमणे केलेली असून भुयारी रस्ता तयार करण्याचे ऐवजी अतिक्रमणे हटवून प्लाय ओव्हर ब्रीज बांधून वरील बाजूने रस्त्याची सुधारणा करण्यात यावी असे माझे मत आहे.

मा. महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १५८/१० :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा परिसारातील बीड बायपास रोडला जोडणाऱ्या १०० फुट रस्त्यावर असलेल्या श्री. गजानन महाराज चौकातील भाविकांची व वाहनांची गर्दी लक्षात घेता गजानन महाराज मंदिर चौक येथे पादचाऱ्यांच्या वाहतुक व्यवस्थेसाठी भुयारी रस्ता अथवा ओव्हर ब्रीज बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५९/११ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, साप्ताहिक विवेकच्या १५ ऑगस्ट रोजी प्रकाशिक झालेल्या सुराज्य विशेषांकात स. नगरसेवक यांच्या स्वेच्छा निधीतून रुपये १५,०००/- पर्यंतची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरील जाहिरातीचा खर्च रक्कम रुपये पंधरा हजार फक्त स. नगरसेवक (१) डॉ. भागवत कराड, (२) डॉ. विजयकुमार मेहेर (३) श्री. संजय केनेकर, (४) श्री. संजय जोशी (५) श्री. राजकुमार बचाटे,

(६) श्री. कंवरसिंग बैनाडे (७) श्री. भगवान घडामोडे (८) सौ. विमलबाई मुंडलिक यांचे स्वेच्छा निधीतून देण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - डॉ. श्री. भागवत कराड
श्री. संजय जोशी
अनुमोदक - श्री. राजकुमार बचाटे (मामा)
श्री. भगवान घडामोडे
दिनांक - १६/११/९८

**संवाद :**

श्री. हमीउद्दिन ताबा : अशा प्रकारची जाहिरात देता येत नाही व त्याचा खर्च म्हणून नगरसेवकांच्या निधीतून देऊ नये. मीही ही अशा जाहिराती देईल. त्याचा खर्च म्हणून निधीतून देता येईल काय? प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

मा. महापौर : सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**ठराव क्र. १५९/११ :** सर्वानुमते असे ठरले की, सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**विषय क्र. १६०/१२ :** प्रस्ताव सादर करण्यता येतो की, दरवर्षी औरंगाबाद शहरात डिसेंबर महिन्यात प्लास्टीक सर्जरी शिबीर मा. डॉ. शरदकुमारजी दिक्षित यांचे हस्त करण्यात येते. या वर्षी सुध्दा डिसेंबर मध्ये प्लॉस्टीक सर्जरी शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे. या शिबीरात गरीब / दुर्बल व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या रुग्णांवर प्लॉस्टीक सर्जरी करण्यात येणार असून, यात ४०० शस्त्रक्रीया करण्यात येणार आहेत यास साधारणात रुपये विस लाख रुपये इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेतर्फे दरवर्षी या शिबीरास रुपये एक लाख आर्थिक मदत देण्यात येते. त्या प्रमाणे यावर्षी सुध्दा सदरील प्लॉस्टीक सर्जरी शिबीरास महानगरपालिकेतर्फे रुपये एक लाख मदत म्हणून देण्यात यावेत. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्ताव सादर. तसेच एक दिवस महापालिकेतर्फे शिबीर आयोजित करण्यता येईल.

सुचक - डॉ. श्री. भागवत कराड,
अनुमोदक - श्री. अविनाश कुमावत
दिनांक - १६/११/९८

**ठराव क्र. १६०/१२ :** प्रस्तावात दर्शविल्यामुळे मा. डॉ. शरद कुमारजी दिक्षित यांच्या हस्ते माहे डिसेंबर मध्ये होणाऱ्या प्लॉस्टीक शिबीरास महानगरपालिकेतर्फे रु.१ लाख (एक लाख) आर्थिक मदत म्हणून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६१/१३ :** प्रस्ताव सादर करण्यता येतो की, औरंगाबाद शहरात जानेवारी ९९ महिन्यात आखिल भारतीय कबड्डी स्पर्धा (डॉ. हेडगेवार स्मृतिचषक) होणार आहेत. या स्पर्धेकरिता भारतातील नामवंत कबड्डी संघ ये्णार आहे. ही स्पर्धा अखिल भारतीय असल्यामुळे यासाठी बराच खर्च होणार आहे. तरी या स्पर्धेकरिता स. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येकी दोन हजार रुपये फक्त आर्थिक मदत देण्यात यावी, करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. राजकुमार बचाटे
डॉ. श्री. भागवत कराड

अनुमोदक - श्री. सुदाम सोनवणे
श्री. म. विखोरोद्दिन कुतुबूद्दिन

**संवाद :**

श्री. नरेंद्र पाटील : ज्यांची इच्छा असेल ते स. सभासद निधी देतील संमती घेऊ नयेत.

मा. महापौर : ज्या स. सभासदांची आर्थिक मदत देण्यास इच्छा असेल व इच्छुक स. सदस्य यांचा निधी उपलब्ध असेल तथा त्या स. सभासदांच्या स्वेच्छानिधीतून प्रशासनाने निधी देण्याची कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. १६१/१३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जानेवारी ९९ महिन्यात होणाऱ्या अखिल भारतीय कबड्डी स्पर्धा "डॉ. हेडगेवार स्मृतिचषक" स्पर्धा करिता ज्या स. सभासदांची इच्छा असेल त्यांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येक २०००/- हजार रुपये या प्रमाणे आर्थिक मदत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *<u>ऐनवेळचे विषय</u>*

**विषय क्र. १६२/१ :** सुरेवाडी येथे १५० मी.मी. आणि २५० मी.मी. व्यासाचे आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १८,८५,३९०/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या सन १९९७-९८ या वर्षाच्या दरसूचिनुसार तयार करण्यात आलेले आहे. सुरेवाडी ही वसाहत १००% विकास निधी नागरिकांकडून भरणा करून नंतर ड्रेनेज व पाणी पुरवठा लाईन काम करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे.

तरी अशा अनाधिकृत वस्तीतर्फे १००% वर्गणी जमा करून पुढील इतर कामे करणे योग्य. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी व विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. महापौर : सचिव यांनी प्रस्ताव वाचून दाखवावा. (सचिव प्रस्ताव वाचून दाखवतात)

श्री. कोकाटे काशिनाथ : मागील बैठकीत अशाच प्रकारचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता तो पुन्हा प्रस्ताव सभागृहात कसा ठेवण्यात आला याचा खुलासा करावा.

मा. महापौर : या प्रस्तावात सदर वसाहतीतील नागरिकांकडून १००% वर्गणी जमा न करता २५% वर्गणी जमा करून ड्रेनेज व पाणी पुरवठा लाईनचे काम करण्यात यावे अशी दुरुस्ती करण्यात येऊन प्रस्तावास मजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १६२/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुरेवाडी या अनाधिकृत वसाहतीत नागरिकांकडून १००% ऐवजी २५% लोक वर्गणी जमा करून १५०/२५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी रक्कम रुपये १८,८५,३९०/- च्या अंदाज पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६३/२ :** दिनांक १९/०८/९८ च्या सर्वसाधारण सभेने विषय क्र. ७२/१३ अन्वये श्री. सुभाष तायडे, नाका जवान यांचे निलंबन अपील प्रकरणी स्थायी समितीने निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले असता सदर प्रकरण मा. सभापती, स्थायी समिती, यांचेकडे निर्णयासाठी दाखल केले असता या प्रकरणी सर्व साधारण सभेने निर्णय घ्यावा असा

अभिप्राय मा. सभापती यांनी दिला आहे. त्यानुसार मा. महापौर यांचेकडील दिनांक १३/११/९८ च्या आदेशानुसार श्री. सुभाष तायडे, नाका जवान यांचे अपिलबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ५८२/९ दिनांक ३०/०३/९८ च्या निर्णयानुसार श्री. सुभाष तायडे नाका जवान यांचे निलंबन अपिला बाबत सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

१) महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियमानुसार ४८ तासापेक्षा जास्त कालावधीत पोलिस कस्टडीत होते. संबंधितावर ठेवण्यात आलेले दोषारोप न्यायालयामधून अद्याप सिध्द व्हावयाचे आहेत.
२) महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरिकांच्या जमा झालेल्या करातून देण्यात येतात. त्यामुळे प्रकरणात कर्मचाऱ्यांस निलंबित ठेवून ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही.
३) उपरोक्त बाबी विचारात घेता संबंधिताचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून रद्द करण्याची शिफारस सर्वसाधारण सभेकडे करण्यात येते.
४) संबंधितांचा निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहित धरण्यात यावा. संबंधितांनी कामावर रुजू करण्याचे आदेश द्यावेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १६३/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नाका जवान श्री. सुभाष तायडे यांच्या अपील प्रकरणात खालील प्रमाणे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियमानुसार ४८ तासापेक्षा जास्त कालावधीत पोलिस कस्टडीत होते. संबंधितावर ठेवण्यात आलेले दोषारोप न्यायालयामधून अद्याप सिध्द व्हावयाचे आहेत.
२) महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरिकांच्या जमा झालेल्या करातून देण्यात येतात. त्यामुळे प्रकरणात कर्मचाऱ्यांस निलंबित ठेवून ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही.
३) उपरोक्त बाबी विचारात घेता संबंधिताचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून रद्द करण्यात येते.
४) संबंधितांचा निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहित धरण्यात यावा. संबंधितांनी कामावर रुजू करण्याचे आदेश द्यावेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६४/३ :** दिनांक १९/०८/९८ च्या सर्वसाधारण सभेने विषय क्र. ७३/१४ अन्वये श्री. कांतीलाल मिस्त्रीलाल बोथरा, कनिष्ठ लिपीक, यांचे निलंबन अपील प्रकरणी स्थायी समितीने निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले असता सदर प्रकरण मा. सभापती, स्थायी समिती, यांचेकडे निर्णयासाठी दाखल केले असता या प्रकरणी सर्वसाधारण सभेने निर्णय घ्यावा असा अभिप्राय मा. सभापती यांनी दिला आहे. त्यानुसार मा. महापौर यांचेकडील दिनांक १३/११/९८ च्या आदेशानुसार श्री. कांतीलाल मिस्त्रीलाल बोथरा, कनिष्ठ लिपीक, यांचे अपीलाबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ५८५/१२, दिनांक ३०/०३/९८ च्या निर्णयानुसार श्री. कांतीलाल मिस्त्रीलाल बोथरा, कनिष्ठ लिपीक यांचे निलंबन अपिलाबाबत सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

१) महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम ४ नुसार २४ तास पोलिस कस्टडीत नव्हते. संबंधितांवर ठेवण्यात आलेले दोषारोप न्यायालयामधून अद्याप सिध्द व्हावयाचे आहेत.
२) महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरिकांच्या जमा झालेल्या करातून देण्यात येतात. त्यामुळे प्रकरणात कर्मचाऱ्यांस निलंबित ठेवून ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही.
३) उपरोक्त बाबी विचारात घेता संबंधिताचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून रद्द करण्यात येते.
४) संबंधितांचा निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहित धरण्यात यावा. संबंधितांनी कामावर रुजू करण्याचे आदेश द्यावेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १६४/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कनिष्ठ लिपीक श्री. कांतीलाल मिस्त्रीलाल बोथरा यांच्या अपील प्रकरणात खालीलप्रमाणे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
१) महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम ४ नुसार २४ तास पोलिस कस्टडीत नव्हते. संबंधितांवर ठेवण्यात आलेले दोषारोप न्यायालयामधून अद्याप सिध्द व्हावयाचे आहेत.
२) महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते नागरिकांच्या जमा झालेल्या करातून देण्यात येतात. त्यामुळे प्रकरणात कर्मचाऱ्यांस निलंबित ठेवून ७५% वेतन देणे योग्य वाटत नाही.
३) उपरोक्त बाबी विचारात घेता संबंधिताचे निलंबन न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून रद्द करण्यात येते.
४) संबंधितांचा निलंबन काळ हा न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार गृहित धरण्यात यावा. संबंधितांनी कामावर रुजू करण्याचे आदेश द्यावेत.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६५/४ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्कमील कॉलनी, हमीद कॉलनी दरम्यानच्या नाल्यावर आर.सी.सी. पुल बांधणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डि.एस. आर दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये २०,१९,०००/- चे तयार करण्यात आले. करिता प्रस्ताव मंजुरीस्ताव व विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १६५/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमील कॉलनी हमीद कॉलनी दरम्यानच्या नाल्यावर आर.सी.सी. पुल बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. २०,१९,०००/-च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६६/५ :** नगर सचिव यांनी प्रस्ताव सादर केला की, भारतीय राज्य घटनेच्या ७४ व्या घटना दुरुस्तीप्रमाणे महानगरपालिकेचे कामाकाज लोकशाही पध्दतीने अधिक परिणामकारक व्हावे, शहराच्या स्थानिक पातळीवर प्रभावी लोकसहभाग घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम २९ अ अन्वये सर्वसाधारण सभा ठराव क्र. २ दि. १८/०५/९५ नुसार लोकसंख्येच्या प्रमाणात निर्माण करण्यात आलेल्या प्रभाग समितीचे कामकाजाबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४, ४५७/२ अन्वये वरील अधिनियमांचे अनुसूचि प्रकरण-२ मध्ये नमूद केलेल्या नियमा

व्यतिरिक्त सभा कामकाज नियमावली मध्ये नव्याने समाविष्ट करावयाचे प्रारुप प्रभाग समिति कामकाज नियमावली कलम ४५९ अन्वये सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. नरेंद्र पाटील : महानगरपालिकेचे कामाकाज व्यवस्थीतपणे चालावे यासाठी माजी महापौर सौ. सुनंदा कोल्हे या महापौर असतांना या बाबतचा प्रस्ताव सभागृहात येऊन त्याबाबत महापौर सौ. कोल्हे यांनी सविस्तर माहितीसह पुढच्या बैठकीत अहवाल सादर करावा असे आदेशित केले होते. परंतु प्रस्ताव चार (४) वर्षांनंतर सभागृहात प्रभाग समिती कामकाज बाबत अहवाल येण्यास का उशीर झाला या बाबतीत जो कुणी दोषी असेल त्यांच्यावर कार्यवाही व्हावयास पाहिजे.

श्री. रशिद खॉन (मामू) स्विकृत सभासदांची निवड करून त्यांचा या समितीमध्ये समावेश करण्यात यावा याबाबत. लवकर कार्यवाही सुरू करावी. २-३ माहिण्यात कमिट्या तयार करण्यात यावे.

श्री. गिरजाराम हाळनोर : (१) अ.क्र. ८ निम्म्यापेक्षा कमी नाहीत, म्हणजे किती सदस्य संख्या असावयास पाहिजे याचा खुलासा व्हावा.
(२) अ.क्र. ११ मध्ये प्रभाग समितीच्या समितीमध्ये कार्य पत्रिकेच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रश्नांवर चर्चा व कामकाज करण्यात येणार नाही. असे दर्शविलेले आहे. त्याऐवजी ऐनवेळी विषय मांडता येईल अशी दुरुस्ती करण्यात यावी.
(३) अ.क्र. १२ मध्ये दर्शविल्यानुसार सदर प्रभाग समितीचे कामकाज सचिव कि अध्यक्ष हाताळणार आहे. याबाबतही खुलासा करावा.

मा. महापौर : सदर प्रस्तावामध्ये क्राप स. सभासद यांचा समावेश करून सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात येऊन शासनाकडे पाठवण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी.

श्री. गौतम लांडगे : हा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. अशा प्रस्तावास शासनाकडे पाठवण्याची आवश्यकता नसते.

**ठराव क्र. १६६/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभा ठराव क्र. २ दि. १८/०५/९५ अन्वये लोकसंख्येच्या प्रमाणात निर्माण केलेल्या प्रभाग समितीचे कामकाजाबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि प्रकरण २ अन्वये केलेल्या नियमा व्यतिरिक्त कलम ४५९ अन्वये नव्याने समाविष्ट करावयाचे खालील प्रभाग समिति कामकाज नियमावलीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**प्रभाग समितीच्या कामकाजाबद्दल
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम
१९४९ चे अनुसूचि प्रकरण-२ मध्ये नमूद केलेल्या
नियमाव्यतिरिक्त नव्याने समाविष्ट करावयाचे नियम.**

१) प्रत्येक प्रभाग समितीची पहिली सभा महिन्यातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा अन्य वेळी भरविण्यात आली पाहिजे.

२) प्रत्येक प्रभाग समितीची पहिली सभा आयुक्त ठरवितील अशा दिवशी व अशा वेळी भरविण्यात आली पाहिजे आणि जर ती त्या दिवशी भरविण्यात आली नाही तर ती आयुक्त ठरवतील अशा नंतरच्या एखाद्या दिवशी भरविण्यात आली पाहिजे आणि प्रभाग समितीची त्यानंतरची प्रत्येक प्रभाग समिती वेळोवेळी ठरवील अशा दिवशी व अशा वेळी भरविण्यात आली पाहिजे.

३) प्रत्येक प्रभाग समितीने आपल्या सभासदापैकी एका सभासदांची तिच्या पहिल्या सभेत आणि त्यानंतर प्रत्येक वर्षी त्याच महिन्यात तिच्या पहिल्या सभेत आपल्या सदस्यापैकी एकाची अध्यक्ष म्हणून नेमणूक केली पाहिजे. परंतु अशा कोणत्याही सभासदांच की जा महानगरपालिकेच्या प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रातील पालिका सदस्य नसेल, अशा सदस्यांस अध्यक्ष नेमता येणार नाही.

४) प्रभाग समितीचा जो कोणताही स्विकृत सभासद तात्पुरता अजारी किंवा प्रभाग समितीने मान्य केलेले कोणतेही इतर कारण या व्यतिरिक्त कारणामुळे लागोपाठ ३ महिन्याच्या मुदतीत प्रभाग समितीच्या सभांना स्वतःहून अनुपस्थित राहील अथवा केणत्याही कारणामुळे मग ते प्रभाग समितीने मान्य केलेले असो वा नसो लागोपाठ ४ महिन्यांच्या अवधीत प्रभाग समितीच्या सभांना स्वतःहून अनुपस्थित राहील [अथवा कोणत्याही कारणामुळे मग ते प्रभा समितीने मान्य केलेले असो व नसो लागोपाठ ४ महिन्याच्या अवधीत प्रभाग समितीच्या सभांना स्वतःहुन अनुपस्थित राहील.] किंवा उपस्थित राहण्यास असमर्थ होईल. तो प्रभाग समितीचा सभासद म्हणून राहणार नाही. व त्यानंतर त्याची जागा रिकामी होईल.

५) प्रभाग समितीचा स्विकृत सभासद म्हणून नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीने पद स्विकारण्याचे नाकारले असेल किंवा प्रभाग समितीचा असा सभासद मरण पावला असेल त्याने त्याग पत्र दिले असेल किंवा तो प्रभाग समितीवर नेमण्यास अपात्र झ ाला असेल, किंवा तो काम करण्यांस असमर्थ झालास असेल किंवा मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम १० च्या तरतुदीनुसार अनर्ह झाला असेल त्याप्रसंगी रिकामी झालेली जागा प्रभाग समितीच्या पालिका सदस्यांना योग्य पात्रता असलेल्या व्यक्तींची नेमणूक करून सोईस्करपणे शक्य होईल तितक्या लवकर भरली पाहिजे. आणि अशा व्यक्ती ज्या व्यक्तींच्या जागी तो नेमण्यात आली असेल त्या व्यक्तीने ती जागा रिकामी झाली नसली तर जितक्या कालावधी पर्यंत पद धारण केले असते तितक्याच अवधीपर्यंत पद धारण करेल.

६) कामकाज उरकण्यासाठी प्रभाग समितीच्या प्रभाग सभा समितीचे (विभागीय कार्यालय) कार्यालयाच्या मुख्य इमारतीत भरविण्यांत आल्या पाहिजेत.

७) आयुक्तांच्या मते जे कोणतेही विभागाचे कामकाज प्रभाग समितीच्या पुढील सर्वसाधारण सभेपर्यंत लांबणीवर टाकता येणार नाही असे कामकाज चालविण्यासाठी आयुक्तांनी सही करून लेखी मागणी केल्यावर प्रभाग समितीच्या अध्यक्षांनी २४ तासाच्या आत उक्त समितीची विशेष सभा बोलविली पाहिजे.

८) प्रभाग समितीच्या सभेत त्या सभेच्या अध्यक्षांना धरून एकूण सभासद संख्येच्या निम्म्यापेक्षा कमी नाहीत इतके सदस्य उपस्थित असल्याचे अध्यक्षांच्या निदर्शनास आणून दिल्यास अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकारणाने ती सभा, सभेसाठी त्यांना सोईस्कर वाटेल अशी वेळ व ठिकाण ठरवून अन्य एखाद्या दिवसापर्यंत तहकूब केली पाहिजे आणि अशा सभेस जे कामकाज निकालात काढावयाचे राहिले असेल ते कामकाज तहकूब सभेत निकालात काढण्यात आले पाहिजे अशा तहकूब सभेत

गणपुर्ती १/३ पेक्षा कमी राहणार नाही अशाच वेळी कामकाज निकालात काढण्यात आले पाहिजे.

९) प्रभाग समितीच्या प्रत्येक सभेचे अध्यक्षस्थान सभा भरविण्यासाठी नेमलेल्या वेळी प्रभाग समितीचे अध्यक्ष उपस्थित असतील तर त्यांनी स्विकारले पाहिजे, आणि अध्यक्ष अनुउपस्थित असतील तर सभेकडून त्याप्रसंगी अध्यक्ष म्हणून निवडण्यात यंईल. अशा उपस्थितीत सदस्यापैकी एका सदस्यांने स्विकारले पाहिजे, या नियमात वर काहीही नमूद केलेले असेल तरी स्विकृत सभासदांची अध्यक्ष म्हणून निवड करता येणार नाही.

१०) या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यांत आलेली असेल त्या व्यतिरिक्त प्रत्येक प्रस्तावावर सभेत उपस्थित असलेल्या व त्या प्रस्तावावर मतदान करणाऱ्या प्रभाग समितीच्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात आला पाहिजे आणि समसमान मते पडतील तेंव्हा अध्यक्ष स्थानी असलेल्या प्राधिकाऱ्यांस दुसरे किंवा निर्णायक मत असेल.

११) प्रभाग समितीच्या समितीमध्ये कार्यपत्रिकेच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रशनावर चर्चा व कामकाज करता येणार नाही.

१२) प्रभाग समितीच्या प्रत्येक सभेचे उपस्थित असलेल्या सदस्यांची नांवे आणि अशा सभेतील कामकाज या संबंधिचे एक कार्यवृत्त या प्रयोजनासाठी तरतूद करण्यात आलेल्या नमूद करून ठेवले पाहिजे, आणि त्यावर नंतरच्या सभेत अध्यक्षस्थानी असलेल्या सभापतीने सही केली पाहिजे.

१३) समिती अध्यक्ष प्रभाग समितीच्या प्रत्येक सभादांला सभेच्या दिवसाच्या आधीच्या दिवसापूर्वी सभेपुढील विषयांची कार्यपत्रिका पाठवतील आणि तातडीच्या परिस्थिती शिवाय आणि उपस्थित सभासदांनी बहुमताने संमती दिल्याशिवाय कार्यपत्रिकेत नसलेले कोणतेही काम सभेला करता येणार नाही.

१४) सभेपुढील विषय कोणत्या क्रमाने विचारात घ्यावेत हे सभेचे अध्यक्ष ठरवतील.

१५) ज्या विशिष्ट विषयांची तीन दिवस अगोदर सूचना देण्यात आलेली नाही. अशा कायक्रमपत्रिकेतील कोणताही विषय, त्यावर चर्चा सुरू होण्यापूर्वी प्रभाग समितीच्या कोणत्याही दोन सभासदांनी तशी तोंडी अथवा ते अनुपस्थित असतील तर पत्राद्वारे विनंती केल्यास तो पुढील सभेपर्यंत स्थगित ठेवता येईल.

१६) सर्व प्रस्ताव व उपसुचना या योग्यरितीने मांडल्या गेल्या पाहिजे आणि त्यांना अनुमोदन मिळाले पाहिजे.

१७) सभेपुढे असलेला एखादा प्रस्ताव किंवा उपसूचना इतक किंवा इतकी गुंतागुंतीची आहे की, तिच्यावर एकच ठराव होऊन मतदान झाल्यास गोंधळ किंवा गैरसोय होण्याची शक्यता आहे, असे अध्यक्षांना वाटेल तर ते त्या प्रस्तावाचे अथवा उपसुचनेचे एकापेक्षा अधिक भाग पाडू शकतील.

१८) मागील सभेचे वृत्तांत कायम करण्यापूर्वी जर ते सभासदांना अगोदर वाटण्यात आले असतील तर ते वाचण्यात आले असे समजण्यात येईल.

१९) जर एखाद्या सभासदाने मागील सभेच्या वृत्तांताचा काही भाग वृत्तंत पुस्तकात चुकीने घातला गेला आहे, असे अध्यक्षांच्या दृष्टीस आणले, जर अध्यक्षांना योग्य वाटेल असे बदल वृत्तांतावर स्वाक्षरी करण्यापूर्वी ते त्यात करतील.

२०) सर्व सुव्यवस्थेच्या व कार्यपध्दतीच्या मुद्यावर आपले निर्णय अध्यक्ष संक्षेपतः देतील.

२१) सभा स्थगित करावी किंवा सभेपुढे असलेल्या विशिष्ठ प्रस्तावाचा विचार स्थगित ठेवावा अशा प्रस्तावाला सदैव प्राधान्य मिळेल.

२२) कोणत्याही सभेच्या पुढे जी कार्यपत्रिका ठेवण्यात आलेली असेल, तया कार्यपत्रिकेतील प्रत्येक प्रस्तावावर शक्यतो त्याच सभेत निर्णय घेण्यात येइ्रल. जर असा निर्णय त्याच सभेत घेण्यांत आला नाही तर लगेच त्यानंतरच्या पहिल्या सभेत शिल्लक राहिलेल्या विषयावर प्रथम निर्णय / घेण्यात येईल.

२३) मतदान हात वर करून घेण्यात येईल. मताला टाकण्यांत आलेल्या प्रत्येक प्रस्तावावर अनुकूल किंवा प्रतिकूल अशी मते घेण्यात येतील.

२४) एखाद्या सभासदाला जर सभेपुढे एखादा प्रस्ताव मांडावयाचा असेल तर ज्या सभेत प्रस्ताव मांडावयाचा असेल त्या सभेच्या पूर्ण ३ दिवस अगोदर सदर सभासद समिती अधिक्षक यांना आपला मनोदय कळविला पाहिजे.

२५) प्रभाग समित्या संबंधित विभागीय कार्यालयाच्या चर्तु:सिमे अंतर्गत प्रश्नावर व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २९-अ पोट कलम-७ मध्ये नमूद केलेल्या विषयापुरतेच कामकाज चालवू शकतील.

२६) आयुक्त यांना किंवा त्यांनी याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांस प्रभाग समितीच्या सभेत उपस्थित राहण्यांचा व त्यामध्ये होणाऱ्या चर्चेत भाग घेण्याचा, अशा समितीच्या सदस्यांस जो अध्िाकार असतो तोच अधिकार असेल, परंतु त्यास अशा सभेत कोणत्याही प्रस्तावावर मतदान करण्याची किंवा प्रस्ताव मांडण्याची मोकळीक असणार नाही.

२७) प्रभाग समितीला एकदा मान्य झालेला आपला ठराव, ज्याला एकूण सभासदांच्या संस्थेच्या किमान निम्म्या सभासदांनी पाठींबा दिला आहे असा ठराव करूनच बदलता येईल किंवा निरस्त करता येईल.

## केवळ मा. नगरसेवकांच्या माहितीस्तव टिप्पणी

### १) <u>प्रभाग समिती रचना</u>

अ) भारतीय राज्य घटनेच्या ७४ व्या घटना दुरुस्ती प्रमाणे महानगरपालिकांचे कामकाज लोकशाही पध्दतीने अधिक परिणामकारक व्हावे. मोठ्या शहरांच्या स्थानिक पातळीवर प्रभावी लोकसहभाग घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. या अधिनियमातील कलम २९(अ) अन्वये लोकसंख्येच्या प्रमाणात अनेक निवडणूक प्रभाग मिळून प्रभाग समित्या स्थापन करण्यांची तरतूद आहे. या प्रभाग समित्यांवर तिच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागाचे नगरसेवक, सभासद म्हणून कार्यरत राहतील. तसचे विभागीय (झोन) कार्यालयाचे प्रमुख अशा प्रभाग समित्यांचे सभासद राहतील.

शिवाय राज्य शासना विहित करेल त्या पात्रतेचे तीन अन्य सभासद प्रभाग समितीचे सभासद म्हणून काम करतील परंतु अशा व्यक्तींची प्रभाग समितीच्या अधिकारी ते मधील व भौगोलिक हद्दिच्या आतीलच प्रभागात मतदार म्हणून नोंदणी झालेली असणे आवश्यक आहे. तथापि या संबंधात राज्य शासनाचे नियम विहित न केल्याने नामनिर्देशित सभासद म्हणून तूर्त नेमणूक करणे शक्य होणार नाही. मा. महापालिका आयुक्त यांनी विविध खाते प्रमुखांना विशिष्ट विभाग (झोन) आयुक्त म्हणून नेमण्यात आलेले आहे. विभागीय कार्यालयाचे कामकाज प्रभाग समित्यांच्या माध्यमातून गतीमान पध्दतीने चालविण्याची व लोकांच्या समस्यांचे सत्वर निराकरण व्हावे अशी कायद्याची अपेक्षा आहे.

ब) औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा दिनांक १८/०५/१९९५ चे ठराव क्र. २ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ प्रभाग समित्यांचे कार्यक्षेत्र व भौगोलिक सिमा निश्चित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार १९९१ च्या जनगणनेची लोकसंख्या विचारात घेऊन ५,७३,२८७/- इतक्या लोकसंख्येसाठी ८२ निवडणूक प्रभागाची खालील प्रमाणे ४ प्रभाग समित्या व त्यांची कार्यालयासाठी निश्चित केलेल्या ठिकाणांस मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

| प्रभाग समिति क्रमांक | प्रभाग समितीचे कार्यक्षेत्र व भौगोलिक हद्दितील येणारे निवडणूक प्रभाग | प्रभाग समितीचे कार्यालयाचे ठिकाण | प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात मोडणारे विभागीय (झोन कार्यालय) |
|---|---|---|---|
| १. | १ ते ७, ४० ते४५, ४७, ५१ ते ५७ (एकूण २१ प्रभाग) | विभागीय कार्यालय क्र.२ (वसंत भवन) | १,२,३ |
| २. | ११,२२ ते ३९ व ४८ | नेहरू भवन तात्पुरते | ३ व ४ |
| ३. | ४६,४९,५०,५८ ते ७५ (एकूण २१ प्रभाग) | विभागीय कार्यालय क्र. ६ (रेल्वेस्टेशन) | ४,२ व ६ |
| ४. | ८,९,१०,१२ ते २१ ७६ ते ८२ (एकूण २०) | विभागीय कार्यालय चिकलठाणा | ५ व ७ |

महानगरपालिकेने सुरत पॅटर्न या धर्तीवर स्वच्छता कार्यक्रम राबविणे व मिनी आयुक्तालय या वर्षाच्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टयापैकीच असून स्वच्छता कार्यक्रमासाठी विभाग निहाय विभाग आयुक्ताच्या नियुक्त्या झालेल्या आहेत. व हेच विभाग आयुक्त मिनी आयुक्तालयाचे प्रमुख राहणार आहेत. व त्यांना मा. आयुक्तांचे काही हद्दिपर्यंतचे अधिकार प्रदान होऊन त्या विभागाचे (झोनचे) ते प्रमुख म्हणून राहतील व प्रभाग समितीची अंमलबजावणी सुरू झाल्यावर नव्याने विभाग आयुक्तांची नियुक्ती करण्याची गरज भासणार नाही.

महानगरपालिकेमध्ये ७ विभागीय कार्यालये असून ४ प्रभाग समित्या राहणार आहे एकपेक्षा जास्त विभागाचे क्षेत्र (झोन) मिशन प्रभाग समिती राहणार आहे. काही विभागचा भागशः भाग देखील प्रभाग समितीच्या भौगोलिक हद्दित [TERRITORIAL JURISDICTION] येईल. एका विभागात दोन प्रभाग समित्या भागशः कार्यक्षेत्र देखील अंतर्भूत झालेले आहे. अशा वेळी ज्या विभागात प्रभाग समिती कार्यालय आहे त्याच ठिकाणी प्रभाग समिती मार्फत संपूर्ण प्रभाग समितीच्या हद्दितील निवडणूक प्रभागातील कामांना योग्य ती मंजुरी देण्यात येईल. परंतु ते प्रभाग ज्या विभागाच्या (झोन) हद्दित येतील त्या विभागाच्या विभाग आयुक्तांनी त्यांची अंमलबजावणी करावी, व प्रभाग समिती समोर देखील त्यांनीच प्रस्ताव सादर करावयाचे आहे. व सर्वसाधारण सभेने मंजुर केलेल्या ठरावा प्रमाणेच प्रभाग समित्यांचे कार्यालय कार्यरत होतील.

## २. <u>प्रभाग समिती कामकाज नियम</u>

औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे समितीचे कामकाज चालविण्यासंबंधीची नियमावली मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. त्या नियमावली मधील तरतूदीच्या अधिन राहून प्रभाग समितीचे कामकाज चालविण्यांत येणार आहे. सर्व साधारणपणे प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रातील व भौगोलिक हद्दितील मोडणारे सर्व निवडूक प्रभागातील स्थानिक सुविधा व गरजांच्या संदर्भात निर्णय घेणे व त्यांची अंमलबजावणी करणे समितीच्या अधिकार क्षेत्रांतर्भूत राहील. प्रभाग समित्यांचे सर्व सभा विभागीय कार्यलयातच कायद्याच्या तरतूदी प्रमाणे घेणें बंधनकारक आहे.

मा. महापालिका आयुक्त यांना प्रभाग समित्यांच्या बैठकीला उपस्थित राहण्याचा व समित्यांच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार आहे. आता विभाग आयुक्त म्हणून प्रत्येक विभाग (झोन) कार्यालयात नियुक्ती झाल्याने मु.प्रा.मा.न.अधि.१९४९ चे कलम ६९ अन्वये विभाग आयुक्तांना प्रभाग समित्यांचे बैठकीस हजर राहण्याचे अधिकार प्रदान करावे लागणार आहे.

## ३. <u>प्रभाग समितीचे कार्यक्षेत्र</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९-अ पोटनियम ७ मध्ये समितीचे कर्तव्य व कार्य विहित करण्यांत आलेली आहेत. विभागीय कार्यालयाचे कामकाज प्रभाग समितीच्या सर्वसाधारण समन्वयाने कार्यान्वित होणार आहे. व प्रभाग समितीची कामे महानगरपालिकेच्या देखरेखी व नियंत्रणाखालीच राहील. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा अंर्तभाव राहील.

**अ]** महानगरपालिकेच्या सेवा व सुविधांच्या संदर्भात स्थानिक नागरिकांच्या तक्रारीचे तातडीने व तत्परतेने अचूक निवारण करणे. यामध्ये पाणीपुरवठा, जल निसःरण, स्वच्छता आणि पावसोच तुंबलेल्या पाण्याची विल्हेवाट या सारख्या स्थानिक व अत्यावश्यक सेवेचा समावेश आहे.

**ब]** प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रातील व भौगोलिक हद्दित येणारे निवडणूक प्रभागातील खर्चाचे अंदाजपत्रक व अर्थ संकल्पातील निरनिराळ्या लेखा शिर्षाखाली बाबींवर मा. आयुक्तांकडे पाठविण्यापूर्वी त्यावर विचार विनिमय करून त्यावर निर्णय घेणे व शिफारशीसह मा. आयुक्तांना सादर करणे.

**क]** महानगरपालिकेने मान्ये केलेल्या अर्थ संकल्पातील प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये करावयाच्या स्थापत्य कामाचे आराखडे यांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्याबाबत निर्णय घेणे. अशी मान्यता मंजूर अर्थसंकल्पात विनिदिर्ष्ट केली असल्यास प्रत्येक कामाच्या संदर्भात ५ लाख रुपयांपर्यंतच्या खर्चास मंजुरी देता येईल.

**ड]** याशिवाय सर्वसाधारण सभा ठराव पारित करून त्याद्वारे योग्य आणि इष्ट वाटतील अशी इतर कामे करण्याचे अधिकार प्रभाग समितीला प्रदान करू शकेल.

**इ]** प्रभाग समितीची सभा महिन्यातून एका वेळी त्या त्या विभाग (झोन कार्यालयात भरविण्यांत आली पाहिजे.)

## ५. प्रस्ताव सुत्रपात [INITATE] करणे.

महानगरपालिकेच्या मंजूर अर्थसंकल्पातील जी स्थापत्य कामे प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये करावयाची असतील त्याचे प्राथम्य व प्राधान्य मा. महापालिका आयुक्त यांच्याशी चर्चा करून विभाग आयुक्तांनी ठरावयाचे आहे. विभाग आयुक्त यांनी अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेली प्रभागातील सर्व कामे त्या त्या वर्षात पार पाडली जातील याची जातीने खात्री करावयाची आहे. त्या दृष्टीकोनातून त्यांनी विभाग अधिकारी व अन्य अधिकारी यांना योग्य ते आदेश / सूचना देऊन मार्गदर्शन करावयाचे आहे. व इतर खाते प्रमुखांशी आवश्यक तो समन्वये ठेवावयाचा आहे. प्राथम्य ठरविल्यानंतर रुढ पध्दतीप्रमाणे प्रशासकीय मान्यता, घेण्याची प्राथमिक जबाबदारी विभाग अधिकारी यांचेवर राहील. प्रभाग समित्यांकडे या संदर्भामध्ये किंवा अन्य कोणत्याही प्रकरणांमध्ये जे विषय पत्र पाठविले जाईल ते मात्र विभाग आयुक्त यांच्या स्वाक्षरीने पाठवावयाचे आहे. या पध्दती संदर्भात समिती अधिक्षक त्यानुषंगाने सभेची विषय संचिका तयार करून नगरसचिव यांचे मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती सभेचे आयोजन करील.

## ६. विषयपत्रांतर्भूत बाबी

विषयपत्रामध्ये कोणत्या गोष्टी अंतर्भूत कराव्यात या संदर्भाचे स्पष्ट असे निर्देश कोणत्याही नियमात दिलेले नसले तरी विषयपत्राचा हेतून विचारात घेता ते त्या विषया संदर्भामध्ये, आर्थिक व कायदेशीर बाबीचा संपूर्ण तपशिल देणारे असावे अशी अपेक्षा आहे. त्याप्रमाणे विषयपत्रामध्ये कोणत्याही प्रकारची संदिग्धता न ठेवता अत्यंत स्पष्टपणे प्रस्ताव लिहिणे आवश्यक आहे. केवळ विषयपत्र ठेऊन प्रभाग समित्यांची मान्यता घेणे म्हणजे तो प्रस्ताव कायदेशीरच होईल असे मानात येणार नाही. त्यामुळे विभाग अधिकारी यांनी केवळ कायद्याने अपेक्षित आहे असाच व कायद्याच्या चौकटीत बसणार आहे. असाच प्रस्ताव मान्यता देणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे ठेवणे त्यांचेवर कायदेशिरित्या बंधनकारक राहील व कोणतीही बेकायदेशीर गोष्ट घडल्यास त्यास विभाग अधिकारी जबाबदार राहील.

## ७. समिती अधिक्षक (कार्यालय अधिक्षक)

प्रभाग समित्यांचे समिती अधिक्षक हे मा. अध्यक्ष प्रभाग समिती यांचे नियत्रंणाखाली व मार्गदर्शनाखाली काम करणारे आहेत. त्यांनी वेळोवेळी नगरसविच यांचे कडून मार्गदर्शन घ्यावयाचे आहे. प्रशासकीयदृष्ट्या ते नगरसचिव यांचे अधिपत्याखाली कार्यरत राहणार आहेत. तथापि अन्य कामकाजाच्या दृष्टीकोनातून ते केवळ मा. अध्यक्ष सभापती, प्रभाग समिती यांचेच पर्यवेक्षणाखाली काम करतील. मा. अध्यक्ष व नगरसचिव यांची मान्यता घेऊन त्यांनी वेळोवळी प्रभाग समितीच्या बैठका निमंत्रिक करावयाच्या आहेत. प्रभाग समितीचे कामकाज हे संपूर्ण पणे मा. स्थायी समितीच्या कामकाजाच्या धर्तीवरच चालणार आहे. त्यामुळे समिती अधिक्षक त्यांनी ज्या पध्दतीने मा. स्थायी समितीच्या सभांचे अभिलेख जबाबदारीने ठेवले जातात. त्याच पध्दतीने प्रभाग समितीचे सर्व अभिलेख समिती लेखानिक यांनी स्वत:च्या जबाबदारीने व स्वत:च्या ताब्यात ठेवायचे आहे. बैठकीच्या सर्व

कामकाजासाठी समिती अधिक्षक हे कायदेशिररित्या स्वतः वैयक्तिक जबाबदार राहतील. त्याचपमाणे प्रभाग समितीमध्ये मान्य झालेले सर्व प्रस्ताव त्याला रितसर ठराव क्रमांक घालून व त्याचे योग्य त्या नोंद वहिमध्ये करून कार्यवाहीसाठी विभाग आयुक्त यांचे कार्यालयात व महानगरपालिकेतील सर्व विभाग प्रमुख यांचेकडे पाठवावयाचे आहेत. तसेच समिती अधिक्षक यांनी नगरसचिव कार्यालयाकडे ज्या पध्दतीने विषयपत्र रजिस्टर, सभाची हजेरी पत्रिके ठराव व इतर महत्वाची कागदपत्रे जतन केली जातात. त्याप्रमाणे प्रभाग समित्यांचे कामकाजाबाबतची कागदपत्रे जतन करावीत. इतिवृत्त नोंदवही PROCEEDING BOOK वर मा. अध्यक्ष व नगरसचिव यांची स्वाक्षरी असेल. विषयपत्र व त्यानुषंगाने होणारे ठराव अत्यंत महत्वाचे आहे. कामकाजाबाबतचे अभिलेखे ठेवण्याचे नमुने नगरसचिव कार्यालयातील नमुन्या प्रमाणेच राहतील. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री जावेद रज्जाक : टपरी बाबत काय झाले खुलासा करावा.

श्रीमती जाहेदा बेगम : माझ्या वॉर्डात १७ पोलसाठी अर्ज दिला होता. काहीही कार्यवाही झालेली नाही. अधिकारी यांच्याकडे नेहमी विचारणा केली असता काम करण्याचे आश्वासने दतात. विद्युत विभागाचे अधिकारी बदलून दुसऱ्या अधिकाऱ्याची नेमणूक रावी. या बाबत प्रशासनाने खुलासा करावा.

सौ. लता दलाल : तसेच मालमत्ता विभागामध्ये सक्षम अधिकारीची नेमणूक करावी.

मा. महापौर : श्रीमती जाहेदा बेगम यांच्या वॉर्डातील ज्या विद्युत बाबत समस्या असतील त्या संबंधित अधिकारी यांनी लवकर पाहणी करून सोडवण्याची कार्यवाही करावी.

श्रीमती फरहत बानो : माझ्याही वॉर्डातील लाईटची कामे अपूर्ण आहेत. संबंधितांना आदेशीत करावे. १५ सोडीयम लाईट लावलेले आहेत. ते व्यवस्थित नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : टपरीबाबत सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. की, ३० फुटाच्या आत रोडमध्ये ज्या टपऱ्या असतील त्या काढण्यासाठी पोलिस कार्यालयाची एन.ओ.सी.ची गरज नाही. विनाकारण संचिका एक दुसऱ्या विभागात प्रलंबित असतात.

श्री. कवंरसिंग बैनाडे : सिडको मधील माझ्या वॉर्डातील ड्रेनेज पाईप टाकण्यासाइी ३-४ महिन्यापासून पत्र दिलेले होते. परंतु अधिकारी यांना विचारणा केली असता सिडकोतील नगरसेवकांना पाणी प्रश्ना व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही कामाबाबत स्वेच्छानिधीतून कामे करता येणार नाही. तशा प्रकारची प्रशासनाने लेखी पत्र द्यावे त्यानुसार न्यायालयात दाद मागण्याची तयारी आम्ही करू. याबाबत खुलासा करावा.

मा. महापौर : श्री. बैनाडे स.स. यांच्या प्रश्नाबाबत संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्रीमती फरहत बानो : मी विचारलेल्या प्रश्नाबाबतही खुलासा करावा.

श्री. शहर अभियंता : ज्या ज्या सभासदांनी लाईट बाबत सूचना मांडल्या आहेत. ज्या समस्या सोडवण्या बाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल. श्रीमती स. फरहत बानो यांच्या वॉर्डातील सोडीअम व्हेपरचे जे लाईट बंद आहेत ते लवकरच चालू करण्यात येतील.

श्री. अविनाश कुमावत : सभागृहात स. सभासद नाही. गणपूर्ती अभावी सभा तहकूब करण्यात यावी.

मा. महापौर : विद्युत (लाईट) बाबत सविस्तर चर्चा करण्यात येईल व आजची सभा गणपूर्ती अभावी तहकूब करण्यात येते.

या बरोबर "जन-गण-मन" या राष्ट्रगीताने सभा सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १९/१२/९८ रोजी भरलेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**शनिवार, दि. १९/१२/९८ रोजी ११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली "कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात" "वंदे मातरम्" गिताने सुरुवात झाली.**

**या सभेस कार्यालयीन अधिकारी वर्ग यांच्यासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स. सदस्य |
| २) | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्माणराव | --//-- |
| ३) | स.स.श्री. अफसरखॉन यासिनखॉन | --//-- |
| ४) | स.स.श्री. लोखंडे रुख्मिणीबाई खंडेराव | --//-- |
| ५) | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ६) | स.स.सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ७) | स.स.श्री. म. सलीम म. हनीफ | --//-- |
| ८) | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ९) | स.स.श्री. ॲड. गणेश किसनराव वानखेडे | --//-- |
| १०) | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | --//-- |
| ११) | स.स.सौ. उषाबाई दिलिप गायकवाड | --//-- |
| १२) | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| १३) | स.स.श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १४) | स.स.श्री. नरेंद्र यादव पाटील | --//-- |
| १५) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १६) | मा. श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १७) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| १८) | स.स.श्री. बैनाडे कवरसिंग किशनसिंग | --//-- |
| १९) | स.स.सौ. शिंदे पद्मा बाबुराव | --//-- |
| २०) | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २१) | स.स.श्री. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २२) | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २३) | स.स.सौ. फरहत बानो भ्र. मो. नवाज | --//-- |
| २४) | स.स.श्री. फजलउल्ला खॉन अजमत खॉन | --//-- |
| २५) | स.स.श्री. अजिज खॉन गणी खॉ | --//-- |
| २६) | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो. मुश्ताफा | --//-- |
| २७) | स.स.श्रीमती नुरजहॉं बेगम अ. रहेमान | --//-- |
| २८) | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| २९) | स.स.श्री. हाजी मोहसीन अहमद हाजी बशिर अहमद | --//-- |
| ३०) | स.स.श्री. मुजीब आलमशा मिर आलमशहा | --//-- |
| ३१) | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखोरादिन | --//-- |
| ३२) | स.स.श्री. अ. जावेद रज्जाक | --//-- |

३३) स.स. जाहेदा बेगम म. जमिर --//--
३४) स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव --//--
३५) स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर --//--
३६) स.स.श्री. तुळशिबागवाले किशोर बाबुराव --//--
३७) स.स. श्रीमती गंगवाल पुष्पाबाई सुरेशचंद्र --//--
३८) स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा --//--
३९) स.स.श्री. स.अ. इकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन --//--
४०) स.स.श्री. म.अ.रऊफ अ. माबुद --//--
४१) स.स.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण --//--
४२) स.स.श्री. स. अली मिरा सलामी --//--
४३) स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद --//--
४४) स.स.श्री. संजय किसनराव केनेकर --//--
४५) स.स.श्री. फैय्याज अहेमद महमद हाजी कुरैशी --//--
४६) स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास --//--
४७) स.स.श्रीमती अलका रमेश पाटील --//--
४८) स.स.सौ. शकुंतला हरीदास धांडे --//--
४९) स.स.श्री. अब्दुल रशिदखॉन (मामू) --//--
५०) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण --//--
५१) स.स.श्रीमती आव्हाड सविता संजय --//--
५२) स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे --//--
५३) स.स.श्री. अ. रशिद अ. सत्तार --//--
५४) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग --//--
५५) स.स.श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन --//--
५६) स.स.श्री. जैन विकास रतनलाल --//--
५७) स.स.श्री. मनमोहनसिंग करमसिंग ओबेरॉय --//--
५८) स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे --//--
५९) स.स.श्री. संजय रामदास जोशी --//--
६०) स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर --//--
६१) स.स.सौ. जोत्स्ना हिवराळे --//--
६२) स.स.श्री. राजकुमार बचाटे --//--
६३) स.स.सौ. राधाबाई तळेकर --//--
६४) स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर --//--
६५) स.स.श्री. जाधव विठ्ठल किसन --//--
६६) स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन --//--
६७) स.स.सौ. काळुसे मंदा धनंजय --//--
६८) स.स.सौ. कोल्हे सुनंदा उत्तमराव --//--
६९) स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम --//--
७०) स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास --//--
६१) स.स.श्री. नवपुते कचरू चंद्रभान --//--

**संवाद** :

श्री. सुदाम सोनवणे, श्री. रशिदखॉन (मामू) : सभेची वेळ ११.०० ऐवजी ११.३० वाजता ठेवूनही सभागृहात स. सभासद उपस्थित असतात. परंतु अधिकारी वर्ग

सभेच्या वेळी उपस्थित राहात नाही यापुढे सभा सुरु होण्याअगोदर अधिकारी वर्ग यांनी सभागृहात उपस्थित राहण्याबाबतचे आदेश मा. महापौर यांनी द्यावे व सभा गणपूर्ती अभावी काही वेळपर्यंत तहकूब करावी. (याच वेळी आघाडीचे व सत्ताधारी स. सभासद मा. महापौर यांच्या असनाजवळ जाऊन अधिकारी वर्ग यांना यापुढे सभेला वेळेच्या आत सभागृहात उपस्थित राहण्याबाबतचे आदेश द्यावेत असा आग्रह करतात. मोठमोठ्याने बोलणे चालू होते. )

श्री. हमीद ताबा : अधिकारी वर्ग सभागृहात वेळेवर उपस्थित राहत नाही. त्याबद्दल निषेध.

मा. महापौर : यापुढे सभेस अधिकारी वर्ग यांनी सभेच्या वेळेच्या आत सभागृहात उपस्थित रहावे याची अधिकारी वर्ग यांनी नोंद घ्यावी व सभा गणपूर्ती अभावी ३० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ ११.३५ वाजता सभेला सुरुवात १२.०५ वाजता)

श्री. अविनाश कुमावत : प्रसिध्द कवी स्व. श्री. प्रदिप व श्री. मालानी यांचे भाऊ स्व. श्री. द्वारकादास मालानी यांचे दुःखद निधन झाले त्या निमित्त सभागृहात २ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. रशिद खॉन (मामू) : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे.

यावेळी प्रसिध्द कवी स्व. श्री. प्रदिप व स. सदस्य श्री. मालानी यांचे भाऊ स्व. श्री. द्वारकादास मालानी यांचे दुःखद निधन निमित्त सभागृहात सर्व स्तबध उभे राहून २ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र. १६७ :** सौ. मिनाताई मोरे, नगरसेविका मुंबई यांना तथाकथित ज्या लोकांनी भर वस्तीत जाळण्यात आले. ह्या विषयी सर्व नगरसेविका निषेध प्रस्ताव करीत आहोत. प्रस्ताव मान्यतेस्तव.

सुचक - सौ. रजनीताई जोशी
अनुमोदक - सौ. लता दलाल.

**संवाद :**

सौ. लता दलाल : मुंबईतील नगरसेविका सौ. मिनाताई मोरे यांना कुठल्या तरी पक्षाच्या गुंडप्रवृत्तीच्या लोकांनी भर रस्त्यावर मारहाण करून रॉकेले टाकून जाळण्यात आले. असून अशा गुंडप्रवृत्तीच्या लोकांवर शासनाने कडक कार्यवाही करावी व तसा निषेधचा प्रस्ताव एकमताने सभागृहात मंजूर करावा.

श्री. नरेंद्र पाटील : पक्षांतर्गत लोक बाबतचा नावाचा उल्लेख करू नये.

सौ. लता दलाल : कुठल्या तरी पक्षाच्या लोकांनी असे शब्द मी वापरलेले असून मग तो कुठल्याही पक्षाचा येऊ शकतो. स. सभासद यांनी स्वतःच्या पक्षाची बाजू मांडू नये.

श्री. रशिदखॉन (मामू) : महिलावर अत्याचार झाला त्याचा निषेध व्हावा तसेच फायर या चित्रपटाचे संदर्भात दिलिपकुमार यांच्या घरावर जाऊन ज्या लोकांनी रस्त्यावर असभ्य वर्तन केले त्यांचा निषेध करण्यात यावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : दिलिपकुमार यांच्या घरावर जे लोक गेलेले होते त्यांनी असे स्पष्ट केले की, आम्ही त्यांना पाठींबा देण्यासाठी मोर्चा नेलेला होता.

सौ. लता दलाल : दोन्ही घटना वेगवेगळ्या असून एकत्रित निषेधाचे ठराव मांडण्यात येऊ नये.

सौ. रजनी जोशी : एका महिलेला भर रस्त्यावर जाळले त्या बाबतचा निषेधाचा ठराव होण्यासाठी लेखी स्वरुपात दिलेले आहे.

(यावेळी सभागृहात मोठमोठ्याने बोलणे चालू असते. मा. महापौर यांच्या असना जवळ जाऊन बोलणे चालू असते. काहीही ऐकू येत नाही.)

श्रीमती मोहनिसा बिल्कीस, सौ. फरहत बानो, सौ. नुरजहा बेगम : अमेरिकेने इराक वर हल्ला केल्याबाबतचा निषेधाचा ठराव मंजूर करण्यात यावा.

मा. महापौर : निषेध करण्यात येतो. नगरसेविका सौ. मिनाबाई मोरे यांना ज्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी जाळले त्यांच्यावर शासनाने कडक कार्यवाही करावी. स. सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे चर्चेसाठी अर्ध्या तासाचा अवधी देण्यात आलेला आहे.

श्री. जावेद रज्जाक : सभागृहनेता हे सभागृहात मोठमोठ्याने बोलतात त्यांना सभागृहा बाहेर काढावे.

श्री. स. अली मिरा सलामी : एका महिला नगरसेविकावर गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी भर रस्त्यावर जाळले, अपमानित केले. अशा लोकांना फाशीची शिक्षा शासनाने द्यावयास पाहिजे मग ती व्यक्ती कुण्याही पक्षाचे असोत.

**ठराव क्र. १६७** : सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मुंबई महानगरपालिकेच्या स. नगरसेविका सौ. मिनाताई मोरे यांना ज्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी भर रस्त्यावर जाळले, त्या बद्दल सभागृह तीव्र निषेध करते. ज्या गुंडानी नगरसेविका सौ. मोरे यांना जाळले आहे, त्यांच्यावर शासनाने कडक कार्यवाही करावी. ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**संवाद** :

मा. महापौर: निषेधाच्या ठरावा बाबत चर्चा करू नये. विकास कामा बाबत चर्चा करावी.

श्री. कवरसिंग बैनाडे : माझ्या वॉर्डातील जिव्हेश्वर कॉलनी येथे स्वेच्छा निधीतून ड्रेनेज लाईनच्या कामाबाबत प्रशासनाकडे ४ महिने झाले पत्र दिलेले आहे. काहीही कार्यवाही झालेली नाही. सदर कॉलनी मधील लोकांनी १००% बेटरमेंट चार्जेस भरलेले आहे. सिडको येथील प्रभागात स. सभासदांच्या स्वेच्छा निधीतून कामे करता येत नसेल तर तसे प्रशासनाने लेखी द्यावे या बाबत खुलासा व्हावा.

श्री. संजय जोशी : स. सदस्य श्री. बैनाडे यांच्या वॉर्डातील जिव्हेश्वर कॉलनी येथे ड्रेनेज लाईन बाबतचे काम होण्यासाठी प्रशासनाकडे ४ महिने झाले पत्र दिले. कार्यवाही केलेली नाही. छोटी छोटी विकास कामे स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून करण्यता हरकत नसावी.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (पा.पु./ज.नि.) : स. सदस्य श्री. बैनाडे यांच्या वॉर्डातील ड्रेनेज लाईनच्या कामा बाबतचे अंदाजपत्रक करून पाठवलेले आहे. लवकरच कार्यवाही करण्यात येईल.

श्री. कवरसिंग बैनाडे : अधिकारी सभागृहात आश्वासने देतात. प्रत्यक्षात कामे करत नाही. सदर काम सिडको अंतर्गत येत असल्याने होत नाही काय? तसे मा.

आयुक्त यांनी खुलासा करावा. स. सदस्य सभागृहात बोलल्या नंतरच अधिकारी काम करण्याची कार्यवाही केली जाईल अशी उत्तरे देतात. हे योग्य नाही.

या वेळी स. सदस्य श्री. बैनाडे व स. सदस्य श्री. संजय जोशी यांनी मा. महापौर यांच्या डायस समोर येऊन बसतात. मा. महापौर यांनी काम करण्याबाबतचे आश्वासन दिल्यानंतर स. सदस्य उठवून आप आपल्या जागेवर जाऊन बसतात.

मा. महापौर : स. सदस्यांनी आप-आपल्या जागेवर बसावे एकावेळी एकाच स. सदस्यांनी बोलावे.

श्री. हमीद ताबा, श्री. जावेद रज्जाक : अंजली टॉकीज जवळ नाल्याजवळ अनाधिकृत बांधकामे होऊ लागली आहे. याबाबत खुलासा करावा.

श्री. अ. रशिदखॉन (मामू) : अंजली सिनेमागृहाजवळ समोर नाल्याजवळ महानगरपालिकेने कशासाठी बांधकाम केले खुलासा करावा.

यावेळी स. सभासद मोठमोठ्याने बोलतात. काहीही एकू येत नाही.

मा. महापौर : सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते.
वेळ १२:३० वा. सभेला सुरुवात १२.४० वाजता.

मा. महापौर : स. सदस्य श्री. बैनाडे बोलतील.

श्री. कवरसिंग बैनाडे : मी केलेल्या प्रनांच्या अनुषंगाने खुलासा करावा. आमच्या स्वच्छो निधीतून काम करता येत नसेल तर द्यावे.ठराविक नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून कामे होतात. जिव्हेश्वर कॉलनी ही महापालिका अंतर्गत येते. १००% विकास खर्च भरलेला आहे. ड्रेनेजचे काम का करता येत नाही लेखी खुलासा करावा.

मा. महापौर : मा. आयुक्त या बाबत खुलासा करतील.

मा. आयुक्त : स. सदस्य श्री. बैनाडे यांच्या वॉर्डातील ड्रेनेज वॉर्डात ड्रेनेज लाईन टाकण्याबाबतची कामाचे जे पत्र दिलेले आहे. तो भाग सिडको येथील असल्यामुळे पाणी पुरवठ्या व्यतिरिक्त इतर कोणतीही विकास कामे, सिडको येथील भागात करता येणार नाही. व तसे नियमावलीत नाही. जर कुणी स. सदस्यांच्या सिडको येथील वॉर्डामध्ये कामे केलेली असेल ती कशा परिस्थितीत व कशाच्या आधारे करण्यात आलेली आहे. त्या बाबत कार्यवाही करून माहिती सभागृहाला देता येईल.

श्री. नरेंद्र पाटील : गेल्या ८ वर्षापासून म्हणजेच १९८८ सालापासून सिडकोचे प्रतिनिधीत्व करीत आहे. महापालिकेच्या माध्यमातून कोणतीही विकासाची कामे करता येत नाही असे सांगण्यात आले. तो नियम आजही लागू आहे. सिडको भागात बऱ्याच ठिकाणी पाणपोई करण्यात आलेल्या आहेत त्यासाठी महापालिकेला पहिल्यांदा त्या जागेची सिडकोची परवानगी घ्यावी लागते व त्यानंतर बांधकामे ही स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून झालेली आहे. तसेच स. सदस्य सांगतात की, ड्रेनेजची कामे सिडको भागात या अगोदर महापालिकेने केलेली आहे. ज्या अधिकाऱ्यांनी संचिका मंजूर करून कामे केलेली आहे. त्यांच्यावर कार्यवाही करणार काय? जी ड्रेनेजची कामे करण्यात आली ती कशाच्या आधारावर केली याचाही खुलासा मा. आयुक्तांनी करावा.

श्री. सुदाम सोनवणे : सिडको मध्ये येणाऱ्या प्रभागातील पाणी पुरवठ्या शिवाय कुठल्याही विकास कामावर स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून पैसे खर्च करता येणार नाही. असे मा. आयुक्त यांनी खुलासा केलेला आहे. परंतु गेल्या वर्षी श्री. रशिद खॉन मामू हे महापौर असतांना सभागृहात असा निर्णय झालेला होता की, स. सदस्यांना कोणत्याही उपयुक्त कामासाठी स्वेच्छानिधी खर्च करता येईल. माझ्या स्वत:च्या वॉर्डामध्ये ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी स्वेच्छानिधीतून काम करण्यात आलेले असून स. सदस्य श्री. बैनाडे यांच्याही स्वेच्छा निधीतून त्यांच्या वार्डातील ड्रेनेज लाईनचे काम करण्यास मा. महापौर यांनी आदेश द्यावेत.

श्री. नरेंद्र पाटील : सभागृहात असा निर्णय झलेला असतांनाही त्या बाबत प्रशासनाने स. सभासदांच्या ही माहिती निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे होती की, स. सदस्यांच्या स्वेच्छानिधीतून कोणतीही विकास कामे करता येईल.

सौ. फरहत बानो : रमजानचा महिना असून माझ्या वॉर्डात पिण्याचे पाणी येण्याची वेळ निश्चित नाही. पाण्याची वेळ स. ८ ते ९ ठेवावी रात्री बेरात्री पाणी पुरवठा होतो. तसेच स्वेच्छा निधीतून ६-७ महिने झाले टावरचे काम झालेले नाही. खुलासा करावा. सदर टावर हे सिडकोच्या जागेवर बांधण्याचे ठरलेले असून सिडकोची एन.ओ.सी. घेण्यास वेळ लागेल त्यासाठी महानगरपालिकेच्या हद्दित टावर करणे योग्य राहील. टावरच्या कामासाठी संबंधित अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता बजेट नाही असे सांगितले जाते. याबाबतही खुलासा करावा.

श्री. अफसर खॉन : स. सदस्या या त्यांच्या स्वेच्छा निधीतून सदर काम करण्यास सिडकोला परवानगी मागत असून काम करण्याची परवानगी द्यावी जी अत्यंत महत्वाची कामे आहेत ती स. सदस्य त्यांच्या स्वेच्छा निधीतून करण्यास हरकत नसावी.

सौ. फरहत बानो : माझ्या वॉर्डातील गल्ली नं. १२ येथे फरशी बसविण्या बाबत ३-४ वेळेस सर्व्हे झालेला असून त्या कामाचे आजपर्यंत अंदाजत्रक तयार केलेले नाही. कधी काम करणार यांचा खुलासा करावा.

सौ. जोत्सना हिवराळे : अमरप्रित हॉटेल ते न्यु बालाजीनगर या अंतर्गत रस्ता होण्यासाठी १९९६ ला पत्र दिलेले होते. नागरिकांना जाण्या येण्यासाठी रस्त्याची आवश्यकता आहे हा भाग शैक्षणिक झोन आहे. येथे संबंधित अधिकारी यांनी कुंपन भिंत बांधण्याची परवानगी दिलेली आहे काय? खुलासा करावा व कशाच्या आधारे दिलेले आहे.

श्रीमती मोहसिना बिल्कीस : माझ्या वॉर्डातील खालील प्रमाणे समस्या आहेत.

१) पाणी पुरवठ्याची वेळ निश्चित असावी. ४ ते ५ दिवसांनी रात्री बेरात्री पाणी पुरवठा होता. तसेच शहागंज येथील पाण्याच्या टाकी येथे बंद असलेल्या फोनची व्यवस्था सुरू करणे.

२) त्याप्रमाणे विद्युत लाईट बाबतही बऱ्याच वेळा तक्रारी करून ही कामे व्यवस्थीत होत नाहीत. लाईनमन येतात अपूर्ण कामे करून जातात. मटेरियल सपंले, शिडी नसते व नगरसेवकांना शिडी मागविण्यास सांगतात. याबाबतही कार्यवाही करावी याच बरोबर चंपाचौक ते पिरगैबदर्गाह रोडवर डिवायडर ची उंची वाढविण्या बाबतच्याकामाची कार्यवाही करावी.

सौ. रुख्मणीबाई लोखंडे : मागील सभेत मी ५ प्रश्न विचारलेले होते. त्यात माझे समाधान झालेले नाही.

१) १९९६ ला स्मशान भूमी करण्यात आली असून त्या ठिकाणी लाईट पोल नसून लाईटची कुठलीही व्यवस्था करण्यात आलेली नाही.

२) सोडियम व्हेपरचे पोल टाकण्यात आले ते शांतीपुरा ते नंदनवन कॉलनी ते भिमपुऱ्यापर्यंत त्यापुढे भावसिंगपुरापर्यंत ५ पोलची आवश्यकता होती ते टाकण्यात यावे.

३) माझ्या वॉर्डातील भावसिंगपुरा येथे पाणी भरण्यासाठी खोलवर गड्डे असून त्यातून नागरिकांना पाणी भरावे लागते. त्यासाठी पाणी भरण्यासाठी सोयीस्कर काय उपाययोजना करता येईल. तशाप्रकारची कार्यवाही करावी. तसेच पाण्याची लाईन ही कमी व्यासाची असून मोठ्या व्यासाची पाईप लाईन टाकण्यात यावी.

४) बऱ्याच दिवसांपासून पाण्याच्या टाकीचे काम होण्यासाठी प्रशासनाकडे पत्रे दिलेली आहे. टाकी उभारणीसाठी माझ्या वॉर्डात जागा उपलब्ध असून वॉर्डातील ड्रेनेज लाईनची अर्ध्या गावामध्ये सुविधा नाही व्यासासाठीही पत्र दिलेले आहे. सदर संचिका मजूर करण्यात आलेली नाही. त्याबाबतही कार्यवाही करण्यात यावी.

५) वार्डातील शौच्छालयाचे काम काही पूर्ण झालेले नाही. त्यामुळे रस्त्यावर नागरिक घाण करून ठेवतात. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता टाळता येत नाही. करिता वॉर्डात शौच्छालय करून देण्याचीही कार्यवाही करावी.

सौ. नुरजहाँ बेगम : शहरात १९९५ पासून मुस्लीम कब्रस्तानावर काही गुंड प्रवृत्तीचे लोक अतिक्रमणे करतात व तशा प्रकारच्या तक्रारी आलेल्या आहेत. हिनानगर येथील श्री. बारी यांचे घर का तोडण्यात आले. त्यावेळेस पूर्ण इमारत उभी होते त्यावेळेस प्रशासनला दिसते काय? महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर नागरिक अतिक्रमण करून घरे बांधतात त्यावेळेस प्रशासन योग्य वेळीच कार्यवाही का करत नाही.

श्री. मुजीब आलमशहा खॉन : श्री. बारी यांनी एक इसम कय्युब यांचा प्लॉट सीटी सर्व्हे नंबर ११३१६ हा असून या ऐवजी ची रजिस्ट्री करून घेऊन बांधकाम केलेले असून महापालिकेने दुर्लक्षित झाले म्हणून संबंधितांनी त्या ठिकाणी अनाधिकृतरित्या बांधकाम केलेले असून बांधकाम पाडू नये म्हणून कोर्टातून स्टे आणला. सदर स्थगिती आदेश १६ तारखेला व्हॅकेट झाला. १८ तारखेला कोर्टातून कॉपीइआणून दिली. गरिबाच्या प्लॉटवर अतिक्रमण केले म्हणून जिन्सी पोलिस स्टेशनमध्ये बऱ्याचदा एकमेका विरुध्द केसेस झ ालेल्या आहेत. श्री. बारी यांच्या अनाधिकृत बांधकाम पाडण्यासाठी गेलेल्या महापालिकेचे अधिकारी यांना मारहाण होते व त्रास सहन करावा लागतो. त्याबद्दल प्रशासनाने उच्च न्यायालयात केस करावी. पोलिसांनी तक्रार घेतली नाही. नियम सर्वांना बरोबर आहे. ४ लोक जखमी झाले. त्याची आतापर्यंत तक्रार नोंदविली नाही. व संबंधितावर योग्य ती कार्यवाही करावी. यास सभागृहाची संपूर्णतः मंजुरी आहे.

मा. महापौर : प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. तसेच संबंधितांविरुध्द न्यायालयात दाद मागवावी.

श्री. राजकुमार बचाटे : महानगरपालिकेच्या माध्यमातून जे रस्ते झालेले आहे. त्यामध्ये शैक्षणिक झोन मध्ये रस्त्याला लागून अनाधिकृत बांधकामाला परवानगी देऊ नये. दिलेल्या बांधकाम परवानगीस स्थगिती द्यावी.

श्रीमती अलका पाटील : वॉर्ड क्र. ५३ मध्ये भडकलगेट येथे घाटी दवाखाना असून दवाखान्यातील बेकामी झालेली घाण तेथील कर्मचारी माझ्या वॉर्डातील वसाहती लगत असलेल्या कुंडीमध्ये आणून टाकतात. त्यानंतर ती कचरा पेटवण्यात येऊन त्यातून सुटणारी दुर्गंधी, यामुळे नागरिकांना त्रास हातो. नागरिकांच्या आरोग्याला धोका होण्याची शक्यता आहे. तसेच घाटी दवाखान्यातील पी.एम. ज्या ठिकाणी होते ती जागा सुध्दा बदलण्याची कार्यवाही व्हावी. संबंधित वैद्यकीय अधिकारी (डीन) यांना या बाबत बऱ्याच वेळा सूचना दिलेल्या असून काहीही कार्यवाही केलेली नाही.

श्री. व्ही.व्ही. देशमुख : माझ्या वार्डालगत जुन्या शहरामध्ये जिन्सी या प्रभागात पाण्याचा हौद असून सदर हौदातून पाण्याचे जो पंप टाकण्यात आलेले आहे. ते खूप वर्षापूर्वीचे असून त्या प्रभागातील पाणी पुरवठा कधीही खंडीत होऊ शकतो. प्रशासनाकडे पत्र दिले होते. त्या पत्राचे उत्तर दि. १८/१२/९८ रोजी मिळाले सदर पाईप लाईन मधून होणारा पाणी पुरवठ्यासाठी ती पाणी पुरवठा लाईन योग्य की अयोग्य याची पहाणी मा. आयुक्त, संबंधित अधिकारी (पा.पु.) यांनी पाहणी करून सदर छत केव्हांही खाली पडण्याची शक्यता आहे. या दृष्टीने प्रशासनाने विचार करावा व मार्च ९९ पूर्वी मंजुरी द्यावी सदर काम करावे मंजुरी देण्यात यावी. येणाऱ्या सर्वसाधारण सभेत या कामास मंजुरी द्यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सभागृहात नेहमी बजेट नाही असे सांगितले जाते. इतर सर्व कामा बाबत एक विशेष सभा बोलवावी त्या प्रशासन व स. नगरसेवक राहतील त्यात विद्युत बाबतही चर्चा करावी. तसेच रमजानचा महिना असल्यामुळे लाईट व पाणी पुरवठा खंडीत होणार नाही याची प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री. प्रभाकर विधाते : शहरातील सर्वच प्रभागातील पाणी पुरवठ्या बाबतच्या समस्य प्रशासनाने सोडवण्याची कार्यवाही करावी.

श्री. रशिद खॉन (मामू) मराठी व उर्दू माध्यमातील शिक्षक भरती करण्याची कार्यवाही सध्या चालू असून त्यास मराठी माध्यमाप्रमाणे उर्दूच्या रिक्त असलेल्या जागा भरण्यात याव्यात. या भरतीमध्ये उर्दू माध्यमाच्या फक्त प्रशासन ३ शिक्षक देणार आहे असे कळते. परंतु तसे न होता जास्त जागा भरण्याची कार्यवाही करावी. बऱ्याचशा उर्दू शाळेवर मुलांची संख्या जास्त असून जसे जिन्सी, चेलीपुरा, रोजाबाग, बेगमपुरा या भागातील शाळेवर मुलांची संख्या जास्त असून उर्दूच्या २५ ते ३० जागा रिक्त आहेत व शिक्षकांची आवश्यकता आहे. ४-४ महिने महिला शिक्षिका प्रसुती रजेवर जातात त्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होते. करिता राखीव शिक्षक नेमावे. उर्दू माध्यमातील शिक्षकांची भरती ३ ऐवजी जास्त करण्यात यावी. तशी कार्यवाही प्रशासनाने करावी.

श्री. हमीदोद्दिन ताबा : रिक्त जागा भरण्याचे आदेश द्यावेत. आता फक्त राखीव जागाच भरण्यात येत आहेत.

सौ. रजनी जोशी : १५ तारखेला कर्मचाऱ्यांनी सामुहिक संप केला त्याचे काय झाले? तसेच येत्या २३ तारखेलाही बेमुदत संप करणार आहेत. याचा खुलासा करावा.

श्री. मोहसिन अहमद : स. सदस्य यांनी जो मुद्दा शिक्षक भरतीबाबत उपस्थित केला तो योग्य असून काही शाळांमध्ये शिक्षक कमी मुलांची संख्या जास्त आहे. त्यातच उर्दू माध्यमातील शाळेवर शिक्षक कमी आहेत. मुलांची संख्या जास्त. शिक्षक विविध कारणासाठी ३-३ महिने रजेवर जातात. दोन-दोन वर्ग एकत्र करून एकच शिक्षक शिकवितात. त्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होते. व ठरल्याप्रमाणे त्या शाळेतील निकाल योग्य लागत नाही. निकषाप्रमाणे शिक्षक पाहिजेत अल्पसंख्यांक या दृष्टिकोनातून विचार केल्यास उर्दू माध्यमातील जास्तीत जास्त शिक्षक भरण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी व विशेष सवलत देण्यात यावी.

मा. महापौर : मा. आयुक्त खुलासा करतील.

मा. आयुक्त : स. सभासदांनी विविध विकास कामाबाबत चर्चा केलेली असून त्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. संबंधित अधिकारी यांना तसे आदेश देण्यात येतील. स. सभासदांनी काही वैयक्तिक बाबी उपस्थित केलेल्या असून काही धोरणात्मक बाबींवरही खुलासा विचारलेला आहे. त्यातील पहिली बाब म्हणजे रमजान महिना सुरू असल्याने पाणी व लाईटची योग्य ती व्यवस्था करण्याचे आदेश संबंधित अधिकारी यांना देण्यात येतील. गेल्या २-३ वर्षापासून रमजानच्या महिण्यात प्रशासनाकडून कुठल्याही प्रकारची अडचण निर्माण झालेली नाही. त्याप्रमाणे उर्दू शाळेवर जास्तीचे शिक्षक द्यावे. या करिता शिक्षण विभागातून काही शिक्षकांची सेवानिवृत्ती, स्वेच्छा निवृत्ती, आकस्मित मृत्यू अशा विविध प्रकारे रिक्त पदे झालेली असून शिक्षक भरती करण्याची कार्यवाही चालू असून उमेदवारांच्या लेखी व तोंडी मुलाखती पण घेतलेल्या आहेत. यात मराठी माध्यमातील १८ शिक्षक व उर्दू माध्यमाचे ३ शिक्षक घेणार आहोत. स. स. यांनी उल्लेख केल्याप्रमाणे एकच शिक्षक एखाद्या शाळेवर दोन-दोन वर्गाला शिकवित असेल, मुलांची संख्या जास्त असेल, त्या शिक्षकांची आवश्यकता आहे. तशी परिस्थिती असेल तर मंजूर पदे किती, रिक्त पदे किती व किती पदे भरणे आवश्यक आहे. याचा निकष लावून उर्दू माध्यमातील शिक्षकांची ३ पेक्षा जास्त शिक्षक घेता येतील यात शंका नाही. तशी जास्त उमेदवारांच्या मुलाखती पण घेतल्या आहेत. स. सदस्या सौ. रजनीताई जोशी यांनी १५ तारखेच्या सामुहिक त्यात महापालिका कर्मचारी महासंघाने आंदोलन केले त्यात कर्मचाऱ्यांनी सामुदायीक रजा घेऊन १००% प्रतिसाद दिला त्यात वर्ग-१,वर्ग-२ तसेच जकात, पा.पु, उद्यान इ. अत्यावश्यक कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतलेला दिसून येत नाही. महापालिका कर्मचारी, महासंघाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या मागण्या अशा की,

१) ५ वा वेतन आयोग लागू करावा.
पाच हजार रुपये प्रत्येक कर्मचाऱ्याला अग्रीम म्हणून द्यावी,

२) २०० स्थायी पदे भरण्याबाबत सत्वर कार्यवाही करावी.

३) १२०० अस्थायी पदे मंजूर करून ती कायम करण्यात यावी.

या प्रस्तुत मागण्या होत्या. इतर ज्या मागण्या आहेत त्या अशा की, अप्रेन्टीस कामगारांना सेवेत सामावून घ्यावे, तसचे त्या कर्मचाऱ्यांना गरम कपडे द्यावे. वर्ग-३ चे जे कर्मचारी सेवानिृत्त होतात त्यांच्या पाल्यांना अनुकंपा धर्तीवर सेवेत सामावून घेण्यात यावे, या सर्व मागण्यांसाठी

संघटनेचे पदाधिकारी यांच्याशी चर्चा केली व महापालिकेतील एक विशेष अधिकारी या सर्व मागण्याबाबत शासनाकडे माहिती देण्यासाठी पाठविण्यात येईल असे आश्वासन दिले. कर्मचाऱ्यांचे जे निवेदन होते ते शासनाकडे पाठविलेले आहे. त्यात असे सांगण्यात आले की, ६ महिन्यापूर्वी सभागृहाने ठराव मंजूर केलेला आहे. २०० कर्मचाऱ्यांच्या बाबतीत १९९५ साली ठराव झ ालेला आहे. आकृतीबंध कसा असावा याबाबतही प्रशासनाने सभागृहाला सादर केलेला आहे. व त्यावर विचार विनिमय चालू आहे. ही सर्व पदे भरतांना अस्थापनेवर खर्च किती होणार आहे, महानगरपालिकेचे उत्पन्न किती आहे, विकासासाठी किती खर्च होणार आहे, तसेच महानगरपालिकेचे जे मोठमोठे प्रकल्प हाती घेतले आहेत त्यावर कर्मचारी वर्ग किती लागणार आहे, या सर्व बाबतीत प्रशासनाला विचार करून सर्वसाधारण सभेत तसा ठराव घेऊन कार्यवाही करावी लागेल. महाराष्ट्रामध्ये सर्वच महापालिका व नगरपालिकांचे हे आंदोलन होते त्यामुळे आपल्या महापालिकेचही कर्मचारी या आंदोलनामध्ये सहभागी होते. महाराष्ट्रातील कुठल्याही महापालिकेमध्ये कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही. जे १२००,२०० अस्थायी पदे भरण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव गेलेला आहे. व येत्या २३ तारखेला संघटनेच्या पदाधिकारी यांनी संप करून नये असे आश्वासन प्रशासनाने दिलेले आहे. वैयक्तिक काही प्रश्न स. सदस्यांनी उपस्थित केलेले आहेत. त्यात शौच्छालय, बालवाडी पाणी पुरवठ्या बाबत य बाबतीत संबंधित अधिकाऱ्यांना तशी कार्यवाही करण्यास आदेश देण्यात येतील.

श्री. रशिदखॉन (मामू) शिक्षकांची रिक्त पदे नसतील, शासनाची मंजुरी घ्यावी लागत असेल तर तोपर्यंत ठराविक वेतनावर शिक्षक देण्याची कार्यवाही करावी. तसेच सिडको येथील विकास कामे स्वेच्छानिधीतून करता येतील किंवा काय याचा खुलासा करावा.

मा. आयुक्त : शिक्षक भरती बाबत खुलासा केलेला असून सिडको येथील स्वेच्छा निधीतून पाणी प्रश्नाव्यतिरिक्त कुठल्याही विकास कामावर निधी खर्च करता येणार नाही. स. सदस्य सोनवणे यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या वॉर्डातील त्यांच्या स्वेच्छा निधीतून १.२५ लाख रुपये खर्च करून ड्रेनेज लाईन केलेली असेल परंतु सभागृहाने एक विशेष बाब म्हणून मंजुरी दिलेली होती. तसे स. सदस्य श्री. बैनाडे यांच्या वॉर्डात स्वेच्छानिधीतून ड्रेनेजलाईन टाकावयाची असेल तर तसा प्रस्ताव देवून सभागृहाने मंजुरी द्यावी.

मा. महापौर : सिडकोतील स. सदस्यांच्या स्वेच्छानिधीतून विकासाची कामे यापुढे करण्यात येतील.

श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. कवरसिंग बैनाडे : सिडकोमधील एन-७ येथील म्हाडा कॉलनी, अविष्कार कॉलनी इ. भाग महानगरपालिकेने हस्तांतर केलेले असून त्या ठिकाणी स्वच्छता, साफसफाई, विद्युत दिवे इ. सुविधा नागरिकांना कोण पुरविते, याचा खुलासा करावा, तेथील स. सदस्य यांना सिडको प्रशासनाच्या माध्यमातून तेथील विकासाची कामे करून घ्यावी लागतात याकडे महापालिकेचे लक्ष नाही काय?

श्री. नरेंद्र पाटील : सिडकोतील स. सदस्यांच्या स्वेच्छानिधीतून कोणतेही काम करावयाचे झाल्यास सभागृहाची मंजुरी मिळाल्यावर करण्यात यावे.

श्री. कवंरसिंग बैनाडे : सिडकोमध्ये ४२ गृहनिर्माण संस्था असून त्या सर्व भागातील विकास कामाबाबतची जबाबदारी महानगरपालिकेने घ्यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : दोन प्रश्न वेगवेगळे असून स्वेच्छानिधीतून खर्च करावे की नाही. याबाबत निर्णय घ्यावा. नसता सिडको प्रशासन सिडकोतील जे विकासाची कामे करताहेत तीही करणार नाही. सिडको हस्तांतरणाबाबत पुढच्या बैठकीस विषय ठेवून निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

सहा. संचालक नगर रचना : रणजीतनगर येथील भागालगत बालाजीनगर म्हणून भाग लागून आहे. हा संपूर्णतः अनाधिकृत असून शैक्षणिक झोन जो आहे, तो रिर्झवेशन नाही. मालकी हक्काचे कागदपत्रे पाहुन परवानगी दिलेली आहे. येथील रस्त्याबाबतही जागा पाहणी केलेली आहे.

श्री. संजय जोशी : अनाधिकृत एरिया आहे. तेथे परवानगी दिली तर शिवशंकर कॉलनी, बालाजीनगर येथे परवानगी देणार काय?

श्री. जयवंत ओक : शहरात शैक्षणिक झोन म्हणून या भागात बांधकाम परवानगी देता येत नाही. त्वरित बंद करावे. गेल्या ३५ वर्ष अशा प्रकारच्या बांधकामास परवागनी दिली आहे काय?, पी.आर.कार्ड कसे देण्यात आले, आतापर्यंत किती शैक्षणिक झोन अंतर्गत बांधकाम परवागनी दिली याची प्रशासनाने चौकशी करावी. नसता शासनाकडे याबाबत दाद मागावी लागेल. प्रशासनाने खुलासा करावा.

सहा. संचालक नगररचना : आरक्षणातील जागा नाही. हा झोन असून आरक्षणातील जागेला आरक्षणाचा नंबर असतो.

श्री. जयवंत ओक : ६ महिन्यापूर्वीच्या जागेवर एका शाळेचा बोर्ड लावलेला होता. संगनमताने बांधकाम परवानगी अधिकाऱ्यांनी दिलेलेली आहे. याबाबत कार्यवाही झाली पाहिजे.

मा. महापौर : याबाबत संबंधित जो कुणी दोषी असेल त्याची सखोल चौकशी प्रशासनाने करावी. याबाबत प्रशासनाने अहवाल सादर करावा. संबंधित बांधकाम करणाऱ्यांवर कार्यवाही करावी.

मा. महापौर : सभा ३० मिनिटे तहकूब करण्यात येते. (वेळ १.५० वा. सभेला सुरुवात २.३० वा.)

**विषय क्र. १६७/१ :** दिनांक ०७/११/९८ च्या विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १९/११/९८ व दि. ०३/१२/९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. गिरजाराम हाळनोर : दि. ०३/१२/९८ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ३२ वर कलम ८ मध्ये ओळ क्र. २ मध्ये सदस्य उपस्थित असल्याचे / नसल्याचे यापैकी कोणता शब्द योग्य आहे, नसल्यास शब्द पाहिजे दुरुस्ती करावी. तसेच पृष्ठ क्र. ३५ वर स्विकृत सभादांचा समावेश करण्यात आलेला दिसून येत नाही. तर प्रभाग समित्या स्थापन कशा प्रकारे करणार जर शासनाचे निर्देश नसतील तर पत्रव्यवहार करून शासनाचे निर्देश घेऊनच या प्रस्तावावर स्विकृती देण्यात यावी.

श्री. संजय जोशी : दि. ०३/१२/९८ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १४ वर विषय क्र. १४६/११ स्थगित ठेवण्यात आलेला असून मंजूरी देण्यात यावी.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

अति. शहर अभियंता : सदरील रस्ता हा डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये आहे. ५० फुटाचा रस्ता असून मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून आलेल्या अनुदानातून हा रस्ता करण्यात येईल.

मा. महापौर : मंजुरी देण्यात येते.

श्री. अ. रशिद अ. सत्तार : दि. ०३/१२/९८ च्या इतिवृत्तातील विषय क्र. १५२/४ पृष्ठ क्र. २२ वर सूचक नव्हते म्हणून प्रस्ताव स्थगित केलेला आहे. मंजुरी देण्यात यावी.

मा. महापौर : प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. शासकीय अनुदान आल्यावर काम करण्यात यावे.

श्री. हमीद ताबा : टपरीबाबत काय झाले, याचा खुलासा करावा.

मा. महापौर : टपरी संदर्भात कमिटी केलेली आहे. लवकरच बैठक घेऊन फॉर्म देण्याबाबत इतर कार्यवाही करण्यात येईल.

सौ. लता दलाल : इतिवृत्तातील पान क्र. ३९ वर समक्ष ऐवजी सक्षम अशी दुरुस्ती व्हावी.

श्री. संजय जोशी : प्रथम दर्शनी नुकसान वाटत असेल तरी ही आजारी लघुद्योग पूर्ववत सुरू करून त्यांना न्याय देण्यास "आर फॉर्म" ची सवलत आवश्यक आहे. नविन लघुउद्योजक प्रोव्होत्साहित होतील. अन्यथा सर्व लघुउद्योजक बाहेर राहतील शहरातील बेरोजगांरावर कुऱ्हाड कोसळेल, त्याप्रमाणे आर फॉर्म ठरावात दुरुस्ती करावीत.

मा. महापौर : आर फॉर्म ठरावात चर्चेनुसार दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १६७/१ :** दिनांक ०३/१२/९८ च्या सर्वसाधारण सभेमधील प्रस्ताव क्र. १४६/११-

१. देवानागरी ते प्रतापनगर स्मशानभूमीपर्यंत खडी रस्ता व नाल्यावर पाईप कल्व्हर्ट बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. १५,०००००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी बाबत स्थगित करण्यात आलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

२. ठराव क्र. १५२/७ अन्वये स्थगित ठेवण्यात आलेल्या प्रस्तावा ऐवजी वॉर्ड क्र. ६१ मध्ये रेल्वेस्टेशन चौरस्त्यावर शासकीय अनुदान प्राप्त झाल्यावर हायमास्ट लाईट बसवण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३. इतिवृत्तातील पान क्र. ३९ वर समक्ष ऐवजी सक्षम अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

४. दिनांक ०३/१२/९८ च्या इतिवृत्तातील ठराव क्र. १४७/१२ मध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात येते. प्रस्तावात दर्शविल्यप्रमाणे महानगरपालिका हद्दितील लघुद्योगजकाकडे प्रक्रियेसाठी मालाची पान नं. ३२ वर महानगरपालिका हद्दिमध्ये, आकारमानात, बाह्य स्वरुपात गुणधर्मात कोणताही बदल न करता प्रक्रियेनंतर निर्यात केलेल्या मालावर सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६३/८ दि. १७/०७/९७ अन्वये लागू करावयाच्या "आर फार्म" नियम व अटींच्या अधिन राहून "०.१०%" ऐवजी एकूण जकात कराच्या १०% जकात कराची आकारणी करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

जकात नियम क्र. १६ मध्ये अस्तित्वात असलेल्या नियमामध्ये "१६(अ) निर्माण करून प्रक्रियेसाठी आयात करून प्रक्रियेनंतर निर्यात करणा४या मालावर

मालाच्या एकूण जकातीच्या १०% जकात आकारणी करणे असा नविन नियम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी नियम क्र. १६(अ) आर फॉर्म सवलतीची नियमावली ठराव क्र. १४७/१२ प्रमाणे राहील.

या व इतर दुरुस्त्यासह दि. ०७/११/९८ च्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त आणि दि. १९/११/९८ व ०३/१२/९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १६८/२ :** अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, निपट निरंजन मंदिर परिसरात फरशी बसविणेच्या कामासाठी सन ९७/९८ च्या सा.बां. खात्याचे डी. एस.आर दरोन अं. प. र. रु. ८१,९९१/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च "स्वेच्छा निधी" मधून करण्यात येईल.

तसेच सदरचे काम हे स. नगरसेवक श्री. प्रभाकर विधाते यांच्या स्वेच्छा निधीतून प्रस्तावित असून निप निरंजन मंदिरामध्ये चबुतरा आहे, त्याभावेती फरशी बसविण्यासाठी स. नगरसेवक त्यांच्या निधीतून काम करण्यासाठी सांगत असून तसे त्यांनी पत्राद्वारे कळविले आहे. सदरील जागेचा सार्वजनिक उपयोग होतो. परंतु मंदिराचा हा भाग आहे. त्यामुळे तेथे काम करण्यासाठी योग्य तो धोरणात्मक निर्णय होणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १६८/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे निपट निरंजन मंदिर परिसरात असलेल्या चबुतऱ्याभोवती फरशी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ८१,९९१/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम स. नगरसेवक श्री. प्रभाकर विधाते यांच्या स्वेच्छा निधीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६९/३ :** सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना आरक्षण क्र. १८१ "खुली जागा" व प्रारुप विकास योजना आरक्षण क्र. २२५ खेळाचे मैदान या आरक्षणाने बाधित होणाऱ्या स. नं. ८/१ गारखेडा ह्या जमिनीचे मालक मुख्य प्रवर्तक, नियोजित अलका सह. गृहनिर्माणसंस्था म. गारखेडा औरंगाबाद यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये महानगरपालिकेस आरक्षित जमीन संपादन करण्याबाबत खरेदी सूचना दिलेली आहे. आरक्षण क्र. १८१ च्या एकूण आरक्षणापैकी संबंधिताचे क्षेत्र ७९३.०० चौ. मी. एवढे आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना आल्याने सहा महिन्यात भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. सहा महिन्यात कार्यवाही झाली नाही तर सदर मिळकत आरक्षणातून वगळली जाते. करिता आरक्षणाने बाधित क्षेत्र महा.प्रा.व न. र. अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादन करणे आणि सदर प्रकरणात होणाऱ्या भूसंपादन खर्चासह मंजुरी देणे योग्य. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. स. अली मिरा सलामी : आरक्षण क्र. १८१ खुली जागा व आरक्षण क्र. २२५ खेळाचे मैदान सदर आरक्षणाची जागा कोठे आहे तसेच प्रस्तावास खर्चासह मंजुरी मागितलेली असून संपूर्ण खर्च किती येणार आहे, याचा खुलासा करावा.

सौ. मोहसिना बिल्कीस : आरक्षणातील संबंधित येत असलेल्यांना किती लोकांना नोटीसा दिलेल्या आहेत. किती देण्याच्या राहिलेल्या आहेत तसेच आरक्षणातील अतिक्रमणे किती झालेली आहेत याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

सहा. संचालक नगररचना : सदर मिळकतीचे जमीन मालक यांनी महा.प्रा.नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये नोटीस दिलेली असून आरक्षण क्र. १८१ मंजूर विकासय योजने मधील असून आरक्षण क्र. २२५ हे शासनास पाठवित असलेल्या प्रारुप विकास योजनेमधील असून ६ महिन्यात भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा आरक्षण व्यपगत होते. भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवतात व जिल्हाधिकारी विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे पाठवतात. यास ३-४ वर्षाचा कालावधी लागतो. त्यामुळे आजच त्यास खर्च किती लागेल सांगू शकत नाही.

श्री. स. अली मिरा सलामी : मा. जिल्हाधिकारी यांचेकडे खर्चासह प्रस्ताव आजच पाठविण्यात येत असून भूसंपादन होण्यास ४-५ वर्ष लागतील तर त्यावेळच्या खर्च धरण्यात येईल की, आजच्या खर्चाची रक्कम धरण्यात येईल याचा खुलासा करावा. प्रस्तावास मंजुरी देण्यास हरकत नाही. परंतु खर्चाबाबत वेगळा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

सहा. संचालक : ज्यावेळेस शासनाची राजपत्रात अधिसूचना येईल त्यावेळेस खर्चाची रक्कम सांगता येईल. प्रस्ताव खर्चासहित पाठवावा लागतो. तसे मा. जिल्हाधिकारी यांचे बंधन असून तशी जिल्हाधिकारी यांची रिक्वायरमेंट आहे. अशा प्रकारचे एकही प्रस्ताव आपल्याकडे प्रलंबित नाही.

सौ. लता दलाल : आरक्षण क्र. १८१ कधीचा आहे? २२५ हा एकच आहे. एकाच प्रारुप मधील पहिला १८१ हा आरक्षण क्र. १० वर्षाच्या आंत घेतला नाही तर नोटीस द्यावी लागते. १९८५ ला १० वर्षे झाली. १९८५ ते ९८ या कालावधीमध्ये या आरक्षणासंबंधी कार्यवाही का झाली नाही. याचा खुलासा करावा. तसेच भूंसपादनाचा खर्च कधीचा दाखवणार आहे.

सहा. संचालक नगररचना : आरक्षण क्र. १८१ हा १९७५ चा असून मंजूर विकास योजनेतील असून प्रारुप मधील आरक्षण क्र. २२५ असून संबंधित मालकांनी आताच खरेदी सूचना दिल्यावरून प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. तसेच त्यावेळेस अ वॉर्ड होईल त्यावेळेस खर्चाची माहिती देता येईल. असा प्रस्तावा मंजुरी करून मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठववयाचा आहे.

श्री. जावेद रज्जाक : सदर आरक्षण कुणाचे आहे, मालकाचे नांव काय? संबंधिताने प्रशासनाकडे केंव्हा पत्र दिलेले आहे, खुलासा करावा.

सहा. संचालक नगररचना : सदर जागा ही सोसायटीची असून त्यांनी दिनांक ११/०६/९८ रोजी पत्र दिलेले आहे.

श्री. जावेद रज्जाक : सदर प्रस्ताव आपण दि. १९/१२/९८ ला ठेवला. अशा प्रकारची कार्यवाही करण्यास वेळ मर्यादित आहे की नाही? मी एक पत्र दिले होते चंपा मस्जीद ते गणेश कॉलनी या अंतर्गत येणाऱ्या आरक्षणाचे संदर्भात उत्तर मागविलेले होते. मला अद्याप पर्यंत मिळालेले नाही. मागील प्रस्तावावर कार्यवाही होत नाही. सदर प्रस्ताव मंजूर न करता स्थगित ठेवावा.

सहा. संचालक : वेळ ही मर्यादित असते. प्रस्ता मंजूर करावा. मागच्या मिटींगच्या वेळेस ऐनवेळी प्रस्ताव ठेवण्यात आला होता.

मा. महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १६९/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना आरक्षण क्र. १८१ खुली जागा व प्रारुप विकास योजना आरक्षण क्र. २२५ "खेळाचे मैदान" या आरक्षणाने बाधित असलेल्या स.नं. ८/१ या जमिनीचे मालक मुख्य प्रवर्तक, अलका सहकारी गृहमिर्माण संस्था यांचे मालकीची ७९३.०० चौ. मी. जागा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७०/४ :** कार्यकारी अभियंता (म.जी.प्रा.वि-२ औरंगाबाद) यांनी पुंडलिकनगर व परिसरासाठीचा पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव रुपये ४७६=७० लक्ष किंमतीचा सादर केला होतो. सदर प्रस्तावास विषय क्र. ३५/१५ दिनांक १६/०७/९८ अन्वये सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आली होती.

मध्यंतरीच्या काळात मुख्य अभियंता (म.जी.प्रा. औ,बाद) यांनी मा. पालकमंत्री यांची ७/९८ मध्ये भेट घेऊन पुंडलिकनगर पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावा बाबत चर्चा केली होती, त्याचर्चेमध्ये ह्या योजनेत शिवाजीनगर, गारखेडा येथील प्रस्तावित टाकी मधील वितरण व्यवस्थेचा अंतर्भाव कारावा असे ठरले. कारण रुपये ६७३२.०० लक्ष किंमतीच्या मंजुर योजनेत ह्या सर्व विस्तारीत कामाचा समावेश आहे. या बदलामुळे व अतिरिक्त वितरण व्यवथेमुळे रुपये १९६.७० लक्ष किंमतीची योजना सुधारित रुपये ९९३.०३ लक्ष किंमतीची तयार करून कार्यकारी अभियंता (म.जी.प्रा.) यांनी पुढील सुधारित ठरावासाठी सादर केली. त्या योजनेत म.न.पा.स. २३.३३% शासकीय अनुदान (रुपये २३१.६७ लक्ष) मिळणार असून उर्वरित रक्कम रुपये ७६१.३६ ही म.न.पा.स आयुर्विमा कर्ज (रुपये ३७१.२१) व बाह्य कर्ज रुपये (३९०.१५) रुपाने उभारावी लागेल. सदर योजना म.जी.प्रा.तर्फे तयार करण्यात येणार असून योजनेच्या कार्यान्वित नंतर पुढील देखभाल म.न.पा. स करावी लागणार आहे. योजनेची गरज व स्वरुप पाहता सदर ठराव पारीत करणेसाठी व विचारार्थ सादर.

२. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार महानगरपालिकेच्या ५ कि.मी. परिसरातील गावासाठी योजना तयार करून राबविणे आवश्यक असल्याने उपरोक्त ६७३२.०० लक्ष किंमतीच्या योजनेमधील सातारा व परिसर प्रस्तावित असून त्या गवासाठी असलेल्या प्रस्तावित टाकीद्वारे वितरण व्यवस्था योजना म.न.पा. तर्फेच तयार करून कार्यान्वित करावी असा प्रस्ताव सादर करीत आहेत. ज्यामुळे १७.५०% (अस्था/समंत्रे खर्च वाचला जाऊन त्या बचतीत इतर कामे करता येईल. ह्या सादर प्रस्तावास मान्यता द्यावी ही विनंती ठरावा नंतर सदर सातारा गावाची योजना त्वरित तयार करून मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

**संवाद :**

श्री. गौतम खरात : सदर प्रस्तावामध्ये पुंडलिकनगर व व परिसरासाठी पाणी पुरवठा योजनेचा उल्लेख असून यात हर्सूलच्या पाठी मागील एकतानगर, मिसारवाडी सुरेवाडी, जाधववाडी यांचा का समावेश करण्यात आलेला नाही.

मा. महापौर : पुंडलिकनगर व परिसरासाठीच्या पाणी पुरवठा योजनेत एकतानगर, सुरेवाडी, अंबिकानगर, भवानीनगर, मिसारवाडी, जाधववाडी यांचा ही समावेश करण्यात येत आहे.

श्री. विखारोद्दिन : सदर काम अनुदानातून करण्यात यावे.

श्री. स.अली मिरा सलामी, श्री. गिरजाराम हाळनोर : विषयातील क्र. २ मध्ये १७.५०% खर्च वाचला जाईल असे दर्शविलेले आहे. माहिती द्यावी तसेच अशा प्रकारची मोठमोठी कामे करण्यासाठी शासनाच्या जी.आर प्रत नंबर प्रस्तावात देणे आवश्यक आहे. याबबतही खुलासा करावा.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री. रशिदखॉन (मामू) : संबंधित अधिकारी अपूर्ण प्रस्ताव सभागृहात ठेवतात. त्यामुळे सभागृहात गोंधळ निर्माण होऊन वेळ वाया जातो. यापुढे कोणत्याही विभागातील प्रस्ताव अर्धवट न येता सविस्तर माहितीसह सादर करावे.
( याच वेळी स. सभासदांचे मोठमोठ्याने बोलणे चालू असते. काहीही एकू येत नाही.)

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता : सदरील प्रस्ताव पुंडलिकनगर व ६ कॉलनीचा असून ९९३.०३ लक्ष खर्च येणार आहे. दही योजना महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी गेलेली आहे. शासनाकडून या योजनेसाठी २३.३३% म्हणजे २३१.६७ लक्ष अनुदान मिळणार आहे. उर्वरित रक्कम ही एल.आय.सी, ओपन मार्केट मधून कर्ज उचलून अशी एकूण ९९३.०३ लक्ष खर्च येणार आहे. सातारा भाग महापालिकेच्या ५ कि.मी. मध्ये येत असून शासनाच्या धोरणानुसार महापालिकेने पाणी पुरवठा करावा लागणार आहे. सध्या म.जी.प्राधिकरण तर्फे ही योजना राबविल्या जाणार आहे. जर महापालिकेला ही योजना करण्याचे ठरले तर अस्थापना व प्लॅन साठी लागणारा जो खर्च म्हणजेच १७.५०% जो आहे तो लागणार नाही.

श्री. विखारोद्दिन, श्री. हमीद ताबा : म.न.पा. ला किती खर्च करावा लागेल व किती कर्ज घ्यावे लागेल. सदरची पाणी पुरवठा लाईनचे काम आताच करणे आवश्यक आहे काय.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : महानगरपाकिला ३७१.२१ + ३९०.१५ लक्ष कर्जरुपी घ्यावी लागेल व ते हप्त्या हप्त्याने द्यावे लागेल.

श्री. विखारोद्दिन : सदर प्रस्ताव पूर्ण अनुदानातून आहे असे भासत होते.

श्री. अविनाश कुमावत : पाणी पुरवठा करायची जबाबदारी महानगरपालिकेची आहे.

श्री. गौतम खरात : सातारा हे गाव महानगरपालिकेच्या हद्दित येत नसून सातारा गावातील ग्राम पंचायतने तसा ठराव घेतला का? आमच्या गावाला पाणी द्यावे वृत्तपत्रात आलेले आहे काय? कुणाच्या हितासाठी प्रशासनाने हा प्रस्ताव ठेवलेला आहे. बाकीच्या वस्ती का घेतल्या नाही. लोक पैसे भरायला तयार नाही. म.न.पा. ला बुडविण्याचा उद्देश आहे असे माझे मत आहे.

श्री.गिरजाराम हाळनोर : पुंडलिकनगर येथील वासियांना पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी म.न.पा.ची असून प्रस्तावात नंबर २ टाकून सातारा गावाला पाणी पुरवठा करण्याबाबत टाकण्याची गरज नाही. सातरा गावासाठी पाणी पुरवठा करावयाचा असेल तर वेगळा प्रस्ताव ठेवावा.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : सातारा याचा समावेश यासाठी केला की, पुंडलिकनगर चे सोबत साताऱ्याचे देखील आरक्षण ठेवलेले आहे. ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची योजना आहे.

मा. आयुक्त : विषय क्र. ४ मध्ये अंतर्भुत असलेल्या कामास यापूर्वीच मंजुरी दिलेली आहे. पुंडलिकनगर येथे जी ५ कोटीची योजनसे स. सदस्य, श्री. रशिदखॉन (मामू) हे महापौर असतांना मंजुरी दिलेली आहे. शासनाचे असे आदेश आहे की, एखादी योजना राबवितांना त्यामध्ये ५ कि.मी. अंतरामध्ये येणाऱ्या गाव वस्ती यांना पाणीपुरवठा होणाऱ्या योजनेद्वारे करण्यात यावे. या योजनेत पाण्याची टाकी व डीस्ट्रीब्युटरीचा समावेश नव्हता म्हणून विस्तारीत योजना म्हणून ६७ कोटी रु. मंजुरी स.श्री. रशिद मामू महापौर असतांना मंजुरी दिलेली आहे. परंतु पुंडलिकनगर या योजनेमध्ये ५ कोटी ऐवजी विस्तारीत म्हणून सातारा या गावासाठी सुधारित योजना म्हणून ४ कोटी वाढलेले असून एकूण ९ कोटीची ही योजना आहे. सुधारित ४ कोटीला मंजुरी देण्यासाठी हा प्रस्ताव सभागृहा समोर ठेवलेला आहे. सदर ग्राम पंचायतीचा ठराव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे गेलेला असल्याने त्यांनी ही योजना करण्याचे ठरविले आहे.

जायकवाडी ते औरंगाबाद अंतर्गत येणाऱ्या जलवाहिनीच्या गावांना जसे म.न.पा तर्फे पाणी पुरविले जाते व पाणीपट्टी त्यांच्या कडून वसूल केली जाते त्या प्रमाणे सातारा गावाकडून बल्क कन्झ्युमर म्हणून पाणीपट्टी वसूल केली जाईल.

श्री. गौतम खरात : महानगरपालिकेच्या माध्यमातून ही योजना राबविणार आहे. कर्ज म.न.पा. देणार आहे. संबंधित गावांना ग्रामपंचायतीचा ठराव मंजूर करून म.जि.प्रा. कडे देण्याचा अधिकार काय? ही वस्तुस्थिती आहे?

श्री. अ. रशिदखॉन (मामू) : प्रस्ताव येतांना पूर्ण येत नाही. मा. आयुक्तांकडून जो प्रस्ताव येतो त्याचा पूर्ण खुलासा ठरावात यायला हवे.

मा. आयुक्त : या योजना राबविण्यासाठी म.जि.प्रा. करणाने राबविलेली आहे. यासाठी एक मंडळ स्थापन केलेले आहे. जायकवाडीची पाणी पुरवठ्याची योजना देखील म.जि.प्रा. राबविलेली आहे. जी योजना जास्त खर्चाची आहे ते मंडळ वेगळे आहे. त्यात आयुर्विमा महामंडळाकडून रक्कम मिळते. त्यास ओपन मार्केट मधून बॉण्डच्या माध्यमातून पैसे मिळतात. ६७ कोटी रु. सारख्या योजना महापालिकेला राबविणे शक्य नाही. प्रस्तावास मंजुरी यासाठी घ्यावी लागते की, पुढील संपूर्ण जबाबदारी म.न.पा.कडे घ्यावयाचे ठरल्यास उदा: विद्युत बिल वसुली, पाणीपट्टी इ. मुख्य योजना ही पहिल्यांदा शहरासाठी राबविल्या जाते. त्यानंतर ५ कि.मी. अंतराच्या आत येणाऱ्या गावाचा समावेश करणे हे आवश्यक असते. तसे शासनाचे धोरण आहे.

श्री. स. अली मिरा. सलीमी : ५ कि.मी. अंतराच्या आत बरेचशी गावे येतात उदा. दौलताबाद, माळीवाडा, झाल्टा इ. गावांनाही म.न.पा. ने पाणी पुरवठा करावा. महापालिकेच्या माध्यमातून पुंडलिकनगरसाठी प्रस्ताव मंजूर केलेला आहे. पुन्हा प्रस्ताव सभागृहात ठेवण्याचे कारण काय?

सौ. लता दलाल : पुंडलिकनगरसाठी ५ कोटी रुपये त्यावरील ४ कोटी हे सातारा गावासाठी जास्तीचा खर्च येणार आहे. तर ४ कोटी हे सातारा गावासाठी लागणारा खर्च कर्जाच्या स्वरुपात घेतल्यानंतर म.न.पा. फेडणार की, म.जि.प्रा. फेडणार याचा खुलासा करावा.

मा. आयुक्त : सातारा गावाकडून किती रक्कम घ्यावयाची हे नंतर ठरविल्या जाईल. बल कन्झ्युमर म्हणून रक्कम घ्यावी लागते.

श्री. काशिनाथ कोकाटे : पुंडलिकनगर येथील नागरिकांना पाणी पुरवठा होण्यासाठी प्रस्तावास ५ कोटी रुपयांची पहिल्यांदा मंजुरी दिलेली आहे. सदर काम शासनाच्या अनुदानातून करण्यांत येणार असून या योजनेत सातारा गावाचा काहीही संबंध येत नसून तशी इतर गावासाठी पाणी पुरवठा करण्यांची अंमलबजावणी करावयाची असेल तर वेगळ्या पध्दतीने प्रस्ताव ठेवून शहराच्या परिसरात येणाऱ्या ५ कि.मी. मधील झाल्टा, सातारा, सुरेवाडी, दौलताबाद, अब्जीमंडी, जाधववाडी इ. गावांना सुध्दा पाणी देण्याची कार्यवाही महानगरपालिकेने करावी. त्यास आमचा विरोध नाही. परंतु सदर प्रस्तावातून सातारा हे गाव वगळण्यात यावे.

श्री. स. अली मिरा सलामी, श्री. काशिनाथ कोकाटे : फक्त पुंडलिकनगरची योजना करण्यास मंजुरी द्यावी

मा. महापौर : प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

(याच वेळी सभागृहात स. सदस्य मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

**ठराव क्र. १७०/४ :**

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुंडलिकनगर परिसरासाठीच्या पाणी पुरवठा योजनेत शिवाजीनगर, गारखेडा येथील प्रस्तावित टाकी आणि वितरण व्यवस्था यांच अंतर्भाव झाल्यामुळे तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ९९३.०३ लक्ष च्या सुधारित ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच सुधारित योजनेनुसार महानगरपालिकेच्या (३३१.६७ लक्ष) २३.३३% शासकीय अनुदान मिळणार असून उर्वरित रक्कमेसाठी आर्युविमा महामंडळातर्फे रु. ३७१.२१ आणि रु. ३९०.१५ बाह्य कर्ज रुपाने उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

२. तसेच महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार महापालिकेचा ५ कि.मी. परिसरातील गावांसाठी योजना करून राबविणे आवश्यक असल्यामुळे या योजने मधील सातारा व परिसराकरिता प्रस्तावित टाकीद्वारे वितरण व्यवस्था महानगरपालिके तर्फे राबविण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७१/५ :** कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको व इतर वसाहतीतील सांडपाणी व मलमुत्र यांचा निचरा झाल्टा येथे करण्याची योजनाआहे. हा संपूर्ण प्रकल्प सुमारे रुपये ५.०० कोटीचा असून हाप्रकल्प एकदम पूर्ण करणे आर्थिकदृष्ट्या शक्य नाही. सध्या झाल्टा येथे साडे सात एकर शासकीय जमीन म.न.पा. च्या ताब्यात असून पहिल्या टप्प्यात या ठिकाणी दोन ऑक्सिडेशन पॉडस व यांत्रिकी सामुग्री, पंप हाऊस उभारणे आहे. सदरील पहिल्या टप्प्याच्या कामासाठी रु. १,५२,७७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. चालू आर्थिक वर्षात या कामासाठी रु. ५०.०० लाख तरतूद करण्यात आलेली आहे. करिता प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

**संवाद :**

श्री. स. अली मिरा सलामी : नगरपालिका असतांना १९७१-७३/७५-७६ मध्ये अशा ऑस्सिडेशन पॉडस व यांत्रिकी सामुग्री, पंप हाऊस राहुलनगर, कांचनवाडी

येथे उभारण्यात आले होते. नगरपालिकेचा खुप पैसा खर्च झालेला आहे. त्याचे काय झले याचा खुलासा करावा.

श्री. कचरू नवपुते : १९८८ मध्ये याच सभागृहाने अशा कामासाठी ५० लक्ष रुपयांची तरतूद म्हणून प्रस्ताव मंजूर केलेला असून त्यास शासनाच्या दिरंगाईमुळे प्रस्ताव येण्यास १० वर्ष लागलेली आहेत. नारेगांव ते चिकलठाणा येथे ४० लक्ष रुपयांचे खर्च करून ड्रेनेज लाईन टाकलेली आहे. याचे पाणी मोकळ्या नदीतून वाहते. सदर भागात आसपास असलेल्या झोपडपट्ट्या, आंबेडकर नगर, चिकलठाणा, मुकूंदवाडी इ. या वस्त्यांना त्रास होतो प्रस्तावास उशिर झालेला आहे. करिता हा प्रस्ताव याच सभेत मंजूर करून स्विकृती द्यावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : विमानतळाच्या बाजूला अशाच प्रकारचा एक प्लॅन आहे. सिडको महापालिकेकडे हस्तांतर झाल्यानंतर या प्लॅनचे चाचणी करून झाल्यानंतर उपयोग करून घेता येईल काय? खुलासा करावा. असे होत असेल तर म.न.पा. चा पैसा तरी वाचेल.

श्री. कचरू नवपुते : नारेगांव चिकलठाणा व रामनगर ते मुकूंदवाडी येथील जो ट्रीटमेंट प्लॅन्ट आहे तो सध्या कार्यान्वित असून झाल्टासाठी ७.५ एकर जमीन राखून ठेवलेली आहे. त्यास तार कुंपन ही केलेले आहे. उलट हा प्रस्ताव येण्यास उशिर झालेला असून स्विकृतीसह मंजुरी देण्यात यावी.

श्री. विखारोद्दिन : राहुलनगर ते कांचनवाडी या दरम्यानचा ऑक्सिडेशन पॉड ७६-७७ मध्ये केलेला होता त्याचा सध्या उपयोग होत नसून आजही ड्रेनेज लाईनचे पाणी लाईन मधून न वाहता नाल्यातून वाहते. सदर पाण्याचा उपयोग शेतकरी शेतीसाठी वापरतात. यामध्ये महानगरपालिकेचे लाखो रुपये खर्च होतात. अशाच प्रकारचे झाल्टा येथील पॉड महानगरपालिकेला फायदा तर जनतेला फयदा असे होईल.

श्री. काशिनाथ कोकाटे : रामनगर, चिकलठाणा, मिसारवाडी या गावा जवळून अशाच प्रकारचा पॉड सिडकोने केलेला असून त्याचा उपयोग होईल काय या बाबत खुलासा करावा.

श्री. भगवान घडामोडे : सिडकोने जो पॉड बांधलेला आहे त्याची क्षमता कमी आहे.

श्री. स. अली मिरा. सलामी : १९७६-७७ मध्ये केलेला राहुलनगर येथील पॉड दुरुस्त करून सिडकोतील पॉडचा उपयोग करता येईल काय ते पहावे तसा खुलासा करावा.

श्री. गौतम खरात : अशा स्किम महापालिका राबवित असेल तर त्यास सभागृहाचा विरोध नाही. परंतु औरंगपुरा येथील नाला तसेच श्रीमान श्रीमती येथील नाल्याच्या बाजूला जी घाण पडलेली आहे तेथील ड्रेनेज लाईन मधून पाणी न जाता नाल्यातून वाहते अशी परिस्थित झाली न पाहिजे असे सभागृहाचे मत आहे. बनेवाडी येथील पॉड देवगिरी साखर कारखान्याचे चेअरमन श्री.डॉ. गाडेकर यांना चालविण्यासाठी दिलेला होता, परंतु त्याची आज अवस्था योग्य नाही. असे समजते की, त्यास सध्या कुलूप लावलेले आहे. असे न होता, यात महापालिकेने लाखो रुपये खर्च होतात याकडे म.न.पा. प्रशासनाने लक्ष द्यावे. बनेवाडी येथील पॉड डॉ. गाडेकर यांना चालवायला दिला होता त्यांच्यावर प्रदूषण ॲक्ट ुनसार कार्यवाही होऊ शकते त्याच प्रमाणे तितकीच जबाबदारी महापालिकेची पण आहे. झाल्टासाठी करण्यात येणाऱ्या पॉडची योजना राबविण्यास हरकत नाही. परंतु योग्य ती जबाबदारी पार पाडणे हे

महापालिकेचे कर्तव्य आहे अशा मोठमोठ्या योजना राबवितांना जनतेचा पैसा यामध्ये जातो. योजना सफल होत नाही.

श्री. मुजीब आलमशा खॉन : सिडको कडून कट-कट गेटकडे येणाऱ्या नाल्यामध्ये खुप घाण पडलेली असून ड्रेनेज लाईनचे पाणी व्यवस्थित जात नाही याबाबत स. सदस्यांनी बऱ्याच वेळेस सूचना केलेल्या असून कार्यवाही झालेली नाही.

कार्यकारी अभियंता : औरंगाबाद शहरामध्ये १९९५ मध्ये मलमूत्र निचरा बाबत शहा कन्सल्टटंट संस्थेने पाणी व ड्रेनेज बाबत पूर्ण शहराचा सर्व्हे केलेला होता. त्यांनी १९८५ मध्ये ७६५ कोटीची योजना महापालिकेला दिलेली होती, यात शहरातील असलेले नाल्यातील मुख्य जलवाहिनी व मल निस्सारण करणाऱ्या मुख्य वाहिनी व ३ ठिकाणी ट्रीटमेंट प्लॅन्ट प्रस्तावित केलेले होते. त्यात १. झाल्टा, २ बनेवाडी, ३. वडोदगांव व पाटोदा या तीन ठिकाणी ट्रिटमेंट प्लॅन्ट करण्यासाठी योजना दिलेली होती. ही योजना ८५ मध्ये देण्यात आली व ८८ पर्यंत राबविण्यात आली नाही. ८८ मध्ये या योजनेला महाराष्ट्र शासनाकडून येणारे अनुदान हे टप्प्या टप्प्याने मिळत होते. त्यानुसार कामे करत होतो. त्यापैकी आता झाल्टा व पाटोदा येथील काम करण्याचे होती घेतले असून झाल्टा मलनिस्सारण वाहिणी करण्यासाठी ७ एकर २० गुंठे जमीन घेतलेली आहे. या संस्थेने शहराचे ड्रेनेजचे तीन झोन केलेले असून त्यापैकी झाल्टा, पाटोदा, बनेवाडी येतात. सिडकोने जो प्लॅन केलेला आहे. त्यामधून योग्य मलमूत्र निस्सारण आजही होते. नारेंगांव येथील मलमूत्र हे झाल्टा या प्लँट मध्येच पोहचू शकते. त्यामु ही योजना राबविणे आवश्यक आहे. बनेवाडीचा जो प्लॅन्ट आहे तो ४ वर्षा पूर्वी देवगिरी साखर कारखानयास चालवण्यासाठी दिलेला होता. परंतु सध्या ६ महिन्यापासून बंद पडलेला असून झालेला करारनामा या वर्षात संपुष्टात आणणारा असून महापालिकेतर्फे राबविण्यात येणार आहे.

श्री. गौतम खरात : ६ महिन्यापासून त्यांनी सदर प्लॅन्ट बंद ठेवलेला आहे. प्रशासनाचे लक्ष नाही. काय संबंधितावर कार्यवाही करावी तातडीने दुरुस्ती करून घ्यावी.

श्री. संजय जोशी : चिकलठाणा एम.आय.डी.सी मध्ये प्रदूषित पाणी झिरपते जे पिण्याचे पाणी येते ते पिण्यास लायक राहत नाही. तेथील काही नागरिकांनी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडे तक्रारी पण दिलेल्या आहेत.

सौ. लता दलाल : सिव्हर लाईनची ही योजना माझ्या मते १९८८ पासून राबविण्यात येत आहे. त्यावेळी असे ठरलेले होते की, शहा कन्सल्टटंट जे नियम घालून दिलेले आहेत. त्यानुसार योजना राबविण्यात आलेल्या आहेत काय? शहरातील ज्या सिव्हर लाईन टाकण्यात आलेल्या आहेत किती तरी सफल झालेल्या नाहीत त्या योग्य आहेत काय? किती ठिकाणी योग्य आहेत किती ठिकाणी अयोग्य असून किती ठिकाणी टाकण्याची आवश्यकता आहे याचा खुलासा करावा.

श्री. स.अ. एकबालोद्दिन : ज्या गुत्तेदारांनी काम केलेले आहेत त्यांच्यावर कार्यवाही करून पोलिस केस करावी.

सौ. लता दलाल, श्री. संजय जोशी : डॉ. गोडकर यांच्यावर कार्यवाही कधी करणर, सिव्हर लाईन बाबतचे प्रश्नाचा खुलासा करावा.

श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. संजय जोशी, श्री. अविनाश कुमावत : शहरातील पाईपलाईन या प्लॅन्टचा काय संबंध आहे. दशमेशनगर मध्ये मागील वर्षी अशाच

प्रकारची ड्रेनेज लाईन टाकण्यात आली होती. एका वर्षात बंद पडलेली आहे. संबंधित ठेकेदारावर कार्यवाही करून काळ्यात यादीत नांव नोंदवावे.

श्री. गौतम खरात : बनेवाडीचा प्लॅन्ट बंद आहे. त्या ठिकाणी गॅस होणार, प्रदूषण जास्त होणार ती योजना ६ महिन्यापासून बंद असून त्या अनुषंगाने प्रशासनाने काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा.

सौ. लता दलाल, श्री. संजय जोशी : सिव्हर लाईन बाबत माहिती देऊन डॉ. गाडेकर संबंधित गुत्तेदार यांच्यावर कार्यवाही करण्याचा निर्णय आताच घेण्यात यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : झाल्टाच्या अंतर्गत सिडकोने जो प्लॅन्ट केलेला आहे त्याचा उपयोग झाल्टासाठी होऊ शकणार नाही काय? सदर प्लॅन्ट हा सिडकोच्या प्लॅन्टला लागून जात असून तेथील सपाटीकरण भाग लेव्हल तपासणी केलेला आहे काय?

कार्यकारी अभियंता : शहा कन्सल्टंट यांचे तांत्रिक सल्या नुसार शहरातील नाल्यामध्ये ४५० मी.मी. पासून ते १२०० मी.मी. पर्यंत वेगवेगळ्या लाईन्स टाकण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी आतापर्यंत फक्त ४०% काम झालेले असून ६० टक्के काम बाकी आहेत. दुसऱ्या टप्पा म्हणून या वर्षी १.७५ कोटी रुपये या कमावर खर्च होणार आहे. याचे डिस्पोझल साठी ऑक्सिडेशन पॉडाची नितांत गरज आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : सिडकोने केलेला नारेगांव ते चिकलठाणा येथील प्लॅन्टची क्षमता कमी पडते काय? सिडको वगळता सदर प्लॅनचा उपयोग फक्त नारेगांव करिताच उपयोग होणार आहे काय? पूर्ण तपासणी करूनच अंमलबजावणी करावी.

श्री. अविनाश कुमावत, श्री. गिरजाराम हाळनोर, कार्यकारी अभियंता : दशमेश नगर येथील ड्रेनेज लाईन नव्यानेच टाकलेली असून सध्या पाणी नाल्यातून वाहते.

कार्यकारी अभियंता : दशमेशनगर मधील लाईन दोन वर्षा पूर्वीच टाकेलेली आहे. सदर लाईन भानुदासनगर ते तरुण भारत प्रेस येथपर्यंत असून आवश्यकतेनुसार त्या ठिकाणी ७५० एम.एम.ची लाईन टाकणे आवश्यक आहे. सध्या त्या ठिकाणी ४५० एक.एम.ची पाईप लाईन आहे. दोन्ही लाईनचे प्रस्ताव वेगवेगळे आहेत.

श्री. गिरजाराम हाळनोर : या बाबत अहवाल द्यावा.

मा. महापौर : बऱ्याच वेळेपासून चर्चा चालू असून प्रस्तावास मंजुरी देण्यात येऊन संबंधित बनेवाडी येथील प्लॅन्ट ज्यांनी चालविण्यासाठी घेतलेला होता तो सध्या बंद असून संबंधितावर प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करून सविस्तर अहवाल सभागृहात सादर करावा.

श्री. रशिद खॉन (मामू) : कार्यवाही कधी करणार याचा खुलासा करावा.

मा. महापौर : मा. आयुक्त खुलासा करतील.

मा. आयुक्त : विकासाच्या दृष्टीने महत्वाचे पाऊन या दृष्टीकोनातून हा प्रस्ताव सभागृहाने मंजूर केलेला असून नारेगांव या ४ कोटी सॉलीड वेस्ट मॅनेजमेंटचा प्लॅन म.न.पा ने केलेला आहे. नवीन प्लॅन्ट आहे. प्रदूषण कायद्यान्वये कार्यवाही करणे हे बंधनकारक आहे. बऱ्याच वर्षापासून बनेवाडी येथील प्लॅन्ट बाबत कार्यवाही केलेली नाही. असे सभागृहाचे मत असून आता लिक्वीड वेस्ट मॅनेजमेंट या प्रकल्प त्यात सांडपाणी, मलमूत्राचे व्यवस्थापन ही याजना राबविण्याची कार्यवाही महापालिका करणार आहे. सभागृहात ५ कोटी

रुपयांचा प्रस्ताव असून टप्प्या टप्याने हे काम करणार आहोत. पहिला टप्पा म्हणून १,५२,७७,०००/- ची अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या वर्षी मार्च पर्यंत महापालिकेला ५० लक्ष रुपये खर्च करावयाचे आहे. दुसरा टप्पा म्हणून ३.५० कोटी रुपये शहा कन्सल्टंट यांच्या सल्यानुसार शहरातील सांडपाणी मलमूत्र निस्सारण इ. विकास कामासाठी नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने खर्च करणे आवश्यक आहे. बनेवाडी येथील प्लॅन्ट ज्यांना चालवायला दिला होता तो सहा महिन्यापासून बंद असून संबंधितांवर प्रशासनाच्या माध्यमातून काय जी कार्यवाही करता येईल ती आवश्य करण्यात येईल यात शंका नाही.

**ठराव क्र. १७१/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको व इतर वसाहतींतील सांडपाणी व मलमूत्र यांचा निचरा झाल्टा येथे करण्याच्या योजनेसाठी पहिल्या टप्प्यातील दोन ऑक्सिडेशन पॉन्डस व यांत्रिकी सामुग्री १,५२,७७,०००/- च्या अंदाज पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *पुरवणी विषय क्रमांक*

**विषय क्र. १७२/१ :** बाबा पेट्रोल पंपा समोरील महाविर चौक परिसरात चारही रस्त्यांनी वाहनांची सतत वरदळ असते. सदर चौकामध्ये प्रकाश व्यवस्था अपुरी असून त्यामुळे नेहमी रात्रीचे वेळी अपघात होतात. सदर चौकात महाविर स्तंभ असल्यामुळे सौंदर्यीकरणाचे दृष्टीकोनातून सदर चौकात योग्य जागी हायमॉस विद्युत दिवे बसविणे अत्यंत आवश्यक आहे, जणे करून महाविर स्तंभ तसेच चोकाचे परिसरात पुरेसा प्रकाश पडेल. अपघाताची संख्या कमी होईल तसेच सौंदर्यात भर पडेल. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. अविनाश कुमावत
अनुमोदक - श्री. अफसरखान
श्री. जयवंत ओक

**संवाद :**
मा. महापौर : सचिव यांनी वाचून दाखवावा.
मा. महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १७२/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बाबा पेट्रोल पंपा समोरील महावीर चौकात प्रकश व्यवस्थेसाठी हायमॉस दिवे बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७३/२ :** प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जायन्टस ग्रुप तर्फे संचकात जायन्टस विद्या मंदिर ही प्राथमिक शाळा चालविली जाते. जायन्टस् ही एक भारतीय स्वयंसेवी संस्था असून देशात व परदेशात या संस्थेद्वारे समाजसेवी उपक्रम राबविली जातात. त्याचीच एक शाखा औरंगाबाद येथे असून "जायन्टस विद्या मंदिर" या नावाने गरीब मुलांसाठी वाळूज येथे ही शाळा चालविली जाते.

या शाळेस सर्व स. नगरसेवकांच्या निधीतून प्रत्येकी रुपये २,०००/- (रु. दोन हजार फक्त) मदत म्हणून देण्यात यावेत करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - प्रफुल्ल मालाणी
अनुमोदक - सौ. यशोदा धनजंय वाडेकर

**संवाद :**
श्री. हमीद उद्दिन ताबा : ज्यांची इच्छा असेल ते स्वेच्छानिधी देतील.
मा. महापौर : अनुमोदक उपस्थित नसल्यामुहे प्रस्ताव रद्द करण्यांत येतो.

**ठराव क्र. १७३/२ :** सदर प्रस्ताव रद्द करण्यांत येतो असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १७४/३ :** आमखास (शिवाजी मैदान) येथे शहरातील शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थी जर खेळांडू क्रिकेट, हॉलीबॉल, फुटबॉल, हॉकी, इत्यादी खेळ मोठ्या प्रमाणात खेळात असतात. सदर ठिकाणी खेळाडॅची गैरसोय होऊ नये म्हणून आमखास मैदान (शिवाजी मैदान) येथे एक मिनी स्टेडियम बांधण्यात यावे. करिता प्रस्ताव सादर.

सुचक - श्री. गौतम खरात
अनुमोदक - श्री. संजय केनेकर
श्री. किशोर तुळशीबागवाले.

**ठराव क्र. १७४/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिवाजी मैदान (आमखास) येथे विद्यार्थी खेळांडूसाठी मिनी स्टेडियम बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७५/४ :** मुकूंदवाडी, रामनगर, भागात सार्वजनिक रस्त्यावर भाजी मंडई दररोज भरते या भाजी मंडईमुळे रस्त्यावर रहदारीस मोठ्या प्रमाणात अडथळे निर्माण होत असून दिवसेंदिवसे अपघाताचे प्रमाण वाढत आहे.

महापालिके मार्फत चिकलठाणा भागात बराच मोठा खर्च करून अद्ययावत व सुसज्ज असे बाजार संकूल उभारले असून त्याचा वापर आठवड्यातून फक्त एकदाच बाजारसाठी करण्यांत येतो. इतर दिवशी हे व्यापारी संकूलन पूर्णतः रिकामेच असते आठवडी बाजारामुळे महापालिकेस अल्प प्रमाणात उत्पन्न मिळते.

मुकूंदवाडी, रामनगर, भागातील भाजी मंडई चिकलठाणा येथील आठवडी बाजाराचे जागी भरविण्यात यावा. जेणे करून या भागामधील वर्दळ कमी होईल. अडथळे दूर होतील अपघताचे प्रमाण घटेल. बाजार संकूलनाचा पुरेपुर उपयोग घेतला जाईल.महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. व बाजार संकुलनासाठी करण्यांत आलेला खर्च काही प्रमाणात वसुल होईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.
सुचक श्री.कचरू चंद्रभान नवपुते
अनुमोदक श्री.अविनाश कुमावत

**संवाद :**

श्री. गांगवे मामा : चिकलठाणा येथे न करता एम.आय.डी.सी ची जागा संपादन करून भाजी मंडई बांधावी.

मा. महापौर : चिकलठाणा येथे स्थलांतर न करता एम.आय.डी.सी. ची जागा संपादन करून भाजी मंडई उभारण्यास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. १७५/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकूंदवाडी, रामनगर परिसरात सार्वजनिक रस्त्यावर भरत असलेली दररोजची भाजीमंडई चिकलठाणा येथे स्थलांतर न करता एम.आय.डी.सी. ची जागा संपादन करून भाजी मंडई उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७६/५ :** चिकलठाणा प्रभागात नव्याने महानगरपालिकेने मार्फत अदयावत व सुसज्ज असे सांस्कृतिक सभागृह उभारण्यांत येत आहे. या भागात कै. देविदासराव देवराव नवपुते हे सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांनी या भागाचे सर्वागिण विकासासाठी बरेच प्रयत्न केलेले आहेत. उभारण्यात येत असलेल्या सांस्कृतिक सभागृहास त्यांचे नांव देणे बाबत या भागातील रहिवाशी मागणी करीत आहेत. या व्यक्तीचे कार्य तसेच येथील रहिवाशी मागणीचा आदर राखून चिकलठाणा येथे उभारण्यात येत असलेल्या सांस्कृतिक सभागृहास "कै. देविदासराव देवराव नवपुते सांस्कृतिक सभागृह" असे नांव देणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. कचरू चंद्रभान नवपुते.
अनुमोदक - श्री. अविनाश लक्ष्मणराव कुमावत
श्री. नरसिंग ढगे

**ठराव क्र. १७६/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिकलठाणा परिसरात उभारण्यांत येणाऱ्या अद्यावत व सुसज्ज सांस्कृतिक सभागृहास "कै. देविदास देवराव नवपुते सांस्कृतिक सभागृह" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ऐनवेळचे विषय

**विषय क्र. १७७/१ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक स.ले.को.१९९५/प्र.क्र.२६९/९५/कोषागार-१ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक १५/०१/९६ नुसार श्री.म.न. सोनार, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-१(क) संगर्वातील अधिकारी यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा इ.) नियम १९८१ मधील परिशिष्ट-३ मधील सूचना क्र. २ नुसार प्रथमतः दोन वर्षासाठी मुख्य लेखा परिक्षक, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद या संवर्ग बाह्य पदावर प्रतिनियुक्तीवर पाठविण्यांस शासन मंजुरी झालेली आहे.

त्यानुसार महानगरपालिका कडील आदेश क्र./मनपा/अस्था-१/२४१/९६. दि. २३/०१/१९९६ नुसार श्री. सोनार यांना दि. २२/०१/९६ रोजी मध्यांन्हपूर्व, मुख्य लेखा परिक्षक या पदावर रुजू करून घेण्यात आलेले आहे.

महानगरपालिका सर्वसाधारण सभा दि. १२/०३/९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. १७५/१५ नुसार त्यांचे प्रतिनियुक्तीस मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

तसेच महापालिका सर्वसाधारण सभेने दि. १६/१२/९७ रोजी संपन्न झलेल्या बैठकीत ठराव क्र. १४१/५ नुसार श्री. म.न. सोनार, यांचा प्रतिनियुक्ती कालावधी दि. २२/०१/९८ पासून एक वर्षासाठी वाढवून देण्यांसाठी मंजुरी प्रदान केली असून त्यास शासनाचे वित्त विभागाने क्रमांक सलेको-११९५/प्र.क्र.-२६९/९२ कोषागार-१ दिनांक २०/०४/९८ नुसार मान्यता दिली आहे.

श्री. सोनार यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २१/०१/९९ रोजी संपत आहे. महानगरपालिकेच्या सेवेतील त्यांचे कामकाज समाधानकारक आहे. तसेच त्यांनी लेखा परिक्षण अद्यावत करून वेळोवेळी लेखा आक्षेपा बाबत पाठपुरावा केलेला आहे. विविध समित्यांच्या माध्यमातून वेळोवेळी महानगरपालिकेला उपयुक्त ठरेल अशा प्रकारे विविध प्रकरणे हातळली आहेत. त्यामुळे त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांचा प्रतिनियुक्तीचा कालवधी २२/०१/९९ पूासन पुढील एक वर्षासाठी वाढवून देण्याबाबतच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री. प्रफुल्ल मालाणी : सदर प्रस्ताव शासनाकडे पाठवावयाचा असल्याने त्याच सभेत स्विकृतीसह मंजुरी देण्यात यावी.

मा. महापौर : स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १७७/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय क्र. स.ले.को./१९९५/प्र.क्र.-२६९/९५ कोषागार-१ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १५/०१/९६ नुसार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-१ (क) संवर्गातील अधिकारी श्री. म.न. सोनार हे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परिक्षक या पदावर दि. २२/०१/९६ पासून प्रतिनियुक्तीवर असून मुख्य लेखा परिक्षक श्री. म.न. सोनार यांच्या सेवेतील कामकाज समाधानकारक असून त्यांनी लेखा परिक्षण अद्यावत करून वेळोवेळी लेखा आक्षेपाबाबत पाठपुरावा केलेला असल्याने मुख्य लेखा परिक्षक श्री. म.न. सोनार यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक. २२/०१/९९ पासून पुढील एक वर्षासाठी वाढवून देण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७८/२ :** कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. युनूस कॉलनी व त्रिवेणीनगर नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक रक्कम रुपये १६,०८,८००/- चे सार्वजनिक बांधकाम खातयाच्या सन ९७-९८ च्या दरसूचिनुसार तयार करण्यात आले असून सदरील काम लेखा शिर्षक "नालोन्ट्रेनिंग" यातून प्रस्तावित केले आहे. सदरील कामाचा समावेश २० कोटी कृति आराखडा या सदरात असून सदरील विकासात्मक कामाकरिता अपेक्षित अनुदान प्राप्त झाल्यानंतर सदरील काम सुरू करण्यात येईल.

सदरील प्रस्तावास मा. आयुक्तांनी दिनांक १८/११/९८ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी सदरील प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. १७८/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे युनूस कॉलनी व त्रिवेणीनगर नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. १६,०८,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७९/३ :** अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, प्रभाग क्र. ४३ मधील रस्त्याचे पुर्नःडांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये १४,१९,५४९/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च पुर्नडांबरीकरण या लेखा शिर्षा अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदीतून करण्यात येईल करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १७९/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ४३ मधील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रुपये १४,१९,५४९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८०/४ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीचौक विनायकराव पाटील चौक हा रस्ता दुभाजकावर एम.एस. रोलींग (ग्रीस) बसविणे बाबत कामासाठी सन १९९७-९८ च्या सर्वजनिक बांधकाम खात्याच्या डि.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये १५,६९,५३१=०० चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च शासकीय अनुदान (४=०० कोटी) च्या तरतूदीमधून करण्यात येईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. हमीद ताबा : कोणत्या शासकीय अनुदानातून सदर प्रस्तावातील काम करण्यास येणार आहे. खुलासा करावा.

मा. महापौर : सदर प्रस्तावातील काम शासनाचे या अगोदरच्या शासकीय अनुदानातून करण्यांत येईल मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. १८०/४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक विनायकराव पाटील या रस्ता दुभाजकावर एम.एस. ग्रील बसविण्याच्या कामासाठी रक्कम रुपये १५,६९,५३१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८१/५ :** सहा संचालक नगररचना यांचे मार्फत सर्वसाधारण सभेसमोर ऐनवेळी माहिती सादर करण्यात येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ अ (दुरुस्ती) नुसार महानगरपालिकेस प्रत्येक वित्तीय वर्षा करिता "पर्यावरण अहवाल" तयार करून प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

सदर पर्यावरण अहवालात शहरातील भागावर नकाशे, पर्यावरण विषयक विधि बाबींची माहिती सद्यास्थितीची आकडेवारी व इतर संलग्न माहितीसह शहराचे भौगोलिक स्थिती, आरोग्य विषयक माहिती इत्यादीचा समावेश असणे, अभिप्रेत आहे.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्राकरिता अशा सर्व माहिती / बाबींचा समावेश असणाऱ्या "पर्यावरण अहवाल" तयार करण्याचे काम स्थायी समितीच्या मान्यतेने महानगरपालिकेत पुणे येथील "मशाल" संस्थेकडे सोपविलेले होते. त्या संस्थेने अभिप्रेत

असलेल्या सर्व माहितीचा समावेश करून परिपूर्ण असा अहवाल तयार करून महापालिकेस सादर केलेला आहे. अहवालाची संक्षिप्त प्रत सोबत देण्यात येत आहे.

या पर्यावरण अहवालामध्ये शहराच्या सद्यास्थितीच्या अधिकृत / अनाधिकृत विकसित भाग, भविष्यातील विकास या सह शहरातील झोपडपट्ट्या, नागरी विकसित भागांना पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सुविधा त्या संदर्भात सविस्तर आकडेवारी, त्याबाबत सूचन, शहरातील पर्यावरणाची सद्यस्थिती, संभाव्य, परिणाम, त्या संदर्भातील उपाययोजना, प्रदूषण त्यावरील उपाय योजना इ. समावेश करण्यात आलेला आहे.

या अहवालामुळे शहराचा नागरी व औद्योगित विकास, पर्यावरण मुलभूत सुविधा या बाबतचे प्रश्न त्यामुळे दैनंदिन नागरी जिवनावर होणारे परिणाम, वाढते प्रदूषण इ. बाबत माहिती उपलब्ध होऊन त्यासाठी उपाययोजना राबविण्याचे नियोजन करणे सोईचे ठरते.

अहवाल सर्वसाधारण सभे समोर सादर करण्यात येत असून सर्वसाधारण सभेस अवगत केल्यानंतर अहवाल शासनास माहितीसाठी सादर करण्यात येईल.

**संवाद** :

मा. महापौरः सचिव यांनी वाचून दाखववावा.
(सचिव वाचून दाखवतात)
इन्व्हारमेंटल स्टेंटस रिपोर्ट हा संविधानिक बाब असून आपणांवर बंधनकारक आहे.

मा. आयुक्त : ३१ जुलैच्या आत सर्वसाधारण सभेस हा रिपोर्ट सादर करणे आवश्यक आहे. या अगोदर पुणे महानगरपालिकेने रिपोर्ट केलेला आहे. दुसरा औरंगाबाद महानगरपालिकेचा क्रम लागतो. हा रिपोर्ट तयार करण्यांसाठी पुणे येथील मशाल या नावाची जी संस्था (एन.जी.ओ.) आहे. त्यांचकडे या संदर्भाने आपल्या महानगरपालिकेने काय सोपविलेले होते. स्थायी समितीला अहवाल सादर केलेला आहे. आज सर्वसाधारण सभेसमोर ठेवलेला असून या बाबत माहिती घेऊन पुढील बैठकीत चर्चा करून निर्णय घेता येईल.

श्री. गौतम खरात : पर्यावरण म्हणजे काय या बाबत रिपोर्ट तयार करण्याची आवश्यकता काय? याचा खुलासा करावा.

श्री. कुलकर्णी (आर्किटेक्ट) : शहरातील सांडपणी, ड्रेनेज, औद्योगिक वसाहत, इतर नाशक पदार्थ या पासून होणारे प्रदूषण तसेच याची सध्याची अवस्था काय व या अगोदर काय होती. याचा रिपोर्ट केला जातो. तसेच नागरिकांना कोणकोणत्या सुविधा योग्य त्या पुरविल्या जातात. कोणकोणत्या प्रक्रियेमुळे त्या-त्या भागात प्रदुषण होते. याचा अहवाल दिला जातो. सध्याची स्थिती कशी आहे. व काय उपाययोजना करता येईल याचाही रिपोर्ट केला जातो.

श्री. गौतम खरात : शहरात गाड्याच्या धुरापासून किती प्रदूषण होते खुलासा करावा.

मशाल संस्थेचा प्रतिनिधी : पर्यावरण म्हणजे नुसते प्रदूषण नाही, मुलभूत सुविधा पुरविणे, त्याचा दर्जा काय आहे. वायू प्रदूषण, आवाजांपासून प्रदूषण, याची सद्यस्थिती काय आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे. शहरात १२ ते १३ नमूने घेतले त्यातल्या त्यात जालना रोडवर निकशांच्या प्रमाणाच्या दुप्पट आहे. इतर ठिकाणी कमी प्रमाणात असून काळजी घेणे आवश्यक आहे.

श्री. अविनाश कुमावत : या प्रस्तावावर पुढील बैठकीत संबंधितांनी सविस्तर माहिती देऊन चर्चा करून निर्णय घेता येईल.

मा. महापौर : ठिक आहे. सविस्तर माहिती पुढच्या बैठकीत ठेवावी. चर्च करून निर्णय घेता येईल.

**ठराव क्र. १८१/५ :** सर्वानुमते असे ठरले की, पर्यावरण अहवाल बाबत चर्चा करून पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल.

**विषय क्र. १८२/६ :** मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक जीईएन/१०९८/प्र.क्र. २१५/९८ न.वि.२४ मंत्रालय, मुंबई दि. ०२/१२/९८ नुसार राज्यातील सर्व महानगरपालिकेतील महापौरांना अतिथ्य भत्ता मंजूर करणे बाबत वेगवेगळे निर्णय दिलेले आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १९(अ) (२) अन्वये प्रदान केलेल्या शक्तिचा वापर करून शासनाने असे आदेश दिले आहे की, "ज्या महानगरपालिकांचे वार्षिक उत्पन्न रु. १००.०० कोटी पेक्षा जास्त आहे. अशा महानगरपालिकेच्या महापौरांना रुपये ६०,०००/- (रु. साठ हजार फक्त) प्रतिवर्ष व ज्या महानगरपालिकांचे उत्पन्न रुपये १००.०० कोटीपेक्षा कमी आहे अशा महानगरपालिकेच्या महापौरांना रु. ४०,०००.०० (रु. चाळीस हजार फक्त) प्रतिवर्षी इतका अतिथ्य भत्ता मंजूर करण्यात येते." उपरोक्त नुसार औरंगाबाद महानगरपालिकेचे उत्पन्न सध्या १०० कोटी पेक्षा कमी आहे त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेच्या महापौरांना अतिथ्य भत्ता रु. ४०,०००.००/- (रु. चाळीस हजार फक्त) देय आहे.

त्यानुसार सन ९८-९९ साला करिता महापौर अतिथ्य भत्ता म्हणून ठेवण्यात आलेली रु. ३ लाखाची तरतूद रद्द करून सन ९८-९९ च्या सुधारित अंदाजपत्रकात महापौर अतिथ्य भत्ता म्हणून रु. ४०,०००.०० (रु. चाळीस हजार फक्त) ची तरतूद करणे बाबत प्रस्ताव विचाराधीन.

**संवाद :**

श्री. गिरजाराम हाळनोर : आतापर्यंत किती खर्च झालेला आहे. किती खर्च लागेल याची माहिती द्यावी.

श्री. रशिदखॉन (मामू) : शासनाच्या या जी.आर. नुसार पुढील महापौर यांच्या पासून लागू करावा.

मा. महापौर : महापौर खर्चाबाबत शासनाच्या जी. आर. ची अंमलबजावणी ही पुढील महापौर यांच्या पासून लागू करण्यात येईल.

**ठराव क्र. १८२/६ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(अ) (२) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेचे उत्पन्न रुपये १०० कोटी पेक्षा कमी असल्याने औरंगाबाद महानगरपालिकेच्या महापौरांना प्रतिवर्षी ४०,०००/- (रु. चाळीस हजार फक्त) इतका अतिथ्य भत्ता मंजूर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तथापि सन १९९८-९९ या आर्थिक वर्षासाठी महापौर अतिथ्य भत्त्या करिता रु. ३.०० लाखाची तरतूद करण्यात आली असून आतापर्यंत झालेला खर्च हा रु. ४०,०००/- पेक्षा जास्त झालेला असल्यामुळे कलम १९(अ)(२)अन्वये सन १९९८-९९ च्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली रुपये ३.०० लाखाची तरतूद रद्द न करता उक्त कलमान्वये रु. ४०,०००/- अतिथ्य भत्त्याची अंमलबजावणी सन १९९९-२००० या अर्थसंकल्प पासून करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८३/७ :** कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग क्र. २ औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. मजीप्रा(बांवि/-२/औ/लेखा/३८९४/९८ दिनांक १७/११/९८ द्वारे औरंगाबाद पाणी पुरवठा योजना नाथ सागर उदद्भवे) सिडको व विस्तारित विभागासाठी स्वतंत्र पाईप लाईन टाकणे या योजनेसाठी घ्यावयाच्या आयुर्विमा महामंडळाच्या कर्जा व खुल्या बाजारातील कर्जाचा प्रस्ताव मान्यतेसाठी व या योजनेचा आर्थिक आकृतीबंध मान्यतेबाबतचा औरंगाबाद महानगरपालिकेचा ठराव पारित करण्याबाबत व्यवस्था करण्यासाठी सूचना केली आहे.

उपरोक्त योजना रुपये ६७,३०,४९,०००/- ढोबळ किंमतीचा असून या योजनेस महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.पापुयो-१०९७/१६६२/प्र.क्र.२३५/९७/पापु९८ दिनांक १६/०३/१९९८ द्वारे प्रशसकीय मान्यता व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण औरंगाबाद यांचे पत्र क्र. म.अ./मजी प्रा.औ/ताशा-१) औ-१०९/१४४० दिनांक २४/०४/१९९८ अन्वये तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. सदर योजना मान्य असणे व त्याबाबतचा लागणारा निधी उपलब्ध करून देणे बाबतचा औरंगाबाद महानगरपालिकेचा ठराव (क्रमांक ९ दिनांक १६/०९/१९९५) यापूर्वीच पारित झालेला आहे. ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविली जाणार असून या योजनेत खालील मुख्य कामाचा समावेश आहे.

१. नक्षत्रवाडी टाकीपासून बीड बायपास, सातारा मार्गे एन-५ पर्यंत १११८ मी.मी व ९१४ मी.मी. व्यासाच्या एम.एस. जलवाहिनी टाकणे.
२. सतारा (एम.आय.टी.) गजानन नगर, शिवाजीनगर पुंडलिकनगर इत्यादी भागसाठी ३ टाक्या व पंप बाधणे.
३. जायकवाडी, ढोरकीन, फारोळा या ठिकाणी जास्तीचे नवीन पंप बसविणे.
४. उंचावरील टाक्यासाठी पंपीगची व्यवस्था इ.किरकोळ कामे.

ही योजना हाती घेण्याचे बाबत कार्यवाही चालू असून सदर योजनासाठी शक्य तितक्या त्वरेने निधी व कर्ज उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. या योजनेचा आर्थिक आकृतीबंध खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शासकीय अनुदान २३.३३% | - | रु. १५,७०,२२,०००/- |
| २. | आयुर्विमा महामंडळाचे कर्ज | - | रु. १६,१२,७६,०००/- |
| ३. | खुल्या बाजारातील कर्ज | - | रु. ३६,४७,५१,०००/- |
| | **एकूण रुपये** | | **६७,३०,४९,०००/-** |

महानगरपालिकेत त्वरित कर्जाची परतफेड नियमित (२०२२ पर्यंत) वार्षिक हप्त्याने करावा लागणार आहे. तरी योजनेसाठी आवश्यक कर्ज उपलब्ध होण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर. व्याजाचा दर १३% राहील.

**ठराव क्र. १८३/७ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजना (नाथसागर उद्‌भवे) सिडको व विस्तारीत विभागासाठी स्वंतत्र पाईप टाकून प्रस्तावातील अ.क्र.१ ते ४ च्याबाबी कार्यान्वित करण्यासाठी रक्कम रुपये ६७,३०,४९,०००/- ढोबळ किंमतीच्या योजने पैकी २३.३३% शासकीय अनुदान रक्कम रुपये १५,७०,२२,०००/- आणि महानगरपालिके तर्फे उपलब्ध करून द्यावयाचा निधीसाठी आयुर्विमा महामंडळाकडून रु. १६,१२,७६,०००/- चे कर्ज आणि खुल्या बाजारातून रु. ३५,४७,५१,०००/- चे कर्ज उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या योजनेसाठी

उभारण्यात येणाऱ्या कर्जास व्याजाचा दर रु. १३% राहील. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८४/८ :** बुढीलैन कबाडीपुरा समारे सिटी क्लब जवळच्या चौरस्त्यावर एक हायमास्ट खंब व फिक्चरसह बसविण्यात यावा. सदरील प्रकरण सुमारे दिड वर्षापासून विद्युत विभागमार्फत चालू आहे. या संदर्भात संबंधित वॉर्डाचे नगरसेवक हे उपोषणास बसणार होते. परंतु मा. आयुक्तांनी सदरील काम त्वरित करण्यात येईल असे आश्वासन दिल्या वरून उपोषणास बसण्यात आले नाही. म्हणून संबंधित वॉर्डाचे नगरसेवकाच्या विकासाबद्दल भावना बघता सदरील जागावर एक हायमास्ट लाईट लावण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक - १. श्री. अफसर खॉन
२. श्री. स.अ. इकबालोद्दिन
३. श्री. अविनाश कुमावत

अनुमोदक - १. श्री. राजकुमार बचाटे
२. श्री. जयंत ओक (बंडू)
३. श्री. रशिद खॉन (मामू)

**ठराव क्र. १८४/८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बुढीलाईन कबाडीपुरा समोरील सिटी क्लब चौरस्त्यावर फिक्चरसह हायमास्ट खांब बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८५/९ :** सहाय्यक संचालक नगररचना यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अस्तित्वात आलेनंतर त्यावेळच्या लागू विकास नियंत्रण निमावलीनुसार जमीन विकास करते वेळी त्या जमीनीचे रेखांकन क्षेत्राचे १५% क्षेत्र खुली जागा म्हणून सोडणे आवश्यक होते. व त्यानुसार रेखांकन प्रकरणी कार्यवाही होत होती.

दरम्यानच्या काळात लागू शासन निर्णय व नंतर मंजूर झलेल्या व लागू असलेल्या वि.नि.नि. नुसार सध्या रेखांकन प्रकरणी एकूण क्षेत्राचे १०% एवढीच खुली जागा सोडणे आवश्यक आहे. व सध्याही त्याप्रमाणे कर्यवाही होत आहे. ह्या बदलामुळे यापूर्वी ९१ पर्यंतच्या रेखांकन प्रकरणी ज्या जमीन मालकांनी १५% खुली जागा सोडली आहे. त्यांनी १०% खुली जागा ग्राह्य धरून रेखांकन प्रस्ताव सुधारित करण्याबाबत मागणी करित आहे. ह्या रेखांकनातील बहुतांश खुल्या जागा संबंधितांनी मनपास नोंदणीकृत दस्तऐवजाने हस्तांतरित केल्या आहे व त्यापैकी काही जागा महानगरपालिकाने विकसितही केलेल्या आहेत.

या प्रकरणातील मागणी विचारात घेता प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अशा रेखांकन प्रकरणी १५% ऐवजी १०% खुली जागा सोडून रेखांकन खालील अटीवर करण्यात यावे.

**१) मनपा पूर्वीची रेखांकने :-**

अ) ८ डिसेंबर १९८२ पूर्वी शासनाच्या नगरविकास विभागाकडून रेखांकनास टेन्टेटिव्ह मंजुरी.

ब) ८ डिसेंबर १९८२ पूर्वी जिल्हाधिकारी यांचेकडील बिगरशेती आदेश आणे आवश्यक.

क) खुली जागा मनपाने विकसित केलेली नाही.

**२) मनपा कालावधीतील रेखांकने :-**

अ) खुली जागा मनपाने विकसित केलेली नाही.

ब) सिध्द शिघ्र गणकाच्या चालूदराच्या ५०% रक्कम मनपाकडे जमा करणे.

प्रस्ताव मान्यतेसाठी सादर

प्रस्ताव मान्यतेनंतर ज्या रेखांकनासाठी वरील अटी लागू होतात त्या करिताच फक्त ही कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव क्र. १८५/९ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म.न.पा. अस्तित्वात आल्यानंतर रेखांकनात १५% खुली जागा सोडणे आवश्यक होते. दरम्यानच्या काळात शासन निर्णयाप्रमाणे १०% खुली जागा सोडणे आवश्यक आहे. या बदलामुळे १९९१ पर्यंत रेखांकन प्रकरणी ज्या जमीन मालकांनी १५% खुली जागा सोडली त्यांना १०% खुली जागा सोडून खालील अटीवर रेखांकन प्रस्ताव सुधारित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**१) मनपा पूर्वीची रेखांकने :-**

अ) ८ डिसेंबर १९८२ पूर्वी शासनाच्या नगरविकास विभागाकडून रेखांकनास टेन्टेटिव्ह मंजुरी.

ब) ८ डिसेंबर १९८२ पूर्वी जिल्हाधिकारी यांचेकडील बिगरशेती आदेश आणे आवश्यक.

क) खुली जागा मनपाने विकसित केलेली नाही.

**२) मनपा कालावधीतील रेखांकने :-**

अ) खुली जागा मनपाने विकसित केलेली नाही.

ब) सिध्द शिघ्र गणकाच्या चालूदराच्या ५०% रक्कम मनपाकडे जमा करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८६/१० :** महानगरपालिकेत पाणीपुरवठा विभागात काम करणाऱ्या अधिकारी,

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एम. डी. सोनवणे | - | कार्यकारी अभियंता |
| २. | श्री. कलीम अक्तर | - | उप अभियंता |
| ३. | श्री. शिरीष रामटेके | - | उप अभियंता |
| ४. | श्री. एम.ए. खालेद सैफोद्दिन | - | शाखा अभियंता |

यांच्या सेवेचा कालावधी जास्तीत जास्त जलनिस:रण व पाणीपुरवठा विभागात गेलेला आहे व सध्याच्या परिस्थितीत सुध्दा पाणी पुरवठा विभागातच कार्यरत आहेत. या अधिकाऱ्यांनी अहोरात्र मेहनत करून औरंगाबाद शहराचा व सिडको भागचा पाणीपुवठा सुरक्षित व योग्य त्या दाबाने नागरिकांना पुरविण्यांचे परिश्रम केलेले आहे. त्यांनी वेळोवेळी नागरिकांशी संपर्क साधून तक्रारी निवारण केल्या. या अधिकाऱ्यांवर वारंवार कित्येक वेळा हल्ले झाली तरी सुध्दा या अधिकाऱ्यांनी संयम पाळून नागरिकांच्या पाण्याच्या टंचाईवर मात करूनच तक्रारी सोडविल्या. त्याच्या उल्लेखनिय कामगिरीबद्दल मा. महापौर यांनी मनपा वर्धापन दिन दिनांक ०८/१२/९८ रोजी अभिनंदन पत्रही दिलेले आहे.

या अधिकाऱ्यांनी केलेल्या परिश्रमाबद्दल व पुढे त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन त्यांना काम करण्यासाठी स्मुर्ती मिळावी यासाठी दोन-दोन अगाऊ वेतनवाढ देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ.

सुचक - १. सौ. सुनंदा उत्तम कोल्हे.
२. सौ. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
३. सौ. जोशी रजनी रमेश
४. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलिक.
५. श्री. लांडगे गौतम लिंबाजी
६. श्री. सोनवणे सुदाम रामदास.
७. श्री. घडामोडे भगवान देविदास
८. सौ. काळुसे मंदा धनंजय.

अनुमोदक १. श्री. नरेंद यादवराव पाटील
२. सौ. चंपाबाई विश्वनाथ पांचाळ.
३. श्री. अजिजखान गणी खान
४. श्री. मो. मुश्ताक अहेमद.
५. श्री. टाकळकर सुभाष भिकाजी
६. सौ. पद्मा बाबुराव शिंदे
७. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक
८. सौ. नुरजहाँ बेगम अब्दुल रहेमान

**ठराव क्र. १८६/१० :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभागात कार्यरत असलेल्या सर्वश्री एम.डी. सोनवणे, कार्यकारी अभियंता, श्री. कलीम अक्तर, उप अभियंता, श्री. शिरिष रामटेके उप अभियंता आणि एम. ए. खालेद सैफियोद्दिन शाखा अभियंता या अधिकाऱ्यांनी अहोरात्र मेहनत करून औरंगाबाद शहर व सिडको भागाचा पाणी पुरवठा सुरळीत व योग्य दाबाने ठेवण्याचे परिश्रम करून पाण्याच्या टंचाईवर मात केलेली असल्यामुळे व वर्धापन दिवशी त्यांना पत्र देवून अभिनंदन केलेले असल्याने संबंधितांना दोन वेतनवाढ देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जन-गण-मन" या राष्ट्रगीताने सभा सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १२/०१/९९ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**मा. महापौर सौ. शिलाबाई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दि. १२/०१/९९ रोजी सकाळी ११.०० विशेष सर्वसाधारण सभा संपन्न झाली तिचे इतिवृत्त मंगळवार दि. १२/०१/९९ रोजी सकाळी ११.३० वा मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सर्वसाधारण सभेस "वंदे मातरम्" या गिताने झाली**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. डॉ. कऱ्हाड भागवत किसनराव | उपमहापौर |
| २) | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स. सभासद |
| ३) | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्माणराव | --//-- |
| ४) | स.स.श्री. अफसरखॉन यासिनखॉन | --//-- |
| ५) | स.स.श्रीमती लोखंडे रुख्मिणीबाई खंडेराव | --//-- |
| ६) | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ७) | स.स.सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ८) | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ९) | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | --//-- |
| १०) | स.स.सौ. उषाबाई दिलिप गायकवाड | --//-- |
| ११) | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| १२) | स.स.श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १३) | स.स.श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --//-- |
| १४) | स.स.श्री. भालेराव अभिमन्यु | --//-- |
| १५) | स.स.श्री. नरेंद्र यादव पाटील | --//-- |
| १६) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १७) | मा. श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १८) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| १९) | स.स.श्री. बैनाडे कंवरसिंग किशनसिंग | --//-- |
| २०) | स.स.सौ. शिंदे पद्मा बाबुराव | --//-- |
| २१) | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| २२) | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २३) | स.स.श्री. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २४) | स.स.सौ. फरहत बानो भ्र. मो. नवाज | --//-- |
| २५) | स.स.श्री. फजलउल्ला खॉन अजमत खॉन | --//-- |
| २६) | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो. मुश्ताफा | --//-- |
| २७) | स.स. श्रीमती नुरजहाँ बेगम अ. रहेमान | --//-- |
| २८) | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| २९) | स.स.श्री. हाजी मोहसीन अहमद हाजी बशिर अहमद | --//-- |
| ३०) | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखोराद्दिन | --//-- |
| ३१) | स.स.श्री. अ. जावेद रज्जाक | --//-- |
| ३२) | स.स. जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |

३३) स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव --//--
३४) स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर --//--
३५) स.स.श्री. तुळशिबागवाले किशोर बाबुराव --//--
३६) स.स.श्री. म.अ.रऊफ अ. माबुद --//--
३७) स.स.श्री. स.अ. इकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन --//--
३८) स.स.श्री. खाखोरडिया धिरज शांतीलाल --//--
३९) स.स.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण --//--
४०) स.स.श्री. स. अली मिरा सलामी --//--
४१) स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद --//--
४२) स.स.श्री. संजय किसनराव केनेकर --//--
४३) स.स.श्री. फैय्याज अहेमद हाजी कुरेशी --//--
४४) स.स.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम --//--
४५) स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास --//--
४६) स.स.श्रीमती अलका रमेश पाटील --//--
४७) स.स.सौ. शकुंतला हरीदास धांडे --//--
४८) स.स.श्री. अब्दुल रशिदखॉन (मामू) --//--
४९) स.स.सौ. सविता संजय आव्हाड --//--
५०) स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे --//--
५१) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंदसिंग --//--
५२) स.स.श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन --//--
५३) स.स.श्री. गाडे गंगाधर सुखदेव --//--
५४) स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन --//--
५५) स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग --//--
५६) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव --//--
५७) स.स.श्री. जोशी संजय रामदास --//--
५८) स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर --//--
५९) स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडू बचाटे --//--
६०) स.स.सौ. राधाबाई तळेकर --//--
६१) स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर --//--
६२) स.स.श्री. विठ्ठल किसन जाधव --//--
६३) स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन --//--
६४) स.स.सौ. काळुसे मंदा धनंजय --//--
६५) स.स.सौ. सुनंदा उत्तमराव कोल्हे --//--
६६) स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम --//--
६७) स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास --//--
६८) स.स.श्री. नवपुते कचरू चंद्रभान --//--

**संवाद** :

मा. महापौर : कोरम अभावे सभा अर्धा तास तहकूब करण्यात येते.
(वेळ अंदाजे ११.३० वाजता)
(सभेला सुरुवात अंदाजे १२.०० वाजता)

श्री. जावेद रज्जाक : मा. उप-महापौर डॉ. भागवत कराड यांच्या सासऱ्याचे नुकतेच दुःखद निधन झाले त्यांना सभागृहात ००=०२ मिनिट श्रध्दांजली वाहण्यात आली.

श्री. अविनाश कुमावत : पैठण रोडवरील बस अपघातात शाळकरी मुलींचा व औरंगाबादेतील काही मजुरांचा दुर्देवी अंत झाला त्यांनाही सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

मा. महापौर : ठिक आहे.

(यावेळी सभागृहात ००=०२ मिनिटे डॉ. वाय. एस. खेडकर व पैठण रोडवरील बस अपघातात मुंबई येथील सहलीसाठी आलेल्या शाळकरी मुलींना औरंगाबादेतील मृत मजुरांना उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.)

श्री. मनमोहनसिंग : पैठण रोडवरील सहलीसाठी आलेल्या शाळकरी मुलींच्या बस अपघाताच्या वेळी ज्यांना सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलेले होते. त्यावेळी सरकारी रुग्णालयातील डॉक्टर सर्वश्री शहापूरकर, काळे, बोरगांवकर व त्यांचे इतर सहकारी कर्मचाऱ्यांनी दुर्दैवी अपघातातील मुलें / मुलीं व मजूरांचे प्राण वाचविण्यासाठी कसोशिन प्रयत्न केले त्यांचे सभागृहात अभिनंदन करावे.

मा. महापौर : ठिक आहे.

श्री. हमीद ताबा : पैठण रोडवरील शाळकरी मुलींच्या बस अपघातात मोठ्या प्रमाणात होऊन जिवीत हानी झालेली असतांनाही पालकमंत्री महोदय त्या घटनेच्या ठिकाणी किंवा इस्पितळात जाऊन पाहणी केलेली नाही वा विचारपूस केलेली नाही. वाढदिवसा निमित्त पेढेतुला करण्यात आले. ही बाब योग्य नसून त्याबाबतचा सभगृहात निषेध नोंदवावा.

मा. महापौर : इतर विषयावर चर्चा न करता इतिवृत्तातील विषय क्र. १ चर्चा करावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : महानगरपालिका ५ वा वेतन आयोग लागू करीत असतांना एकंदर मनपास किती आर्थिक बोजा पडेल याबाबतची सविस्तर टिप्पणी सभागृहाला देणे आवश्यक आहे. व ५ वा वेतन आयोगाची अंमलबजावणी करीत असतांना कर्मचाऱ्यांसाठी लागणारी वेतन देय ही कोणत्या हेडमधून दाखविणार. मनपाने तशी तरतूद कसन १९९७-९८ मध्ये केलेली आहे काय? जर मनपाने तशी तरतूद केलेली नसल्यास सदरच्या खर्चाची अंमलबजावणी कशी करणार? काय उपाययोजीले आहेत. त्याबाबत सविस्तर माहिती सभागृहाला द्यावी. त्याचपमाणे सध्या मनपाची आर्थिक स्थिती ठिक आहे. आणि अशा परिस्थितीत जर कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू करावयाचा झाल्यास शासनाकडून यासंदर्भात अनुदान मागवावे लागणार आहे. एकूण प्रशासकीय अस्थापनेवरील बोजा ३५% च्या वर जावयास नको असे शासनाचे धोरण आहे. तरीही प्रशासनातर्फे आकृतीबंध आणि इतर काही पदे भरण्याची प्रक्रिया चालू असते. त्यामुळे अस्थापनेवरील खर्च सर्व मिळून ४५% च्या वर जाणार आहे. तर ते नियमाबह्य होईल. त्यापेक्षा खर्च बाजूने विचार करूनच निर्णय घेणे योग्य राहील. व तसा ठराव घेऊन शासनाकडे पाठविणे योग्य. अगोदरच मनपाकडे फार मोठ्या प्रमाणात कर्ज झलेले असून रु. १०.०० कोटी शासनाने यासाठी द्यावे अशी मागणी सभागृहाने करावी.

श्री. अविनाश कुमावत : ५ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी संदर्भात महाराष्ट्रातील कोणकोणते महानगरपालिकांनी आयोग लागू केलेला आहे. या बाबतची

माहिती मागवावी. व त्यानंतर अभ्यास करून सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव प्रस्ताव ठेवावा.

श्री. नरेंद्र पाटील : महानगरपालिकेचे आजच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता ५ व्या वेतनआयोग लागू करणे याबाबत निर्णय घ्यावा लागेल. परंतु आस्थापनेवरील खर्च किती टक्क्याने वाटणार आहे. तो खर्च शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे आहे काय? याची तपासणी करून निर्णय घ्यावा. महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकांनी ५ व्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीस्तव निर्णय घेतलेला आहे काय? याची अगोदर माहिती घ्यावी. जर मनपाची आर्थिक स्थिती चांगली नाही. तर एवढ्या घाईन निर्णय घेणे योग्य नाही. सन १९९७-९८ च्या मनपाच्या आर्थिक वर्षात रु. १०.०० कोटीची तूट होणार आहे. एकूण मनपास मिळकतीपासून किती महसूली उत्पन्न मिळणार आहे. याचे टक्केवारी सध्या बरोबर दिसत नाही. सध्या बाजारभावात मंदि आहे. त्याप्रमाणे मालमत्ता कर व पाणीपट्टीची वसूली आतापर्यंतची फक्त २५% ते ३०% च्या जास्त होत नाही. ही थकबाकी फक्त प्रत्येक वर्षी कितीतरी पटीने वाढत जाणार आहे. संपूर्ण शहराचा विचार केला तर नागरिकांच्या समस्य व त्यांना द्यावयाच्या सुविधा लक्षात घेता विज/ पाणीपुरवठा/ रस्ते/ ड्रेनेज/ साफसफई या बाबत प्रचंड खर्च मनपास येतो. आता सध्या या वर्षाचे ९-१० महिने संपलेले आहेत व उर्वरित २-३ महिन्यात विकासाचे कामे त्या-त्या अंदाजपत्रकात तरतूद केल्याप्रमाणे होणे आवश्यक आहे. बत्याच वेळेस स. नगरसेवक जेव्हा कामे घेऊन जातात. त्यावेळेस बजेट संपले असे सांगितल्या जाते. व त्यामुळे विकास कामांना खिळ नसते. कर्मचाऱ्यांच्या अस्थापनेवरील खर्चाचा बोजा दिवसेंदिवस वाढत असून ५ व्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीने ती आणखीच वाढणार आहे. तेंव्हा बजेट मध्ये तशी तरतूद करणे आवश्यक आहे. किंवा शासनाकडून दरवर्षी अनुदान देणेची मागणी करणे योग्य राहील. ५ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करणे हे काही संघटनांनी सहानुभूतीसाठी आणलेला आहे. तेंव्हा मनपाची आर्थिक स्थिती लक्षात घेता पुढे ५/६ महिन्यानंतर बजेटमध्ये तरतूदीसह सभागृहासमोर ठेवावा. तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवून महाराष्ट्र शासन या बाबत मार्गदर्शन मागवावे.

श्री. डॉ. विजयकुमार मेहेर : महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोग लागू करून त्यांना थकबाकीसह वेतन अदा करणे हा त्यांचा कायदेशीर हक्क आहे. व मिळणे आवश्यक आहे. कारण शासनाने हा निर्णय लादलेला आहे. यासाठी एकत्रित तोडगा काढून निर्णय घेणे योग्य राहील. यामध्ये कर्मचाऱ्यांचे थकित वेतनाबाबत भविष्यनिर्वाह निधीत जमा करून बाकीच्याबाबतीत काय सवलती द्यावयाच्या संदर्भात संघटनांशी चर्चा करून निर्णय घ्यावा. सध्या मनपाची मालमत्ता कर व पाणीपट्टी थकबाकी शहरातील नागरिकांकडे फार मोठ्या प्रमाणात आहे. त्याची वसूली तातडीने कशी होईल याकडे प्रशासनाने युध्दपातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. शहरातील ५०,०००/- घरे असे आहेत की, त्यांनी नळ कनेक्शन सुध्दा घेतलेले नाही व ते अनाधिकृतरित्या घेऊन मनपाच्या पाण्याचा वापर करतात ते शोधून काढणे आवश्यक आहे. यासाठी जकातीवर लक्ष देवून महसूल उत्पन्न वाढविणेची प्रयत्न करणे आवश्यक आहे. आणि ही सर्व जबाबादरी

प्रशासनाची आहे. मनपाची आर्थिक बाजू बळकट राहावी ती दिलेल्या उद्दिष्टानुसार कमी पडणार नाही. याची दक्षता घ्यावी. काही प्रमाणात मनपात अनावश्यक नौकर भरती चालू आहे. याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे. व ती थांबवावी. सध्या प्रशासनाच्या अस्थापनेवरील ३५% चा खर्च ४२% च्या वर जाणार नाही. याची दक्षता घ्यावी. ५ व्या वेतन आयोग लागू करून मनपास अंदाजे रु. १०.०० कोटीचा आर्थिक बोजा प्रत्येक वर्षी होणार आहे. त्या प्रमाणात तरतूद करणे आवश्यक होते. ते केलेली नाही त्यामुळे सभागृहात अनेक स.स. विचारणा करतात. त्या माहिती देणे आवश्यक आहे.

श्री. सुदाम सोनवणे : मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूलीची जमा खर्च आतापर्यंत किती झोननिहाय झाली याची माहिती द्यावी ५ वा वेतन आयोग लागू केल्यास मनपास किती आर्थिक बोजा पडणार आहे. व तो खर्च आकृतीबंध प्रस्तावानुसार गृहित धरून राहील काय याची सविस्तर माहिती द्यावी. आकृतिबंध मंजुरीनंतर किती खर्च वाढेल याची माहिती द्यावी.

श्री. अ. रशिदखॉन (मामू) ५ वा वेतन आयोग कर्मचाऱ्यांना लागू केल्यास सध्या रु. ४.५० कोटीचा बोजा मनपास दरवर्षी पडणार आहे. त्याचप्रमाणे मनपाने चतुर्थश्रेणी १२०० कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव घेऊन शासनाकडे पाठविलेले आहे. तो जर मंजूर होऊन आल्यास पुन्हा रु. ४.५० कोटीचा खर्च मनपास पडेल असे मिळून एकंदरित रु. ९.०० कोटीचा बोजा मनपास पडेल. तेंव्हा शासनाने मागील परिपत्रकान्वये काही तांत्रिक कर्मचाऱ्यांना रु. १९९५ पासून वेगळी वेतनवाढ देवू केलेली होती. परंतु त्यांची थकबाकी दिलेली नाही. त्यानुसार मनपातील कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करावयाची झाल्या सन १९९६ पासून लागू करून थकबाकी सध्या देय राहणार नाही. ती भविष्य निर्वाह निधीत जमा करण्या येईल असे करण्यास हरकत नसावी. याबाबत प्रशासनाने संपूर्ण माहिती द्यावी. त्याच प्रमाणे मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूली दिलेल्या उद्दिष्टानुसार फारच कमी प्रमाणात होते रु. ३५ कोटीची थकबाकी आहे. प्रशासनाने याकडे जबाबदारीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांच्या ३५% आर्थिक बोजा हा वाढणार नाही याकडेही प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : ५ व्या वेतन आयोगा बाबतचा निर्णय इतर मनपाने घेतलेला आहे काय? याबाबतची माहिती प्रशासनाने घ्यावी.

श्री. डॉ विजयकुमार मेहेर : महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांसाठी शासनाने लागू केलेल्या निर्णयानुसार या ठिकाणी लागू करण्यास हरकत नाही.

श्री. अफसर खॉन : स.स.नी ५व्या वेतन आयोगावर चर्चा करत असतांना कोणत्याही पक्षाचे हित लक्षात ठेवून बोलू नये तर, सभागृहात सर्व समावेश व सामोपचाराने एकत्रित निर्णय घ्यावा.

सौ. लता दलाल : कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू केल्यास एकंदर मनपास किती बोजा पडणार आहे. आपल्याकडे बजेट किती आहे. तशी तरतूद केलेली आहे काय? शहरातील बांधकामे / रस्ते / लाईन / पाणी इ. विकास कामावर प्रशासनाला नागरिकांच्या सुविधांवर लक्ष देणे आवश्यक असते. मनपाची सेवाभरती नियम आकृतीबंध नुसार आर्थिक बोजा किती पडणार आहे. याची प्रशासनाने सविस्तर माहिती द्यावी नंतरच निर्णय घ्यावा.

श्री. अफसर खॉन : नाशिक महानगरपालिकेने माझ्या माहितीने कर्मचाऱ्यांना ५ वे वेतन आयोग लागू केलेला आहे. त्याप्रमाणे या मनपातही आयोग लागू करून कर्मचाऱ्यांना रु. ५/- हजार अग्रीम देण्यात यावे. व उर्वरित रक्कम भविष्य निर्वाह निधीत जमा करावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : ५ वा वेतन आयोग म्हणजे काय? याची प्रथमतः माहिती द्यावी. ५ व्या वेतन आयोगाच्या तरतूदी काय आहेत प्रत्येक पृष्ठ निहाय वाचून केलेले आहे काय? किंवा त्यामधीन नियम स.स. माहितीस्तव दिलेले आहे काय? प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकंदर कर्मचाऱ्यांना किती ाकिबाकी द्यावयाची आहे. किती खर्च अपेक्षित आहे. असे निश्चित केलेले आहे काय? व मनपाने ५ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करणेस्तव तरतूद या वर्षी केलेली आहे काय? बऱ्याच कर्मचाऱ्यांना समयश्रेणी / निवडश्रेणी चा फायदा देण्यात आलेला आहे. या बाबत प्रशासनाला अस्थापनेवर किती खर्च झलेला आहे. याची माहिती दिलेली नाही. ही सर्व माहिती सविस्तर तपासणी करूनच निर्णय घेणे योग्य राहील तोपर्यंत सदरील प्रस्तावावर निर्णय घेऊ नये.

श्री. जावेद रज्जाक : सभागृहात प्रस्तुत प्रस्तावावर चर्चा बरीच होत आहे. त्यापेक्षा चर्चा न करता प्रथमतः प्रशासनाने सविस्तर माहिती द्यावी. त्यानंतरच स.स. चर्चेत भाग घेऊन काही तरी निर्णय घेण्यास भाग पाडतील.

मा. महापौर : स.स. नी सूचना केल्याप्रमाणे प्रशासनातर्फे मुख्य लेखाधिकारी यांनी माहिती द्यावी.

मुख्य लेखाधिकारी : शासनाने दि. १०/१२/९८ रोजी अधिसूचना जारी करून कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू केलेला आहे. दर दहा वर्षांनी ही वेतनश्रेणी कर्मचाऱ्यांना देण्यात येते. १९८६ ला आयोग लागू केल्यानंतर आता १९९६ पासून सुकरानकर समितीच्या अहवालानुसार शासनाने कर्मचाऱ्यांसाठी लागू करण्यात येते. महानगरपालिका स्वंतत्र्य स्वायत्त संस्था असल्याने या बाबतची अंमलबजावणी करणेसाठी सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेतील अस्थापनेवर एकंदरीत ३२१६ स्थायी कर्मचारी व १०० कर्मचारी जायकवाडीतील नव्याने समाविष्ट झालेले कर्मचारी असे एकूण ३३१६ कर्मचारी स्थायी कर्मचारी स्थायी स्वरुपातील असून ३२१६ कर्मचाऱ्यांना सन १ जानेवारी १९९६ पासून तर १०० कर्मचारी जायकवाडीतील त्यांना सन ०१/०४/९८ पासून थकबाकी त्यांचे पूर्वीचे कार्यालयातून देतील तर ३२१६ कर्मचाऱ्यांना वाढीव थकबाकी रक्कम मनपा फंडातून द्यावे. लागेल आणि या बाबत एकूण जवळपास रक्कम रुपये १०.०० कोटीची थकबाकी स्वरुपात आयोग लागू केल्यास कर्मचाऱ्यांना द्यावे लागेल. आणि सर्व कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी निश्चित केल्यास जवळपास ३५ ते ४० लाख प्रतिमाह आणि वार्षिक रु. ५.०० कोटीचा आर्थिक बोजा मनपास पडणार आहे. सध्या मनपाचा आर्थिक खर्च अस्थापनेवरील ३६% आहे व आणखी ५% वाढ गृहित धरून ३९% पर्यंत जाईल. पुढील मनपा सेवेत भरती नियमाप्रमाणे करण्यात येतात. कर्मचाऱ्यांना सात वर्षाची समयश्रेणी व १५ वर्षाची नंतरची निवडश्रेणी एप्रिल ९४ पासून सर्व कर्मचाऱ्यांना दिलेल्या आहेत. आणि आर.आर. नुसार पुनश्च कर्मचाऱ्यांना समयश्रेणी / निवडश्रेणीची तरतूद केलेली आहे. राज्यशासनाने ठरवून दिलेल्या धोरणानुसार पदोन्नतीची कर्मचाऱ्यांना संधी त्या-त्या संवर्गात

नसल्यास १२ वर्षाचे ऐवजी ७ वर्षाने सेवा भरती नियमात तरतूद केल्यानुसार समयश्रेणीचा लाभ दिलेला आहे. आता पुन्हा १५ वर्षानंतर निवडश्रेणी साठी कर्मचाऱ्यांना लाभ द्यावयाचे ठरल्यास ते द्यावे लागणार आहे. व पुन्हा आता ५ वा वेतन आयोग लागू करणेची प्रक्रिया पार पाडणे आवश्यक आहे. यासाठी प्रशासनावर आर्थिक बोजा पडणार असून शासनाकडून मार्गदर्शन मागवावे लागणार आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मनपाचे अंदाजपत्रक फार फुगविण्यता आलेले असून १०० कोटीचे जवळपास बसविलेले आहे. त्याचे आस्था खर्च ३९% होईल. ते प्रत्यक्षात ७० कोटीपर्यंतचे आहे. तेंव्हा त्या तरतूदीनुसार कार्यवाही व्हावी.

श्री. प्रकाश निकाळजे : सर्व कर्मचारी महानगरपालिकेच्या आवारात येऊन उभे आहेत कार्यालयीन शिस्त आहे किंवा नाही. सर्वसाधारण सभेत चर्चा चालू अतून कर्मचारी मात्र गेटजवळ येऊन उभे राण्याचे कारण काय? प्रशासनाने याबाबत दखल घ्यावी. त्यांना कामावर पाठवावे.

श्री. जावेद रज्जाक : स.स. यांनी आतापर्यंत बरीच चर्चा केलेली आहे. तेंव्हा आता जास्त चर्चा न करता प्रशासनाने माहिती द्यावी.

मुख्य लेखाधिकारी : काही स.स. चे गैरसमज झालेले आहे. मागील वर्षी कर्मचाऱ्यांना समयश्रेणी / निवडश्रेणीचा लाभ सर्व कर्मचाऱ्यांना दिलेला आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : ५ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करावयाची झाल्यास खर्च कोठून व कसा करणार याची प्रशासनाने माहिती द्यावी.

श्री. अविनाश कुमावत : बाहेर मनपा गेटजवळ कर्मचारी आप-आपले कार्यालयीन काम सोडून आवारात आलेले आहेत. त्यांना आपआपल्या विभागात जाऊन काम करण्याची आदेश द्यावेत.

मा. महापौर : स.स. नी सूचना केल्यानुसार मनपा गेटजवळील आवारात काही कर्मचारी कार्यालय सोडून उभे असतील त्यांनी आपआपल्या विभागात जाऊन काम करावे. असे आदेशित करण्यात येते. व सभा १५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ १२.४० वा) सभेला सुरुवात १=५५वा.

श्री. अविनाश कुमावत, श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स.स. ना या बाबत अभ्यास करून चर्चा करणेसाठी वेळ द्यावा व तोपर्यंत सभा तहकूब करावी.

मा. महापौर : स.स. नी सूचना केल्याप्रमाणे आजची सभा तहकूब करण्यात येते.

या बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १२/०१/९९ रोजी भरलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेची तहकूब केलेली विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १३/०१/९९ रोजी संपन्न झाली तिचे इतिवृत्त.**

**दिनांक १२/०१/९९ रोजी तहकूब करण्यात आलेली विशेष सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १३/०१/९९ रोजी सकाळी ११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृहात "मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित घेते. स. सभासदांची नांव हजेरी रजिष्टर प्रमाणे.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. डॉ. भागवत किसनराव कऱ्हाड | उपमहापौर |
| २) | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स. सभासद |
| ३) | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्माणराव | --//-- |
| ४) | स.स.श्री. अफसरखॉन यासिनखॉन | --//-- |
| ५) | स.स.श्री. लोखंडे रुख्मिणीबाई खंडेराव | --//-- |
| ६) | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ७) | स.स.सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ८) | स.स.श्री. म. सलीम म. हनिफ कुरेशी | --//-- |
| ९) | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| १०) | स.स.श्री. ॲड. गणेश किशनराव वानखेडे | --//-- |
| ११) | स.स. श्रीमती जोशी रजनी रमेश | --//-- |
| १२) | स.स.विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| १३) | स.स.श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १४) | स.स.श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --//-- |
| १५) | स.स.श्री. नरेंद्र यादव पाटील | --//-- |
| १६) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १७) | मा. श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १८) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| १९) | स.स.सौ. शिंदे पद्मा बाबुराव | --//-- |
| २०) | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| २१) | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २२) | स.स.श्री. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २३) | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २४) | स.स.श्री. फजलउल्ला खॉन अजमत खॉन | --//-- |
| २५) | स.स.श्री. अजिज खॉ गणी खॉ | --//-- |
| २६) | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो. मुश्ताफा | --//-- |
| २७) | स.स. श्रीमती नुरजहॉं बेगम अ. रहेमान | --//-- |
| २८) | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| २९) | स.स.श्री. हाजी मोहसीन अहमद हाजी बशिर अहमद | --//-- |
| ३०) | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखोराद्दिन | --//-- |
| ३१) | स.स.श्री. अ. जावेद रज्जाक | --//-- |
| ३२) | स.स. जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| ३३) | स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |

३४) स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर --//--
३५) स.स.श्री. तुळशिबागवाले किशोर बाबुराव --//--
३६) स.स.श्री. हमीदोद्दिन ताबा --//--
३७) स.स.श्री. म.अ.रऊफ अ. माबुद --//--
३८) स.स.श्री. स.अ. इकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन --//--
३९) स.स.श्री. प्रदिपकुमार जैस्वाल --//--
४०) स.स.श्री. सय्यद अली मिरा सलामी --//--
४१) स.स.श्री. रमेश लाहोट --//--
४२) स.स.श्री. संजय केनेकर --//--
४३) स.स.सौ. लता दलाल --//--
४४) स.स.श्रीमती अलका रमेश पाटील --//--
४५) स.स.सौ. शकुंतला धांडे --//--
४६) स.स.श्री. अ. रशिदखॉन (मामू) --//--
४७) स.स.सौ. सविता आव्हाड --//--
४८) स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे --//--
४९) स.स.सौ. अब्दुल अ. सत्तार --//--
५०) स.स.श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन --//--
५१) स.स.श्री. गंगाधर गाडे --//--
५२) स.स.श्री. गजानन बारवाल --//--
५३) स.स.श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय --//--
५४) स.स.श्री. प्रकाश निकाळजे --//--
५५) स.स.श्री. संजय जोशी --//--
५६) स.स.श्री. राजकुमार बचाटे --//--
५७) स.स.सौ. राधाबाई तळेकर --//--
५८) स.स.श्री. नरसिंग ढगे --//--
५९) स.स.श्री. विठ्ठल जाधव --//--
६०) स.स.श्री. विजयकुमार मेहेर --//--
६१) स.स.सौ. मंदा काळुसे --//--
६२) स.स.सौ. सुनंदा कोल्हे --//--
६३) स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम --//--
६४) स.स.श्री. भगवान घडामोडे --//--

**संवाद :**

श्री. सुदाम सोनवणे : सभेला सध्या कोरम पूर्ण नाही. करिता सभा १५ मिनिटांसाठी तहकूब करावी.

मा. महापौर : कोरम अभावी १५=०० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ अंदाजे ११=३२ वा. सभेला सुरुवात ११=४५ वाजता)

**विषय क्र. १८७/१ :** मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाचे शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांना राज्य शासनाने जारी केलेल्या अधिसूचना क्र. वित्त विभाग क्र. वेपुर/१२९८/प्रक्र/१३/९८ सेवा-१० दि.१०/१२/९८ अन्वये पाचवा वेतन आयोग लागू केलेला आहे. औरंगाबाद महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग

लागू केलेला आहे. औरंगाबाद महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करावयाचा झाल्यास विविध संवर्गातील ३२१६ कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ दि. ०१/०१/९६ पासून द्यावा लागणार आहे. त्यासाठी ऑक्टोंबर -९८ ते जानेवारी-९९ कालावधीची थकबाकी रोख द्यावयाची झाल्यास त्यासाठी रु.१.६० कोटी अंदाजित खर्च येणार आहे.

तसेच महानगरपालिका कर्मचाऱ्यांना ७ वर्ष व १५ वर्ष सेवे नंतरची समयश्रेणी व निवड श्रेणी आर.आर. नुसार लागू आहे. त्यामुळे तो अतिरिक्त बोजा महानगरपालिकेवर पडणार आहे. या सर्व बाबींचा विचार करून "पाचवा वेतन आयोग" महानगरपालिका कर्मचाऱ्यांना लागू करणे संदर्भात विचारार्थ सादर.

**संवाद** :

श्री. जावेद रज्जाक : सदरची सभा तहकूब केलेली होती की, रद्द केलेली होती याची माहिती द्यावी.

मा. महापौर: कालचिच सभा तहकूब केलेली आज घेण्यात येत आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सभा पुढे ढकलण्यात आलेली होती. तर तशा प्रकारची सभा पुन्हा घ्यावयाची ठरल्यास तिन दिवसांची नोटीस काढून घेता येते. एकदा संपली म्हणायची व पुन्हा पुढे ढकलली म्हणून सभा घेण्यात येते ही बाब नियमबाह्य आहे. ५ व्या वेतन आयागोच्या अंमलबजावणी बाबत मा. महापौरांनी कोणताही निर्णय नियमा प्रमाणे घ्यावा त्यास आमची काहीही हरकत नाही. जर सदरची बैठक घ्यावयाची असल्यास तिन दिवसांची नोटीस काढून घ्यावयाची होती ती का केली गेली नाही.

श्री. प्रदिपकुमार जैस्वाल : ही सभा तहकूब केलेली होती. आणि तहकूब सभा केव्हांही घेता येऊ शकते. तेंव्हा प्रस्तावातील विषयानुसार ५ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करणेस्तव सभागृहात चर्चा करून निर्णय घ्यावा.

श्री. जावेद रज्जाक : सदरील सभा सोमवारनंतर घेण्यात येईल व खुलताबादला घेण्यात येईल असे सांगून सभा तहकूब केलेली होती. आता याबाबत कुणाचे काही प्रेशर आहे काय? कोणत्या पदाधिकाऱ्याचे प्रेशर आहे काय याची माहिती द्यावी वर्तमान पत्रात पालकमंत्री यांचे बाबतीत जी बातमी प्रसिध्द झाली ती खरी आहे काय? याची माहिती द्यावी.

श्री. वसंत देशमुख : स. सदस्यांनी आपआपले परिने चर्चा करावी इतर स. सदस्यांनी काय बोलले किंवा कुणाच्या बाबतीत काय बातमी आली याची शहानिशा करू नये. महानगरपालिकेच्या विकासाच्या निगडीत सर्वबाबी आप-आपले वार्डनिहाय स. सदस्यांनी प्रयत्न करावेत. व तशाच प्रकारचे सभागृहात एकत्रित निर्णय व्हावा. नुकतेच स. सदस्य श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी मांडलेली सूचना योग्य असून त्या प्रमाणे सभागृहाने एकत्रित चर्चा करून योग्य निर्णय घ्यावा व तो सभागृहाला मान्य करावा.

श्री. स. अली मिरा सलामी : कामगार व कर्मचारी यांनी संप केलेला होता काय? सर्वसाधारण सभा चालू असतांना कर्मचाऱ्यांनी महापालिका आवारात येऊन सभेवर दबाव आणणे योग्य नाही. सदरील बाब नियमाप्रमाणे नसून याबाबत प्रशासनाची भूमिका कशी असावी हे दिसून येते. कारण आपआपल्या कार्यालयीन कामे सोडून काही शिक्षक / कर्मचारी वर्ग मुख्य कार्यालयात आलेले होते याचे कारण काय? ५ व्या वेतन आयोग लागू करणे बाबत सभगृहाचा विरोध नाही. परंतु कोणताही निर्णय निमाप्रमाणे व विचारपूर्वक

होणे आवश्यक आहे. असे आमचे मत आहे. इकडे सभागृहात बैठक चालू असतांना कर्मचारी वर्ग बाहेर येऊन परिसरात कामे बंद करून येणे ही बाब योग्य नाही. त्यामुळे प्रशासनाचा वचक संबंधित कर्मचाऱ्यांवर नाही हे दिसून येते. कर्मचाऱ्यांचे प्रेशर प्रशासन व सभागृहासमोर आणणे ही बाब शिस्तीला धरून नाही. कोणताही प्रश्न सोडवित असतांना विचारपूर्वक आणि आर्थिक बाबींची तपासणी करूनच केल्या जाते. तो पर्यंत कोणत्याही प्रकारचा निर्णय होऊ शकत नाही. शहरातील नागरिकांना त्रास होऊ नये याची काळजी प्रशासनाने घ्यावी आपले घर जाळण्यासाठी आपल्याच दिव्याचा उपयोग होऊ नये काल जी पध्दत कर्मचाऱ्यांनी केली ती वस्तुस्थितीला धरून नव्हती शाळेतील विद्यार्थ्याचे नुकसान हेत आहे. वार्षिक परीक्षा आता येणार, त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होतो किंवा नाही विद्यार्थ्यांना व्यवस्थित शिकविल्या जात नाही सर्व शिक्षक व मुख्याध्यापक शाळा सोडून या ठिकणी आलेले होते. त्यामुळे विद्यार्थी सुध्दा शाळा सोडून निघून गेलेले होते. कुणाचाही कुणाला धाक नाही या सर्व बाबींचा विचार करून प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी.

श्री. अविनाश कुमावत : असे समजले की, काल काही कर्मचाऱ्यांना साड्या व गणवेश वाटप होणार होते म्हणून मुख्य कार्यालयात कर्मचारी आलेले होते. तर काही कर्मचारी सकाळून काम संपल्यानंतर दुपार १.०० नंतर कार्यालयात आलेले होते. कर्मचाऱ्यांना रमजान सक्रांत निमित्त काही तरी पदरात पडेल यासाठी कर्मचारी उत्सुकतेने ५ व्यावेतन आयोगाच्या संदर्भात निर्णय लागल्यास प्राप्त होईल म्हणून एकत्रित आलेले होते.

श्री. स. अली मिरा सलामी : कर्मचाऱ्यांना साड्या गणवेश / बुट चप्पल आतापर्यंत काही दिलेले नव्हते काय? वर्ष संपत येत आहे आतापर्यंत का दिलेले नाही याची माहिती द्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : काल कर्मचाऱ्यांनी सभागृह व प्रशासनावर प्रेशर टाकण्याचा जो प्रकार केला तो निदंनीय होता. सभागृहात नागरिकांचे समस्या सोडविण्यासाठी, प्रश्न सोडविण्याची या ठिकाणी विचार मांडले जातात आणि काल काही संघटनानी सभागृह व प्रशासनावर प्रेशर आणणे ही बाब योग्य नव्हती. कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू करणे यासाठी महापालिकेची आर्थिक परिस्थिती काय आहे याची तपासणी करणे आवश्यक आहे. आकृतीबंध व १२०० चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना प्रस्ताव शासनाकडे मंजूर करून पाठविलेला आहे. याचाही विचार करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे कर्मचाऱ्यांना ७ वर्षाची समयश्रेणी व १५ वर्षानंतरची निवडश्रेणी किती कर्मचाऱ्यांना लागू केली याची माहिती प्रशासनाने द्यावी. नंतरच ५ वा वेतन आयोगाबाबत विचार व्हावा.

श्री. प्रकाश निकाळजे : सभागृहात ५ वा वेतन आयोग लागू करणे बाबत चर्चा चालू असतांना त्यावर निर्णय काय लागतो हे समजून घेण्यासाठी सर्व कर्मचारी व काही शिक्षक वृंद मनपा परिसरात एकत्र आलेले होते. काही मंजुरांचे काम सकाळी ६ ते दुपार १.०० पर्यंत असते. तर शिक्षकांचे वेळ सकाळ व दुपार पाळीत असतात. तरीही मुख्य कार्यालयात बरेचसे कर्मचारी व शिक्षक मंडळी आलेली दिसून येत होते. प्रशासनानी वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यावर वचक नाही. असे यावरून दिसूनयेते. काल सभा संपल्यानंतर मा. आयुक्त यांच्या कॅबीनला कुलूप लावतात हा प्रकार अतिशय निंदणीय होय.

कर्मचाऱ्यांनी लोकशाही पध्दतीने न्याय हक्कासाठी झगडावे परंतु आपले हक्क मागत असतांना कुठेही अनुचित प्रकार होणार नाहीयाचीही दक्षता घेणे आवश्यक आहे. अन्यथा अशा सर्व कर्मचाऱ्यांवर नियमाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : लोकप्रतिनिधी हे लोकशाही जिवंत राहण्यासाठी प्रयत्न करतात.

श्री. प्रकाश निकाळजे : सुरक्षा रक्षक व सुरक्षा अधिकारी यांनी अशा वेळी अतिशय दक्ष रहावे. अशा सूचना प्रशासनाने द्याव्यात.

सौ. मोहसिना बिल्कीस : कर्मचाऱ्यांनी व शिक्षक लोकांनी काल सर्व कामे धंदे सोडून या ठिकाणी येणे योग्य नाही त्यामुळे बरेचसे विद्यार्थी शाळा सोडून निघून जात होते. परिणामी विद्यार्थ्यांवर याचा परिणाम होत असतो.

श्री. गौतम खरात : एकंदरीत केंद्र शासनाने ५ वा वेतन आयोग लागू केलेला आहे. त्या प्रमाणात महाराष्ट्र शासनाने ही प्रस्तावित केलेला आहे त्याची अंमलबजावणी शासनाने केलेली आहे. शासनाकडे कर्मचारी ज्या न्याय मागण्यासाठी, हक्क मागण्यासाठी घेराव घालतात आंदोलने करतात आता काल परवाच मंत्रालयातील कर्मचारी एकत्रित येऊन मुख्यमंत्री महोदयाच्या दालनासमारे घोषणा दिल्या संप केले. त्यांच्यावर काय कार्यवाही केली. मग आताच कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्यासाठी लढा दिला तर कार्यवाही करण्याचे कारणच नाही. अनेक संघटनांनी या संदर्भात चर्चा झालेली होती. त्यावेळी आमचे संघटनेमार्फत प्रशासनाने शासनाकडून ५ वा वेतन आयोग लागू करणेसाठीचा जी.आर आलेला आहे. त्यावर तातडीने निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्यासाठी सर्व प्रथम पुढाकार घेतलेला होता. त्यावेही प्रशासनाने आमच्याशी चर्चा करीत असतांना वेगवेगळ्या संघटनांशी चर्चा न करता एकत्र चर्चा करावी वेगवेगळ्या संघटनांशी वेगळी रू नये. काल कर्मचाऱ्यांना रु. ५/- हजार थकबाकीपाटी अग्रीम मंजूर करणार आहेत आणि म्हणून कर्मचारी मुख्य कार्यालयात जमा झालेले होते. यासभागृहात स. सदस्य काय चर्चा करतात. याची इतंभूत माहिती बाहेर जाऊन माहिती दिली जाते. त्यामुळे वातावरण चिघळते ही बाब बरोबर नाही. सभागृह हे सर्वोच्च असून सभागृहातील सर्व स. सदस्य हे ट्रस्टी आहेत. ५ व्या वेतन आयोगाचा निर्णय घ्यावयाचे ठरल्यास जास्त आता चर्चा न करता कर्मचाऱ्यांना अग्रीम म्हणून रु. ५/- हजार देण्याबाबतचा निर्णय घ्यावा व काही कर्मचाऱ्यांमध्ये फुट पाडण्याचे कृत्य केले जाते ते होऊ नये. वर्ग-४ व वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना वरिष्ठ श्रेणी देण्यात आलेली आहे. मात्र वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना याचा काहीही फायदा झालेला नाही. वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना ३० ते ४० हजारापर्यंत रक्कम मिळालेली आहे. मात्र वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांना उलट त्यांच्या पगारातून रक्कम वळती करावी लागत आहे. येथील चतुर्थ श्रेणी कर्मचारी सकाळी साफसफाईचे कामे करतात. त्यांना त्यांचे हक्क मिळणे आवश्यक आहे. प्रशासन लोकप्रतिनिधींना सन्मानाची वागणूक द्यावयास पाहिजे. याबाबत शासनाने वर्षभरात दोनदा जी. आर काढलेला आहे. प्रशासनाने महसूली उत्पन्नावर अंकुश असणे आवश्यक आहे. प्रशासन ढेपाळु नये याची दक्षता घ्यावी.

श्री. अविनाश कुमावत : आजच्या सभागृहात ५ व्यावेतन आयोगाबाबतचा निर्णय घ्यावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मनपाच्या अर्थसंकल्पात कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोगाचा अंमलबजावणी करणेस्तव त्यांच्या पगाराची तरतूद केलेली आहे काय? सन २००० च्या बजेटमध्येही तरतूद करण्यात आलेली आहे. असे मुख्य लेखाधिकारी यांनी पत्रकात नमूद केलेले आहे. तेंव्हा कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू केल्यास हा सर्वपैसा कोणत्या हेड मधून खर्च करणार व कसा देणार याची माहिती प्रशासनाने द्यावी. या शहरातील नागरिकांच्या विकासाच्या माध्यमातून अनेक प्रकल्प राबविले जातात. अने समस्या उत्पन्न होतात. त्या सोडविणे आवश्यक असते. आणि या सर्व बाबींचा विचार न करता जर एकदम कर्मचाऱ्यांना आयोग लागू करण्याचा निर्णय घेतल्यास प्रशासन वर्षभर आपला विकासाचा गाडा कसा निभावेल. या बाबत सभागृहाने विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. लोकांच्या नागरी समस्या सतत भेडसावतात त्याकडे लक्ष देणे आहे. सध्या रमजान ईद / सक्रांत मुळे बरेचसे गुत्तेदार यांच्या कामाचे पैसे थांबलेले आहेत. ते देण आवश्यक आहेत. आणि ५ वा आयोग लागू करून कर्मचाऱ्यांना पैसा कोठून देणार व कोणत्या हेडमधून देण्याची याची तरतूद कशी केली याची माहिती घ्यावी. कोणताही निर्णय हा सभागृहातील भावनांचा विचार करून व्हावा. कर्मचाऱ्यांना १९९६ पासून थकबाकी देवू शकणार नाही. याबाबत प्रशासन नागरिकांवर बोजा लादू नये महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवावे.

श्री. गंगाधर गाडे : ५ व्या वेतन आयोगाच्या संदर्भात मनपा कर्मचारी व प्रशासन यांच्यात वाद होता कामा नये. आयोग लागू करणे बाबत मनपाची आर्थिक परिस्थिती काय आहे. हे पाहणे जरुरीचे आहे. शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता अनेक समस्या आहेत. त्यांच्या विकासाच्या समस्या सोडविण्यासाठी बजेट मध्ये तरतूदीतील पैसाही कमी पडतो. ५ व्या वेतनाच्या संदर्भात शासनाकडून जी.आर. प्राप्त झालेला आहे काय? जर आलेला असल्यास सर्व कर्मचाऱ्यांना रु. ५/- हजार अग्रीम थकबाकीपोटी देण्यात यावी. जर मनपाची आर्थिक परिस्थिती ठिक नाही. असे असल्यास शासनाकडून अंदाजे रु. १०.०० कोटीचे अनुदान मागणी करून कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू करावा.

श्री. रशिद खॉन (मामू) ५ वा वेतन आयोग लागू करणे बाबत सभागृहात एकत्रित चर्चा करून सर्वानुमते निर्णय व्हावा. सध्याची मनपाची आर्थिक परिस्थिती काय आहे. याची तपासणी करून कार्यवाही होणे आवश्यक आहे. आताच स.स. गंगाधर गाडे, मनमोहनसिंग ओबेरॉय, नरेंद्र पाटील, गौतम खरात व अश्फाक सलामी यांनी केलेल्या चर्चेनुसार सर्वाचे मत ऐकून प्रशासनाने दखल घ्यावी. कर्मचाऱ्यांना आयोग लागू करणे बाबत इंटरिम रिलिफ जशा प्रकारे दिल्या जातो त्या प्रमाणात देता येईल काय? याचीही तपासणी करावी. १ हजार अग्रीम दिला तर ३३ लक्ष वाढ होईल व ५ हजार दिले तर १ कोटी ६२ लक्ष द्यावे लागेल त्यानुसार अग्रीम रक्कम बाबत सर्वमान्य तोडगा काढण्यात यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : कर्मचाऱ्यांना ५ वेतन आयोग लागू करणे बाबत अनेक संघटनांनी धरणे कार्यक्रम व संप केलेले आहेत व आता पर्यंत चर्चाही झालेली आहे. याबाबत प्रशासनाने वेगवेगळ्या संघटनांशी पदाधिकाऱ्यां समवेत बैठकाही झालेल्या आहेत. परंतु चर्चेद्वारे व शासनाकडील जी.आर. प्राप्त न झाल्याने

बैठकीतील निर्णय अंतिमरित्या होऊ शकलेला नाही. सभागृहातील बैठक संपल्यानंतर स्थानिक वर्तमान पत्रात मनपाची बदनामीकारक बातम्या छापून येतात. ते योग्य नाही. कोणत्याही प्रस्तावाची माहिती प्रशासनाने अगोदर सभागृहात द्यावयास पाहिजे परंतु तसे होतांना दिसून येत नाही व ज्यामुळे सभागृहात स.स. प्रश्नांचा भडीमार करतात व सभागृहाचा वेळ वाया जातो. कालच्याच सभेत ठराव मंजूर करता आला असता सर्वांना विश्वासात घ्यावयास पाहिजे. सर्व स. सदस्यांना संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.

श्री. स. अली मिरा सलामी : जी टिप्पणी लेखा विभागाने सभागृहात सर्व स.स. ना दिली त्यामधील अ. क्र. ३ मध्ये जे आकडे दिलेले आहेत. ती टक्केवारी कमी आहेत. आणि चुकीची दर्शविलेली आहे. असे वाटते कर्मचाऱ्यांना ७ वर्षाची समयश्रेणी व १५ वर्षाची निवडश्रेणी याबाबत आस्थापनेवरील खर्च ५५% होतो आहे. स.स. गंगाधर गाडे यांनी सूचना केल्यानुसार ५ व्या वेतन आयोगाची शिफारस करून मंजूर करून कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी जी रक्कम प्रशसनाला अंदाजे रुपये १०.०० कोटी लागणार आहे ती शासनाकडून अनुदान स्वरुपात मागणी करून कर्मचाऱ्यांना अदा करावी.

श्री. गौतम लांडगे : ऑक्टोंबरच्या महिन्यात महसूली उत्पन्न १८% टक्के होते व आता जानेवारी महिन्यात ते २७% इतके झालेले आहे. आणखी उद्दिष्ट प्राप्तीसाठी ७३% वसूली करणेसाठी २ ते २$^{१/२}$ महिन्याच्या कालावधी राहिलेला असून दिलेले उद्दिष्ट या कालावधीत पूर्ण होईल काय? सध्या मनपातर्फे अनेक प्रोजेक्ट तयार करावयाचे असून अस्थापनेवर चतुर्थश्रेणी कर्मचारी १२०० पदे मंजूर करून शासनाकडे पाठविले आहे. सिडको हस्तांतर झाल्यास मनपा प्रशासनावरील खर्च पुन्हा वाढणार आहे. हा सर्व खर्च ४५% वरून ५५% पर्यंत जाऊन पोहचतो. दिलेल्या टिप्पणीनुसार अस्थापनेवरील खर्चात वाढ होत आहे. शिवाय सन १९९६ पासून कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू केल्यास वेतनश्रेणी द्यावयाची आहे. आणि त्यातल्या त्यात कर्मचाऱ्यांना ७ व १५ वर्षाची समयश्रेणी / निवडश्रेणी लागू केलेली असून ७ वर्षाचा लाभ सर्व कर्मचाऱ्यांना प्राप्त झालेला आहे. त्याचाही आर्थिक बोजा मनपास पडलेला आहे. व पुढे २००० सालापर्यंत १५ वर्षाची निवडश्रेणी कर्मचाऱ्यांना द्यावयाची आहे. या सर्व बाबी लक्षात घेता मनपाचा आर्थिक स्थितीकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. आर्थिक उत्पन्नात कशी भर पडेल याचाही विचार प्रशासनाने करणे आवश्यक आहे. त्यापेक्षा दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना रु. ८९/- प्रमाणे रोजंदारी वाढविणेचा प्रस्तावही शासनाकडे पाठविलेला आहे. त्यामुळे आर्थिक बोजा मनपास परवडणार का या बाबत महसूली उत्पन्नाशी निकडीत प्रशासनाने कडक धोरण अवलंबून निर्णय घेणे आवश्यक आहे. तरच ५ वा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घ्यावा.

श्री. भगवान घडामोडे : कर्मचाऱ्यांच्या भावनिकेतेशी चर्चा न करता सभागृहान तातडीने निर्णय घ्यावा. कोणाला याचे श्रेय मिळते हे न पाहता संस्थेचे ही हीत बघावे.

मा. महापौर : मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी.

मा. आयुक्त : महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्याबाबत विचारविनिमय करण्यासाठी आज विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

पाचवा वेतन आयोग महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्यासाठी पालिका संघाचे अध्यक्ष श्री. रतनकुमार पंडागळे व त्यांचे पदाधिकारी कामगार शक्तीचे अध्यक्ष श्री. गौतम खरात, कामगार सेनेचे श्री. खरे व त्याचं पदाधिकारी यांनी आग्रह धरलेला आहे.

श्री. रतनकुमार पंडागळे व त्यांचे पदाधिकारी यांनी दि. २३/१२/९८ रोजी महानगरपालिकेसमोर धरणे आणि उपोषणाचा कार्यक्रम हाती घेतला होता. पालिका कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी मा. महापौर मा. प्रदिप जैस्वाल व मा. उप-महापौर, मा.विरोधी पक्ष नेता यांनी चर्चा करून दि. ११/०१/९९ रोजी विशेष सर्वसाधारण सभा घेऊन त्यात पाचवा वेतन आयोग लागू करावयाचा किंवा कसे याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले व त्याप्रमाणे आज विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

मध्यंतरीच्या कालावधीमध्ये महानगरपालिकेतर्फे मुंबई येथे खास दूत पाठवून पाचवा वेतन आयोगा बाबत शासनाचे आदेश प्राप्त करून घेण्यात आले आहेत. व शासनाने पाचा वेतन आयोग लागू करण्यांसाठी काढलेली अधिसूचना प्राप्त झाली आहे.

पालिका कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करावयाचा किंवा कसे याबाबत शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी आयुक्त परिषदेत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यावेळी मा. प्रधान सचिव श्री. नंदलाल यांनी असे मार्गदर्शन केले की, पाचवा वेतन आयोग मनपाना लागू करण्याबाबत नगरविकास विभागामार्फत कोणतेही वेगळे आदेश पारित केलेले नाही. परंतु महानगरपालिकांनी आपल्या आर्थिक परिस्थित पाहून पाचवा वेतन आयोग लागू करावा किंवा कसे याबाबत निर्णय घ्यावा व त्या निर्णयान्वये सुधारित वेतनश्रेणी शासनाची मान्यता घ्यावी व तदनंतरच महानगरपालिकांनी आदेश निर्गमित करावेत.

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्यासंदर्भात मुख्य लेखाधिकारी यांनी सविस्तर टिप्पणी विशेष सर्व साधारण सभेसाठी तयार केली आहे. पाचवा वेतन आयोग लागू केल्यास महानगरपालिकेच्या तिजोरीवर पडणारा आर्थिक बोजा याचे विश्लेषणही केले आहे. महाराष्ट्र शासनाने सर्व शसकीय कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग शासकीय कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे व सदरहू पाचवा वेतन आयोग दि. ०१/०१/९६ पासून लागू करण्याबाबत आदेश पारित केले आहेत.

महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून शासनाच्या धोरणाप्रमाणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करावयाचा किंवा कसे याबाबत निर्णय घेण्यास सक्षम आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांच्या सेवा व शर्तीबाबत शासनाचे सेवा, शर्ती, नियम लागू होतील असे यापुर्वीच ठरलेले आहे. परंतु ते लागू करणे अथवा न करणे याबाबत सर्व साधारण सभेमध्ये धोरणात्मक निर्णय व चर्चा होणे क्रमप्राप्त ठरते.

महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करणे संदर्भात व तो दिनांक ०१/०१/९६ पासून लागू करण्याचे ठरविल्यास सुमारे रुपये १०.०० कोटी हे थकबाकीपोटी कर्मचाऱ्यांना द्यावे लागणारे आहेत.

तसेच आस्थापनेवरील वाढीव खर्चाचा बोजा दरवर्षी सुमारे रुपये साडेचार ते पाच कोटी एवढा होणार आहे. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर मंजूर आकृती बंधाप्रमाणे खालील कर्मचारी कायमपणे सेवेमध्ये कार्यरत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | वर्ग-१ - | १२ |
| २. | वर्ग-२ - | ५२ |
| ३. | वर्ग-३ - | १४९६ |
| ४. | वर्ग-४ - | १७५३ |
| | एकूण | ३३१३ |

दैनिक वेतनावरील कर्मचारी एकूण -१२४६ आहेत महानगरपालिकेचे सद्याचे आर्थिक उत्पन्न अपेक्षित रुपये ७५.५० कोटी एवढे आहे. अस्थापनेवरील सद्याची खर्चाची टक्केवारी ३४% ऐवढी आहे. शासनाच्या धोरणाप्रमाणे अस्थापनेवरील खर्च ३५% पेक्षा जास्त असू नये असा संकेत आहे. पाचवा वेतन आयोग लागू केल्यानंतर अस्थापनेवरील संभाव्य वार्षिक खर्च रुपये ३३.०० कोटी एवढा अपेक्षित आहे. या संभाव्य खर्चाची टक्केवारी ३९% एवढी येणार आहे.

महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये विकासाची अनेक कामे सुरू असून नागरिकांना अपेक्षा वाढल्या आहेत व प्रत्येक वॉर्डामध्ये निरनिराळ्या विकासाच्या कामांची सातत्याने मागणी होत आहे. ही सर्व विकासाची कामे राबविण्यासाठी व त्यावर योग्य ती देखभाल व रक्षण होण्यासाठी आकृतीबंधा मध्ये वाढ करण्याबाबत कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामध्ये वाढ करण्याबाबत विभाग प्रमुखांची सातत्याने मागणी येत आहे. दुरुस्ती आकृतीबंधाबाबत यापूर्वीच सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यांत आला असून सदरहू प्रस्ताव विचाराधीन आहे.

अंदाजपत्रकाप्रमाणे एकूण सुमारे ६५% रक्कम ही विकासाच्या कामासाठी खर्च व्हावी अशी अपेक्षा असते ३५% खर्च हा अस्थापनेवर व्हावा अशा प्रकारची अपेक्षा असते. पाचवा वेतन आयोग लागू केल्यानंतर आस्थापनेवर होणारा संभाव्य खर्च वर नमूद केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये विभागासाठी लागणारा निधी व आस्थापनेवर होणारा खर्च याचा ताळमेळ विचारात घेणे ही आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील इतर सर्व महानगरपालिकामध्ये अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

सर्वसाधारण सभेसमोर प्राप्त झालेल्या प्रस्तावाबाबत खालील मुद्दावर सर्वसाधारण सभेने निर्णय घेणे आवश्यक आहे.

१) पाचवा वेतन आयोग लागू करावा किंवा कसे
२) लागू करावयाचा झाल्यास कोणत्या तारखेपासून लागू करावा.
३) थकबाकी बद्दल काय धोरण असावे.
४) पाचवा वेतन आयोग टप्प्याटप्प्याने लागू करावा किंवा कसे.

तरी या विषयांवर सांगोपांग चर्चा होऊन साधारण सभेने निर्णय घ्यावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : "झा" कमिटीच्या शिफारशीनुसार आस्थापनेवर एकूण खर्चाची टक्केवारी ३५% असावयास पाहिजे. परंतु सध्याची सभागृहात दिलेली टिप्पणी व आकडेवारी लक्षात घेता ही ४५% पर्यंत अस्थापनेवरील खर्च येणार आहे. म्हणजे ३५% ते ४५% या मधील १०% चा गॅप बाबत महसूली

उत्पन्न उदा. जकात, मालमत्ता कर व पाणीपट्टी व इतर कर अन्वये तूट भरू निघेल काय? याबद्दल शंका येते, आणि ही तूट भरून काढावयाची झाल्यास प्रशासनास खुप प्रयत्न करावे लागणार आहे. यासाठी शासनाचे धोरणानुसार शहरात विकास कामांसाठी ६५% खर्च व आस्थापनेवरील ३५% खर्च हे नियमाप्रमाणे असावे यामध्ये कोणत्याही प्रकारे आस्थापनेचा खर्च विकास कामाच्या व्यतिरिक्त जादा असता कामा नये जेणे करून ऑडिट झाल्यास ते प्रशासनास योग्यरित्या हाताळता येणे शक्य नाही.

श्री. नरेंद्र पाटील : शहराचा विकास कामावरील खर्चाची टक्केवारी ही ६५% असावी.

मा. आयुक्त : इतर महानगरपालिकेची तुलना केली असता त्या त्या मनपाची अस्थापनेवरील खर्चाची वाढ होतच आहे. तेंव्हा दिवसेंदिवस शहराच्या वाढत्या समस्येबरोबर आस्थापनेचाही खर्च वाढत जातो. त्यामुळे ३५% अस्थापनेवरी खर्च व ६५% विकास कामासाठीचा खर्च यामध्येच व्हावा असा शासनाचा संकेत आहे. भौगोलिक व आर्थिक परिस्थिती पाहून ठरवावयाचा असतो. त्या प्रमाणेच प्रशासन कार्यवाही करेल.

श्री. गौतम खरात : शासनाने जाहीर केलेल्या वेतन आयोगाच्या शिफारशी अन्वये सभागृहात फारच चर्चा होणे आहे. आता जास्त चर्चा न करता सर्वसंमतीने निर्णय व्हावा असे वाटते शासनाचे नियमाप्रमाणे द्यावे असे ठरविलेले आहे. पाचवा वेतन आयोग लागू करून सर्व कर्मचाऱ्यांना रु.५/- हजार अग्रीम देणेची कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : सभागृहात चर्चा झालेल्या नुसार व स. सदस्य यांनी मांडलेल्या सुचना या आधारे प्रस्तावातील औरंगाबाद महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग सन १९९६ पासून लागू करण्यांत येतो. व फक्त चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना अग्रीम म्हणून रु. २,०००/- (दोन हजार फक्त) देण्याची कार्यवाही व्हावी.

**ठराव क्र. १८७/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करणे बाबत सर्वसाधारण सभेत सांगोपांग चर्चा झालेली आहे. मनपाच्या सद्य: परिस्थितीतील आर्थिक स्थिती संदर्भाने प्रशासनातर्फे सविस्तर टिप्पणी सादर करण्यांत आलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करून खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येतो.

१. मनपा कर्मचाऱ्यांना दि. ०१/०१/९६ पासून वेतन आयोग लागू करण्यांत येतो. प्रत्यक्ष अंमलबजावणी दिनांक ०१/०१/९९ पासून करण्यात येईल.

२. वेतन आयोग लागू करणे बाबत शासनाची मान्यता येईपर्यंत लागणारा कालावधी घेता सर्व कर्मचाऱ्यांना शसनाच्या मान्यतेच्या अधिन राहून रु. १०००/- अग्रीम देण्यात यावे.

३. सेवा भरती नियमानुसार १५ वर्ष सेवा झाल्यानंतर मनपा कर्मचाऱ्यांना पुनश्च निवडश्रेणी देय राहील का, याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात यावे. कारण शासनाच्या धोरणानुसार पुनश्च निवडश्रेणी लागू होत नाही. अशी सभागृहाची धारणा आहे. त्यामुळे सदरील निवडश्रेणी रद्द करण्यांत यावी. व त्या दृष्टीने शासनास माहिती पाठवून मार्गदर्शन घेण्यात यावे.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा समाप्त झाल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १८/०१/९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**सोमवार दि. १८/०१/९९ रोजी सकाळी ११.३० वा. मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभेस महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या बैठकीस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. डॉ. कऱ्हाड भागवत | उपमहापौर |
| २) | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स. सभासद |
| ३) | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्माणराव | --//-- |
| ४) | स.स.श्री. अफसरखॉन यासिनखॉन | --//-- |
| ५) | स.स.श्री. लोखंडे रुख्मणबाई खंडेराव | --//-- |
| ६) | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ७) | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| ८) | स.स.सौ. जोशी रजनी रमेश | --//-- |
| ९) | स.स.सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक | --//-- |
| १०) | स.स.श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| ११) | स.स.श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --//-- |
| १२) | स.स.श्री. भालेराव अभिमन्यु | --//-- |
| १३) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १४) | मा. श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १५) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| १६) | स.स.श्री. बैनाडे कंवरसिंग किशनसिंग | --//-- |
| १७) | स.स.सौ. शिंदे पद्मा बाबुराव | --//-- |
| १८) | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| १९) | स.स.श्री. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २०) | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २१) | स.स.श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |
| २२) | स.स.श्री. फजलउल्ला खॉन अजमत खॉन | --//-- |
| २३) | स.स.श्री. अजिज खॉ गणी खॉ | --//-- |
| २४) | स.स.सौ. आबेदा बेगम मो. मुस्तफा | --//-- |
| २५) | स.स. श्रीमती नुरजहॉं बेगम अ. रहेमान | --//-- |
| २६) | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| २७) | स.स.श्री. हाजी मोहसीन अहेमद हाजी बशिर अहेमद | --//-- |
| २८) | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखोराद्दिन | --//-- |
| २९) | स.स.श्री. अ. जावेद रज्जाक | --//-- |
| ३०) | स.स. जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| ३१) | स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३२) | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३३) | स.स.श्री. म.अ.रऊफ अ. माबुद | --//-- |
| ३४) | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा फसीयोद्दिन | --//-- |

३५) स.स.श्री. स.अ. इकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन --//--
३६) स.स.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण --//--
३७) स.स.श्री. स. अली मिरा सलामी --//--
३८) स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद --//--
३९) स.स.श्री. संजय किसनराव केनेकर --//--
४०) स.स.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम --//--
४१) स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास --//--
४२) स.स.श्रीमती अलका रमेश पाटील --//--
४३) स.स.सौ. शकुंतला हरीदास धांडे --//--
४४) स.स.श्री. अब्दुल रशिदखॉन (मामू) --//--
४५) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण --//--
४६) स.स.डॉ. कु. माया लिंबाजी लाडवाणी --//--
४७) स.स.सौ. सविता संजय आव्हाड --//--
४८) स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे --//--
४९) स.स.श्री. अब्दुल रशिद अ. सत्तार --//--
५०) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंदसिंग --//--
५१) स.स.श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन --//--
५२) स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन --//--
५३) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव --//--
५४) स.स.श्री. जोशी संजय रामदास --//--
५५) स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर --//--
५६) स.स.श्री. ज्योत्स्ना दौलतराव हिवराळे --//--
५७) स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडू बचाटे --//--
५८) स.स.सौ. राधाबाई तळेकर --//--
५९) स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर --//--
६०) स.स.श्री. विठ्ठल किसन जाधव --//--
६१) स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन --//--
६२) स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम --//--
६३) स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास --//--

**संवाद :**

श्री. अविनाश कुमावत : कोरम अभावी सभा तहकूब करावी.
मा. महापौर : सभा ३० मिनीटासाठी तहकूब करण्यात येते.
(वेळ ११.३० वा सभेला सुरुवात १२.०० वा.)
श्री. जावेद रज्जाक : शहरातील नामांकित वकील श्री. अकबर पटेल यांच्या पत्नी यांचे दुःख निधना निमित्त ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.
श्री. स. अली मिरा सलामी : स्वातंत्र्य सेनानी स्व. आर. के. देशपांडे यांचे दुःखद निधना निमित्त ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी.
श्री. गौतम खरात : मानगरपालिकेतील कनिष्ठ लिपीक श्री. घुबडे यांचे दुःखर निधन झाले त्यांना ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.
श्री. अ. रशिद खॉन (मामू), अविनाश कुमावत : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे श्री. अकबरखॉन, यांच्या पत्नी, श्री. आर.के. देशपांडे स्वातंत्र्य सेनानी तसेच श्री. घुबडे, कनिष्ठ लिपीक यांचे दु:खद निधना निमित्त ०२ मिनिटे एकत्रित श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

याच वेळी सभागृहात श्री. अकबर खॉन यांचे पत्नी स्व. श्री. आर. के देशपांडे तसेच मनपाचे कनिष्ठ लिपीक श्री. घुबडे यांच्या दु:खद निधना निमित्त सभागृहात स्तब्ध उभे राहून ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री. जावेद रज्जाक : मागील बैठकीत कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन लागू करण्याबाबत चर्चा होऊन १ हजार रुपये ॲडव्हान्स देण्यांत यावे असा निर्णय झालेला होता. ५ हजार रुपये देण्याबाबत कुणाचाही विरोध नव्हता. पुन्हा त्या संदर्भात बैठक होऊन ५ वा वेतन लागू करून २ हजार रुपये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना देण्याबाबतचा निर्णय झालेला आहे, कितपत सत्य आहे.

श्री. अविनाश कुमावत : मागील बैठकीत चर्चा होऊन निर्णय झालेला होता. परंतु संघटनेच्या लोकांना झालेल्या निर्णयावर समाधान न झाल्याने मा. महापौर यांच्या दालनात पदाधिकारी यांच्या समवेत बैठक होऊन ५ व्या वेतन आयोग तसेच वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना ॲडव्हान्स पोटी २०००/- रु. देण्याबाबत चा निर्णय झालेला असून त्या अनुषंगाने चर्चा करू नये. दुसऱ्या विषयावर बोलावे.

श्री. जावेद रज्जाक : सर्व स. सदस्यांना विश्वासात न घेता मा. महापौर यांनी निर्णय घेतलेला असून ५ हजार रुपये देण्यावरून १ हजार रुपये देण्याचे मान्य केले होते. परंतु पुन्हा बैठक होऊन २ हजार रुपये आगाऊ देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. ठराविक स. सदस्यांना विश्वासात घेऊन असे निर्णय घेणे योग्य नाही. सर्व स. सदस्याचे म्हणणे आहे. ५ हजार रु. देण्यांत यावे असे असतांना काही स. सदस्यांना विश्वासात न घेता निर्णय घेतला.

मा. महापौर : कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू तसेच ५ हजार ऐवजी चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना तुर्त २ हजार रुपये ॲडव्हान्स देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मा. महापौर यांच्या दालनात पदाधिकारी मा. आयुक्त तसेस संघटनेचे पदाधिकारी व काही स. सदस्य उपस्थित होते. सगळ्याच्या सन्मतीने निर्णय घेण्यांत आलेला आहे.

श्री. म.अ.रऊफ : यापुढे अशा प्रकारच्या बैठका घेऊन निर्णय घेण्यात येऊ नये.

श्री. गौतम खरात : तसेच घेतल्यास सर्व स. सदस्यांना विश्वासात घेऊन निणर्य घेण्यात यावे.

सौ. नुरजहाँ बेगम : कर्मचाऱ्यांला पाचवा वेतन लागू करण्या संदर्भात तसेच इतर कर्मचारी वगळता फक्त चतुर्थश्रेणी (वर्ग-४) कर्मचाऱ्याला ॲडव्हान्स पोटी २ हजार रुपये देण्याचा निर्णय सर्व स. सदस्यांना विश्वासात घेऊन करण्यांत आलेला नाही. असे वैयक्तिक बैठका घेऊन निर्णय घेण्यात येऊ नये.

श्री. प्रकाश निकाळजे : संघटनेच्या पदाधिकारी यांना आश्वासन दिलेले होते. त्यामुळे निर्णय घेण्यात आलेला आहे काय?

श्री. जावेद रज्जाक : ज्या समस्या समवेत बैठक घेऊन पाचवा वेतन आयोगाबाबत निर्णय घेतला त्या सदस्यांनी वृत्तपत्रात नावे जाहीर झालेली असून बाकी इतर स. सदस्यांचा कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्याबाबत विरोध होता

अशी भावना कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेली असून असे ठराविक स. सदस्यांना बोलावून बैठका घेऊन निर्णय घेणे योग्य नाही.

मा. महापौर : याबाबत निर्णय घेतला असून ठराव सभागृहात वाचून दाखवण्यात येईल.

श्रीमती मोहसिना बिल्कीस : सभागृहात चर्चेनुसार दि. ०१/०१/९९ पासून वेतन आयोग लागू तसेच सर्व कर्मचाऱ्यांना १ हजार रुपये ॲडव्हान्स पोटी देणे व सक्रांती पूर्वी सर्व महिला कर्मचाऱ्यांना साड्या वाटप करणे बाबत निर्णय झालेला होता. ऐनवेळी बैठका घेऊन पाचवा वेतन दि.०१/०१/९६ पासून लागू करून २ हजार रुपये चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना देणे बाबत निर्णय घेतला त्याबद्दल अभिनंदन तसेच महिला कर्मचाऱ्यांनी संक्राती पूर्वी साड्याचे वाटप करण्यात आले नसून काही महिला कामगारांना संक्राती सारख्या महत्वाच्या सणाला साड्या खरेदी करता आल्या नसून सभागृहातील निर्णयाची योग्य अंमलबजावणी होत नाही. तसेच वैयक्तिक काही स. सदस्यांनाच बोलावून बैठका घेऊन यापुढे निर्णय घेण्यांत येऊ नये.

श्री. अविनाश कुमावत : निर्णय घेण्यात आलेला प्रस्तावाच मा. सचिवाकडे दिलेले असून सभागृहात वाचून दाखवावा.

मा. महापौर : मा. नगरसचिव यांनी पाचवा आयोग लागू करण्याबाबतचा प्रस्ताव सभागृहात वाचून दाखवावा.
(याच वेळी मा. नगरसचिव, पाचवा वेतन आयोग लागू करण्याबांबत प्रस्ताव वाचून दाखवतात.)

**विषय क्र. १८८ :** दिनांक १३/०१/९९ च्या विशेष सर्वसाधारण सभेत विषय क्र. १८७/१ च्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्याबाबत झालेला ठराव बाबत खालील प्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

१. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दि. ०१/०१/९६ पासून वेतन आयोग लागू करण्यांत येतो. प्रत्यक्ष अंमलबजावणी दिनांक ०१/०१/९९ पासून करण्यांत येईल. तसेच दिनांक ०१/०१/९६ ते ३१/१२/९८ पर्यंतच्या थकबाकी बाबत भविष्यात महानगरपालिका आर्थिक परिस्थिती लक्षात घेवून विचार करण्यात येईल.
२. वेतन आयोग लागू करण्याबाबत शासनाची मान्यता येई पर्यंत लागणारा कालावधी लक्षात घेता वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून रु.२०००/- अग्रीम म्हणून रक्कम देण्यांत येईल व उर्वरित कर्मचारी यांना एप्रिल / मे महिन्यात अग्रीम रक्कम रुपये १०००/- देण्यात येईल.
३. सेवा भरती नियमानुसार १५ वर्षे सेवा झाल्यावर मनपा कर्मचाऱ्यांना पुनश्चः निवडश्रेणी देण्यात यावी. या तरतुदीबाबत पाचवा वेतन आयोग लागू केल्यास सदरील निवडश्रेणी देय राहील का, याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यांत यावे. कारण शासनाच्या धोरणानुसार पुनश्चः निवडश्रेणी लागू होत नाही. त्यामुळे सदरी निवडश्रेणी रद्द करण्यांत यावी. त्यादृष्टीने शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

सुचक - श्री. अविनाश कुमावत.
अनुमोदक - श्री. अफसर खॉन
श्री. जयवंत (बंडू) ओक

**संवाद :**

श्री. जयवंत ओक : पाचवा वेतन लागू करण्याच्या संदर्भाने अभिनंदन ज्या कर्मचाऱ्यांना निलंबन केले त्या कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याबाबत मा. महापौर यांनी निलंबनाची कार्यवाही परत घ्यावी निलंबनाची कार्यवाही रद्द करावी सर्वसाधारण सभेला अधिकार आहे. तसेच पाचवा वेतन बाबत झालेल्या बैठकित जो निर्णय घेण्यात आला तो. स. सदस्या, पदाधिकारी, मा. प्रशासन, मा. महापौर मा. सर्व संघटनेचे पदाधिकारी यांच्या समवेत घेण्यांत आलेला असून त्याबाबत अभिनंदन करतो.

श्री. अफसर खॉन : सर्वसाधारण सभेला निर्णय घेण्याचा अधिकार आहे. निलंबनाचे आदेश रद्द करावे.

श्री. अविनाश कुमावत : निलंबना बाबतचे निर्णय स्थायी समितीमध्ये घेता येते. तशी प्रकारची कार्यवाही करावी हे अधिकार स्थायी समितीला आहे.

श्री. डॉ. विजयकुमार मेहेर : निलंबन झालेल्या कर्मचाऱ्यांचे निलंबन रद्द करणे बाबत स्थायी समिती समोर ठेवून निलंबन रद्द करणे योग्य वाटते काय? सर्वसाधारण सभेस निर्णय घेता येतात.

(याच वेळी सभागृहात स.सदस्यांचे मोठमोठ्याने बोलणे चालू असते. काही ऐकू येत नाही.)

श्री. गजानन बारवाल : अशा प्रकरणी निर्णय घेण्याचे अधिकार स्थायी समितीला असून स्थायी समितीच्या सभेत निर्णय घेण्यात यावा त्या निर्णय घेण्यास आला नाही तर पुढील कार्यवाही करावी.

श्री. जयवंत ओक : स्थायी समिती मध्ये अधिकार आहेत परंतु सर्व साधारण सभेने निर्णय घेतल्यास योग्य या बाबत आजच निर्णय घेण्यास योग्य होईल.

श्री. डॉ. विजयकुमार मेहेर : मा. प्रशासनाने सभागृहात खुलासा करावा या प्रकारणात निर्णय घेण्याचे बाबतचे अधिकार कुणाला आहेत?

श्री. जावेद रज्जाक : ज्या कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले त्यांना कामावर घेण्या संदर्भात मा. स्थायी समितीने निर्णय घ्यावा. अशी माझी विनंती आहे.

मा. महापौर : कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव क्र. १८८ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहातील चर्चेनुसार दि. १३/०१/९९ च्या विशेष सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १८७/१ अन्वये महापालिका कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्याबाबत जो निर्णय घेतला आहे. त्यात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दि. ०१/०१/९६ पासून वेतन आयोग लागू करण्यांत येतो. प्रत्यक्ष अंमलबजावणी दिनांक ०१/०१/९९ पासून करण्यांत येईल. तसेच दिनांक ०१/०१/९६ ते ३१/१२/९८ पर्यंतच्या थकबाकी बाबत भविष्यात महानगरपालिका आर्थिक परिस्थिती लक्षात घेवून विचार करण्यात येईल.

२. पाचवा वेतन आयोग लागू करण्याबाबत शासनाची मान्यता येई पर्यंत लागणारा कालावधी लक्षात घेता वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून रु.२०००/- अग्रीम म्हणून रक्कम देण्यांत येईल व

उर्वरित कर्मचारी यांना एप्रिल / मे महिन्यात अग्रीम रक्कम रुपये १०००/- देण्यात येईल.

३. सेवा भरती नियमानुसार १५ वर्ष सेवा झाल्यावर मनपा कर्मचाऱ्यांना पुनश्चः निवडश्रेणी देण्यात यावी. या तरतुदीबाबत पाचवा वेतन आयोग लागू केल्यास सदरील निवडश्रेणी देय राहील का, याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यांत यावे. कारण शासनाच्या धोरणानुसार पुनश्चः निवडश्रेणी लागू होत नाही. त्यामुळे सदरी निवडश्रेणी रद्द करण्यांत यावी. त्यादृष्टीने शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

बैनाडे कवंरसिंग : दिनांक २९/१२/९८ च्या बैठकीत निर्णय झाला की पत्र दिलेले होते. त्यानुसार अद्याप पर्यंत काही कार्यवाही झालेली नाही. सिडको येथील भागात महानगरपालिके मार्फत पाणी पुरवठा, ड्रेनेज लाईन, विद्युत व्यवस्थेबाबतची सर्व विकास कामे करण्याबाबत प्रशासनाने तसेच सभागृहाने परवानगी द्यावी.

सौ. पद्मा शिंदे : सिडको-हडको मधील स. सदस्याच्या स्वेच्छा निधीतून कोण-कोणती विकास कामे करण्यांत येईल तशा प्रकारचा संबंधितांनी खुलासा करावा. व त्यानुसार मा. महापौर यांनी आदेश द्यावेत. फरशी, ड्रेनेज, पाणी पुरवठा इ. सर्व विकास कामे करावी तशी कार्यवाही करावी.

श्री. डॉ. विजयकुमार मेहेर : मा. प्रशासनास या बाबत खुलासा करू द्यावा.

मा. महापौर : सिडको-हडको अंतर्गत येणाऱ्या प्रभागामध्ये स. सदस्यांनी पत्र दिल्यानंतर त्या-त्या सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून (कोणतेही) विकास कामे करण्याबाबत मा. प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री. रशिदखॉन (मामू) : महानगरपालिका मालमत्ता कर पाणीपट्टी कर थकबाकी व जकात वसूली योगय त्या प्रमाणात झालेली आहे काय? याबाबत कडक कार्यवाही करावी. जो पर्यंत पुर्णतः वसुली होत नसेल तर असे विकास कामे करणे परवडणार नाही. सुधारित अंदाज पत्रक करावयाचा वसुली ४५ कौटी पर्यंत होणार आहे का ६० दिवस राहिलेले आहे. याचा खुलासा करावा.

मा. महापौर : विषय पत्रिकेतील विषयावर चर्चा करावी विषय पत्रिकेतील विषय संपल्यावर माहिती देण्यात येईल.

श्री. रशिद खॉन (मामू) : विकासाची कामे करण्यात येईल अशी बातमी वृत्तपत्रात छापून आलेली आहेत. योग्य वसुली होते काय माहिती द्यावी.

श्री.स. अली मिरा सलामी : मागील वर्षाच्या डिसेंबर पर्यंत किती वसुली झालेली आहे. यावर्षीच्या डिसेंबर अखेर तुलनात्मक दृष्ट्या किती वसुली झालेली आहे. गेल्या जानेवारी पर्यंत किती कर वसुली झालेली असून चालू वर्षाच्या जानेवारी पर्यंत किती होईल. याबाबतचा सविस्रत खुलासा सभागृहात संबंधित अधिकारी यांनी करावा.

जकात अधिक्षक : उद्दिष्ठाच्या प्रमाणकानुसार एकूण ३२ कोटी जकात वसुली झालेली आहेत. ४२ ते ४३ कोटी पर्यंत निश्चित जाईल चालू आर्थिक वषार्च्याच्या जी उद्दिष्ट ठरवलेले आहे ती वसुली आर्थिक वर्षा अखेर पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. गेल्या वर्षाच्या डिसेंबर अखेर ३ कोटी ३० लाख झालेली होती चालू

आर्थिक वर्षात डिसेंबर अखेर ३ कोओी ५२ लाख म्हणजेच २२ लक्ष रु. ची वसुली वाढ झालेली आहे. एकूण ४३ कोटी वसुली होईल अशी अपेक्षा आहे.

श्री. स. अली मिरा सलामी : मागील वर्षाच्या व चालू आर्थिक वर्षाच्या विचार केल्यास २२ लक्ष जास्तीची वसुली झालेली असली तरी शहराचा होणारा विकास येणाऱ्या, कच्च्या मालाची आयातीत वाढ, इतर मालावरील जकातीच्या मानाने जास्त झालेली नाही. महागाई निर्देशांक वाढला मागील वर्षाच्या प्रमाणकानुसार यावर्षी वसुली झालेली नाही टक्केवारी प्रमाणे जकात वसुली कमी झाली आहे.

श्री. गौतम लांडगे : उद्दिष्ट ४८ कोटीचे आहे. सभागृहात ४२-४३ कोटी पर्यंत वसुली होईल याचे कारण काय?

मा. आयुक्त : कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू केल्यामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीवर आर्थिक बोजा पडणार असून हा भार कसा भरून काढणार व विकासाच्या कामावर परिणाम याची चिंता वाढणे सहाजिक आहे. तसेच जकात वसुलीच्या माध्यमातून हा आर्थिक भार कसा भरून काढता येईल याची विचाराधीन असून महानगरपालिकेवर पडलेला आर्थिक भार कसा भरून काढणार असे जनता तसेच सभाभृहाला वाटने सहाजिकच आहे. १९९४-९५ अंदाजपत्रकात २५ कोटीचे उद्दिष्ट ठरवले असता २४ कोटी रु. वसुली झालेली होती. ९५-९६ च्या आर्थिक वर्षात ३० कोटीचे उद्दिष्ट असता एकूण २९ कोटी ७५ लाख रु. ची वसुली झालेली होती. त्याचप्रमाणे ९६-९७ व्या वर्षात ३२ कोटीचे उद्दिष्ट ठरवले असता ३० कोटी ८९ लक्ष पर्यंत वसुली झालेली होती. ९७-९८ मध्ये ३९ कोटी ऐवजी ३८ कोटी ५५ लाख वसूल झालेली आहे. तसेच चालू आर्थिक वर्षात ४५ कोटीचे उद्दिष्ट धरले असता सभागृहाच्या निर्णयाने ४८ कोटीचे उद्दिष्ट धरले होते. गेल्या वर्षी डिसेंबर अखेर जमा झालेला जकात वसुली ३० कोटी २३ लाख वसुली झालेली होती चालू आर्थिक वर्षात डिसेंबर अखेर ३२ कोटी ८५ लाख रु. वसुली झालेली आहे. प्रमाणकानुसार दर दिवसाला ११,१२,१३,१४ लाख रु. ची वसुली ही होत असून त्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. वर्षाचे ७५ दिवस बाकी असून ३१ मार्च पर्यंत ४३ कोटी रु. ची वसुली होईल अशी अपेक्षा आहेत. शहरातील कारखानदार तसेच व्यापारी वर्ग यांची अकाउंटीग तपासणार. किती कच्चा माल आयात केला, बाहेर किती गेला त्याचे व्हॉवचर काय आहेत जकात किती जमा केली, कुणी चोरून माल आणलेला आहे काय, अशी तपासणी चालू आहे. अधिक कार्यवाहीसाठी कर्मचाऱ्यांना वायरलेसची व्यवस्था करण्यात आली असून दोन जीप्सी गाड्या घेतल्या. आहेत जकात कर चुकविणाऱ्याच्या माहिती देणऱ्यांना १% जकातीच्या प्रमाणकानुसार रक्कम देण्याचे ठरलेले असून जकात वसुली कशा पध्दतीने जास्तीत जास्त करता येईल असे प्रयत्न प्रशासनाच्या माध्यमातून चालु आहे. १९९४-९५ ला २५ कोटी उद्दिष्ट वरून चालू आर्थिक वर्षाचे ४३ कोटीचे उद्दिष्ठ पर्यंत वाढ झालेली असून त्यातील कर्मचारी, अधिकारी यांचे कष्ठ व परिस्थिती भक्कम कशी होईल यासाठी प्रशासन प्रयत्नशिल असून चालू आर्थिक इतर प्रयत्न लक्षात घेता महानगरपालिकाची आर्थिक वर्षात ४२ कोटी पर्यंत मार्च अखेर निश्चित वसुली होईल यात शंका नाही.

श्री. स. अली मिरा सलामी. : महानगरपालिकोतील जकात तील काही कर्मचाऱ्यांच्या इतर विभागात बदल्या करण्यात आल्या होत्या. पुन्हा त्याच कम्रचाऱ्यांना जकात विभागात पाठविण्यात आले. दुसऱ्या विभागातील. कर्मचारी काम करण्यास सक्षम नाही काय? खुलासा करावा.

श्री. जावेद रज्जाक : जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या केलेल्या होत्या आमच्या माहिती प्रमाणे बदल्याच झाली नाही. सदर कर्मचारी दिर्घकाळ रजेवर जाऊन पुन्हा त्यांना त्या विभागात देण्यांत आले. त्यांची नांवे सभागृहात सुचवावीत?

श्री. प्रदिप जैस्वाल : सभागृहात कोणतेही प्रश्न उपस्थित करून नये विकसाधीन कामाबाबत चर्चा करावी.

मा. महापौर : उप आयुक्त (प्र) यांनी खुलासा करावा.

उप-आयुक्त (प्र) : सर्वसाधारण सभेने घालून दिलेले उद्दिष्ट पुरेपुर वसुली कशी करता येईल याकडे प्रशासनाचे प्रयत्न चालू असून जकात विभागातील ५-५ वर्षापासून ज्यांना सलग सेवा केलेली होती त्यांच्या इतर विभागामध्ये बदल्या केलेल्या आहेत. जकात विभागात काम करण्याच्या विभाग प्रमुखाच्या शिफारशीनुसार कार्यक्षम असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी २-३ कर्मचाऱ्यांनाच जकात विभागात देण्यात आले असून वसुली होण्याबाबतची संपूर्ण जबाबदारी ही विभाग प्रमुखावर टाकलेली असून ज्या कर्मचाऱ्यांबाबत जकात विभागात संशय घेण्यात आला त्या कर्मचाऱ्यांना त्या विभागातून बदलीवर दुसऱ्या विभागात पाठविण्यांत आलेले.

श्री. स. अली मिरा सलामी, श्री. प्रकाश निकाळजे, :
ज्या कर्मचाऱ्यांना बदलीवर पाठविले ते सक्षम नाही का, श्री खरे कनिष्ठ लिपीक हे बदलीवर गेले नाही. आस्था-२ मध्ये कार्यरत आहे.

उप आयुक्त (प्र) : श्री. मोकासे यांना बदलीवर दिले होते परंतु विभाग प्रमुखाच्या शिफारशीनुसार त्यांना त्याच विभागात देण्यात आले.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी या बाबत खुलासा केलेला आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : आस्थापना-२ मधील बदल्या झालेल्या कर्मचारी इतर दुसऱ्या विभागात रुजू झालेले नाही.

श्री. प्रफुल्ल मालानी : कर्मचाऱ्यांच्या बदल्याबाबत एक विशेष बैठक बोलवण्यात येऊन चर्चा करून निर्णय घेण्यात यावा.

श्री. जावेद रज्जाक : प्रत्येक मुद्या बाबत विशेष बैठक ठेवणार काय? विद्युत व्यवस्थेबाबत अद्यापपर्यंत बैठक झाली नाही.

श्री. अली मिरा सलामी : पाचवा वेतन आयोग कर्मचाऱ्यांना लागू केलेला असून ॲडव्हान्स पोटी २ हजार रुपये देणेचे मान्य केले आहे. कर्मचारी बदलीवर दुसऱ्या विभागात रुजू होणार नसतील तर अशा कर्मचाऱ्यांवर कडक कार्यवाही करावी.

श्री. प्रदिपकुमार जैस्वाल : इतर चर्चा बंद करावी. विषय क्र. १ वर चर्चेला सुरुवात करून त्यात दुरुस्ती करावयाची आहे.

सौ. नुरजहाँ बेगम : जकात विभागातील कर्मचाऱ्यांच्या इतर विभागात बदल्या केलेल्या असतांना बदली जागी न जाता पुन्हा जकात विभागात घेण्यात आले हे कस काय? खुलासा करावा.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा केलेला असून विषय क्र. १ वर चर्चा करावी.

श्री. मोहसीन अहेमद : मा. नगरसचिव यांच्या मार्फत २० दिवसापूर्वी पत्र दिले होते. खुलासा मागवलेला होता. संबंधित अधिकारी यांनी दिलेल्या खुलाशाची प्रत मला मिळाली असून दिलेले उत्तरसमाधान कराक नाही या बाबत सभागृहात चर्चा व्हावयास पाहिजे.

१) महानगरपालिकेच्या जियाउद्दीन ले आऊट मधील खुल्या जागेवर एका इसमाने अतिक्रमण केलेले असून सदर इसमावर कुठल्याही प्रकारचे पुरावे नसतांना मनपाची ती खुली जागा असताना महानगरपालिकेच्या नावांवर पि. आर. कार्ड असतांना, ले-आऊट मंजूर असतांना ती जागा एका इसमाने बळकावली आहे. मा. श्री. प्रदिप जैस्वाल महापौर असतांना सदर जागेवर स्पेशल कोर्ट केस दाखल करून स्थगीती आणलेली होती. सदर मिळकत ही १५ ते २० लाखाची असून मनपा ने खालच्या कोर्टात प्रकरण दाखल केले असता महानगरपालिके विरुध्द निकाल लागलेला असून जिल्हा कोर्टामध्ये ही केस दाखल झाल्यानंतर सदर जागेचे पि.आर. कार्ड महानगरपालिकेच्या नावावर असून जागेचे ले-आऊट मंजूर कागदपत्र महापालिकेकडे असतांना संबंधित व्यक्तीकडे कुठल्याही प्रकारचे पुरावे नसतांना जिल्हा कोर्टामध्ये या जागे संदर्भात मनपाच्या विरोधात निकाल लागलेला असून ही खेदाची बाब आहे. म.न.पा. चे नेमलेले वकीलॉचे पॅनल प्रामाणिकपणे काम करीत नाही काय? महानगरपालिकांच्या विरुध्द निकाल कसा लागतो याचे कारण काय? महानगरपालिकांच्या विरुध्द निकाल कसा लागतो याचे कारण काय? महानगरपालिकांच्या विरुध्द निकाल कसा लागतो याचे कारण काय? या बाबत सभागृहात मी नेहमी चर्चेद्वारे उल्लेख केलेला असून काही कार्यवाही झालेली नाही.

२) नागसेन कॉलनी, रेखाकन खुल्या जागेवर एका व्यक्तिने खाजगी लोकांना १८X२० =३६० चौ. फुट ज्यांनी नांवावर लावले त्यांनी रु. २,१५,०००/- ला विकले हे मी मनपाच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. स्टे उठत नाही. २० ते २५ लाखाची मिळकत महानगरपालिकेने टॅक्स लावला तसेच नळ, ड्रेनेज, विजेची सोय इत्यादी सर्व सुविधा पुरविल्या जातात. महानगरपालिकेचे विधी सल्लागार यांचे याकडे लक्ष नाही असे दिसते.

श्री. जावेद रज्जाक, श्री. अविनाश कुमावत : याबाबत चौकशी करून संबंधीतावर कार्यवाही करावी जागा विकाणारा संबंधित व्यक्तीचे नां सांगावे.

श्री. कवरसिंग बैनाडे : स. सदस्या श्री. मोहसीन अहेमद यांनी सूचना केल्या प्रमाणे महानगरपालिकेच्या खुल्या जागा किती आहेत. या बाबत स. सदस्य सभागृहात माहिती द्यावयास पाहिजे ज्या जागेवर अतिक्रमणे केलेली आहे. संबंधित अधिकारी व विधी सल्लागार यांच्या एकत्रित कार्यवाहीने संबंधितांवर का कार्यवाही होत नाही विधी सल्लागार हे पद अद्यापपर्यंत भरलेले नाही. प्रशासनाने खुलासा करावा. पुढच्या बैठकीत खुल्या जागा बाबत सभागृहाला संपूर्ण माहिती द्यावी.

श्री. प्रकाश निकाळजे : म्हाडा कॉलनी ते पिरबाजार जवळील नाल्यावर १५ लोकांना मदत केलेली असून नालयाच्या बाजूलाच असलेली संरक्षित भिंत पाडून अतिक्रमण करून महानगरपालिकेची प्रॉपर्टी लोक हस्तगत करत असून

महानगरपालिकेतील संबंधित अधिकारी यांचेकडे लक्ष द्यावे संबंधित अधिकारी यांच्याकडून खुलासा द्यावा.

श्री. जावेद रज्जाक, श्री. मोहसीन अहेमद : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री. जयवंत ओक, श्री. मेहेर विजयकुमार : संबंधित अधिकारी यांनी खुलासा केल्यानंतर संबंधितावर तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत १० वर्षापासून संबंधित व्यक्ती महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे. जागा आपल्या ताब्यात द्यावी.

सहा. संचालक, नगर रचना : स.स. यांनी खुल्या जागेबाबत सुचवलेल्या प्रश्नापैकी १) जिलॉग प्रेसिंग येथील अल्टरनेट करण्यासाठी संबंधित कार्यालयास कळविलेले असून दुसऱ्या न्यायालया महानगरपालिकेच्या विरुध्द लागलेल्या निकाला संदर्भात जागेबाबत पुढच्या बैठकीत माहिती देण्यात येईल.

श्री. बैनाडे कवरसिंग : संबंधित अधिकारी यांना या बाबत संपूर्ण माहिती का नसते पुढच्या बैठकीत असे उत्तरे सभागृहात देता-देता स. सदस्याचे पाच वर्षाचा कालावधी निघून जात आहे.

सहा. संचालक, नगररचना : नागसेन कॉलनी येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर अतिक्रमण झालेले असून त्या संदर्भात विभागातून महानगरपालिकेच्या नावांने लावलेल्या सिटी सर्व्हे कार्यालयास १९९३ मध्ये कळविण्यांत आलेले आहेत.

श्री. मोहसीन अहेमद : १९९३ मध्ये तक्रार करून ६ वर्षाचा कालावधी निघून गेलेला असतांना संबंधित अधिकारी यांनी पी.आर.कार्ड मनपाच्या नांवावर करू शकले नाही. संबंधित व्यक्तीकडून सदर जागा परत घेण्याबाबत कार्यवाही करावी तसेच संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करून सदर जागेवर कुंपन भिंत बांधावी विधी सल्लागार यांनी गेल्या ८ वर्षात संबंधितावर का कार्यवाही केलेली नाही. अशा प्रकरणी केसेस न्यायालयात जाऊन महानगरपालिके तर्फे विधी सल्लागार यांच्या मार्फत चांगल्या प्रकारे कार्यवाही न होता महानगरपालिकेच्या विरोधात निकाल लागतो. महानगरपालिका बाहेरील जागा खरेदी करतात व मनपाने हस्तगत केलेल्या खुल्या जागेवर इतर नागरिक अतिक्रमण करून जागा बळकावतात. महानगरपालिकेच्या प्रशासनास अशा खुल्या जागावर होणाऱ्या अतिक्रमण बाबत स. सदस्य सूचना करता त्याची अंमलबजावणी प्रशासनाच्या माध्यमातून तात्काळ होणे गरजेचे आहे. सभागृहाने तसा निर्णय घ्यावा.

श्री. बैनाडे कवंरसिंग : विधी सल्लागार यांच्याकडून खुलासा करावा स. सदस्यांनी सूचना केलेल्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे काय? सध्या विधी सल्लागार या पदावर कोण काम बघते खुलासा करावा.

श्री. प्रकाश निकाळजे : महानगरपालिकेच्या खुल्या जागा किती व कोठे आहेत याकडे कुणाचे ही लक्ष नसते फक्त अनाधिकृत बांधकाम संबंधिचे काम पाहतात.

सौ. लोखंडे रुख्मीनीबाई : माझ्या वॉर्डात महानगरपालिकेने एका जागेवर खर्च केलेला आहे का वर्ष झाले त्या संदर्भात माहिती विचारली असता उत्तर मिळालेले नाही.

श्री. अफसर खॉन : स.स. मोहसीन अहेमद यांच्या प्रश्नाच्या संदर्भाने खुलासा करावा.

श्री. विजयकुमार मेहेर : स. सदस्य यांनी महानगरपालिकेच्या खुल्या जागवेर होणाऱ्या अतिक्रमण व त्या संदर्भाने सभागृहाच्या निर्णयानुसार करावयाची कार्यवाही या बाबत सभागृहाशी १००% सहमत असून अतिक्रमण झालेल्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्या लोकांना सूचना दिल्यानंतर न्यायालयात जाऊन त्या

जागेवर स्थगिती म्हणतात स्थगिती आणल्या नतर महानगरपालिकेतर्फे साध्ये स्टे व्हॅकेट होत नाही. केस जिंकणे तर दूर राहते. अशा प्रकारे जनता मनपाच्या खुल्या जागा मिळकत करत असून न्यायालयात जास्त कालावधी गेल्यास महानगरपालिका विरुध्द निकाल लागतो. संबंधित व्यक्ती जागा बळकावून घेतात.

सौ. शिंदे पद्मा : माझ्या वॉर्डात महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर दोनच बाजुनी संरक्षित भिंत बांधलेल्या असून चार ही बाजूने संरक्षित भिंत बांधून द्यावी.

सौ. लता दलाल : औरंगपुरा येथे कुंभारवाड्यात एका इसमाने त्याच्या हद्दिच्या बांधकामां व्यतिरिक्त दुसऱ्या एका गरीब व्यक्तीची भिंत पाडून अतिक्रमण करून बांधकाम केले अतिक्रमण करून बांधकाम चालू असतांना संबंधित अधिकारी तसेच प्रशासकीय अधिकारी यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिलेली होती. त्यावेळी हे प्रकरण कोर्टात गलेले नव्हते. संबंधित व्यक्तीने आता त्या बांधकाम पाडल्यावर न्यायालयातून स्थगिती आणलेली असून कशाच्या आधारे स्थगिती आदेश मिळवले कोणत्या मुद्यावर स्थगिती मिळाली सदर ठिकाणी १०-१२ घरे आहे. रस्ता बंद झालेला आहे. अधिकारी यांना सूचना करून तसदी घेतली नाही.

सौ. नुरजहाँ बेगम : अतिक्रमण विभागातील इमारत निरिक्षक यांच्या बदल्या कराव्यात इमारत निरिक्षक यांच्या बदल्या होऊन ही पुन्हा ज्या त्या जागेवर बदल्या होतात याबद्दल माहिती द्यावी.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

प्रशासकीय अधिकारी : स. सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सदर ठिकाणी जाऊन पहाणी केली होती त्यानंतर रितसर बांधकाम परवानगी दिलेली आहे. आहे काय? या करिता संबंधित बांधकाम करणाऱ्या व्यक्तीला नोटीस पाठवल्या नंतर दोन दिवसाने न्यायालयातनू स्थगित आदेश आणलेला आहे. भोगवटा प्रमाणपत्र देतात. नगररचना विभागातून कार्यवाही होऊ शकते. संबंधिताने केलेले बालकणीचे बांधकाम पाडू शकलो नाही. बांधलेले काम रेग्युराईज होण्यासारखे आहे.

श्री. विजयकुमार मेहेर : संबंधित व्यक्ती अतिक्रमण करून बांधकाम करण्यास अधिकाऱ्यांकडून संधी मिळकत त्यानंतर काही तक्रार केल्यास न्यायालयातून स्थगिती आणतात त्यामुळे बरेचशे अतिक्रमणे होऊ लागली आहे.

श्रीमती नुरजहाँ बेगम : माझ्या वॉर्डात बरेच अनाधिकृत आहे. श्री. बसैय्ये यांनी सर्वांना पत्र दिले आहे. संबंधित अधिकारी तसेच विधी सल्लागार यांना माहिती देऊन ही कार्यवाही होत नाही.

मा. महापौर : अतिक्रमणच्या बाबत स. सदस्यांनी ज्या तक्रारी केलेल्या आहेत त्या संदर्भात ३ दिवसांच्या आत लेखी उत्तर त्या संबंधित अधिकाऱ्यांनी स. सदस्यांना द्यावे. ज्यांनी अतिक्रमण केलेले आहेत तसेच कर्मचाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी अशा अतिक्रमण बांधकामाला तसेच खुल्या जागावर अतिक्रमण करण्यास प्रोत्साहित केले. दोषी कोण आहेत, त्यांच्यावर प्रशासनाने कडक कार्यवाही करावी.

श्री. व्ही.व्ही. देशमुख : मा. महापौर यांच्या आदेशाला संबंधित अधिकारी दक्ष राहत नाही. याबाबत स. सदस्यांना तात्काळ उत्तर मिळाले पाहिजे. स. सदस्य श्री.

मोहसीन अहेमद यांनी ९३ मध्ये सदर खुल्या जागेबाबत तक्रार करून ही अद्यापपर्यंत संबंधित अधिकारी यांनी उत्तर तयार ठेवलेले नाही.

श्री. मोहसीन अहेमद : ९३ ते आतापर्यंत का थांबले हात मिळवणी केली किंवा कसे माहिती संबंधी अधिकारी यांनी दिली नाही. याचे कारण काय?

मा. महापौर : विधी सल्लागार यांनी माहिती द्यावी.

उप-आयुक्त (प्र) : न्यायालयात काम करणारे वकील यांच्याकडून सविस्तर माहिती घेऊन ३ दिवसात स. सदस्यांना या बाबत माहिती देण्यात येईल.

श्री. गौतम खरात : अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदलया झाल्या होत्या. तया बाबत सभागृहात चर्चा ही झालेली होती. परत त्यास कर्मचाऱ्यांना त्याच विभागात का देण्यात आले हे प्रशासनाने कशासाठी केले खुलासा करावा.

श्री. प्रकाश निकाळजे : इमारत निरिक्षक श्री. पवार यांनी एका जागेवर अनाधिकृत बांधकाम करून देण्यासाठी निकटच्या नातेवाईकांकडून ३०००/- घेऊन सदर बांधकाम होऊ दिले. अशा कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कार्यवाही झाली पाहिजे.

श्री. अभिमन्यु भालेराव : सभागृहात दिशाभूल करून बांधकाम करणाऱ्यांना प्रोत्साहित करतात न्यायालयातून झालेल्या बांधकाम पाडू नये म्हणून स्थगिती आणण्यास सांगतात आणि त्यावर स्थगिती आदेश संबंधिताने आणल्यावर विचारणा केली असता न्यायालयाचा निकाल आहे असे सांगतात. अधिकारी हे स्वत: किती पैसे मिळाले हा उद्देश समोर ठेऊन कुठेही बांधकाम करू देऊ लागले. वॉर्डात डांबरीकरणाचे काम चालू होते. उप-अभियंता, शहर अभियंता यांना सूचना केली तसेच पावरलूम येथे एका बांधकामा बाबत मा. आयुक्त सूचना केली होती. पूर्ण बांधकाम झाले परंतु भारत भुमनगर बांधकाम का पाडण्यात आले नाही. खुलासा करावा.

श्रीमती अलका पाटील : बांधकाम चालू असतांना अधिकारी हे स. सदस्यांच्या नांवाखाली नागरिकांकडून पैसे घेतात. मा. आयुक्त यांना पैसे द्यावे लागतात. अशी बतावणी करून खरे तर त्यात स. सदस्यांचा काही संबंध नसतो अशा कर्मचारी अधिकारी यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

श्री. हमीदउद्दिन ताबा : स. सदस्य श्री. निकाळजे यांनी सांगितल्याप्रमाणे इमारत निरिक्षक यांनी ३ हजार रु. घेऊन बांधकाम करू दिले संबंधीतावर कार्यवाही करण्याबाबत आदेश द्यावेत.

प्रशासकीय अधिकारी : सखेल चौकशी करून कार्यवाही करण्यांत येईल.

सौ. नुरजहाँ बेगम : अधिकारी व कर्मचारी स. सदस्य तसेच मा. आयुक्त यांच्या नांवाखाली पैसे घेऊन स. सदस्य यांना बदनाम करतात.

श्री. जयवंत ओक : संबंधितांवर प्रशासनाने सखोल चोकशी करून निलंबनाची कार्यवाही करावी.

श्री. गौतम लांडगे : कायद्याच्या तरतुदीप्रमाणे ज्या त्या क्षेत्रात इमारत निरिक्षकांना नेमून दिलेल्या प्रभागात एक ही अनाधिकृत बांधकाम केलेले दिसून आल्यास त्या इमारत निरिक्षकास जबाबदार धरण्यांत यावे कार्यवाही झाली पाहिजे याबाबत स्थायी समितीवर चर्चा झालेली आहे. जे इमारत निरिक्षक बदलीच्या जागेवर रुजू झालेले नाहीत तयांच्यावर ही कार्यवाही करावी.

मा. महापौर : स. सदस्य यांनी सुचवल्यानुसार जो इमारत निरिक्षक दोषी असतील त्याच्यावर निलंबनाची कार्यवाही करावी तसेच ज्या विभागातील कर्माऱ्यांच्या बदल्या करून संबंधित विभागात रुजू झालेले नसतील त्यावरही प्रशासनाने

कार्यवाही करावी. व इतर स. सदस्यांच्या विचारलेल्या प्रश्नाबाबत संबंधित अधिकारी यांनी ३ दिवसात स. सदस्यांना लेखी खुलासा सादर करावा.

श्रीमती अलका : ड्रेनेजच कामाबाबत माहिती विचारलेली आहे चर्चा होणे आवश्यक आहे.

मा. महापौर : विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. १८९/१ :** दिनांक १९/१२/९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**ठराव क्र. १८९/१ :** दिनांक १९/१२/९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. १९०/२ :** औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील सर्व मिळकतीला महानगरपालिका मार्फत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदी अंतर्गत कर आकरणी करण्यांत येते. सदर कर आकारणी त्या त्या मिळकतीचे वापर / बांधकामाचा प्रकार / प्रत्यक्ष व अपेक्षित भाडे विचारात घेऊन केली जाते. केली जाते. त्या वेळी भोगवटा धारकांकडून जागेची मालकी त्या बाबतची वैद्य कागदपत्रे इ.ची मागणी करून उपलब्ध कागदपत्रा आधारे जागा मालकी पडताळून कर आकरणी करण्यांत येते.

शासन निर्णय क्र. एसओपी-२१८९/प्र.क्र.६७३/भाग-२/म-१ दि. ०२/१२/१९८९ ने निर्देश देण्यात आले आहेत की, भारतीय नोंदणी अधिनियम १९०८ च्या कलम १७ मधील तरतुदीप्रमाणे स्थावर मालमत्तेची किंमत रु. १००/- पेक्षा जास्त असल्यास अशा मालमत्तेचे हस्तांतरणासाठी दस्ताऐवजाची नोंदणी करणे आवश्यक आहे. करिता कर निर्धारण करते वेळी अथवा कर निर्धरण करून नंतर मालमत्ता हस्तांतर / नामांतर करतांना नोंदणी न केलेले दस्त हस्तांतरणाचा पुराव म्हणून ग्राह्य धरू नये व अभिलेखात जयोच ंनाव त्यांच्या नांवाने कर निर्धारण करावे.

औरंगाबाद शहरात बऱ्याचशा अनाधिकृत वसाहती/ घोषित झोपडपट्ट्या असून तेथे मालकी हक्काच्या काही तांत्रिक कारणामुळे मिळकतीचे होणाऱ्या खरेदी विक्री व्यवहाराची नोंदणी होत नाही अशा मिळकतीची कर निर्धारण करिता संबंधित भोगवटा धारक कोणतेही वैध कागदपत्र सादर न करता रु. १०/-, २०/- रु. रक्कमेच्या मुद्रांकावर केसेस व्यवहार निर्दशनास आणून देऊन तशी मागणी करतात. नुकताच सर्वसाधारण सभेने अनाधिकृत बांधकामाना कर आकरणी करण्या बाबतचा ठराव मंजूर केला आहे. तसेच अशा वस्त्यांमध्ये मिळकतीचे खरेदी विक्री व्यवहाराचे कसलयाही प्रकारे कागदपत्राची दस्ताची नोंद न करता फक्त मुद्रांक आधारे करण्यांत येतात व त्या आधारे मिळकतीचे नामांतर करावे अशी त्यांची मागणी आहे.

शास निर्देशानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास अनाधिकृत विकसित वसाहती / घोषित झोपडपट्ट्या मधील घरांना कर निर्धारण / त्योच नामांतर करणेच्या अडचणीचे होते. त्यानुसार अशा प्रकरणी कार्यवाही केल्यास अवेद्य हस्तांतरीत व्यक्तीच्या नांवे कर निर्धारण नामांतर होते ही बाबत शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे योग्य नाही.

अनाधिकृत वसाहती / घोषित झोपडपट्टी मधील घरांना कर निर्धारण / त्याचे नामांतर करणे हा महानगरपालिका उत्पन्नांचा भाग असून अशी कार्यवाही न केल्यास मिळकत धारण कर भरणा करण्यास सहकार्य करत नाही. परिणामतः मनपोच प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष नुकसान होते.

ह्या करिता प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका हद्दितील ज्या मिळकतीचे नोंदणीकृत दस्ताऐवजाने हस्तांतरण / खरेदी विक्री व्यवहार होत नाही वा काही तांत्रिक कारणाने होवू शकत नाही अशा प्रकरणी कर आकारणी किंवा केलेले कराचे हस्तांतरण हे मालकी हक्काचे हस्तांतरण नाही व त्यासाठीचा पुरांवाही नाही असे स्पष्टपणे नमूद करून मिळकतीचे मालकी हक्क बाबत काही वाद असल्यास अथवा भविष्यात वाद उद्भवल्यास त्याचे सक्षम कार्यालयाकडे निराकरण करावे त्यास मनपा जबाबदार राहणार नाही. या अटीवर कार्यवाही करणे योग्य होईल त्यासाठी सादर केलेली कागदपत्रे नोंदणी न केलेले दस्त पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यांत यावे.

करिता वरीलप्रमाणे नोंदणी न केलेले दस्त अथवा रु. १०/- चे बॉन्ड पेपरवर झालेले व्यवहार ग्राह्य धरून मुळ मालकाचे नांवे नमूद करून वहिवाटदाराचे नांवाने कर हस्तांतर कर निर्धारण करण्याचे कार्यवाही करिता नामांतर / कर हस्तांतर शुल्क रु. ५००/- प्रत्येकी घेण्यांत येईल.

प्रस्ताव मान्यतेनंतर तशी कार्यवाही करून कर निर्धारण / कराचे हस्तांतरण नामांतर करून सुलभ होऊन प्रत्यक्ष मालकी हक्काची हस्तांतरण होत नसल्याने शासन र्नियाचे ही उल्लंघन होणार नाही, त्यामुळे मनपाचे कर वसुलीस प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष मदत होवून उत्पन्नात भर पडेल. वरील प्रस्ताव मान्य झाल्यास शासनाची पूर्व संमती घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

**ठराव क्र. १९०/२ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील बऱ्याचशा अनाधिकृत वसाहती/ घोषित झोपडपट्ट्या येथील मिळकतीचे काही तांत्रिक कारणामुळे होणाऱ्या खरेदी विक्री व्यवहाराची नोंदणी होत नसल्यामुळे अशा मिळकतीच्या कर निर्धारणा करिता कर निर्धारण किंवा केलेले कराचे हस्तांतरण हे मालकी हक्काचे हस्तांतरण नाही व त्यासाठीचा पुरावा ही नाही असे स्पष्ट नमूद करून मिळकतीच्या मालकी हक्का बाबत काही वाद असल्यास अथवा भविष्यात वाद उद्भवल्यास तयाचे समक्ष कार्यालयाकडे निराकरण करावे त्याच महानगरपालिका जबाबदार रहाणार नाही. या अटीवर नोंद न केलेले दस्त अथवा रु. १०/- चे बॉन्ड पेपरवर झालेले व्यवहार ग्राह्य धरून अशा मिळकतीबाबत मुळ मालकांचे नांव नमूद करून वहिवाट दाराचे नावांने कर हस्तांरण कर निर्धारण करण्यांची कार्यवाही करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वरील नमूद केलेल्या प्रकरणांत नांमातर / कर हस्तांतरण शुल्क म्हणून प्रत्येक प्रकरणी रुपये ५००/- या प्रमाणे फी आकरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९१/३ :** सहाय्यक संचालक नगररचना प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहरातील वाढते उद्योग धंदे, शहराचे शैक्षणिक व पर्यटन विषयक महत्व, विभागीय मुख्यालय, मध्यवर्ती स्थानक इ. मुळे शहरात बाहेरून येणाऱ्या / बाहेर गांवी जाणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत नजिकच्या काळात लक्षणिक वाढ झालेली आहे, मात्र तुलनेत राज्य परिवहन मंडळाने बसेसची संख्या / सुविधांमध्ये वाढ न केल्याने व राज्य शासनाचे धोरण, खाजगी बस वाहतुकीस दिलेले परवाने इ. मुळे प्रवाशांच्या मागणी नुसार शहरात खाजगी बसेसच्या संख्येत बरीच वाढ झालेली आहे.

व्यापक संघटेचा अभाव ह्या उद्योगातील उद्योजकांना वैयक्तिक सहभाग व स्वतंत्र बस स्थानक नसल्याने तसेच ह्या उद्योगात नियोजन नसल्याने ह्या खाजगी बसेस पार्कींग बाबतच्या सुसुत्रचे अभावी ह्या बसेस त्यांच्या रिकम्या वेळेत महानगरपालिकेने

विकसित केलेल्या रस्त्यावर उभ्या राहून प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या रहदारीस अडचण निर्माण करतात. त्यामुळे लगतच्या रहिवांश्यांना त्रास होतो, अशा तक्रारी प्राप्त झाल्याने जनतेची गैरसोय दूर व्हावी व संबंधिताची पार्कींग करिता पर्यायी व्यवस्था करावी ह्या दृष्टीकोनातून (महानगरपालिकेचे उत्पन्नाचे दृष्टीने नव्हे तर रहदारीस अडथळा दूर होवून पार्कींग मध्ये सुसुत्रता यावी म्हणून) प्रती बस प्रतिदिन रु. ४०/- प्रमाणे पार्कींग शुल्क आकरण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे. या कार्यवाहीस यापुर्वी सर्वसाधारण सभेने दि. २०/०७/९६ या सभेत ठराव क्र. २३/२१ ने मान्यता दिलेली आहे.

सदर पार्कींग शुल्क वसुली करण्यासाठी बसेसच्या वेळा व त्याचे (हॉलटिंगतास) इ. विचारात घेता नियमित कर्मचाऱ्यांकडून सदर वसुली तेवढ्याशा प्रमाणात प्रभाविपणे होत नसल्याने प्रभावीपण वसुली करून खाजगी बसेसच्या पार्कींगला आळा घालून त्यांना पर्यायी व्यवस्था करण्यास बाह्य करण्याच्या दृष्टीने सदर वसुली खाजगी करणाद्वारे करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) यामध्ये शहरातील सुशिक्षित बेरोजगारांना नेमून त्यांच्या मार्फत कमिशन तत्वावर वसुली करणे.
२) सर्वेक्षण करून किमान / कमाल वाहनांची संख्या निश्चित करून कंत्राट पध्दतीने जाहिर निविदा / लिलावाधारे एजन्सी कायम करून वसुली करणे याचा समावेश आहे. वर नमूद (१) व (२) बाबत निर्णय होण्यासाठी प्रस्ताव सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर त्या पध्दतीने वसुली करावयाची आहे. त्यानुसार सर्वांगिन विचार करून प्रत्यक्ष वसुलीची कार्यवाही अंमलात आणण्यात येईल.

**संवाद** :

श्री. गौतम लांडगे : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नंबर १,२ मध्ये सुशिक्षित बेरोजगारांकडून जी मुले आहे त्यांच्याकडून ही वसुली करावी तसेच अगोदर संबध शहरातील वाहनाचा सर्व्हे करून पुढील कार्यवाही करण्यांत यावी अशी विनंती.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

सहा. संचालक नगररचना : पार्कींगचा बाबत ठराव ९६ ला मंजूर करण्यांत आलेला आहे. झोन मध्ये कर्मचारी संख्या कमी असल्यामुळे अडचण निर्माण होत असल्यामुळे सुशिक्षित बेरोजगार यांना पहिल्यांदा संधी देणार आहोत. त्या अगोदर शहरातल वाहनांचा सर्व्हे करून त्यातील कमीशन तत्वावर महानगरपालिकेला किती उत्पन्न मिळू शकेल या सर्व बाबींचा विचार करून वृत्तपत्रात अशा प्रकारची निविदा मागवून कार्यवाही करण्यांत येईल.

श्री. गौतम लांडगे : सर्व्हे केल्यानंतर झोनवाईज जे सुशिक्षित बेरोजगार मुले असतील त्यांना ह्या कामाची संधी देण्यात यावी.

श्री. हमीदोद्दिन ताबा : ९६ चा प्रस्ता आहे. इतका उशी कसा झालेला आहे. खुलासा करावा.

सहा. संचालक, नगररचना : झेनवाईन वसुलीचे काम चालू असतांना वसुली योग्य होत नसल्यामुळे हा निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्री. जावेद रज्जाक : झोन अधिकारी यांच्याकडून आपआपल्या काही लेखी स्वरुपात कळविण्यांत आलेले आहे काय? ९६ साठी प्रस्ताव मंजूर केला सभागृहात येण्यास उशीर झाल्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न बुजले. यास जबाबदार कोण?

सौ. लता दलाल : प्रस्तावास पर्याय १ व २ नुसार वसुली करणार आहे सदर वसुली कुणाच्या अधिकारात होणार आहे. याबाबत चार्ज कुणाकडे देणार आहे, वसुली कशा प्रकारे गृहित धरण्यात येणार आहे. झोन मार्फत होईल की, मालमत्ता विभागामार्फत होणार आहे.

सहा. संचालक नगररचना : झोनच्या संबंधित वसुली बाबत कार्यवाही करणार नाही. मालमत्ता विभागामार्फत कार्यवाही करण्यांत येणार आहे. त्याचे प्रमुख उप-आयुक्त (महसूल) आहेत.

श्री. हमीउद्दिन ताबा : सुशिक्षित बेरोजगारांना कोणत्या हिशोबाने कमिशन देणार याचा खुलासा करावा.

श्री. व्ही.व्ही. देशमुख : १९९६ चा प्रस्ताव सीागृहात मंजुरीसाठी आणलेला असून जवळ-जवळ २ ते ३ वर्षापासून या संदर्भात वसुली झालेली नाही शहरात कितीतरी वाढणे रस्त्यांच्या कडेला आजही दिसतात. एवढ्या उशीरा प्रस्ताव येणे व शहरातील वाहणे किती आहे. याबाबत अधिकारी यांना अद्याप माहिती नसून त्याबाबत सर्व्हे झाल्यानंतर कार्यवाही सुरू होईल असे सांगितले जाते. गेलेल्या कालावधीमध्ये कार्यवाही का करण्यांत आली नाही. यामुहे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले असून असे अपूर्ण प्रस्ताव सभागृहात यापुढे आणू नये.

**ठराव क्र. १९१/३ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खाजगी बस वाहतुकीस दिलेले परवाने इ. मुळे शहरात बाहेरून येणाऱ्या / बाहेर गाँी जाणाऱ्या खाजगी सेसच्या संख्येत बरीच वाढ झाल्यामुळे ह्या बसेस त्यांच्या रिकाम्या काळात मनपाने विकसित केलेल्या रस्त्यावर उभा राहून प्रत्यक्ष / अप्रत्यक्षरित्या रहदारीस अडथळा निर्माण करत असल्याने पार्किंगमध्ये सुसुत्रता यावी म्हणून सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३/२१ दि. २०/०७/९६ अन्वये अशा खाजगी बसेस कडून प्रतिदिन प्रति बस रु. ४०/- याप्रमाणे आकारावयाची पार्कींग शुल्क फी शहरातील सुशिक्षित बेरोजगारांना नेमून त्यांच्या मार्फत कमिशन तत्वावर वसूल करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९२/४ :** मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुकत यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका औरंगाबाद ज्या ज्या ठिकाणी व्यापार संकुलन बांधण्यांच्या प्रस्ताव / प्रयोजन ठेवते, त्यावेळी महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार दिनांक ३०/०१/९१ अन्वये मागासवर्गीयांसाठी गाळे राखून ठेवण्याचा निर्णय आहे. त्याप्रमाणे सर्वसाधारण सभा दि. २५/११/९७ अन्वये ५% जागा एस.सी., एस.टी., व्ही.जी.एन.टी. यांचेसाठी त्याच प्रमाणे अंध, अपंग मुक बधिर यांचेसाठी राखीव ठेवण्यांचा निर्णय घेण्यात आला यामध्ये मागासवर्गीयासाठी अनामत रक्कमेतून ५०% सुटही देण्यांत आलेली आहे. मात्र यामध्ये स्वातंत्र सैनिक, धरणग्रस्त यासाठी कोणतीच तरतूद वा शासनाचे मार्गदर्शन नव्हते. परंतु गाळे वाटप करण्याच्या धोरणात शासन स्तारावर कोणत्याही सूचना नाहीत, परंतु तयांना शासकीय नेमणूकीत आक्षणचा लाभ मिळतो. सर्व बाबींचा साककल्याने विचार करता मनपाच्या उत्पन्नावर परिणाम होणार म्हणजे अनामत रक्कमेत कुठलीही सुट न देता स्वातंत्र्य सैनिक, धरणग्रस्त यांचेसाठी ५% गाळे राखीव ठेवणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्रीमती अलका पाटील : प्रस्तावित व्यापार संकुलनातील गाळे महिन्यांसाठी राखीव ठेवण्यात यावे.

श्री. गजानन बारवाल : प्रस्तावामध्ये इतराप्रमाणे स्वातंत्र्य सैनिक धरणग्रस्त यांच्यासाठी राखीव ठेवावे त्याप्रमाणे महानगरपालिकेने ज्या व्यक्तीकडून कोणतीही जागा कोणत्याही कारणासाठी मिळावा यासाठी प्रशासनाने तशी कार्यवाही करण्याबाबतचे आदेश द्यावेत.

श्री. रशिद खॉन (मामू) शहरात झोपडपट्टी भागांत काही धरणग्रस्त लोक राहण्यास आलेले आहेत त्याचा व इतर मागासवर्गीयाच देखील विचार करण्यात यावा.

श्री. घडामोडे भगवान : ओ.बी.सी. साठी टक्केवारी ठेवावी.

श्री. गौतम खरात : शासनाच्या नियमाप्रमाणे राखीव टक्केवारी ठेवण्यात यावी.

मा. महापौर : सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत येऊन दुरुस्ती करून पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात यावा. त्यात महिला आरक्षणाबाबत ही विचार व्हावा.

**ठराव क्र. १९२/४ :** सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्ताव दुरुस्तीसह पुढील सभेत ठेवण्यांत यावा.

**विषय क्र. १९३/५ :** उप-आयुक्त (म) यांनी प्रस्ताव सादर केला की, सध्या प्राणी संग्रहालयात वेगवेगळे प्राण्यांचे आगमन झाल्यामुळे वार्षिक खर्चात वाढ झाली आहे. सध्याचे प्रवेश फी द्वारे उत्पन्न कमी असल्यामुळे प्रवेश फी मध्ये वाढ करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव विचारार्थ सादर.

| तिकिटाचे दर | मुलांसाठी<br>(३ते१२ वर्ष) | प्रौंढासाठी |
|---|---|---|
| सध्याचे दर | रु.१=०० | रु.२=०० |
| प्रस्तावित दर | रु.२=०० | रु.५=०० |

**संवाद :**

श्रीमती अलमा पाटील : प्रस्तावात प्राणी संग्रहालयात प्रवेश लहान मुलांसाठी १=०० रु. ऐवजी २=०० रु. करण्यांत आलेले असून प्रौंढसाठी २=०० रु. ऐवजी ५=०० रु.करण्यांत आलेले असून माझे मते प्रौढांसाठी असावे तसेच लहान मुलांसाठी रु. १=०० ठेवण्यात यावा.

श्री. गजानन बारवाल : प्राणी संग्रहालयावर सध्या जास्तीचा खर्च होत असून उत्पन्नाचे भर पडणे आवश्यक आहे. करिता प्रस्ताव मंजुर करावा.

श्रीमती आबेदा बेगम :प्राणी संग्राहलयातील प्राण्यांना पाहण्यासाठी येणा४यांना आणखी एक तासाचा प्रवेशासाठी अवधी वाढवून देण्यांत यावा.

मा. महापौर : प्राणी संग्रहालयात प्राण्यांना पाहण्यासाठी येणाऱ्यांना आणखी एक तासाचा प्रवेशासाठी अवधी वाढवून देण्यांत येऊन प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

श्री. काशिनाथ कोकाटे : सिध्दार्थ उद्यानातील प्राणी कशामुळे मृत्यूमुखी पडले याबाबत माहिती द्यावी.

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर केला असून त्या विषयावर चर्चा करून नये स. सदस्‍ श्री. कोकाटे यांना वाघाच्या मृत्यूबाबत संबंधित अधिकारी यांनी ३ दिवसांच्या आत माहिती द्यावी.

**ठराव क्र. १९३/५ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्राणी संग्रहालयात वेगवेगळ्या प्रांण्याचे आगमन झाल्यामुळे वार्षिक खर्चात झालेली वाढ लक्षात घेता प्राणी संग्रहालय प्रवेश फी खालील प्रमाणे वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | |
|---|---|
| मुलां-मुलींसाठी | प्रस्तावित दर |
| (३ ते १२ वर्ष) | रु. २=०० |
| प्रौढांसाठी | रु. ५=०० |

तसेच प्राणी संग्राहलय खुले ठेवण्याची वेळ एक तासांनील वाढविण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९४/६ :**

दिनांक १७/१०/९८ च्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र. १२१/अ-७ अन्वये स्थगित ठेवलेला प्रस्ताव पुन:विचार्थ प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, राष्ट्रीय गलिच्छ सुधारणा कार्यक्रमाची अंमलबजववणी महानगरपालिका हद्दित सुरू करण्यासाठी शासनाच्या दि. ०५/०६/९८ च्या शासन निर्णयान्वये सूचना दिलेल्या आहेत. या कार्यक्रमा अंतर्गत पहिल्या टप्प्याचा अंमलबजववणी संबंधित महानगरपालिकांनी तात्काळ सुरू करावयाची असून दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्याच्या अंमलबजववणी बाबत शासनाकडून स्वंतत्ररित्या कळविण्यांत येणार असल्याने दिनांक १६/०७/९८ च्या शासना पत्रान्वये स्पष्ट करण्यांत आले आहे. कार्यक्रम अंमलबजावणीसाठी खालील प्रमाणे सूचना दिल्या आहेत.

१) कार्यक्रमा अंतर्गत कामाचे प्रस्ताव शेजार समित्या / समाज विकास संघटना मार्फत तयार करून आराखड्यासह प्रशासकीय मंजुरीसाठी जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडे सादर करावेत.

२) या कार्यक्रमासाठी सन ९८-९९ वित्तिय वर्षा करिता लागणाऱ्या निधीचा मागणी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा नागरी विकास यंत्रणेकडे सादर करण्यात यावेत. ही मागणी सादर करतांना या योजने अंतर्गत अर्थ सहाय्याच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित महानगरपालिकांनी सादर करावयाची आहे.

३) ज्या महानगरपालिका क्षेत्रात सद्या झोपडपट्टी सुधारणा कायदा लागू आहे व ज्यांचा पहिल्या टप्प्यातील ५० शहरात समावेश नाहीत अशा मनपा क्षेत्रात "सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना" अंतर्गत शे्जार समित्या समाज विकास संघटना अशी समाज सरचना निर्माण झाल्या बरोबर ही योजना लागू करण्याबाबतचे प्रस्ताव तात्काळ शासनास सादर करावेत. जेणे करून ही योजना संबंधित महानगरपालिका क्षेत्रात तात्काळ सुरू करता येईल.

४) या योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचा अंमलबजावणी संबंधित महानगरपालिका महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा) कायदा १९७१ ही आपल्या महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू करण्याबाबतचे प्रस्ताव तात्काळ शासनास सादर करावेत. प्रस्ताव सादर करतांना संबंधित महानगरपालिका क्षेत्रात दि. ०१/०१/९५

पूर्वीच्या वसलेल्या व ज्यांची नांवे १९९५ च्या मतदार यादीत समाविष्ठ आहेत अशा सर्व झोपडपट्ट्यांची संख्या झोपडपट्टी क्षेत्राचे नांव, कोणत्या जागेवर वसलेल्या आहेत त्याचा तपशिल व त्यातील लोकासंख्या इ. तपशिल देऊन आपल्या अभिप्रायासह सविस्तर प्रस्ताव सादर करावेत.

५) झोपडपट्टी क्षेत्र नसल्यास तसे स्पष्ट कळविण्यात यावेत.

६) ज्या महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रात सद्या महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा कायदा १९७१ लागू आहे तसेच हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. अशा सर्व महानगरपालिका / नगरपालिका क्षेत्रातील दि. ०१/०१/९५ पूर्वी वसलेल्या व सन १९९५ च्या मतदार यादीत नांवे असलेल्या झोपडपट्टी वासीयांना या योजने अंतर्गत सुविधा लाभ द्यावयाच्या असल्यामुळे वरील मुद्या क्र. ४ नमूद केल्याप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यांत यावेत.

७) या योजनेच्या तिसऱ्या टप्प्याला अंमलबजावणी मध्ये नागरी गरीबासाठी आवश्यकते प्रमाणे नवीन घर बांधणी व निवारा सुधारच्या घटकांचा समावेश असून या बाबतचे योजना शासन स्तरावर ठरविण्यात यावयाचा आहे. त्यासाठी महानगरपालिके कडून काही मार्गदर्शक सूचना / प्रस्ताव अडचणी शासनास स्वंतत्ररित्या कळविण्यांत याव्यात असे शासनास अभिप्रेत आहे. सदरील सूचना किंवा अभिप्राय योजना ठरवितांना विचारात घेता येईल. शासनाच्या सूचना विचारात घेऊन सदरील योजना राबविण्याबाबत कार्यवाही करावी. असे शासनाचे आदेश आहेत.

ज्या झोपडपट्टी वासीयांना या योजनेचा लाभ घ्यावयाचा असले त्याचेसाठी सदर योजना लागू करण्यांत यावा. अर्थ साह्याच्या अटी व नियम यापूर्वी वितरीत करण्यांत आले आहेत. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. महापौर : मंजुरी देण्यांत येते.

**ठराव क्र. १९४/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि.०५/०६/९८ च्या शासन निर्णयाप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दित राष्ट्रीय गलिच्छ वस्ती सुधारणा काय्रक्रमाच्या अंमलबजावणीतील प्रस्तावित अ.क्र.१ ते ६ नुसार पहिला टप्पा अंमलबजावणी करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९५/७ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरीने प्रस्ताव सादर केला की, बन्सीलाल नगर येथील प्रभागात महानगरपालिकेच्या वतीने भव्य सांस्कृतिक सभागृह व वाचनालय बांधण्यात आले आहे. सदर सभागृह व वाचनालय बांधण्यांस जागा स्व. श्री रामकिशनजी गंबलालजी बारवाल यांच्या सहकार्याने मिळाली आहे. त्यांची समाजसेवा कारणी लागावी यासाठी सदर सभागृह व वाचनालयास स्व. रामकिशनजी बारवाल यांचे नांव देणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. १९५/६७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर येथील महानगरपालिका सांस्कृतिक सभागृह व वाचनालयास स्व. रामकिशनजी बारवाल यांचे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र. १९६/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वसाधारण सभा दिनांक १९/०९/९८ रोजी ठराव क्रमांक ९४ अन्वये चिकलठाणा येथील पुरामुळे वाहून गेलेल्या लोकांना आर्थिक मदत देण्याचा ठराव मंजूर झालेला आहे. त्यात मृतांची नावे सदोष लिहिलेली आहे. ती खालील प्रमाणे दुरुस्त करण्यांत यावी.

१. समिनाबी उर्फ गोराबी आयुब पठाण
२. तहीमिना आयुब पठाण
३. नाशिमाबी अब्दुल पठाण.

सुचक - श्री. कचरू चंद्रभान नवपुते.
अनुमोदक - श्री. नरसिंग ढगे
दिनांक - ०८/०१/९९

**ठराव क्र. १९६/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभा ठराव क्र. ९४ दिनांक १९/०९/९८ अन्वये चिकलठाणा येथील पुरामुळे वाहून गेलेल्या मृतांच्या सदोष नावांत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. समिनाबी उर्फ गोराबी आयुब पठाण
२. तहीमिना आयुब पठाण
३. नाशिमाबी अब्दुल पठाण.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९७/२ :**

१ जवाहर कॉलनी येथील महानगरपालिका उद्यानास "श्री. संत शिरोमनी सावता महाराज उद्यान" हे नांव देण्यात यावे.
२ शास्त्रीनगर येथील महानगरपालिका उद्यानास "लाल बहादुर शास्त्री उद्यान" हे नांव देण्यात यावे.

सुचक - सौ. राधाबाई तळेकर
अनुमोदक - सौ. निर्मला कांबळे
दिनांक - १२/०१/१९९९

**ठराव क्र. १९७/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे (१) जवाहर कॉलनी येथील महानगरपालिका उद्यानास "श्री. संत शिरोमनी सावता महाराज उद्यान" आणि (२) शास्त्रीनगर येथील महानगरपालिका उद्यानास "लाल बहादुर शास्त्री उद्यान" हे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९८/३ :**

औरंगाबाद महानगरपालिका अस्थापनेवर विविध विभागात कार्यरत असलेल्या काही कर्मचाऱ्यांच्या पत्नी अथवा पती बाहेरगांवी शिक्षिका तथा अन्य पदावर कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांनी शासनाचे पति पत्नी एकत्रिकरण धोरणा आधारे त्यांची सेवा महानगरपालिकेकडे वर्ग करणे बाबत मागणी केलेली आहे. राज्य शासनाने वेळोवेळी खालील नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार निर्णय घेतलेले आहेत.

१) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एस.आर.व्ही-१०७२-डी, दि. १५/०७/७२
२) शासन निर्णय क्र. एस.आर.व्ही.-१०७२-डी. दि. ३०/११/७२
३) शासन निर्णय क्र. एस.आर.व्ही-१०७४-डी. दि. २१ सप्टेंबर १९७४
४) शासन परिपत्रक क्र. एस.आर.व्ही-१०८७/सीआर-४९/१६-अ, दि.१४ मार्च १९८८.
५) शासन निर्णय क्र. एस.आर.व्ही-१०७४-डी. दि. ०४/०३/१९९७

महाराष्ट्र शासनाचे वर नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार पती-पत्नी एकत्रिकरण धोरणास तत्वतः मान्यता दिलेली असून शासन निर्णयास अधिक राहून महानगरपालिका अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या पत्नी अथवा पती यांची सेवा अन्य खात्यामधून महानगरपालिकेत वर्ग करून घेणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. अविनाश कुमावत
श्री. प्रदिपकुमार जैस्वाल
अनुमोदक - श्री. अफसरखॉन.
श्री. प्रफुल्ल मालानी.

**ठराव क्र. १९८/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ.क्र. १ ते ४ च्या शासन निर्णयानुसार महानगरपालिका अस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या पत्नी अथवा पती यांची सेवा अन्य खात्यामधून महानगरपालिका वर्ग करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९९/४ :**

शहरामधील जालना रोड वरील मोंढा नाका चोका व प्रमुख चौक असून या चौका लगत रोहीदासपुरा, ढोरपुरा या वसाहती आहेत. या वसाहती मधील रहिवाशांनी मोंढा नाका चौकास "संत रोहिदास महाराज चौक" असे नांव देणे व या चौकामध्ये मुख्य जागी "संत शिरोमणी राहिदास महाराज" यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत मागणी केलेली आहे.

मोंढा नाका चौका लगत राहणाऱ्या रहिवाशांची मागणीचा आदर राखून मोंढा नाका चौकास "संत रोहिदास महाराज चौक असे नांव देणे व या चौकात" "संत शिरोमणी

रोहिदास महाराज" यांचा पुर्णाकृती पुतळा महानगरपालिके मार्फत उभारणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. बन्सिलाल गांगवे |
| | | श्री. अविनाश कुमावत |
| | | श्री. त्र्यंबक तुपे |
| | | श्री. महादेव सुर्यवंशी |
| अनुमोदक | - | श्री. भगवान घडामोडे |
| | | श्री. अफसर खॉन |
| | | सौ. यशोदा वाडेकर |
| | | श्री. संजय जोशी |

**ठराव क्र. १९९/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोहिदासपुरा, ढोरपुरा भागातील नागरिकांच्या मागणीनुसार मोंढा नाका चौक ऐवजी या चौकाचे पश्चिमेस जालना रोडवरील रोकडीया हनुमान कॉलनी जक्शन (मिंगलिग हॉटेलसमोर अभिनय टॉकीज कडे जाणाऱ्या जक्शनवर) येथे "संत रोहिदास महाराजा पुर्णाकृती पुतळा" उभारण्यास आणि या जक्शनला "संता रोहिदास महाराज चौक" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २००/१ :**

सहाय्यक संचालक नगररचना यांचे कडून प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील महानगरपालिकेच्या जमिनी ज्या मोक्याच्या जागी असून वाणिज्य वापराच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत, त्या जमिनी त्या त्या भागातील विकास, जनतेची मागणी विचारात घेऊन महानगरपालिकेचे नियमित उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी विकसित करण्याचे महानगरपालिकेने ठरविले आहे.

महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती व अशा जमिन विकसित करावयाचे प्रकल्पाकरिता करावी लागणारी प्रारंभी करावी लागणारी गुंतवणूक याचा विचार करता सध्या महानगरपालिकेस असे प्रकल्प महानगरपालिका निधीतून राबविणे शक्य नाही. करिता अशा जमिनी खाजगी करणाचे माध्यमातून विकसित करण्याचे प्रस्तावित करण्यांत येत आहे. व ह्यातंर्गत मो. पैठणगेट येथील सादीया सिनेमा गृहानजीकचे वाहन तळाचा दुकान केंद्र तथा पार्कींग अशा एकत्रित वापरासाठी खाजगी करणाचे माध्यमातून विकास करण्याचे प्रस्तावित करण्यांत येत आहे. यामध्ये (स्ट्रिलट फ्लार) देऊन पार्कींग सुविधा उपलब्ध करून देऊन त्यावर वाणिज्य वापरासाठी बांधकाम करण्याचा समावेश आहे.

प्रस्ताव मान्यतेनंतर व्यापक प्रसिध्दी देऊन या प्रकल्पाकरिता निविदा ऑफर मागविण्यात येतील व प्राप्त निविदा (ऑफर) चा सर्वांगिण विचार करून महानगरपालिकेच्या दृष्टीने अधिक फायद्याचे (ऑफर) ला अंतिम करून प्रकल्प कार्यान्वित करण्यांचा निर्णय घेण्यात येईल.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री. स अली मिरा सलामी : महानगरपालिकेच्या जागेवर खाजगीकरणाच्या माध्यमातून विकसित करणे योगय वाटप नाही. मोक्याच्या जागा आहेत. अशा योजना स्वतः महानगरपालिकेने राबवाव्यात. खाली वाहनतळ (पार्कींग) पहिल्या मजल्यावर दुकान केंद्र यासाठी आगाऊ (ॲडव्हान्स) रक्कम देखिल मिळू शकेल. १-२ जागांचा विचार करण्या ऐजवी संपूर्ण जागांचा विचार व्हावा. स. नगरसेवकांना तया संबंधी माहिती द्यावी.

श्री. जयवंत ओक : याबाबत प्रशासनाकडून खुलासा मागवावा.

सहा. संचालक नगररचना : महानगरपालिकेच्या १९९७ च्या बजेट मध्ये ठेवण्यात आलेले आहे. खाजगीकरणाच्या माध्यमातून ज्या जागा मोक्याच्या ठिकाणी आहे त्या विकसित केल्यास त्या ठिकाणी शॉपिंग सेंटर काढल्यास भाडेतत्वावर त्याचा म.न.पा. ला फायदेशीर असून खाजगीकरणाच्या माध्यमातील ही योजना राबवावयाची की नाही याबाबत निर्णय घ्यावा. करिता हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवलेला आहे.

श्री. अफसर खॉन : महानरपालिकेला सदर जागेवर अशा योजना विकसित करणे शक्य नाही काय?

श्री. प्रदिपकुमार जैस्वाल : महानगरपालिकेने आताच ५ व्या वेतन आयोग लागू केलेला असून , त्याच प्रमाण्ो प्रत्येक नगरसेवकांच्या वॉर्डात सातत्याने विकास कामे करण्यासाठी लागणारा पैसा खर्च होणार आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या योजना राबविण्यासारखी परिस्थिती महानगरपालिकेची होणार नाही. याचा विचार करावा.

श्री. रशिदखॉन (मामू) पैठणगेट नाल्यावर विवेकानंद कॉलेज इ. सर्व जागा विकसित करण्यासाठी एकत्र प्रस्ताव घेऊन टेंडर काढावे ज्यांना विकसित करण्यासाठी एकत्र प्रस्ताव घेऊन टेंडर काढावे ज्यांना विकसित करण्यासाठी द्यावयाचे आहे. त्यांच्याकडून ॲडव्हान्स रक्कम वसूल करावी.

श्री. जयवंत ओक : शहरातील ज्या ज्या ठिकाणी अशा जागा आहेत विकसित करण्या संदर्भात तसे प्रसताव मंजुरीसाठी आणावे व त्यास कसा प्रतिसाद मिळतो ते पाहावे.

श्री. अविनाश कुमावत : हा प्रस्ताव स्थगित इेवावे असे सर्व प्रस्ताव एकत्रितरित्या आणावे.

श्री. गौतम खरात : महानगरपालिकेला फायदा होईल अशाच प्रकारचे प्रस्ताव सभागृहात मंजुरीसाठी आणावे. त्यावर निर्णय घ्यावा .

मा. महापौर : विषय क्र. १,२, दुरुस्त करून पुढील बैठकीत ठेवण्यात यावा. तसेच विषय क्र. ३ मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. २००/१ :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तुत प्रस्ताव दुरुस्तीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**विषय क्र. २०१/२ :**

सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील महापालिकेच्या मालकीच्या जमिनी ज्या स्थापनपरत्वे मोक्याच्या जागी असून वाणिज्य वापराच्या दृष्टीने महत्वाच्या आहे. ज्या जमिनी

यालगतच्या भागातील विकास व जनतेची मागणी यांचा विचार करून महानगरपालिकेच्या नियोजित उत्पन्नाचे साधन वाढविण्यासाठी महापालिकेने वाणिज्य वापरासाठी विकसित करण्याचे ठरविलेले आहे.

महापालिकेची सध्याची आर्थिक स्थिती व अशा जमिनी विकसित करण्यासाठी प्रारंभीकरणची लागणारी गुंतवणूक याचा विचार करता सध्या मनपास असे प्रकल्प मनपा निधीतून राबविणे शक्य नाही. करिता अशा जमिनी खाजगी करण्याचे माध्यमातून विकसित करण्याचे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

खाजगीकरणाचे माध्यमातून महानगरपालिका मालकीच्या जमिनी विकसित करण्यासाठी ह्या धोरणास ससर्वसाधारण सभेने तत्वत: मान्यता दिल्यास याबाबत स्थानिक व राज्यस्तरीय प्रमुख वर्तमानपत्रातून व्यापक प्रसिध्दी देऊन विकासाच्या निविदा (ऑफर) मागविण्यात येतील व प्राप्त निविदा / (ऑफर) चा सर्वांगिण विचार करून अशा जमिनी विकासाच्या प्रकल्पाची मार्गदर्शक तत्व ठरवून प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी अंतिम निर्णय घेण्यात येईल.

महानगरपालिकेच्या मालकीच्या जमिनीपैकी मो. रेल्वेस्टेशन भागातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, विभाग क्र. ६ चे कार्यालय असलेल्या भूखंड प्रथमतः विचारात घेण्यांत आलेला असून त्या भूखंडाचे विकासासाठी ऑफर मागविण्यांत येत आहे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. महापौर : सदरचा प्रस्ताव दुरुस्तीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**ठराव क्र. २०१/२ :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तुत प्रस्ताव दुरुस्तीसह पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**विषय क्र. २०२/३ :**

सहाय्यक संचाकल नगररचना यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराच्या मंजूर विकास योजने नुसार आरक्षण क्र. १५२ ते १५८ खुली जागा, वाचनालय, आरोग्य केंद्र व प्राथमिक शाळा यासाठी आरक्षित आहे व प्रारुप विकास योजना नुसार त्यांचा आरक्षण क्र.२६६ ते २७२ ह्या आरक्षणा खाली असलेल्या सर्वे क्र. ६१/१, ६१/२, ५९, ६५/२ आणि ६४/२ गारखेडा व श्री. रविंद्र चंपालाल खिंवसरा यांनी वरील आरक्षणासाठी महानगरपालिकेस दि. २६/०७/९३ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिली त्या अन्वये कार्यवाही होवून आरक्षण क्र. १५२ व आरक्षण क्र. १५२ सोडून इतर सर्व आरक्षणाचे निवाडे जाहिर झाले आहेत. आरक्षण क्र. १५२ ची भुसंपादन कार्यवाही चालू असून न्यायालयाचे आदेशान्वये ती सहा महिण्यात पूर्ण होईल, आरक्षण क्र. १५३ ची भूसंपादन संस्था जिल्हा परिक्षद औरंगाबाद आहे.

वरील आरक्षणाची कार्यवाही होऊन अ.क्र.१५४ ते १५८ यांचे निवाडे दि. २९/०७/९७ ते २७/०४/९८ चे दरम्यान जाहिर झाले आहेत. त्यानुसार ह्या आरक्षणा खालील क्षेत्र ४८८०० चौ. मी. एवढे आहे व निवाडा रक्क रु. १,९९,६०,३२१/- एवढी आहे. ह्या निवाड्या बाबत मिळकत धारकाने न्यायालयात भसंपादन कायदा कलम १८ खाली वाढीव मावेजा सुमारे ३.०० कोटीसाठी [Entrancement] दावे केले आहेत तसचे आरक्षेण क्र.

१५२ खेत्र ६२९५.०० चौ.मी. चा निवाड्याची रक्कम सुमारे रु. ७०.०० लक्ष द्यावे लागणारआहेत व मिळकत धारकाचे जमिनी वरून जाणाऱ्या विकास याजना रस्त्याचा मोबदला सुमारे २.०० कोटी एवढा होईल. असे एकूण रु. ७.६९ कोटी रुपये खर्च महानगरपालिकेस मिळकत धारकास द्यावे लागणार आहेत. वरील निवाडा रक्कम रु. १,९९,६०,३२१/- त्वरित मिळावी म्हणून मिळकत धारकाने न्यायालयात दावे दाखल केले आहेत.

तरी मोबदल्याचे बदल्यात मिळकत धारकाने

१) सदर आरक्षणे वगळणे,
२) रस्त्याचा
३) रस्त्याचा मोबदला
४) काही अंशी रकमेच्या स्वरुपात मोबदला देणे असा प्रस्ताव मांडला होता त्यास पुढीलप्रमाणे मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१] आरक्षण क्र. १५२,१५४ ते १५८ एकुण क्षेत्र ५५३९.०० चौ.मी. ३०% क्षेत्र म्हणजेच १६६१.५० चौ. मी. क्षेत्र मिळकत धारकांनी महानगरपालिकेस विना मोबदला द्यावे उर्वरित ७०% जागा मिळकत धारकास आरक्षणातून वगळून देण्यात येईल त्याचा वापर त्यांनी निवास व व्यावसाय जो नियमानुसार देय असेल तो वापर करणेस ह्या प्रस्तावात मान्यता खालील अटीवर देण्यात येते.

१. वरील आरक्षण वगळणेसाठी (३०%-७०%) प्रस्तावित जमिन महाराष्ट्र प्रादेशिक जमीन महाराष्ट्र प्रोदशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये वगळून शासन मान्यता प्राप्त झाल्यावरच मिळकत धारकास विकास परवानगी देण्यात येईल.
२. वरील ३०% क्षेत्र १६,६१८.५० चौ. मी. मिळकत धारकाने महानगरपालिकेस एक ठिकाणी नकाशात दाखविल्यानुसार (A B C D E F G H I A) घ्यावे लागेल. तुड्यामध्ये नाही. हे विमा मोबदला व नोंदणी कृत हस्तांतर (Relinquishment) महानगरपालिकेस द्यावे लागेल.
३. ह्या सर्व जमिन वरील (आरक्षणा खालील) असलेली झाडे (Tree Authority) ची परवानगी घेवून स्वखर्चाने तोडून न्याची लागतील.
४. वरील प्रस्ताव शासनाने अमान्य केल्यास महानगरपालिका मिळकत धारकास नियमानुसार निवाडा रक्कम देईल.

अशा प्रकारच्या प्रस्तावास मा. सर्वसधारण सभेने दि. ३१/०७/९७ ठराव क्र. ३२/९२ व दि. ०६/११/९३ ठराव क्र. १८१ नुसार मान्यता दिली आहे.

करिता वरील प्रस्तावित अर्जदाराची जमिन आरक्षणातून ७०% वगळणे तसेच सर्वच आरक्षणाचा वापर एके ठिकाणी ३०% जागेत करणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाहीचे मान्यतेस्तव वरील अटीसह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यांत येतो.

२] मिळकत धारकाने मंजूर रेखांकन उल्कानगरी (क्र १९००/८७ दि. २४/०६/८७ सुधारित) मधील विकास योजना रस्त्याच्या मोबदला चटई निर्देशांकाच्या स्वरुपात मागितले आहे. त्यास पुढील प्रमाणे मान्यतेबाबत प्रस्ताव सदर करण्यांत येत आहे.

१. एकूण क्षेत्र १६,०६७,.०० चौ. मी. पैकी ७५% क्षेत्र १२.०५० चौ. मी. क्षेत्र एवढा चटई निर्देशांक देय होईल तसेच ही सर्व रस्त्या खालील जमिन नोंदणीकृत हस्तांतर करून स्वखर्चाने महानगरपालिकेस द्यावी लागेल अशा प्रकारे चटई निर्देशांक पूर्वी १९८७ मध्ये ह्याच रेखांकनाच्या काही रस्त्याचा देण्यात आलेल्या आहे. करिता मान्यतेस्तव सादर.

२. मिळकत धारकाने मंजूर रेखांकना व्यतिरिक्त असलेल्या रस्त्याचा मोबदला रक्कमेच्या स्वरुपात मागितले आहे. ह्या रस्त्याचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.

१. असे विकास योजना रस्ते की, जे रेखांकनातील विकास योजना रस्ते नाहीत परंतु महानगरपालिकेने विकास केला आहे.

२. असे विकास योजना रस्ते की, ज्यांची भूसंपादनाची कार्यवाही चालू असून जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नाहीत.

३. असे विकास योजना रस्ते की, जयांची जागा रेखाकनात विकास योजना रस्ते म्हणून घेतलेली नाहीत व त्यांचे भूसंपादन ही सुरू करणे आहे.

४. ह्या सर्व प्रकारच्या रस्तयाचे खालील जमिनीचे एकूण क्षेत्र १५६६७.२५ चौ. मी. एवढे आहे. त्याचा दर १९९८ चे शिघ्र सिध्द गणला नुसार घेवून मोबदला रुपये ८७,६२,१७६/- एवढा होतो, सदर रकमेतून वरील ७०% सुट दिलेल्या अथवा संबंधित मिळकत धारकाच्या इतर जमिनीमध्ये विकास परवानगीसाठी लागणारा विकास खर्च जमिन विकास खर्च ह्या रकमेतून वळता करून घेण्यात येवून उर्वरित जागेचा ताब्याचा करारनामा करून रक्कम मिळकत धारकास अदा करण्यात येईल. वरील वगळलेला जमिनीस व रस्त्याचा चटई निर्देशांक (F.S.I.) दिलेल्या एकूण क्षेत्रास लागणारा विकास खर्च रक्कम रुपये २३,३८,०१८/- व जमिन विकास खर्चाची रक्कम रु. ८,२२,६६०/- रु. ३१,६०,६७९/- वगते करून उर्वरित रक्कम रु. ५६,०१४,९७/- मार्च २००० पर्यंत तिन समान हफ्त्यात देण्यात येईल करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

वरील (१) (२) (३) हे तिन्ही प्रस्तावास मान्यता मिळाल्यास महानगरपालिकास द्यावे लागणारे निवाडा रक्कम, वाढीव मावेजा इ. असे ६-७ कोटी रुपये खर्च करावे लागणार नाहीत. ह्या जागेचा विकास करणेस येणारा खर्च ही कमी करावा लागेल.

मिळकतधारकास मोबदला रक्कम रुपये ८७,६२,१७६/- पैकी प्रत्यक्ष रक्कम रु. ५६,०१,४९७/- अदा करून आरक्षणाचे साठी क्षेत्र १६,६१८,५० चौ. मी. व रस्त्या खालील क्षेत्र ३१,७३४.२५ चौ.मी. जागा महानगरपालिकास मिळेल. ह्या भगाचा विकास होवून महानगरपालिकाच्या उत्पन्नात भर पडेल करिता वरील तिन्ही प्रस्ताव मान्यतेस सादर व प्रस्ताव मान्यते नंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव शासनास सादर करणेत येईल.

महाराष्ट्र व प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अनवये करावयाच्या पुढील कार्यवाही अंतर्गत शासनाची अंतिम मंजुरी घेण्याकरिता ठरवून दिलेला कार्य पध्दतीस अनुसरून प्रस्तावित फेरबदलास अंतिम स्वरुप देण्यासाठी जनतेकडून सूचना / हरकती मागविण्याचे व सूचना हरकतीचा विचार करून फरे बदलाचे स्वरुपास अंतिम स्वरुप देवून प्रस्ताव शासनाचे मंजुरी करिता राज्य शासनाकडडे पाठविण्यासाठी आवश्यक ती पत्र व्यवहार

करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात यावे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव क्र. २०२/३ :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार अ.क्र. १,२, व ३ मुद्यांना खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१. औरंगाबाद शहराचे मंजूर विकास योजने नुसार आरक्षण क्रमांक १५२,१५४ ते १५८ खुली जागा वाचनालय, आरोग्य केंद्र, दुकाने केंद्र व प्राथमिक शाळा ह्यासाठी आरक्षित आहे व प्रारुप विका याजनेनुसार त्यांचा आरक्षण क्र. २६६,२६८ ते २७२ आहे. ह्या आरक्षणा खालील श्री. चंपालाल कन्हैयालाल खिंवसरा व श्री. रविद्र चंपालाल खिवसरा यांच्या असलेल्या सर्वे क्र. ६१/१, ६१/२ ,५९, ६५/२ आणि ६४/२ मो. गारखेडा जमिनी पैकी ७०% जमिन आरक्षणातून वगळून ती. जमिन रहिवास विभागात अंतर्भुत करून वगळलेल्या आरक्षणाचा वापर एक ठिकाणी उर्वरित ३०% जमिनीत करणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम खालील अटीवर सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अ] वरील आरक्षणा वगळणेसाठी (३०%-७०%) प्रस्तावित जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये वगळून शासन मान्यता प्राप्त झाल्यावरच मिळकत धारकास विकास परवानगी देण्यात येईल.

ब] वरील ३०% क्षेत्र १६६१८.५० चौ. मी. मिळकत धारकाने महानगरपालिकेस एके ठिकाणी नकाशात दाखविल्या नुसार (अे,बी,सी,डी,ई,एफ,जी, आय,अे) द्यावे लागले तुकड्यामधे् नाही. हे विना मोबदला नोंदणीकृत दस्तऐवजाने हस्तांतर (Relinquishment deed) करून महानगरपालिकेस द्यावे लागेल.

क] ह्या सर्व जमिनी वरील (आरक्षणा खालील) असलेली झाडे (Tree Authority) ची परवानगी घेऊन स्वखर्चाने तोडून न्यावी लागेल.

ख] वरील प्रस्ताव शासनाने अमान्य केल्यास महानगरपालिका मिळकत धारकास नियमानुसार निवाडा रक्कम देईल.

२. प्रस्तावात दर्शविल्यानुसार मंजूर रेखांकन उल्कानगरी (क्र.१९००/८७ दि. २४/६/८७ सुधारित) मधील विकास योजना रस्त्याचा चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I.) प्रस्तावित क्षेत्र १६०६७.०० चौ. मी. ७५% म्हणजे १२०५०.०० चौ. मी. एवढ्या वरील जमिनीवर वापरणेचा सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३. प्रस्तावात दर्शविल्यानुसार वरील जमिनीतील मंजूर रेखांकना व्यतिरिक्त असलेल्या विकास योजना रस्त्याचा मोबदला रक्कम रु. ८७,६२,१८७/- देणेस प्रस्तावात दर्शविल्यानुसार वरील ७०% सुट दिलेल्या जमिनीसाठी व रस्त्याचा चटई क्षेत्र निर्देशांक दिलेल्या जमिनीसाठी विकास खर्च व जमिन विकास खर्चाची रक्कम अनुक्रमे रु. २३,३८,०१९/- व रु. ८,२२,६६०/- असे एकूण रक्कम रु. ३१,६०,६७९/- वळते करून घेऊन उर्वरित रक्कम रु. ५६,०१,४९७/- मिळकत धारकास मार्च २००० पर्यंत विना व्याज तीन समान हप्त्यात देण्यास व जागेचा ताबा करारनामा करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच वरील अ.क्र. १ मधील महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाची पुढील कार्यवाही अंतर्गत शासनाची अंतिम

मंजुरी घेण्याकरिता ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीस अनुसरून प्रस्तावित फेरबदलास अंतिम स्वरुप देण्यासाठी जनतेकडून सूचना / हरकत मागविण्याचे व सूचना / हरकतींचा विचार करू फेरबदलाचे स्वरुपास अंतिम स्वरुप देऊन प्रस्ताव शासनाचे मंजुरी करिता राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी आवश्यक ते पत्र व्यवहार करण्योच सर्व अधिकार मा. आयुक्तांना देण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०३/४ :**

सहाय्यक संचालक नगर रचना यांचे कडून प्रस्ताव सादर करण्यात येते की, औरंगाबाद शहराचे मंजूर विकास योजना नुसार आरक्षण क्र. २०५ माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान करिता आरक्षित असलेली मो. जसवंतपुरा स. नं. १० पै. ची जमिन औरंगाबाद महानगरपालिकेने १९८५ साली खाजगी वाटाघाटीने संपादित केलेली आहे. खाजगी वाटाघाटीने संपादित ह्या जमिनीचे क्षेत्र २ हेक्टर ३५ आर एवढे असून त्यावेळी त्या क्षेत्राकरिता संबंधितास देय मोबदला रक्कम देण्यात आली.

नंतर ह्या संपादित जमिनीचा रितसर विकास करण्याची कार्यवाही महापालिकेने प्रस्तावित करून जमिनीस तार कुंपन घालण्याचे काम सुरू केले असता संबंधिताने जमिनीच्या क्षेत्र एककाचे संदिग्धता संबंधाने वाद निर्माण करून प्रकरण न्यायप्रविष्ठ करून न्यायालया मार्फत महापालिकेस प्रत्यक्ष जागेवर तार कुंपन घालण्यास /विकास कामे करण्यास मनाई केली होती. व तुर्त ह्या प्रकरणी विकास कामे थांबलेले असल्याने संबंधिताने सादर केलेला तडजोड प्रस्ताव तत्वतः स्विकारून तो तडजोड प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. तडजोड प्रस्ताव संबंधाने खालील प्रमाणे दोन प्रकारची (१) कायदेशिर (२) तांत्रिक सविस्तर माहिती देण्यात येत आहे.

१] **<u>कायदेशिर माहिती</u>**

अ. जमिनीचे क्षेत्र मापनाचे एकका मधील संदिग्धतेमुळे न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणात दि.दा. क्र. ७१४/८९ मध्ये न्यायालयाने महापालिका विरुध्द निर्णय दिलेला आहे. महापालिकेने ह्या निर्णया विरुध्द वरिष्ठ नयायालयात अपिल केलेले आहे.

ब. महापालिकेने १९८५ साली खाजगी वाटाघाटीने २ हे. ३५ आर जमिन संपादन करते वेळी नोंदणीकृत दस्तएवेजाने जमिनीचे हस्तांतर केलेले नसल्याने स्पष्टपणे नमूद करून त्यामुळे तसेच खाजगी वाटाघाटीने संपादित जमिनीचे क्षेत्रासाठी पंचनामा मनपाचा ठराव, ७/१२ उतारा वरील नोंद ह्या आधारे मनपाचे हक्क तेवढ्या क्षेत्रा करिता स्थगित होत नसल्या बाबत मा. न्यायालयाने निर्णय दिला आहे. त्यामुळे ह्या दि.दा. क्र. ७१४/८९ मध्ये मा. न्यायालयाने मनपास ह्या जागेस तारकुंपन घालून संपादित क्षेत्र २ हे ३५ आर क्षेत्र ताब्यात घेण्यास मनाई कुकूम दिला व मनपाचे ताब्यात ३ एकर क्षेत्र असल्याने उर्वरित क्षेत्र मुळ जमिन मालक / वादीचे ताब्यात असल्याचे स्पष्ट केले.

क. वर नमूद दाव्यामुळे सध्या मनपाचे ताब्यात ३ एकर जागा असूनही त्या बाबत अधिकृत पंचनामा नोंदणीकृत हस्तांतरण ऐवज व त्यानुसार प्रत्यक्ष जागेवर सिमांकन केलेले नसल्याने मनपाचे नेमके क्षेत्र कोणते व त्या वरील विकास कामा बाबत स्पष्टता होत नसल्याने मुळ जमिन मालकही आक्षेप घेत आहेत.

ड. दरम्यानचे काळात नंतर मनपाने ह्या स.न. १० चे उर्वरित जमिनीतून वाहणाऱ्या नाला जमिनीतून ड्रेनेज लाईन व नाला संरक्षण भित बांधण्याचे काम सुरू केले

असता संबंधिताने पुन्हा जमिन संपादित न करता वा त्या बाबत कसलीही कार्यवाही, करारनामा न करता, संबंधिताचे संमतीविना काम होत असल्याचे नमूद करून मा. न्यायालयात दावा दाखल केला. सदरील दि.दा. क्र. ५८४/९७ मध्येही मा. न्यायालयाने मनपाने दाव्या संबंधिने आपले म्हणणजे दाखल करे पावेतो स्थगिती ओदश दिला आहे.

इ. न्यायालयीन आदेशानुसार ह्या प्रकरणी नाला ट्रेनिंगचे व ड्रेनेज लाईनचे काम बंद असून सध्या ही कामे अर्धवट अवस्थेत आहेत.

१. सदरील कामाचा ठेकेदाराशी करानामा रितसर झाला असलयाने सदरील कामासाठी महानगरपालिकेकडून विलंब झाल्यामुळे मनपा आर्थिक हानी होणार आहे.

२. ड्रेनेज लाईनचे काम पूर्ण झाले असून मुख्य ड्रेनेज लाईनला जोडणी करण्यात आली नाही. त्यामुळे मनपाचे ड्रेनेज लाईनवर खर्च करूनही त्याचा उपयोग होत नाही. ह्या दाव्यातही संबंधिताचे म्हणणे आहे की, ड्रेनेज लाईन व संरक्षक भिंती करीता मनपाने बांधिव क्षेत्राचा मोबदला देण्याचे मान्य करूनही मोबदला दिला नसलयाने तसेच संबंधिताचा आक्षेप असतांनाही रितसर जमिनीचे हस्तांतर करून न घेता मनपा काम करित असल्याने त्या क्षेत्राचा मोबदला मिळावा व तोपर्यंत मनपास कामे करण्यास मनाई हुकूम द्यावा.

सध्या सदरील दोन्ही दाव्या संबंधिने न्यायालयात कार्यवाही प्रलंबित आहे.

फ. ह्या न्यायालयीन कार्यवाहीमध्ये अंतिम निर्णयास किती कालावधी लागेल? व निर्णय काय होईल? त्यावेळी त्या निर्णयामुळे मनपावर येणारी जबाबदारी मनपाचा फायदा या बाबत अनिश्चितता आहे व अंतिम निर्णय होई तो मनपा ह्या जमिनीचा प्रत्यक्ष विकास करू शकत नाही. व त्या भागातील नागरिकांच्या मागणीनुसार त्यांना सुविधा पुरवू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे.

२] <u>**तांत्रिक माहिती**</u>

अ. न्यायालयने निर्णयात नमूद केल्याप्रमाणे मनपाच्या ताब्यात ३ एकर जमिन आहे. मात्र प्रत्यक्ष जागेवर सिमांकन व जागेची मोजमापे अधिकृत नसलयाने जागेवर नेमके मनपाचे क्षेत्र कोणते? त्याचा विकास करावयाचा झाल्यास त्याची मोजमापे किती? या बाबत स्पष्टता नसल्याने विकास कामे करणे अडचणीचे आहे.

ब. मनपाने सुरू केलेली ड्रेनेज व संरक्षक भिंतीचे बांधकाम न्यायालयाने स्थगिती आदेशामुळे सध्या बंद असून काम अर्धवट स्थितीत अपूर्णावस्थेत आहे.

क. अर्धवट / अपूर्ण अवस्थेत असलेल्या कामामुळे ह्या कामावर लाखो रुपये खर्च होवूनही जनतेस ह्या कामांचा / सुविधांचा उपयोग होत नाही.

ड. महसूल खात्याचे अभिलेखा नुसार ह्या जमिनीतून नाला / नैसर्गिक पाणी प्रवाह जात असल्याबाबत नोंद नसल्याने जरी प्रत्यखात जागेतून नाला वाहत असला तरी जमिनीचा उतार नैसर्गिक पाणी प्रवाह या संबंधाने प्रत्यक्ष ड्रेनेज लाईन टाकण्याचे व संरक्षक भिंत बांधण्याचे कामी न्यायालयीन कार्यवाही पाहता जागेचे संपादन करून घेतल्या शिवाय मनपास ह्या ठिकाणी ही अर्धवट कामे पूर्ण करता येणार नाहीत. ज्या

क्षेत्रासाठी आजच्या बाजार भावाने मोबदला मिळावा म्हणून संबंधिताने न्यायालयात मागणी केलेली आहे.

संबंधिताच्या दाव्यावर न्यायालयाने विचार करून "जैसे थे" आदेश दिलेला आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने तडजोडीचा मार्ग मनपाच्या हितावह ठरेल.

इ. ह्या जमिनीतून मनपाने संपादित केलेल्या जागे पैकी एका भागात मनपाने पाण्याची टाकी (एस. आर.) बांधलेली आहे व यासाठी प्रस्तावित १२.० मी. रुदींचा वि. यो. रस्ता ह्या स. नं. चे जमिनीतून जात आहे. त्यासाठी बाधित होणारे क्षेत्र ७२० चौ. मी. आहे.

ई. १(अ) मध्ये नमूद केल्या नुसार न्यायालयाने निर्णयानुसार मनपाने ताब्यात असलेल्या ३ एकर जमिनीचे रजिस्ट्री (नोंदणीकृत दस्त ऐवज) करून दिलेली नसल्याने कायदेशिर मालकी हक्क मनपाने मिळवला आहे / असे म्हणता येणार नाही असा न्यायालयाचा शेरा आहे.

प्रत्यक्ष सिमांकन करून मोजमापे निश्चित करणे मनपाचा प्रत्यक्ष ताबा स्थापित करणे करिता व जनतेच्या मागणीनुसार सविधा पुरविणे सोईचे व्हावे यासाठी या प्रकरणी संबंधिताने न्यायप्रविष्ठ प्रकरणी अंतिम निर्णयास लागणारा कालावधी, न्यायालयाचा अंतिम निर्णय या बाबतचे अनिश्चिते मुळे सादर केलेला तडजोड प्रस्ताव विचारात घेतला आहे.

३] **<u>प्रस्तावातील प्रमुख मुद्दे</u>**

१. संबंधित जमिन मालक महापालिकेस तीन एकर क्षेत्राची जमिन रितसर नोंदणीकृत दस्तऐवजाने हस्तांतरीत करून देतील.

२. नाला ट्रेनिंगमुळे बाधित होणारे क्षेत्र व पाण्याचे टाकीस जाणारा तसेच मनपाच्या वर नमूद जागेस पोच रस्ता असलेल्या १२.० मी रुंद वि. यो. रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र संबंधित जमिन मालक विना मोबदला मनपास हस्तांतरित करून देतील व मनपास रोख स्वरुपात जागेचा मोबदला न देता मनपास देण्यात येणारे तीन एकर क्षेत्रातून १६ गुंठे जमिन संबंधितास द्यावयाची आहे. अशा प्रकारे संबंधित जमिन मालकाची या प्रकरणा ातील जमिन एकूण क्षेत्र -५ एकर ३५ गुंठे महानगरपालिकेस नागरी सुविधेसाठी उपलब्ध होणारे क्षेत्र

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्राथमिक शाळा व क्रीडांगण | - | २ एकर २४ गुंठे |
| २) | विकास योजना रस्त्यासाठी | - | ७.२० गुंठे |
| ३) | ड्रेनेज व नाला ट्रेनिंग करिता | - | २६.४ गुंठे |
| | एकूण क्षेत्र | - | ३ ए. १७.६ गुंठे |

३ एकर १७ गुंठे क्षेत्र महानगरपालिकेस उपलब्ध होणार आहे. करिता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर रितसर करारनामा नोंदणीकृत दस्ताऐवज करून जमीन हस्तांतरीत करून घेण्यात येईल व न्यायप्रविष्ठ प्रकरणी नयायालयातून काढून घेवून प्रत्यक्ष विकास कामे सुरू करण्यात येतील ज्यामुळे त्या भागातील जनतेस ड्रेनेज नाला ट्रेनिंग व प्राथमिक शाहा क्रीडांगण इ. सुविधा उपलब्ध होतील.

**संवाद** :

मा. महापौर : सदर प्रस्तावा नुसारच्या तडजोड प्रस्तावास मान्यता देण्यात येते व त्यानुसार करारनामा व जागा हस्तांतर करून घेण्याची वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव क्र. २०३/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजूर विकास योजने नुसार मोजे् जसवंतपुरा येथील आरक्षण नं. २०५ माध्यमिक शाळा पैकी २.३५ हे. जागा १९८५ लाखाजगी तडजोडीने संपादन करण्यात आली असून क्षेत्राच्या संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्याने व स्थगिती आदेश झाल्याने विकास कामे थांबलेली आहेत. व दिवाणी दावा क्र. ७१४/८९ या प्रकरणांत निकाला महानगरपालिकेच्या विरुध्द गेलेला असून अपिल प्रकरण प्रलंबित आहे. तसेच या आरक्षणा व्यतिरिक्त याच सर्व्हे नं. १० पैकी दावेदारांच्या मालकीच्या जमिनीतून नाला जात असून, न्यायालयीन स्थगिती आदेशानुसार नाला संरक्षित भिंत व ड्रेनेजचे काम बंद करावे लागले या परिस्थितीचा विचार करून व जनतेला विकास सुविधा तत्परतेने पुरविता यावे. म्हणून प्रस्तावित केल्याप्रमाणे वरील आरक्षणाच्या जागे पैकी.....

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्राथमिक शाळा व क्रीडांगण करिता व्यतिरिक्त | - | २ एकर २४ गुंठे आणि आर |
| २) | १२ मीटर रुंद विकास योजना रस्त्यासाठी | - | ७.२० गुंठे आणि |
| ३) | नाला संरक्षित भिंतीसाठी व ड्रेनेज लाईनसाठी | - | २६.४० गुंठे अशी |
| | **एकूण क्षेत्र** | - | **३ ए. १७.६० गुंठे** |

क्षेत्र मुळ जमिन मालकाने महानगरालिकेस देण्यात यावी. शासनास सादर केलेल्या प्रारुप विकास योजनेत महानगरपालिकेच्या जागेसाठी महानगरपालिकासाठी वापर आणि उर्वरित अर्जदारासाठी जमिन आरक्षणांतून वगळून निवास भागात सामिल करण्यासाठी खालील अटीवर सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अ) या जमिनीच्या संदर्भात महानगरपालिकेच्या विरुध्द न्याय प्रविष्ठ असलेली सर्व प्रकरणे जमिन मालकांनी काढून घ्यावी दाव्याचा खर्च अर्जदाराने स्वत:च सोसावा व आता.

ब) आता पुन्हा वर प्रस्तावित ३ ए. ३७.६० गुंठे जागा रितसर हस्तांतर करून महानगरपालिकेच्या ताब्यात द्यावी.

क) न्यायालयामध्ये तडजोड प्रस्ताव सादर करून न्यायालयाने तडजोड प्रस्तावाप्रमाणे ७/१२ च्या कालकी हक्कात महानगरपालिकांच्या नांवे वरिल क्षेत्राची दुरुस्ती करून देण्यात यावी.

ड) वरील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगरपालिकेस आवश्यक ते नोंदणीकृत करारनामा करून द्यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०४/५ :**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांचे कडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातून वाहणाऱ्या प्रमुख नाल्यापैकी काही नाल्यांच्या नाला जमिनी शहर विकास व शहर सौदर्यीकरणाचे दृष्टीने सामाजिक संस्था, नोंदणीकृत संस्था तसेच खाजगी व्यक्तींना त्यांची मागणी विचारात घेवून विकसित करण्यासाठी दिर्घ मुदतीवर भाडेपट्ट्याने देण्याबाबतची कार्यवाही महापालिकेकडून होत

आहे. ह्यांतर्गत काही नाला जमिनी यापूर्वी रितसर हस्तांतरीत होऊन विकसित झालेल्या आहेत.

स्थायी समितीच्या मंजुरीने खालील नाला जमिनी त्यापुढे नमूद संस्था व्यक्तींना भाडेपट्ट्यावर देण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून होत आहे व तसे प्रस्ताव शासनाचे तत्वतः मान्यतेसाठी शासनाकडे सादर केलेले आहे. ह्या प्रकरणी शासनाकडून कार्यवाही होत आहे.

१) समर्थ वरद गणेश मंदिरा लगतची नाला जमिन - औरंगाबाद जिल्हा पत्रकार संघ
२) औरंपुरा २४.० मी. रस्त्याचे पूर्वेस लागून असलेली नाला जमिन - श्री. शिवाई सेवा ट्रस्ट
३) औरंगपुरा २४.० मी. रस्त्याचे पश्चिमेस लागून असलेली नाला जमिन - लोकमान्य बहुविध संस्था
४) बारुदगरनाला - एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटी
५) श्रेयनगर - श्री. उमाकांत नाईक
६) सिध्दार्थ उद्याना लगतचा नाला जमिन (प्रस्ताव अद्याप शासनास सादर करावयाचा आहे.) - गिरजा देवी महिला प्राथमिक ग्राहक संस्था औरंगाबाद.

दरम्यान यापैकी (१) औरंगाबाद जिल्हा पत्रकार संघ औरंगाबाद व (२) श्री. शिवाई सेवा ट्रस्ट, मुंबई या दोन प्रकरणी शासनाने मंजूर व प्रारुप विकास योजना मध्ये त्या त्या नाला जमिनीचा निर्देश त्या त्या संस्था करिता म्हणून दाखविण्यात यावी म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदलाची कार्यवाही करण्याबाबत सुचविलेले होते व त्यानुसार किरकोळ फेरबदल करण्याबाबत मंजुरी दिली आहे. वरील प्रमाणे मंजूर विकास योजना मध्ये नमूद केल्याप्रमाणे नाला जमिनीचा खालील संस्था करिता निर्देश करण्याची जसे की,

१) औरंगपुरा येथील २४.० मी. रुंद रस्त्याचे पश्चिमे कडील नाला जमिन - लोकमान्य बहुविध संस्था
२) बारुदगरनाला सुराणा इमारतीचे उत्तरेकडील नाला जमिन - एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटी
३) श्रेयनगर येथील नाला जमिन - श्री. उमाकांत नाईक.
४) सिध्दार्थ उद्याना लगतची नाला जमिन - गिरजा देवी महिला प्राथिमिक ग्राहक संस्था, औरंगाबाद.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अनवये किरकोळ फेरबदल करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत असून प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव शासनास सादर करणेत येईल.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावयाचे पुढील कार्यवाही अंतर्गत शासनाची अंतिम मंजुरी घेण्याकरिता ठरवून दिलेल्या कार्यपध्दतीस अनुसरून प्रस्तावित फेरबदलास अंतिम स्वरुप देण्यासाठी जनतेकडून सूचना हरकती मागविण्याचे व सूचना हरकतीचा विचार करून फेरबदलाचे स्वरुपास अंतिम स्वरुप देवून प्रस्ताव शासनाचे मंजुरीकरिता राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी आवश्यक तो पत्र व्यवहार करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात यावे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

**ठराव क्र. २०४/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नाला जमिनी त्यापुढे नमूद संस्था, व्यक्तींना भाडेपट्ट्यावर देण्याची कार्यवाही मनपाकडून होत असून विकास योजनेत नमूद केल्याप्रमाणे नाला जमिनीचा वापर त्या त्या संस्थाकरिता दाखविता यावा म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच अधिनियमाचे कलम ३७ अन्वये करावयाचे कार्यवाही अंतर्गत शासनाची मंजुरी कार्यपध्दतीनुसा हरकती / मुद्याचा विचार करून फेरबदलाचे अंतिम स्वरुप देवून शासनास पाठविणे इ. बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०५/६ :**

औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना दैनंदिन देखभाल दुरुस्ती बीड बायपास ते रेल्वेस्टेशन दरम्यान १४०० मी.मी. व्यासाच्या पी.एस.सी. पाईप गुरुतव वाहिनीच्या वारंवार खंडणीमुळे होणाऱ्या पाणी पुरवठ्यातील व्यत्यामुळे असे प्रस्तावित किले आहे की, बीड बायपास साखळी पासून ते रेल्वेस्टेशन पेट्रोल पंपा जवळील अस्तित्वातील पोलादी पाईपा पर्यंत साधारणपणे १०२० मिटर लांबीचे १४०० मी.मी. व्यासाचे पाईप बदलावे. कारण आजच्या परिस्थितीत उपरोक्त साखळी मध्ये (१०२० मिटर लांबीचे १४०० मी.मी. व्यासाचे पाईप बदलावे कारण आजच्या परिस्थितीत उपरोक्त साखळीइमध्ये १०२० मिटर लांबीमध्ये ) पाईप लाईन नंतर वेगवेगळ्या व्यवसायाची दुकाने, पान टपऱ्या, हॉटेल्स असून आजुबाजुला वस्ती सुध्दा जवळ असल्याने प्रत्येक पाईप फुटण्याचे वेळी नागरिकांचे नुकसान होऊन त्यांची भरपाई महानगरपालिकेस करावी लागते.

दुसरे कारण असे की, आज रेल्वे क्रॉसिंग जवळ उड्डाण पुलाचे काम प्रगती पथावर असल्याने १४०० मी.मी. व्यासाच्या गुरुत्व वाहिनीचे ५ ते ६ पाईप पाया खोदाई मध्ये आले आहेत. जर त्या विशिष्ट जागी पाईप फुटला किंवा दुरुस्तीची वेळ आली तर ती करणे अशक्य आहे, कारण पुलाचे काम अपुरी जागा यामुळे जी.सी.सी. नेऊन काम करणे अवघड आहे. त्या कारणाने पाणी पुरवठा ४ ते ५ दिवसापय्रंत बंद राहू शकतो. या सर्व बाबींचा विचार करता उपरोक्त साखळीतील जर पोलादी पाईप अंथरले तर कायम स्वरुपी त्रास कमी होईल व कोठलेही नुकसान होणार नाही. नक्षत्रवाडी ते बीड बायपास पर्यंत खंडणाचे प्रमाणे नगण्य आहे. तसेच ह्या सखळीत वित्तहानी वगैरे होत नाही.

सदर १०२० मिटर लांबीच्या १४०० मी.मी. व्यासाच्या (१० मी.मी. जाडीचे) पाईप लाईनचे अंदाजपत्रक रुपये १६५.९७ लक्ष रुपयाचे सादर केले असून अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. २०५/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे क्रॉसिंग येथील प्रगती पथावर असलेले उड्डाण पुलाचे काम आणि औरंगाबाद शहरात नक्षत्रवाडी ते रेल्वे स्टेशन दरम्यान १४०० मी.मी. व्यासाची पी.एस.पी गरुत्व वाहिनीच्या वारंवार खंडामुहे पाणी पुरवठ्यात होणरा व्यत्यय यामुळे बीड बायपास साखळी पासून १०२० मीटर लांबीचा १४०० एम.एम. व्यासाचा पाईप रेल्वे स्टेशन पेट्रोल पंपा जवळील अस्तित्वात असलेल्या पोलादी पाईप पर्यंत बदलण्यासाठी १६५.९५ लक्ष रुपयाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०६/७ :**

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात सुमारे ६० च्या वर अनाधिकृत वसाहती आहेत. अशा अनाधिकृत वसाहतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी वेळोवेळी शासनाकडून मदत मागतिली जाते. नागरी सुविधा पुरवठ्या लागतात. परंतु या भागातून विकास खर्चाची रक्कम, शहर विकास शुल्क इत्यादी वसूल होत नाही. नागरी सुविधा मिळाल्याने नविन अनाधिकृत वसाहती तयार होण्यास प्रोत्साहन मिळते हे चक्र थांबविण्यासाठी तात्काळ अनाधिकृत वस्त्यांचे सर्व्हेक्षण होणे व नविन वसाहती होण्यास प्रतिबंध करणे गरजेचे आहे. या करिता ज्या प्रमाणे पुणे, जळगांव, लातूर इत्यादी शहरामध्ये ऐरीअल फोटोग्राफी (हवाई सर्व्हेक्षण) करण्यात आले त्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील ऐरिअल फोटोग्राफी करण्यात यावी व यासाठी जो खर्च लागेल त्यास मान्यता देण्यात यावी. या करिता त्यांनी आवश्यक त्या शहराचा अभ्यास दौरा करावा व महानगरपालिकेवर कमीत कमी आर्थिक बोजा पडेल या पध्दतीने हे काम पूर्ण करून घ्यावे.

सुचक - गौतम लांडगे
(बंडू जयवंत ओक)
अविनाश कुमावत
अनुमोदक - संजय जोशी
विकास जैन

**ठराव क्र. २०६/७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाकडून मिळणाऱ्या मदतीतून नागरी सुविधा मिळाल्याने नविन अनाधिकृत वसाहती तयार होण्यास प्रोत्साहन मिळकते हे चक्र थांबविण्यासाठी पुणे, जळगांव, लातूर या शहराप्रमाणे औरंगाबाद शहरामध्ये अरियल फोटाग्राफी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच वरील प्रमाणे अरियल फोटोग्राफी करण्याचे काम कमीत कमी खर्चात करण्यात यावी, त्यासाठी येणाऱ्या खर्चास आणि अरियल फोटोग्राफीचा प्रशासकीय अधिकारी यांना आवश्यक त्याशहराचा दौरा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०७/८ :**

प्रस्तावात सादर करण्यात येते की, मोहल्ला चिस्तीया कॉलनी येथे जाणारा रोडला डॉ. वाय. एस. खेडकर रोड असे नांव देण्यात यावे कारण सध्या सदरील रोडला कोणतेही नांव देण्यात आलेले नाही. म्हणून सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक - अ. रशिदखॉन मामू
अनुमोदक - गौतम लांडगे, संजय जोशी, जयवंत ओक, गौतम खरात, हमिद ताबा, जावेद रज्जाक, म. विखारोद्दिन, विजयकुमार मेहेर, अविनाश कुमावत, श्रीमती अलका पाटील.
दिनांक - १६/०१/९९

**ठराव क्र. २०७/८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चिस्तिया कॉलनी येथे जाणाऱ्या रस्त्यास डॉ. वाय.एस. खेडकर असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०८/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका स्थापना झाल्यापासून आता पर्यंत औरंगाबाद शहरामध्ये महानगरपालिके तर्फे महापौर, उप-महापौर अथवा इतर महानगरपालिका लोकप्रति निधीची एकही परिषद घेण्यात आलेली नाही. अलिकडेच अखिल भारतीय महापौर परिषद भोपाळ येथे संपन्न झाली व त्या महापौरांच्या विचाराची व समस्यांची देवाण घेवाण झाली.

औरंगाबाद शहरामध्ये आखिल भारतीय उप-महापौर परिषद घेण्यात यावी व अशी परिषद भरविण्याचा प्रथम मान आपल्या ऐतिहासिक शहराला मिळावा करिता औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे आखिल भारतीय उप-महापौर परिषद घेणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - १) अविनाश कुमावत
२) भगवान घडामोडे
३) म. रशिदखॉन (मामू)

अनुमोदक - १) अफसरखान
२) राजकुमार बचाटे (मामा)
३) गजानन बारवाल
४) डॉ. विजयकुमार मेहेर

**ठराव क्र. २०८/९ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका स्थापने पासून आतापर्यंत या शहरात लोकप्रतिनिधीची एकही परिषद घेण्यात आलेली नाही. यावर विचार करता विचारांची व समस्यांची देवाण घेवाण करण्यासाठी औरंगाबाद शहरामध्ये आखिल भारतीय उप-महापौर परिषद घेण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०९/१० :**

हंगामी कामगारांना शासन नियमाप्रमाणे (रु.८९) ८९ रु. दैनिक वेतन देणे बाबत.

सुचक - प्रदिप जैस्वाल,
अविनाश कुमावत,
गौतम खरात,
अ. रशिद खॉन (मामू)

अनुमोदक - मनमोहनसिंग ओबेरॉय,
गौतम लांडगे.

**संवाद :**

श्री. रशिद खॉन (मामू) : जे. रु. १०००/- प्रतिमहा ठराविक वेतनावरील कामगार आहेत त्यांना दैनिक वेतनावर घ्यावे.

श्री. गौतम खरात : ठराविक वेतनावरील कामगारांना दैनिक वेतनावर सामावून घ्यावे. दैनिक वेतनाप्रमाणे पगार द्यावा.

मा. महापौर : हंगामी कामगारांना फेब्रु ९८ पासून दैनिक वेतनात रु. १५ वाढ करण्यात येते व ठराविक वेतन रु. १०००/- प्रतिमहा यांना दैनिक वेतनावर घ्यावे.

**ठराव क्र. २०८/९ :**

औरंगाबाद महानगरपालिकेत जे कामगार रु. १०००/- ठराविक वेतनांवर आहेत व त्यांना दैनिक वेतनावर घेण्यास व अशा हंगामी कामगारांना फेब्रु.-९८ पासून दैनिक वेतन प्रतिदिन रु. १५/- वाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १८/०२/९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दिनांक १८/०२/९९ रोजी सकाळी ११.३० "मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेस महानगरपालिका मुख्य कार्यालयातील "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या बैठकीस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. डॉ. कराड भागवत | उप-महापौर |
| २) | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स. सभासद |
| ३) | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्माणराव | --//-- |
| ४) | स.स.श्री. अफसरखॉन यासिनखॉन | --//-- |
| ५) | स.स.श्री. लोखंडे रुख्मिणीबाई खंडेराव | --//-- |
| ६) | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ७) | स.स.सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ८) | स.स.श्री. म. सलीम म. हनिफ कुरेशी | --//-- |
| ९) | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| १०) | स.स. श्रीमती जोशी रजनी रमेश | --//-- |
| ११) | स.स.सौ. उषाबाई दिलिप गायकवाड | --//-- |
| १२) | स.स.सौ. मुंडलिक विमलबाई नंदकुमार | --//-- |
| १३) | स.स.श्री. ॲड गणेश किसनराव वानखेडे | --//-- |
| १४) | स.स.श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १५) | स.स.श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --//-- |
| १६) | स.स.श्री. नरेंद्र यादव पाटील | --//-- |
| १७) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १८) | मा. श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १९) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| २०) | स.स.सौ. शिंदे पद्मा बाबुराव | --//-- |
| २१) | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| २२) | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २३) | स.स.श्री. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २४) | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २५) | स.स.सौ. फरहद बानो मो. नवाज | --//-- |
| २६) | स.स.श्री. फजलउल्ला खॉन अजमत खॉन | --//-- |
| २७) | स.स.श्री. अजिजखॉन गणी खॉ | --//-- |
| २८) | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो. मुश्ताफा | --//-- |
| २९) | स.स. श्री. महंमद मुश्ताफ अहेमद | --//-- |
| ३०) | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| ३१) | स.स.श्री. हाजी मोहसीन अहमद हाजी बशिर अहमद | --//-- |
| ३२) | स.स.श्री. मुजीब आलमशहा मीर आलमशहा | --//-- |
| ३३) | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखोराद्दिन | --//-- |
| ३४) | स.स.श्री. अ. जावेद रज्जाक | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३५) | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| ३६) | स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३७) | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३८) | स.स.श्रीमती गंगावाल पुष्पाबाई सुरेशचंद्र | --//-- |
| ३९) | स.स.श्री. हमीदउद्दिन ताबा फसीयोद्दिन | --//-- |
| ४०) | स.स.श्री. म.अ.रऊफ अ. माबुद | --//-- |
| ४१) | स.स.श्री. स.अ. इकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन | --//-- |
| ४२) | स.स.श्री. प्रदिपकुमार जैस्वाल | --//-- |
| ४३) | स.स.श्री. सय्यद अली मिरा सलामी | --//-- |
| ४४) | स.स.श्री. रमेश लाहोट | --//-- |
| ४५) | स.स.श्री. संजय केनेकर | --//-- |
| ४६) | स.स.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ४७) | स.स.सौ. लता दलाल | --//-- |
| ४८) | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | --//-- |
| ४९) | स.स.सौ. शकुंतला धांडे | --//-- |
| ५०) | स.स.श्री. अ. रशिदखॉन (मामू) | --//-- |
| ५१) | स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण | --//-- |
| ५२) | स.स.डॉ. कु. माया लिंबाजी लाडवाणी | --//-- |
| ५३) | स.स.सौ. आव्हाड सविता संजय | --//-- |
| ५४) | स.स.सौ. अब्दुल अ. सत्तार | --//-- |
| ५५) | स.स.श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | --//-- |
| ५६) | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ५७) | स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ५८) | स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ५९) | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | --//-- |
| ६०) | स.स.श्री. जोशी संजय रामदास | --//-- |
| ६१) | स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | --//-- |
| ६२) | स.स.सौ. ज्योत्सना दौलत हिवराळे | --//-- |
| ६३) | स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --//-- |
| ६४) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ६५) | स.स.श्री. जाधव विठ्ठल किसन | --//-- |
| ६६) | स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | --//-- |
| ६७) | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ६८) | स.स.श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

**संवाद** :

श्री. जावेद रजाक : कोरम अभावी सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात यावी.

मा. महापौर : १० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते.
(वेळ अंदाजे ११.३२ वा. सभेला सुरुवात ११.४५ वा.)

श्री. अफसर खॉन : लेखा परिक्षण बाबतचा अहवाल पत्र देवून मागविलेला होता. परंतु अद्यापपर्यंत काही रिपोर्ट मला मिळालेला नाही. मा. सभापती यांना या बाबत विचारणा केली असता माझ्याकडे तसे पत्र आलेले नाही. असे सांगण्यात

आले. लेखा परिक्षणाचे गैरव्यवहार बाबत ज्यांना दोषी ठरविण्यात आले. तथा किती कर्मचाऱ्यांवर आतापर्यंत प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात आली याबाबतचा खुलासा करावा.

श्री. अविनाश कुमावत : स. सदस्य यांनी चर्चेस आणलेला विषय य सभेचा होऊ शकत नाही. दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री. अफसर खॉन : १९८३ पासून अद्यापपर्यंत लेखापरिक्षण अहवाल सभागृहात कधी सादर करण्यात आलेला नव्हता. जवळ-जवळ १५ वर्षाचे एकत्रित सर्व लेखा परिक्षण अहवाल सभागृहाच्या मंजुरीसाठी सादर केला एवढा कालावधीमध्ये का अहवाल सादर करण्यात आलेला नाही याचा खुलासा करावा.

श्री. प्रदिप जैस्वाल : सभागृहात दुसऱ्या विषयावर चर्चा करावी. लेखापरिक्षण अहवाल स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतर सर्वसाधारण सभेत सादर होईल त्यावेळी काय प्रश्न उपस्थित करावयाचे ते स. सदस्यांनी करावे. चर्चेसाठी ३० मिनिटाचा अवधी ठेवावा व इतर विषयावर चर्चा करावी.

श्री. जयवंत ओक : स. सदस्य श्री. अफसरखॉन यांनी सभागृहात विचारलेल्या प्रश्नाबाबत स्थायी समितीचा अद्याप निर्णय झालेला नसून सभा तहकूब करण्यात आलेली आहे. पुन्हा २-३ दिवसात सभा घेण्यात येऊन निर्णय घेतल्यानंतर त्या बाबतची संपूर्ण अहवाल मा. महापौर यांच्याकडे दिल्यावर सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात येईल. त्यावेळी सभागृहाने चर्चा करावी.

श्री. मोहसीन अहेमद : ज्या संदीर्भात स. सदस्य श्री. अफसरखॉन यांनी माहिती विचारली ते या महापालिकेचे पादाधिकारी म्हणून कार्यरत असून त्यांनी पत्र दिल्यानंतर प्रशासनाने त्या पत्राच्या अनुषंगाने माहिती का देण्यात आली नाही लेखा परिक्षण अहवालामध्ये काही कर्मचारी यांनी त्यात गैरव्यवहार केल्याबाबत वृत्तपत्रात छापून आलेले असून जनतेच्या मनामध्ये महानगरपालिका प्रशासनाच्या कारभाराबाबत वेगवेगळ्या भावना निर्माण होत असून यात सभागृह तसेच प्रशासन यांची बदनामी होत आहे.

श्री. अफसर खॉन : लेखा परिक्षण अहवालाबाबतची संपूर्ण माहिती सर्व स. सदस्यांना द्यावयास पाहिजे. ॲक्टनुसार तशी तरतूद नाही काय खुलासा करावा.

श्री. हमीदउद्दिन ताबा : संबंधित अधिकारी यांनी स्थायी समितीसमोर लेखा परिक्षण अहवाल सादर करतांना त्याची प्रत पत्रकारांना दिलेली नव्हती तर सभा होण्याच्या अगोदर वृत्तपत्रात बातमी कशी छापून आलेली आहे. याबाबत खुलासा करावा.

श्री. मोहसीन अहमद : स. सदस्यांना लेखा परिक्षण अहवाला बाबत प्रत देण्यात यावी जेणे करून महानगरपालिकेच्या प्रशासनाचा काय कारभार चालू आहे याबाबत संपूर्ण माहिती होईल.

श्री. प्रदिपकुमार जैस्वाल : ॲक्टनुसार जो पर्यंत लेखापरिक्षण अहवालाबाबत अंतिम निर्णय लागत नाही तोपर्यंत कुणालाही प्रती देता येत नाही.

श्री. नरेंद्र पाटील : मा. महापौर यांना विचारलेल्या प्रश्ना बाबतचा खुलासा मा. महापौर यांनीच केला पाहिजे इतर स. सदस्यांनी मध्ये बोलू नये. लेखापरिक्षण अहवाला संदर्भात वृत्तपत्रात काहीतरी वेगळे छापून येते. यात प्रशासनाची व सभागृहाची बदनामी होत आहे.

श्री. अफसरखॉन : लेखा परिक्षण अहवाल कोणी तयार केलेला आहे. त्याबाबत संबंधित अधिकारी व मा. सभापती यांनी सर्व स. सदस्यांना माहिती का दिलेली नाही खुलासा करावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : लेखा परिक्षण अहवाला संदर्भात ३० मिनिटे चर्चा होऊ द्यावी चर्चेला सुरुवात झालेली आहे.

मा. महापौर : विषयपत्रिकेतील विषयावर चर्चा करावी. नंतर चर्चेसाठी ३० मिनिटाचा अवधी देण्यात येईल. लेखा परिक्षण अहवाला संदर्भात या सभेत चर्चा करू नये.

श्री. अफसरखॉन, सौ. मोहसीन बिल्कीस :

अगोदर लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करावी नंतर विषय पत्रिकेवरील विषयावर चर्चा करावी. लेखा परिक्षण अहवाला बाबत रिपोर्ट मागविलेला होता त्याचा खुलासा करावा.

श्री. जावेद रज्जाक : लेखा परिक्षण अहवाल संदर्भात बातम्या छापून आलेल्या असून काही कर्मचाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आलेले आहे. अशा कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : लेखा परिक्षण अहवालाबाबत सविस्तर माहिती द्यावी. तयानंतर चर्चा करण्यात यावी असे माझे मत आहे.

(याच वेळी सभागृहात सभासदांचे मोठमोठ्याने बोलणे चालू असते.काहीही ऐकू येत नाही.

मा. महापौर : स. सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे याबाबत मा. आयुक्त खुलासा करतील.

श्री. अफसर खॉन : लेखा परिक्षण अहवालाबाबतची माहिती मिळण्या संदर्भात तीन महिण्यापासून पत्र दिलेले असून प्रशासनाने अद्यापपर्यंत त्याचे उत्तर दिलेले नाही.

मा. आयुक्त : सभागृहामध्ये विरोधी पक्ष नेते श्री. अफसरखॉन यांनी लेखापरिक्षण अहवाला बाबत माहिती मागविण्याच्या संदर्भान चर्चा होत असून महापालिकेच्या कारभारामध्ये काही आर्थिक गैरव्यवहार झाले आहे किंवा काय? काही तृटी आहेत किंवा काय प्रशासनाच्या चुका झालेल्या आहे किंवा काय? त्या चुका सुधारणा करण्याची आवश्यकता आहे किंवा काय? याबाबतीत एकसर्टनल ऑडीटर जो की, शासनाने नियुक्त करून दिलेले मुख्य लेखा परिक्षक यांना दरमहिण्याला मासिक व दर वर्षी वार्षिक अहवाल स्थायी समितीला सादर करावा लागतो. परंतु १९८३ पासून ते १९९८ पर्यंत ऑडिट का करण्यात आलेले नाही या बाबतचा खुलासा करू शकत नाही. सभागृहाला हे सांगू इच्छितो की मार्च ९८ पर्यंतच्या संपूर्ण लेखा परिक्षण अहवाल तयार करण्यात आलेला आहे. याच्या मुख्य लेखा परिक्षक यांना ज्या तृटी आढळून आलेल्या आहेत. त्याबाबतच्या समग्र अहवाल स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेला आहे. मुख्य लेखा परिक्षक यांनी वार्षिक अहवाल, तसेच त्या महिण्याला मासिक अहवाल स्थायी समितीसमोर सादर करणे बंधनकारक असून संपूर्ण अहवाल सादर करीत आहोत. मागील ८३ पासनचा म्हणजेच एकूण १६ वर्षाचा अहवाला का सादर झालेला नव्हता याबाबत त्यावेळचे मा. आयुकत, त्यावेळचे प्रशासन त्यावेळचे मुख्य लेखा परिक्षक, स्थायी समिती यांना विचारावे लागेल. वस्तुस्थिती अशी आहे की, गेल्या सोळा वर्षाच्या कारभाराबद्दल संपूर्ण अहवाल तयार असून काय चूका आहे काय तृटी

आहेत, काय सुधारणा करता येतील, याबाबतचा अहवाल स्थायी समितीसमोर सादर केलेला असून त्या बाबत मागील आठवड्यात बैठक घेण्यात आलेली होती. परंतु वेळे अभावी ती तहकूब करण्यात आलेली आहे. जोपर्यंत स्थायी समिती सभेचा अंतिम निर्णय होत नाही. तो पर्यंत कुणालाही अहवालाच्या प्रती देता येत नाही. सभा चालू असतांना स्वतः पत्रकारांनी अहवाल मागविलेला होता. त्यावेळी मा. सभापती यांनी पत्रकारांना स्वतः भेटून सभागृहात त्या संदर्भात चर्चा होऊन अंतिम निर्णय झाल्यानंतर आपणांस प्रत देण्यात येईल. असे सांगण्यात आलेले आहे. वेळे अभावी तहकूब केलेली स्थायी समिती सभा पुन्हा घेण्यात येणार असून त्यामध्ये निर्णय झाल्यानंतर लेखा परिक्षणाचा संपूर्ण अहवालाच्या प्रती सर्वसाधारण सभेस सादर करण्यात येतील. त्यावेही सभागृहाने जे प्रश्न मांडावयाचे आहेत त्यावेळी ते प्रश्न सभागृहात चर्चीले जावेत असे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

श्री. अफसरखॉन : लेखा परिक्षण अहवालातील गैरप्रकाराबाबत किती कर्मचाऱ्यांवर कार्यवाही केली आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : लेखा परिक्षक यांनी ज्यावेळी स्थायी समिती मधील सभासदांना लेखा परिक्षण अहवाला दिलेले आहेत त्याचवेळी इतर स. सदस्यांनी द्यावयास पाहिजे यापुढे होणाऱ्या सभेच्या अगोदर सर्व स. सदस्यांना ८ दिवस अगोदर प्रती द्याव्यात.

श्री. जयवंत ओक : लेख परिक्षण अवालातील गैरप्रकाराबाबत कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईलच यात शंका नाही. परंतु याबाबत स्थायी समितीमध्ये अद्याप काही ही निर्णय झालेला नसून निर्णय घेतल्यानंतर झालेल्या निर्णयाची माहिती सर्वसाधारण सभेमध्ये सादर करण्यात येईल यावर सभागृहात चर्चा झाल्यानंतर मा. महापौर यांनी संबंधित कर्मचाऱ्यांवर काय कार्यवाही करावयाची तसे आदेश द्यावेत. या संदर्भात सभागृहाने सर्वाचे हित बघावे व दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : गैरप्रकार झाल्या बाबतची बातमी दैनिक वृत्तपत्रात आलेली आहे. या बाबत सविस्तर माहिती कुणी पुरवलेली आहे याचा खुलासा करावा.

श्री. जयवंत ओक : स. सभासदा व्यतिरिक्त इतर कुणालाही लेखा परिक्षण अहवालाच्या प्रती दिलेल्या नव्हत्या. त्यामुळे दुसऱ्यावर आक्षेप घेणे योग्य होणार नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर : मा. आयुक्तांनी यांबाबत खुलासा केलेला आहे. विषय क्र. १ वर चर्चा करावी.

मा. महापौर : विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. २१०/१ :**

दिनांक १२/०१/९९ व १३/०१/९९ च्या विशेष सर्वसधारण सभा व दिनांक १८/०१/९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. नरेंद्र पाटील : विषय क्र. २०२/३ हा मागील बैठकीत ऐनवेळचे ठराव म्हणून मंजूर केलेला आहे. याच सभेत बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित असलेले इतर प्रस्ताव

मंजूर करण्यात आलेले आहे. सदर प्रस्ताव मंजुरीसाठी प्रशासनाच्या माध्यमातून पुन्हा सभागृहात मंजुरीसाठी येतात हे अयोग्य असून आश्चर्यकारक आहे. इतिवृत्तातील विषय क्र. २०२/३ पान क्र. २८ वर मागील बैठकीत चर्चा न झालेला ठरावास मंजुरी दिलेली आहे. ही जागा वाचनालय, आरोग्य केंद्र व प्राथमिक शाळा यांच्यासाठी आरक्षित होती. शहराचे वाढतीकरण होत आहे. अशा परिस्थितीत आरक्षित असलेल्या जागा डिलीट करत आहात. असे झाले तर दवाखाने शहराच्या बाहेर २० कि.मी. तसेच शाळा शहराच्या बाहेर २५ कि.मी. अंतरावर नेऊन कार्यन्वित कराव्या लागतील. त्यानंतर नागरिक एक फुट खुली जागा म्हणून महापालिकेला देणार नाही. प्रशासनाचे या ठरावात सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. ठरावात दोन आरक्षण दाखविण्यात आलेले आहे. ज्यात पैसे देऊन ही महापालिका आरक्षित जागा घेऊ शकत नाही. तया प्रकरणात ७० लक्ष रुपये दिल्या बाबत ठरावात नमूद करण्यात आले आहे. दोन प्रकारचे रिझर्वेशन आहेत. एक रस्त्यांच्या संदर्भात असून दुसरा आरक्षणात बदल करणाऱ्या प्रस्ताव आहे. रस्त्याचा मोबदला महापालिका ७ कोटी रुपये देऊ शकत नाही. म्हणून ३०%, ७०% या प्रमाणे ३०% जागा मनपाने घ्यावी असे ठरावात नमूद करण्यात आलेले ७ कोटी रुपये अदा करण्याचा विचार केल्यास न्यायालयाच्या आदेशानुसार ४ महिन्यात २.५० कोटी रुपये संबंधित मालकाला द्यावयाचे आहे. उर्वरित ३ कोटी रक्कम ही कोर्टाच्या आदेशानुसार नंतर देणार आहोत. कोर्टाचे आदेश सध्या तरी प्राप्त झालेले नाहीत. या ७ कोटी मधून ३ कोटी अदा केल्यानंतर ४ कोटी रु. शिल्लक राहतात. महापालिका रस्त्याच्या संदर्भात ५५ लक्ष रुपये द्यावयाचे दर वर्षी रु. ६० कोटीचा बोजा होता. तर २ कोटी का देवू शकत नाही. मागील बैठकीत ५ व्या वेतन आयोग लागू करण्याच्या निमित्ताने दरवर्षी ७ कोटीचा बोजा महापालिका सहन करू शकते तर या जमिनीच्या संबंधित मालकाला २.५० कोटी रुपये महापालिका देऊ शकत नाही काय? सभागृहाने जनतेच्या हिताचा विचार करावा या दृष्टिने सदरचे ठराव रद्द करावे व असे प्रस्ताव सभागृहात मंजुरीसाठी आणने चुकीचे असून सदर प्रस्तावावर चर्चा करावयाची असेल तर तो स्थगित ठेवून पुढच्या बैठकीत त्यावर विचार करावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे हा ऐनवेळचा प्रस्ताव नव्हता मुळ विषयपत्रिकेवर हा प्रस्ताव मंजुरीसाठी आलेला होता सन १९९०-९१ मध्ये प्रशासकांच्या काळात अशा प्रकारचा ४०% ६०% या प्रमाणे आरक्षण डिलीट करण्या बाबतचा प्रस्ताव सादर केलेला होता. ६०%-४०% प्रस्ताव मान्य झाल्यानंतर ३०%-७०% आरक्षणा बाबतचा प्रस्तावास मंजुरी देणे योग्य नाही प्रस्ताव सादर करतांना संबंधित अधिकारी यांनी योग्य ती माहिती न घेता प्रशासनाकडून प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार महापालिका जमिनीच्या आरक्षणा संदर्भातील प्रस्ताव रितसर शासनाकडे मंजुरीसाठी पाठवतील व त्यानंतर शासन त्या संदर्भात विचार करते शासनाने वरील अधिनियमाचे कलम ५० जे आरक्षण रद्द करण्या संबंधीचे होते ते यामुळेच रद्द केलेले आहे. शहरातील हिंतचिंतक जमिन

मालकाला अशा प्रकरणात स्वतः नातेवाईकांना सभासद करून संबंधित अधिकारी यांना भेटतात व जागा डिलीट करणे बाबतचे प्रस्ताव मंजुरीसाठी सभागृहात येतात. त्यानुसार लाखा रुपये कमवतात. काही ठिकाणी अशा जागेचे आरक्षण डिलीट करण्यात आलेले आहेत की, संबंधित बिल्डर पैसे कमवून समाधानी आहेत. श्री. गरे साहेब प्रशासन असतांना अशा प्रकारच्या जमिन आरक्षणा बाबतचा प्रस्ताव मंजूर करून शासनाकडे पाठवलेला होता. त्यावेही कोणीही तक्रार केलेली नव्हती. त्यावेही प्रशासक यांना तर या बाबत काहीही घेणे-देणे नव्हते. तेंव्हा सभागृहाला विनंती की शासनाकडे मंजुरीसाठी पाठवलेले ज्या-ज्या विकास आराखड्यात आरक्षणा संबंधी शासनाची मंजुरी येईल त्या प्रकारचेच प्रस्ताव सभागृहात मंजुरीसाठी यावयास पाहिजे असे असतांना आरक्षित जागा वगळण्याचा प्रस्ताव येतो यांचा अर्थ असा की अधिकारी भ्रष्टाचार करण्यास सामील आहेत अशा पध्दतीने शहरातील संपूर्ण डेव्हलपमेंट होण्यास २० वर्ष अवधी लागेल नियमाने १० वर्ष कुणीही समझोता करू शकत नाही. तसेच २ वर्षाचे आरक्षण ॲक्वायर करू शकत नाही. यापुढे शासनाने ज्या आरक्षणाची डिलीट करण्यास मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार तेच प्रस्ताव सभागृहात मंजुरीसाठी आणावे. मंजूर झाल्यानंतर त्याबाबतची एक प्रत शासनाकडे माहितीसाठी पाठवण्यात यावी जेणे करून शासनाला व या सभागृहाला योग्य ते निर्णय घेण्यास अडचण निर्माण होणार नाही. रस्त्याच्या संदर्भातील आरक्षण डिलीट करण्याबाबतचा प्रस्ता असेल तर सभागृह मंजुरी देऊ शकेल. परंतु शानाने मंजुरी न दिलेल्या विकास आराखड्यातील आरक्षणाच्या बाबतीतील जमिन डिलीट करण्याबाबतचे प्रस्तावावर चर्चा करून मंजुरी मिळण्यासाठी सभागृहात आणू नये ६०%-४०% अशी दुरुस्ती करावी. ६०%-४०% मान्य नसेल तर पैसे द्यावे. दुसरा प्रस्ताव रिझर्वेशन अकोमोडेशनचा प्रस्ताव सभागृहात सादर केलेला आहे. यात आरक्षणातील २५% जागा महापालिकेस बांधकाम करून देण्यास तयार आहे असे नमूद केले आहे. सभागृहात ७५-२५%, ६०%-४०%, ७०%-३०% असे वेगवेगळे टक्केवारीनुसार आरक्षण डिलीट करण्याबाबतचे प्रस्ताव मंजुरीसाठी येतात. याचा विचार करता आरक्षणामध्ये किती टक्केवारी पर्यंत जागा डिलीट करण्यास मंजुरी द्यावयाची आहे. याबाबत सभागृहाने एकच निर्णय घ्यावा. वेगवेगळे प्रकारचे प्रस्ताव मंजुरीसाठी आणणने सभागृहाचा तसेच शासनाचा गैरसमज होतो व आरक्षणाची जागा डिलीट करतांना जनतेचे हित लक्षात घेवून योग्य असेच निर्णय सभागृहाने घेतले पाहिजे. स. सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी ज्या मुद्द्यावर चर्चा केली तो रस्त्याच्या संदर्भातील असून यांना ६०%-४०% दुरुस्त करून मान्य करावे अन्यथा मोबदल्याची रक्कम द्यावी अशी माझी विनंती आहे.

श्री. अविनाश कुमावत : शहरातील ज्या जागा आरक्षणात ठेवलेल्या आहेत त्या ठिकाणी घरे असलेल्या भागात किती जागा आहेत बाबतचा सविस्तर खुलासा करावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : शहरातील समतानगर येथे आरक्षण दाखवलेले आहे.

श्री. जयवंत ओक : शहरातील औद्योगिक वसाहती नं. १ वर असून विकास आराखडा मंजूर होऊन आलेला आहे. ज्या भागात अगोदरच घरे झालेली आहेत त्या ठिकाणी आरक्षण कसे ठेवता येईल. ज्या भागात घरे नाहीत त्या भागात आरक्षण

ठेवावे. ज्या ठिकाणी आरक्षणाच्या जागेवर अनाधिकृत घरे झालेली असतील ती तात्काळ काढण्यात यावी. तशा प्रकारची कार्यवाही करून प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात यावा.

श्री. मुजीब आलम शहा खॉन : इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ३१ वर विषय क्र. २०३/४ सर्व्हे नंबर १०, ३ एकर जमिन महापालिकेच्या ताब्यात आहेत असे दर्शविण्यात आलेले आहेत. परंतु नागरी सुविधांसाठी उपलब्ध होणाऱ्या शेतातील जमीन कुठे आहे. याचा खुलासा करावा तसेच सर्व प्रकारची कागदपत्र असतांना असे प्रकार घडतात का? जवळ-जवळ ८० ते ९० लाखाच्या किंमतीची ही जमिन आहे. याबाबतचा ठराव मागील दि. १९/११/९८ च्या सभेत हा ठराव आलेला होता. तो रद्द झाला तीन महिने झाले नसतांना पुन्हा प्रस्ताव सभागृहात मंजुरीसाठी आणण्याची आवश्यक काय? ठराव रद्द करावा.

श्री. अविनाश कुमावत : प्रस्ताव पुन्हा कसा ठेवण्यात आलेला आहे. याबाबत माहिती द्यावी.

श्री. रशिद खॉन (मामू) माझ्या मते या प्रस्तावावर खुलासा होऊ शकत नाही. नियमाने काय दुरुस्ती करता येईल ती करावी.

श्री. जावेद रज्जाक : मा. आयुक्तांनी खुलासा करावा तो सभागृहाला मान्य असेत तर योग्यच आहे. सहाय्यक संचालक नगररचना हे सभागृहाची दिशाभूल करीत आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सभागृहात ठराव पुन्हा कसा आलेला आहे याबाबत खुलासा करावा.

श्री. जावेद रज्जाक : जयावेही विषयत्रिकेवर चर्चा चालू असते त्यावेही स. सदस्य मंजूर असे बोलतात त्यामुळे त्या विषयावर पुन्हा-पुन्हा चर्चा होते.

(याच वेळी सभागृहात मोठमोठ्याने बोलणे चालू असते काहीही ऐकू येत नाही.)

श्री. मुजीब आलमशहा खॉन : दि. १९/११/९८ च्या सर्वसाधारण सभेत प्रसताव ठेवण्यात आलेला होता. पुन्हा प्रस्ताव मंजुरीसाठी कसा ठेवण्यात आलेला आहे. रद्द करावा.

श्री. अविनाश कुमावत : हा प्रस्ताव चुकीने आलेला आहे. पुढच्या बैठकीत दुरुस्ती करून ठेवण्यात यावा असे आदेश द्यावेत.

श्री. नरेंद्र पाटील : दि. १८/०१/९९ च्या इतिवृत्तातील पान क्र. २८ वरील विषय क्र. २०२,२०३,२०४ स्थगित ठेवण्यता यावे अशी माझी विनंती आहे.

मा. महापौर : सर्व स. सदस्यांनी आआपल्या जागेवर बसावे मा. नगरसचिव याबाबत खुलासा करतील.

मा. नगरसचिव : इतिवृत्तातील विषय क्र. २०३/४ ठरावा संदर्भात इतिवृत्त बघून माहिती देण्यात येईल.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : १० मिनीटासाठी सभा तहकूब करण्यात येते.

मा. महापौर : १० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ अंदाज १२.४० वा सुरुवात १.०० वाजता)

श्री. अविनाश कुमावत : सदर प्रस्तावावर बरीच चर्चा णालेली आहे. दुरुस्त करून पुढच्या बैठकीत ठेवण्यात यावा.

श्री. मुजीब आलम शहा खॉन :

सदर प्रस्ताव स्थगित ठेवू नये. रद्द करण्यात यावा नस्ता न्यायालयात याबाबत दाद मागवावी लागेल.

श्री. गिरजाराम हाळनोर : मागील बैइकीत हे प्रस्ताव मंजूर केलेले आहेत. दुरुस्ती काय करता येईल ती करावी.

श्री. मोहसीन अहमद : मागल बैठकीत दिनांक १८/०१/९९ च्या इतिृत्तातील क्र. १० वर मी महापालिकेच्या एका जागेवर एका व्यक्तीने अतिक्रमण करून १९९३ साली सदर मिळकतीचे स्वतःच्या नावाने पी.आर.कार्ड काढून २०X३० च्या मिळकतीवर स्तःचा ताबा घेतला अशा प्रकारे अनाधिकृत पणे महापालिकेची जागा बळकावणे हे योग्य नाही. मागील बैठकीत याबाबत चर्चा होऊ उप-आयुक्त (प्र) यांनी ३ दिवसात माहिती घेऊन कळविण्यात येईल असे आश्वासन दिलेले आहे. तशी इतिवृत्तातही नोंद झालेली आहे. संबंधितावर प्रशासनाने पोलिस गुन्हा दाखल केलेला आहे काय? आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे. खुलासा करावा.

तसेच दुसऱ्या एका महापालिकेच्याच जागेवर एका व्यक्तीने लाकडाची वखार केलेली आहे. व सदर जागेचे ले-आऊट मंजूर करून घेतलेले आहे. स्वतःच्या नावाने पी.आर.कार्ड काढून ती जागा दुसऱ्याला विकलेली आहे. तेंव्हा महापालिकेचे अधिकारी साइट तपासणी करून ले-आऊट मंजूर करतात का नाही अशा अधिकाऱ्यांवर मा. आयुक्त यांनी काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : खुलासा करण्यासाठी अधिकारी सभागृहात उपस्थित नाही. याबाबतचा खुलासा पुढच्या बैठकीत संबंधित अधिकारी यांनी द्यावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : स. सदस्य यांनी मागील बैठकीत या संदर्भात चर्चा केलेली होती. कार्यवाही करण्याचे आश्वासन दिलले होते. काय कार्यवाही केलेली आहे. खुलासा करावा.

श्री. मोसीन अहमद : संबंधित व्यक्तीने ती जागा दुसऱ्याला विकलेली आहे. त्यांच्यावर पोलिस केस करण्यास प्रशासनास काय अडचण निर्माण होत आहे.

श्री. रशिद खॉन (मामू) स. सदस्य तसेच सभागृहाने महापालिकेच्या खुल्या जगोवर झालेल्या अतिक्रमण संदर्भात मागील बैठकीत बऱ्याच वेळा चर्चा केलेली आहे. त्यावेळी कार्यवाही करण्याचे आश्वासन दिलले होते. प्रशासनाच्या माध्यमातून संबंधित व्यक्तीवर पोलिस गुन्हा दाखल करण्यास काय हरकत आहे.

मा. महापौर : या संदर्भात मा. महापौर यांच्या दालनात बैठक घेतली होती. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने कार्यवाही करता आलेली नाही. दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री. मोहसीन अहमद : एक प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे पण दुसरे जागेवर एका व्यक्तीने स्वतःच्या नावावर पी.आर.कार्ड काढून दुसऱ्याला ती जागा विकलेली आहे. त्या संदर्भात कुणाच्या सम्मतीने पी.आर.कार्ड वरील नांव बदलते महापालिकेने कसा ले-आऊट मंजूर केला याबाबत संबंधित अधिकारी यांच्यावर आतापर्यंत काय कार्यवाही केली.

श्री. प्रदिपकुमार जैस्वाल : ज्या अधिकाऱ्यांनी ले-आऊट मंजूर केला त्या अधिकाऱ्यावर प्रशासनाच्या माध्यमातून काय कार्यवाही करण्यात आली खुलासा करावा.

मा. महापौर : सदर प्रकरणात महापालिकातील त्यावेळचे कार्यरत असलेले अधिकारी यांच्यावर मा. आयुक्तांनी कायदेशिर कार्यवाही करावी. संबंधित व्यक्तीला दिलेले पी.आर.कार्ड संदर्भात सिटी सर्व्हे कार्यालयास कळवून पी.आर.कार्ड

रद्द करण्याची कार्यवाही करावी. तसेच ज्यांनी ती जागा दुसऱ्यांला विकली त्यांच्यावरही प्रशासनाच्या माध्यमातून कडक कार्यवाही करण्यात यावी. तसेच खिंवसरा यांच्या जमिनीच्या आरक्षणाच्या आरक्षणाच्या संदर्भात ४०%-६०% प्रमाणे मंजूर करण्यात येते.

**ठराव क्र. २१०/१ :**

दिनांक १८/०१/९९ च्या इतिवृत्तातील .....

१ ठराव क्र. २०२/३ मध्ये "अ" नुसार ३०% -७०% जमीन आरक्षण वगळण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे तसेच ठरावातील इतर ठिकाणी ३०%-७०% आहे त्याऐवजी वरील आरक्षण वगळण्यासाठी ४०%-६०% प्रस्तावित जमीन दुरुस्तीसह महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये वगळून शासन मान्यता प्राप्त झाल्यावरच मिळकतधारक विकास परवानगी देण्यात येईल. अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

२ दिनांक १८/०१/९९ च्या सभेत मंजूर करण्यात आलेला ठराव क्र. २०३/४ सर्वानुमते स्थगिती ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.

वरील प्रमाणे दर्शविलेल्या दुरुस्तीसह दि. १२/०१/९९ व १३/०१/९९ ची विशेष सर्वसाधारण सभा व दिनांक १८/०१/९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २११/२ :**

स्थायी समिती ठराव क्र. ४४६ दिनांक ०८/१/९९ अन्वये सन १९९९-२००० या वित्तीय वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता वरील मालमत्ता कराचे खालील दर्शविलेल्या दराने मालमत्ता कर आकारणी करण्यांस सर्वानुमते मंजुरी देवून सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

**अ. महानगरपालिकेचे दर**

| अ.क्र. | कराचे नांव | सन १९९९-२००० चे प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | | |
| | | ०१ ते ०१००० | २३% |
| | | १००१ ते ०१,००० | २४% |
| | | १०,००१ ते ०२०,००० | २५% |
| | | २०,००१ ते ०५०,००० | ३०% |
| | | ५०,००१ ते १,००,००० | ३३% |
| | | १,१०,००० ते पुढे | ३५% |
| २. | साफसफाई कर | | |
| | अ) निवासी वापर | ०१ ते ०१००० | ०३% |
| | ब) निवासेत्तर वापर | १००१ ते ०१,००० | ०८% |
| ३. | वृक्षदर | १०,००१ ते ०२०,००० | १.५% |
| ४. | अग्निशमन कर | २०,००१ ते ०५०,००० | १.५% |
| ५. | म.न.पा. शिक्षण कर | ५०,००१ ते १,००,००० | १.५% |
| ६. | पथ कर | १,१०,००० ते पुढे | ०२% |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | जलनि:सारण कर | -//- | १.५% |
| ८. | जललाभ कर | -//- | १.५% |
| ९ | मोकळ्या जागेचा कर सामान्य कराचे दराने आकारण्यात येईल | | |

तसेच राज्य शिक्षण कर, राजगार हमी उपकर व मोठ्या निवासी क्षेत्रा वरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दरा प्रमाणे कर योगय मुल्यावर आकारण्यात येतील.

तरी सर्वसाधारण सभेच्या निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : बजेट मिटींग मध्ये घ्यावे.

श्री. प्रदिप जैस्वाल : विषय क्र. २,३,४ अर्थसंकल्पाच्या संदर्भाने असलयाने स्थायी समितीकउे पाठविण्यात यावे.

श्री. नरेंद्र पाटील : विषय क्र. २,३,४ स्थायी समितीकडे पाठवतांना मागील तीन वर्षापूर्वीचे मालमत्ता दर काय होते व इतर कर कसे लावण्यात येत असे याबाबतची सविस्तर माहिती प्रस्तावात दर्शविण्यात यावी. सदर प्रस्ताव १९९९-२००० मध्ये दर ठेवण्याबाबतची माहिती प्रस्तावित केलेली आहे. अशी तोटक माहिती ठेवल्यानंतर त्यात स. सदस्यांना काही कळत नाही.

श्री. गिरजाराम हाळनोर :विषय क्र. २,३,४ वर चर्चा करून मंजुरी द्यावी सदर प्रस्ताव फेब्रुवारी अखेर मंजूर करून शासनाकडे पाठवावयाचे असल्याने याच सभेत निर्णय घ्यावा.

मा. महापौर : विषय क्र. २,३,४ वर मा. आयुक्त खुलासा करतील.

मा. आयुक्त : विषय क्र. २,३,४ हे मालमत्ता कराच्या संदर्भात असून पुढील आर्थिक वर्षाचे करा संदर्भात असून सभागृहासमारे मंजुरीसाठी सादर केलेले आहे. कलम ९९ नुसार २० फेब्रुवारी पूर्वी सर्वसाधारण सभेने मंजुर करणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर केलेले होते त्या मान्यता देऊन सर्वसाधारण सभेसमारे मान्यतेसाठी ठेवण्यात आलेले आहे. विषय क्र. २,३,४ ला मंजुरी द्यावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : दर वर्षी कर वाढ करण्या संदर्भात मंजुरी घ्यावी लागते काय? प्रस्तावामध्ये गत तीन वर्षीचे दर काय होते याबाबत सविस्तर माहिती द्यावयास पाहिजे होती. कर वाढ मान्य नाही. अर्थसंकल्पात याचा समावेश करावा.

श्री. रशिद खॉन (मामू): प्रत्येक वर्षाला कर वाढ केली किंवा कसे या बाबतचा प्रस्ताव मंजूर करून शासनाकडे पाठवावे लागतात याबाबत २० फेब्रुवारीच्या आत मंजुरी देणे आवश्यक आहे.

श्री. मोहसीन अहेमद : गेल्या वर्षाचे जे दर होते तेच या वर्षासाठी राहू द्यावे असे सभागृहाचे मत आहे. परंतु गेल्या तीन वर्षापासून सामान्य कर व इतर कर कशा प्रकारे लावण्यात येत असे याबाबत सविस्तर माहिती अे.बी.सी. डी. प्रमाणो या प्रस्तावात प्रस्तावित करावयास पाहिजे होती. शहरातील ८१-८३ च्या जुन्या इमारती यांच्यासाठी दर कमी करण्यांत आले आहे किंवा काय याबाबतचीही सविस्तर माहिती या सोबत असावयास पाहिजे होती.

श्री. प्रदिप जैस्वाल : मागील ३ वर्षाचे जे दर आहेत तेच ठेवावे असे माझी विनंती असून सामान्य कराची वाढ केलेली होती. परंतु स्थायी समितीने मागचाच दर मंजूर केला.

श्री. नरेंद्र पाटील : मागील वर्षाचे जे दर काय होत प्रस्तावात करावयास पाहिजे होते. मागील वर्षाच्या जे दर लावण्यात आले होते ते लावण्यात यावे.

श्री. जावेद रज्जाक : सदर दर वाढ करण्याच्या संदर्भात स्थायी समितीकडे निर्णय झालेला असून पुन्हा सभागृहात चर्चा होऊ लागली आहे. ९७-९८ मध्ये हे दर होते काय खुलासा करावा.

मा. आयुक्त : १९९९-२००० मध्ये मालमत्ता कर लावण्या संदर्भात स्थायी समितीत शिफारस करून मंजूर केलेले आहे. मागील वर्षाचे किती दर होते त्या बाबत माहिति पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | कराचे नांव | सन १९९९-२००० चे प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|
| १. | **सामान्य कर** | | |
| | ०१ ते ०१००० | २३% | २३% |
| | १००१ ते ०१,००० | २४% | २४% |
| | १०,००१ ते ०२०,००० | २५% | २५% |
| | २०,००१ ते ०५०,००० | २७% | ३०% केलेले आहे. |
| | ५०,००१ ते १,००,००० | २८% | ३३% केलेले आहे. |
| | १,१०,००० ते पुढे | २९% | ३५%केलेले आहे |
| २. | **साफसफाई कर** | | |
| | अ) निवासी वापर | ३% | ०३% आहे तोच |
| | ब) निवासेत्तर वापर | ६% | १.५% |
| ३. | वृक्षदर | १% | १.५% |
| ४. | अग्निशमन कर | १% | १.५% |
| ५. | म.न.पा. शिक्षण कर | १% | १.५% |
| ६. | पथ कर | १% | ०२% |
| ७. | जलनि:सारण कर | १% | १.५% |
| ८. | जललाभ कर | १% | १.५% |
| ९ | मोकळ्या जागेचा कर सामान्य कराचे दराने आकारण्यात येईल यास स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. काय निर्णय घ्यावयाचा तो सभागृहाने घ्यावा. | | |

श्री. संजय जोशी : स्थायी समितीमध्ये कोणत्याही प्रकारची कर वाढ करण्यात आली नाही.

श्री. जयवंत ओक : स्थायी समितीमध्ये १६ सभासदांच्या निर्णयानुसार कोणत्याही प्रकारची कर वाढ करावयाची नाही असे ठरविण्यात आले आहे. कर वाढ करण्यात येऊ नये.

श्री. गौतम लांडगे : स्थायी समितीमध्ये कोणत्याही प्रकारची कर वाढ करण्यात आलेली नाही.

श्री. संजय जोशी, श्री. काशिनाथ कोकाटे : स्थायी समितीमध्ये कोणतयाही प्रकाराच्या कर वाढ केलेली नसून प्रस्तावात चुकीने दाखवलेला आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मागच्या वर्षी जो कर होता. तोच कायम ठेवण्यात यावा.
मा. आयुक्त : सदर कर वाढ ९९-२००० साठी असून सभागृहाने चर्चा करून निर्णय घ्यावा.
मा. महापौर : विषय क्र. २ मध्ये मागील वर्षाच्या दरप्रमाणे कर आकारण्यात यावे. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. २११/२ :**

| अ.क्र. | कराचे नांव | सन १९९९-२००० चे प्रस्तावित दर | |
|---|---|---|---|
| १. | **सामान्य कर** | | |
| | | ०१ ते १००० | २३% |
| | | १००१ ते १,००० | २४% |
| | | १०,००१ ते ०२०,००० | २५% |
| | | २०,००१ ते ०५०,००० | २७% |
| | | ५०,००१ ते १,००,००० | २८% |
| | | १,००,००० ते पुढे | २९% |
| २. | **साफसफाई कर** | | |
| | अ) निवासी वापर | | ०३% |
| | ब) निवासेत्तर वापर | | ०६% |
| ३. | वृक्ष कर | | १% |
| ४. | अग्निशमन कर | | १% |
| ५. | म.न.पा. शिक्षण कर | | १% |
| ६. | पथ कर | | १% |
| ७. | जलनि:सारण कर | | १% |
| ८. | जललाभ कर | | १% |
| ९ | मोकळ्या जागेचा कर सामान्य कराचे दराने आकारण्यात येईल | | |

तसेच राज्य शिक्षण कर, राजगार हमी उपकर व मोठ्या निवासी क्षेत्रा वरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दरा प्रमाणे कर योगय मुल्यावर आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१२/३ :**

स्थायी समिती ठराव क्र. ४४७/दि. ०८/०१/९९ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण कलम ९९ अन्वये सन १९९९-२००० या वित्तीय वर्षासाठी हॉटेल्सच्या मोकळ्या जागांना निवासेत्तर "ड" प्रकारचे दर रु. ४.८४ प्रति चौ. मी. प्रति महा अपेक्षित दराने लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येवून सर्वसाधारण सभेकडे शिफारस केली आहे.

तरी सर्वसाधारण सभेच्या निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

श्री. मोहसीन अहमद : ४.८४ ऐवजी १०/- करावे

मा. आयुक्त : मागच्या वर्षी मोकळ्या जागांना रु. ४.८४ प्रति चौ. मी प्रती महा यात वाढ करू शकता ४.८४/- ऐवजी ५ करावी.

मा. महापौर : ४.८४ ऐवजी ५/- रु. वित्तीय वर्षासाठी हॉटेल्सच्या मोकळ्या जागांना निवासेत्तर "ड" प्रकारचे कर आकारण्यात यावे.
प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. २१२/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण कलम ९९ अन्वये सन १९९९-२००० या वित्तीय वर्षासाठी हॉटेल्सच्या मोकळ्या जागांना निवासेत्तर "ड" प्रकारचे दर रु. ५=०० प्रति चौ. मी. प्रति महा अपेक्षित दराने लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१३/४ :**

स्थायी समिती ठराव क्र. ४४८ दिनांक ०८/०१/९९ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना नविन कर आकारणी करतांना स्वत: वापरातील वेगवेगळ्या बांधकाम प्रकाराप्रमाणे ठरलेल्या दराने कर आकारणी करण्यात येते. प्रस्तावित दराने कर आकारणीत कोणतीही वाढ न करता सन १९९८-९९ करिता लागू असलेले खालील दर सन १९९९-२००० वर्षा करिता लागू करण्यास सर्वानुमते मंजुरी देवून सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

सन १९९९-२००० करिता प्रस्तावित दर खालील प्रमाणे

| बांधकामाचा वर्ग | निवासी ९९-२००० | निवासेत्तर ९९-२००० |
|---|---|---|
| "अ" | ४.८४ | ११.३० |
| "ब" | ३.७६ | ०९.१४ |
| "क" | ३.२२ | ०६.४५ |
| "ड" | १.६१ | ०४.८४ |

वरी सर्वसाधारण सभेच्या निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

मा. महापौर : मंजूर करण्यात येतो.१९९८-९९ च्या दराप्रमाणे कर आकारण्यात यावे.

**ठराव क्र. २१३/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिका क्षेत्रातील नवीन मालमत्तांना कर आकारणी करतांना प्रस्तावित दरात कोणतीही वाढ न करता सन ९९-२००० या वित्तीय वर्षाकरिता खालील दर लागू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| बांधकामाचा वर्ग | निवासी ९९-२००० | निवासेत्तर ९९-२००० |
|---|---|---|
| "अ" | ४.८४ | ११.३० |
| "ब" | ३.७६ | ०९.१४ |
| "क" | ३.२२ | ०६.४५ |
| "ड" | १.६१ | ०४.८४ |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१४/५ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुकत यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर केला की, मनपाच्या वाचनालय, व्यायाम शाहा, सांस्कृतिक हॉल, क्रीडा संकलू, मंगल कार्यालय इत्यादी इमारती भाडे तत्वावर वापरण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने खालील नियमावली निश्चित करण्यात आली.

१) ज्या संस्थेला इमारत भाड्याने घ्यावयाची असेल ती संस्था धर्मादाय आयुक्त किंवा सहकार निंबधक मार्फत पंजिकृत असणे आवश्यक आहे.

२) रितसर अर्ज संस्था प्रमुखांनी मा. आयुक्तांच्या नावे केला असावा अर्जामध्ये संदर्भिय इमारत कोणत्या करणासाठी (हेतुसाठी) वापरली जाणार आहे यांचा स्पष्ट उल्लेख असावा. इमारतीचा वापर ज्या लाभार्थीसाठी होणार आहे त्याचा उल्लेख अर्जदाराने स्पष्टपणे केलेला असावा. या इमारतीत स्थानिक नागरिकांना त्रास होईल असा कोणताही कार्यक्रम करता येणार नाही.

३) संदर्भिय इमारत ज्या कारणासाठी बांधलेली आहे त्या कारणासाठी इमारत भाड्याने देण्यांत येईल. उदा. वाचनालयासाठी बांधलेली इमारत वाचनालयासाठीच वापरली जावी.

४) मनपाच्या इमारतीचे किमान भाडे (कार्यालयीन दृष्टीकोन न ठेवता) भाडे समितीद्वार योग्य निकष लाऊन निश्चित करण्यात येईल. यासाठी व्यापारी दृष्टीकोणातून विचार करू नये.

५) इमारतीचे किमान भाडे निश्चित झाल्यावर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जास्तीत जास्त भाड्याची बोली बोलण्या संदर्भात अर्जदारांना बोलावण्यात येईल.

६) जास्तीत जास्त भाडे देण्याची ज्या संस्थेची तयारी असेल त्या संस्थेस करारनामा करून घेऊन पाच वर्ष मुदतीसाठी इमारत भाड्याने देण्यात येईल.

७) या पाच वर्षात केव्हाही मुदतीपूर्वी संस्थेने अर्जात नमूद केल्याप्रमाणे योग्य रितीने कामकाज चालत नसेल तर मनपा ती इमारत संस्थेकडून काढून घेईल. आणि पर्यायी व्यवस्था करील.

८) इमारतीचा दुरपयोग होत असल्याचे आढळून आल्यास संबंधितावर योग्य ती दांडात्मक कार्यवाही करण्यात येऊन पुन्हा मनपा आपल्या ताब्यात इमारत घेईल. अर्जामध्ये नमूद केलेल्या निश्चित वेळेतच इमातरीचा वापर केला जाईल याची काळजी संस्थेने घ्यावी.

९) सामाजिक कार्यासाठी संदर्भिय इमारतीचा वापर व्हावा.

१०) इमारतीमध्ये पोट भाडेकरू ठेवले जाऊ नये.

११) वापराच्या काळात इमारतीस काही नुकसान झाल्यास संबंधित संस्थेस जबाबदार धरण्यात येईल, तसेच इमारत आणि इमारतीचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

१२) एक वर्षाचे आगावू भाडे मनपा कडे भरावे लागेल. दर वर्षी भाड्याच्या रक्कमेत ५% वाढ करण्यात येईल.

१३) मालमत्ता कर संबंधित संस्थेकडून वसूल कण्यांत येईल. देखभालीच्या काळात वीज व पाणी यांचे बील संदर्भिय संस्थेस भरावे लागेल. त्याच सोबत रंगरंगोटी, किरकोळ दुरुस्ती मनपाची परवानी घेऊन करता येईल.

तरी मनपाच्या मालमत्तेचा योगय वापर होणेस्तव वरील नियमावलीनुसार प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री. गिरजाराम हाळनोर :

१. प्रस्तावातील अ.क्र. १ मध्ये ज्या संस्था धर्मादाय आयुक्त, सहकार निबंधक यांच्या पंजिकृत असेल तर त्यांना वापरण्यास द्याव्यात जर त्या संस्थांचा वापरासाठी नकार असेल तर इतर संस्थांना देण्यात यावे.

२. प्रस्तावातील अ.क्र. १२ मध्ये संस्थांना दर वर्षी भाड्यामध्ये ५% वाढ असे दर्शविण्यात आलेले आहे. त्या ऐवजी ४% ठेवण्यात यावे.

३. अ.क्र. १३ मध्ये मालमत्ता कर बाबत सुचवलेले असून मालमत्ता कर वसूल करु नये कारण ती मालमत्ता आपल्या मालकीची असते, मालमत्ता कर वसूल करु नये इ. दुरुस्ती करण्यात यावी.

मा. महापौर : मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. २१४/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या समितीचे शिफारशीनुसार खालील अटीवर महापालिकेच्या वाचनालय, व्यायाम शाळा, सांस्कृतिक हॉल, क्रीडा संकलू, मंगल कार्यालय, इत्यादी इमारती भाडे तत्वावर वापरण्यासाठी देण्यात येते.

१) ज्या संस्थेला इमारत भाड्याने घ्यावयाची असेल ती संस्था धर्मादाय आयुक्त किंवा सहकार निंबधक मार्फत पंजिकृत असणे आवश्यक आहे.

२) रितसर अर्ज संस्था प्रमुखांनी मा. आयुक्तांच्या नावे केला असावा अर्जामध्ये संदर्भिय इमारत कोणत्या करणासाठी (हेतुसाठी) वापरली जाणार आहे यांचा स्पष्ट उल्लेख असावा. इमारतीचा वापर ज्या लाभार्थीसाठी होणार आहे त्याचा उल्लेख अर्जदाराने स्पष्टपणे केलेला असावा. या इमारतीत स्थानिक नागरिकांना त्रास होईल असा कोणताही कार्यक्रम करता येणार नाही.

३) संदर्भिय इमारत ज्या कारणासाठी बांधलेली आहे त्या कारणासाठी इमारत भाड्याने देण्यांत येईल. उदा. वाचनालयासाठी बांधलेली इमारत वाचनालयासाठीच वापरली जावी.

४) मनपाच्या इमारतीचे किमान भाडे (कार्यालयीन दृष्टीकोन न ठेवता) भाडे समितीद्वारे योग्य निकष लाऊन निश्चित करण्यात येईल. यासाठी व्यापारी दृष्टीकोणातून विचार करू नये.

५) इमारतीचे किमान भाडे निश्चित झाल्यावर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जास्तीत जास्त भाड्याची बोली बोलण्या संदर्भात अर्जदारांना बोलावण्यात येईल.

६) जास्तीत जास्त भाडे देण्याची ज्या संस्थेची तयारी असेल त्या संस्थेस करारनामा करून घेऊन पाच वर्ष मुदतीसाठी इमारत भाड्याने देण्यात येईल.

७) या पाच वर्षात केव्हाही मुदतीपूर्वी संस्थेने अर्जात नमूद केल्याप्रमाणे योग्य रितीने कामकाज चालत नसेल तर मनपा ती इमारत संस्थेकडून काढून घेईल. आणि पर्यायी व्यवस्था करील.

८) इमारतीचा दुरपयोग होत असल्याचे आढळून आल्यास संबंधितावर योगय ती दांडात्मक कार्यवाही करण्यात येऊन पुन्हा मनपा आपल्या ताब्यात इमारत घेईल. अर्जामध्ये नमूद केलेल्या निश्चित वेळेतच इमारतीचा वापर केला जाईल याची काळजी संस्थेने घ्यावी.

९) सामाजिक कार्यासाठी संदर्भिय इमारतीचा वापर व्हावा.
१०) इमारतीमध्ये पोट भाडेकरू ठेवले जाऊ नये.
११) वापराच्या काळात इमारतीस काही नुकसान झाल्यास संबंधित संस्थेस जबाबदार धरण्यात येईल, तसेच इमारत आणि इमारतीचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी संस्थेची राहील.
१२) एक वर्षाचे आगावू भाडे मनपा कडे भरावे लागेल. दर वर्षी भाड्याच्या रक्कमेत ५% वाढ करण्यात येईल.
१३) मालमत्ता कर संबंधित संस्थेकडून वसूल कण्यांत येईल. दखभालीच्या काळात वीज व पाणी यांचे बील संदर्भिय संस्थेस भरावे लागेल. त्याच सोबत रंगरंगोटी, किरकोळ दुरुस्ती मनपाची परवानी घेऊन करता येईल.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१५/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वीर सावरकर चौक ते जवाहर कॉलनी पोलिस स्टेशन या ८० डी. पी. रस्त्याच्या दुभाजकावर लोखंडी ग्रिल बसविणेच्या कामासाठी सन १९९७-९८ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या जिल्हा दर सूची दराने अंदाजपत्रक रक्कम रुपये १४,२१,४००=०० चे तयार करण्यात आले असून सदरील काम शासकीय अनुदान सन १९९७-९८ च्या आर्थिक तरतुदी मधून प्रस्तावित आहे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. अफसर खॉन : सदर प्रस्तावाच्या संदर्भाने मागे १ कोटी रुपयाचे काम केलेले होते. त्यात भ्रष्टाचार झालेला आहे. म्हणून विभागीय आयुक्त यांच्याकडे चौकशी साठी प्रकरण गेलेले असून त्याबाबत एक पत्र दिलेले होते. त्यासंबंधी माहिती अद्यापपर्यंत मिळालेली नाही. १ कोटीमध्ये ४० लाखाचा भ्रष्टाचार झालेला आहे. सदर प्रकरणाबाबतचा काही अंतिम निर्णय लागलेला नसून पुन्हा तशाच प्रकारचा प्रस्ताव सभागृहात मंजुरीसाठी आलेला आहे.

श्री. संजय जोशी : दोन्ही विषय हे वेगवेगळे असून मंजुरी देण्यात यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : विरोधी पक्ष नेता यांनी कुठल्या तरी कामा संदर्भात भ्रष्टाचार झालेला आहे. त्याबाबतची खुलासा विचारलेला आहे. ती पुढच्या बैठकीत द्यावा. सदरचा विषय मंजूर करावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : रस्त्याच्या दुभाजकावर दोन्ही बाजूने ग्रिल बसविणार की एकाच बाजूने.

श्री. अफसरखॉन : या कामास माझा विरोध नाही. यापूर्वी जी कामे झालेली आहे. त्यासंदर्भात मी बोलत होतो.

श्री. रशिद खॉन (मामू) : अशाच प्रकारच्या कामा संदर्भात ६० लाखाचे काम असतांना १ लाखापर्यंत झालेले आहे. त्यात ४० लाख भ्रष्टाचार झाला त्याबाबत विभागीय आयुक्त यांचेकडे चौकशी चालू आहे. त्यांचा अंतिम निर्णय येईपर्यंत असे प्रस्ताव सभागृहात मंजुरीसाठी आणू नये विरोधी पक्षनेता यांचे म्हणणे आहे.

मा. महापौर : श्री. अफसर खॉन, विरोधी पक्ष नेता यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचा त्यांनी दिलेल्या पत्राचा खुलासा पुढील बैठकीत खुलासा करावा. विषय क्र. ६ मंजूर करण्यात येतो.

**ठराव क्र. २१५/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वीर सावरकर चौक ते जवाहर कॉलनी पोलिस स्टेशन या ८० डी.पी. रस्त्याच्या दुभाजकावर लोखंडी ग्रील बसविण्याच्या कामासाठी रककम रु. १४,२१,४०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१६/७ :**

कार्यकारी अभियंता, (पा.पु.व. ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्क मिल कॉलनी येथे नालयास संरक्षित भिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १९,७८,४००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग ह्यांच्या सन १९९७-९८ च्या दरसूची प्रमाणे तयार करण्यात आले आहे.

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. अविनाश कुमावत : या प्रस्तावाबाबत खुलासा करावा. हे काम कोणत्या लेखाशिर्ष मधून करून घेण्यात येणार आहे.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : सिल्कमिल कॉलनी येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी या वर्षासाठी १ कोटीच्या रिटेनींग वॉल बांधणे या सत्राखाली तरतूद केली होती त्यातून हे काम करण्यात येणार आहे.

श्री. संजय जोशी : हा प्रस्ताव मंजूर करण्यात माझा विरोध नाही. परंतु गेल्या पावसाळ्यामध्ये माझ्या वॉर्डामध्ये पूल वाहून गेला ते बांधणेच्या कामाबाबत पत्र दिलेले होते. बजेट नाही म्हणून सांगण्यात आले. याचा अर्थ मुद्दामहून माझ्या वॉर्डातील संरक्षित भिंतीचे काम केलेले नाही या कामासाठी कुठून बजेट आले खुलासा करावा.

कार्य. अभि. (पा.पु.) : ९८-९९ च्या बजेटमध्ये १ कोटीची तरतूद होती त्यातून हे काम करण्यात येणार आहे.

श्री. संजय जोशी : प्रस्तावात ९७-९८ चे दर सुचीनुसार दर्शविलेले असून मुद्दामहून काम माझ्या वॉर्डातील केलेले नाही. १००% मालमत्ता कर देणारा माझा वॉर्डा असून तेथील कामे व्यवस्थित व वेळेवर केली जात नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : ज्या स. सदस्यांनी अगोदर पत्र दिलेले आहे. त्या पत्राच्या संदर्भात अगोदर त्याच स. सदस्यांच्या वॉर्डामध्ये काम व्हावयास पाहिजे. काही वॉर्डातील कामासाठी बजेट नाही म्हणून अधिकारी सांगतात. काही वॉर्डातील त्याच संदर्भातील प्रस्ताव सभागृहात मंजुरीसाठी घेवून येतात हे धोरण योग्य नसून याची सर्व अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

श्री. म.अ. रुऊफ : माझ्या वॉर्डातील ही बजेट नाही म्हणून सांगण्यात आले. कामे केलेले नाही.

कार्य.अभि.पा.पु. : स. सदस्य श्री. जोशी यांच्या वॉर्डात दोन ठिकाणी रिटेलींग वॉल बांधण्याचे काम सध्या चालू असून रु. १० लाखाच्या वरिल कामे सर्वसाधारण सभेला पाठवण्यात येतात व रु. १० लक्षाच्या आतिल अंदाजपत्रके स्थायी समिती कडे मंजुरी घेवून कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. नरेंद्र पाटील : हा प्रस्ताव मंजूर करून स. सदस्य श्री. जोशी यांच्या वॉर्डातील कामासंदर्भात पुढच्या बैठकीत मंजुरी घेऊन कार्यवाही करावी.

मा. महापौर : सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यता येऊन अशाच कामा संदर्भात ज्या-ज्या स. सदस्यांनी पत्र दिलेले आहे. त्या-त्या पत्राच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी यांनी त्या-त्या वॉर्डातील संरक्षित भिंतीच्या कामाचे बाबतचे प्रस्ताव मंजुरीसाठी आणून येत्या अर्थ संकल्पामधून सदरील कामे करण्याची कार्यवाही संबंधित अधिकारी यांनी करावी.

**ठराव क्र. २१६/७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्कमील कॉलनी येथे नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रक्कम रु. १९,७८,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१७/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक एस.ए.ओ-३१९६/२७९८४/(३२०)/९६ प्रशा-२ मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२,दि. १० ऑक्टोंबर १९९६ नुसार श्री. एस.जी. देशमुख यांची शिक्षणाधिकारी, औरंगाबाद महानगरपालिका यापदावर आदेशा सोबातच्या अटी व शर्ती प्रमाणे प्रतिनियुक्ती करण्यांत आलेली आहे.

श्री.एस.जी. देशमुख हे "शिक्षणाधिकारी" या पदावर दि. ११/०२/९९ रोजी प्रथमतः रुजू झालेले आहेत.

महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.२९/२६ दि. ३१/०५/९७ नुसार दि.११/०२/९७ पासून प्रथमतः एक वर्षासाठी व महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. १८३/६ दि. २७/०३/९८ नुसार दि.११/०२/९८ पासून पुढील एक वर्षाकरिता औरंगाबाद महानगरपालिका येथील प्रतिनियुक्ती शासन आदेशा सोबतच्या अटी व शर्ती नुसार मंजूर करण्यात आलेला आहे. हा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक १०/०२/९९ रोजी संपत आहे.

करिता श्री. एस. जी. देशमुख यांना दिनांक ११/०२/९९ पासून पुढील एक वर्षाकरिता शासन आदेशातील अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढवून देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. अफसर खॉन : मा. शिक्षणाधिकारी यांना मागील वर्षीच्या बैठकीत मुदतवाढ देतांना फक्त एकच वर्षासाटी मुदतवाढ देण्यात येणार असून पुढच्या वर्षी म्हणजेच सध्याची मुदतवाढ ही देण्यात येणार नाही. असे सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला होता. शिक्षणाधिकारी यांनी एक वर्षाची सेवा संपलेली असून त्यांना त्यांच्या सेवेतून पाठवण्यात यावे. मुदवाढ देण्यात येऊ नये. संबंधित अधिकारी हे अकार्यक्षम असून मुलांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. ज्या शाळेत शिक्षक पाहिजे. तया शाळेत शिक्षक नाहीत. महापालिकेच्या शाळेसंबंधी वृत्तपत्रात देण्याचा निर्णय घेऊ नये घेतल्यास न्यायालयात या बाबत दाद मागवावी लागेल. खरे तर हा प्रस्ताव सभागृहात मंजुरीसाठी आणावयास नको होता. प्रस्ताव रद्द करण्यात यावा. मा. महापोर चुकीचे निर्णय घेऊन नये. शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या सेवेत पुन्हा पाठवण्यात यावे. असा सर्वसाधारण सभेचा मागील वर्षी मुदतवाढ देतांना निर्णय झालेला होता. मुलांचे शैक्षणिकदृष्ट्या नुकसान होत आहे. मा. महापौर यांनी स्वतःच्या

अधिकारात असलेले कोणतेही चुकीचे निर्णय सभागृहात घेणे हे सभागृहाच्या विरुध्द आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : मा. प्रशासनाला शैक्षणिक दृष्ट्या अडचण येत असेल तर शिक्षणाधिकारी यांना ६ महिण्यासाठी पुढील मुदतवाढ देण्यात यावी.

श्री. अफसर खॉन : ६ महिण्यासाठी मुदतवाढ न देता ३ महिण्यासाठी देण्यात यावी तोपर्यंत हे शैक्षणिक वर्ष संपते मुलांच्या भवितव्याचा प्रश्न आहे.

श्री. जयवंत ओक : स. सदस्य श्री. अफसर खॉन यांनी संबंधित अधिकाऱ्यावर आरोप केलेला असून ते अकार्यक्षम नाहीत त्यांनी महापालिकेच्या सेवेत आल्यापासून कितीदा त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप या प्रशासनाने सिध्द केलेले आहेत. प्रशासनाने तसे सिध्द करावे. अधिकाऱ्यांवर तडकाफडकी आरोप करणे हे सभागृहाला अशोभणिय असून अधिकाऱ्यावर बोलतांना त्याचा मान राखून बोलावे. या अगोदरचे शिक्षणाधिकारी या अधिकाऱ्यापेक्षा जास्त कालावधी या महापालिकेच्या सेवेत कार्यरत होते. जे भ्रष्टचार करूत होते ते या सभागृहाला मान्य होते. यांनी काही भ्रष्टाचार केला असेल तर यांच्या वरही कार्यवाही व्हावी.

(याच वेळी सभागृहात मोठमोठ्याने बोलणे चालू असते. काहीही ऐकू येत नाही.)

श्री. अफसर खॉन : शिक्षण अधिकारी हे भ्रष्टाचारी आहे असे मी सांगितलेले नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : सभागृहाच्या भावना लक्षात घेता शिक्षणाधिकारी यांना ६ महिण्यासाठी पुढील मुदतवाढ देण्यात यावी.

मा. महापौर : शिक्षणाधिकारी यांना ६ महिण्याची पुढील मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. २१७/८ :**

प्रस्तावत दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक एस.अे.ओ-३११६/२७९८४/(३२०)/९६/ प्रशा-२ दि. १० ऑक्टोंर १९९६ नुसार प्रथम नेमणूक करण्यात आलेली शिक्षणाधिकारी श्री. एस. जी. देशमुख यांना सभागृहातील चर्चेनुसार दिनांक ११/०२/९९ पासून पुढील एक वर्षाऐवजी सहा महिन्याकरिता शासन आदेशतील अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्ती कालवधी वाढवून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१८/९ :**

जकात अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकाचे जकात दर दिनांक ३१ मार्च १९८४ पासून शासनाच्या मंजुरी अनुसार अंमलात आहेत. तद्नंतर सन १९९६-९७ मध्ये जकात दर अनुसूची "ओ" मधील २५ वस्तुवर जकात दरवाढ सुचवून त्यास शासनाची मंजुरी घेण्यात येऊन दि.१०/०६/९७ पासून एकूण २५ वस्तुवर वाढीव दराने व उर्वरित ६१ वस्तुंवर जुन्याच दराने जकात महसूल उत्पन्न प्राप्त केले जात आहे.

सुधारित जकात दर अनुसची "ओ" मधील वस्तुच्या बाबीवर सन १९८४ पासून सन १९९८ पर्यंत कोत्याही स्वरुपाची जकात दरात वाढ करण्यात आलेली नाही.

करिता सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात महानगरपालिकेकउे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने गेल्या चौदा वर्षाच्या कालावधीत ज्या वस्तुच्या बाबींवर जकात दरात

वाढ केलेली नाही अशा वस्तुंवर जकात दरात वाढ करणे अपरिहार्य झालेले असून त्यांची मुख्य कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. गेल्या चौदा वर्षाच्या कालावधीत औरंगाबाद शहराची लोकसंख्या व विस्तार झपाट्याने वाढलेला आहे, परंतु त्या दृष्टीने महानगरपालिकेचे उत्पन्न शहराच्या वाढता व्याप व विस्तार यांच्या तुलनेत आवश्यक त्या प्रमाणात वाढ झालेली नाही. यांचे मुख्य कारण असे आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दिलगत असलेले वाळुज चितेगांव व इतर ठिकाणी असलेल्या औद्योगिक क्षेत्राची वाढ झपाट्याने झालेली असून सदर क्षेत्र हे जकात मुक्त आहे. परंतु सदरच्या औद्योगिक क्षेत्रात काम करणारे बहुतांश कर्मचारी व कामगार हे महानगरपालिका हद्दित वास्तव्य करतात.

२. औरंगाबाद महानगरपालिका ही एक स्वायत्त संस्था असल्याने येथे वास्तव्य करित असलेल्या नागरिकांना "नागरी व मुलभूत सेवा व सुविधा" उपलब्ध करून देण्याची संपूर्णतः जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे. विस्तारीत शहराच्या विविध योजनांची कामे प्रति वर्षी महानगरपालिकेस करावी लागतात. त्या दृष्टीने सुध्दा जिल्हा दर सुचिच्या दरात दर वर्षी साधारणतः १०% ते २०% च्या दरम्यान वाढ होत असते त्यामुळे प्रतिवर्षी महानगरपालिके तर्फे विविध कामा अंतर्गत ठेवण्यात येणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कमेत त्या दराने वाढ करून तरतूद करावी लागते ज्यामुळे अशा योजना राबविण्याकरिता अधिक खर्चाचे नियोजन करावे लागते. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या महानगरपालिकेच्या जकात दरात वाढ करणे अनिवार्य आहे.

३. औरंगाबाद शहराचा वाढता व्याप व विस्तार लक्षात घेता महानगरपालिका प्रशासनास लागणाऱ्या कर्मचाऱ्यांनी व्याप्ती सुध्दा वाढलेली आहे. महानगरपालिकेने १ जानेवारी १९९६ पासून कार्यरत कर्मचारी वर्गास पाचवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या खर्चात वाढ होणार आहे. ज्यामुळे नागरिकांना मुलभूत सेवा व सुविधा पुरविण्यास लागणाऱ्या खर्चाच्या नियोजना करिता महानगरपालिकेचे महसूल उत्पन्न वाढविणे आवश्यक असून त्या दृष्टीने जकात दरात सुध्दा वाढ करणे अपरिहार्य झालेला आहे.

आर फॉर्मची सवलत महानगरपालिकेने प्रस्तावित केली असून प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. ही सवलत लागू केल्यास महानगरपालिकेच्या जकात उत्पन्नात रु. २.६५ कोटी घट होणार आहे.

एकूण वजनांवर आधारित दरामध्ये १५ वस्तु वरील दरमुल्यावर आधारित प्रस्तावित करण्यात आले असून त्यापासून महानगरपालिकेस रु. ४० लक्षची जकात उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे. उर्वरित ४२ वस्तु वरील जकात दरवाढ केल्यानंतर साधारणतः ४.५७ कोओी जकात उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे. वरील दोन्ही प्रस्तावित जकात दरवाढ मान्य केल्यास महानगरपालिकेच्या जकात उत्पन्नात एकूण ४.९७ कोटीची वाढ अपेक्षित आहे.

उक्त सर्व बाबींचा साकल्याने विचार करून महानगरपालिका प्रशासनाने सोबत दर्शविलेल्या एकूण ५७ वस्तु वरील दरात अंशतः वाढ प्रस्तावित केलेली आहे.

सदरचा जकात दरात वाढ करीत असतांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४९,४५४,४६९ आणि ४६० अंतर्गतची पूर्तता करणे करिता उक्त महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५९ अन्वये महानगरपालिका

प्रशासना मार्फत सोबत दर्शविल्याप्रमाणे सविस्तर प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमारे विचारार्थ सादर.

**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद**

**(जकात विभाग)**

**जकात दर पत्रकातील ज्या मालावर, वजनावर जकात कर आकारणी करण्यात येते त्याचे विवरण**

**प्रपत्र "अ"**

| अ. क्र. | जकात दर अनुसूचि-तील क्र. | वस्तुचे नांव | प्रचलित जकातीचे दर | प्रस्तावित जकातीचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | १ | अ. धान्य,पीठ,डाळी, भाजलेले धन्य, रवा, मैदा, गव्हाचे पीठ आणि ज्वारी (कण्या) लाह्या, मुरमुरे, फुटाणे पोहे व कडधान्य. | ०.५० पैसे प्रति क्वि. | १.०० पैसे प्रति क्वि. |
| २. | २ | गवत, गवताची कांडी, (पेढी) उुसाचे वाढे कोंडा, कडबा व भुसा (घोड्या करिता वैरण) (पशु खाद्य वगळता) | ०.२० पैसे प्रति क्वि. | ०.५० पैसे प्रति क्वि. |
| ३. | ८ | बर्फ | ०.२० पैसे प्रति १० किलोस | ०.५० पैसे प्रति १० किलोस |
| ४. | १४ | अ. सर्व प्रकारची ताजी फळे | ०.०५ पैसे प्रति १० किलोस | १.००% |
| ५. | १५ | नारळ | १.०० रु. प्रति १०० नगास | २.००% |
| ६. | १७ | अ. ताजे मासे, झिंगे व ताजे मासे. | ०.५० पैसे प्रति क्विं. | १.००% |
| | | ब. शो कुकरींगसाठी वापरण्यात येणारे जिवंत मासे | ०.५० पैसे प्रति १० किलोस | १.००% |
| | | अंडी | ०.५० पैसे प्रति १० किलोस | १.००% |
| ७. | २२ | मेंढ्या, बकऱ्या, कोकरे | ०.५० प्रति नगास | १.०० प्रति नगास |
| ८. | २३ | बैल, म्हशी, गायी, कालवडी, घोडे, गाढव, डुकरे, उंट व हत्ती. | १.०० प्रति नगास | ५.०० प्रति नगास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | २४ | कोंबड्या, बदके, आणि सर्व प्रकारचे पक्षी | ०.२० प्रति नग | ०.५० प्रति नगास |
| १०. | २५ | सर्व प्रकारचे वन्य व पाळीव प्राणी | १.०० प्रति नग | १०.०० प्रति नगास |
| ११. | ३२ | ड. घासलेट (निळे) पांढरे | ०.०२ पैसे प्रति १० लिटर | ०.५०% |
| १२. | ३७ | जळाऊ लाकूड | ०.३० पैसे प्रति १०० किलोस | २.००% |
| १३. | ४२ | अ. खडी दगडाचा चुरा | ५.०० रु. प्रति ट्रक | १०.०० रु. प्रति ट्रक |
| | | ब. माती वाळु, आणि मेटल ब्राबल, डब्बर, मुरुम | ५.०० रु. प्रति ट्रक | १०.०० रु. प्रति ट्रक |
| १४. | ५४ | क. नागवेलीची पाने, (५००) पानाच्या पेटाऱ्यात | ०.१५ पैसे प्रति पेटारा | ०.५०% |
| १५. | ८४ | मळी | १.०० रु. प्रति टनास | ४.००% |

**औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद**
**(जकात विभाग)**
**जकात दर अनुसूची "ओ" दरवाढ प्रस्ताव**

**प्रपत्र "अ"**

| अ.क्र. | मालाचे वर्णन | प्रचलित दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ |
| ५. | अ. हायड्रो जिनीटेड तेल, वनस्पती किंवा खाद्य तेलाच्या निर्मितीसाठी लागणारे तेल. | १% | २% |
| | ब. खाद्य तेलाचे इतर सर्व प्रकार शुध्द तेल, लोणी, शुध्द तुप, वनस्पती तेल | १% | २% |
| ६. | अ. साखर, खडी साखर चमचमी आणि बुरा साखर | १% | २% |
| | ब. सर्व प्रकारचा गुळ व राब काकवी पेंड खजून शिरा. | १% | २% |
| | क. ऊस | १% | २% |
| ९. | चहा, कॉफी, काफी बिया | १% | २% |
| १०. | केशर व कस्तुरी | २% | ४% |
| ११. | अ. सुकलेले बोंबील, डुकराची पातळ चरबी, डबाबंद मासे फरीनासेस अन्न डब्बाबंद, कोंबडीचे मास | २% | ४% |
| | क. ग्लुकोज, मध, बटाटा बेफर्स व चिप्स, दुधाची पावडर, मलाई, श्रीखंड, आम्रखंड, सर्व प्रकारचे सरबत, खवा, सायकरीन, चक्का, लस्सी, कोकम, करीपावडर, कस्टर्ड पावडर, रस, शितपेय व सर्व | २% | ४% |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रकारचे खाद्य पेय, तयार केलेली व साठवलेली मिळाई खनिज पाणी, खाण्यायोग्य बेकण आणि हॅम, कोरडे लोणी, सुकलेले किंवा ठेवलेली फळे आणि कठीण सालाची फळे, सुपारी, सुकलेले मासे खवा, मिठाई जॅम आणि जेली, आटवलेले दूध आणि ठेवलेले आईस्क्रिम, सर्व प्रकारचे पिष्ठमय पदार्थ, पिकलेस कोका, कोकाच्या बिया, चॉकलेटस्, बिस्कीटस् , कोकस, डुकराची चरबी मावा, दुधाची मलाई, चक्का आणि दही, फळांचा रस, शरबत आणि पेय, ग्लुक्जेड एक्स्ट्रोज किंवा कोणत्याही प्रकारच्या फ्रुट शुगर, आणि खाद्य तेल व्यतिरिक्त तेल साठा, बेकींग, किंवा करी पावडर, सॅकरीन, सर्व प्रकारचे अन्नाचे रंग आणि अर्क, इतर सर्व प्रकारचे जव, पापड, कोणत्याही प्रयोजनासाठी साठवण्यात आलेले मास होल, दूध किंवा नीर, या व्यतिरिक्त विनिर्दिष्टपणे तरतूद न करण्यात आलेले इतर सर्व प्रकारचे अन्न व पये सोयाबीन पावडर इडिबल बेरुन. | | |
| १२. | अ. गॅस भरलेले सर्व प्रकारचे सिलेंडर, सॅनिटरी, टॉवेल्स, बॅडेज, जंतुरहित कापूस यासह जंतुरहित वस्तु. | १% | ३% |
| | ब. औषधी, आयुर्वेदिक औषधी, ॲलोपॅथीक औषधी, होमिओपॅथिक औषधी व युनानी औषधी | १% | २% |
| १४. | ब. शोभिवंत झाडे व रोपटे, सर्व प्रकारची फुले व फळांची रोपटे. | १% | २% |
| १६. | सर्व प्रकारचे गोड ब्रेड, बेरी इ. | २% | ३% |
| १८. | पोटॅश, रिठे, तुरटी, सरस शिकेकाई, सोडा, भांडी, कपडे आणि फरशा घासण्यासाठी वापरे जाणारे शुध्द मिठ | १% | ३% |
| अ.क्र. | मालाचे वर्णन | प्रचलित दर | प्रस्तावित दर |
| १९. | अ. पांढरी व लाल सुपारी व इतर सर्व प्रकारची मसाला सुपारी | १% | ३% |
| | ब. विलायची, जायफळ, ओलाचा सिडस्, कापुर, लवंग, सिनानॉम, गरज मसाला, मसाळ्याच्या वस्तु. | १% | ३% |
| २०. | ओवा, अंबीहळद, दगडफूल, दगडफुल, उद, कात, कडकी बीज कुंकू, खसखस, गुलाब, गोडंबी, सरस, डिंक, जिरा, काळेमीठ, बुक्का, राळ, शेंदुर, खान्याचा सोडा, सनजिरा, शिंधी मिठ, धणे, खोबरे, साबुदाणा, मिरची, हळद, मसाला पावडर, आणि सर्व प्रकारच्या किराणा | १% | २% |

| | | | |
|---|---|---|---|
| | वस्तु, खान्याचा रंग, हिंग, सुंठ, या व्यतिरिक्त विनिर्दिष्ट न केलेल्या सर्व प्रकारच्या किराणा वस्तु. | | |
| २६. | ब. कोळसा व कोक (दगडी कोळसा) हार्ड कोक | ३% | ४% |
| २७. | फटाके, दारुकाम व त्याचे घटक भाग आणि स्फोटक, कॅलशियम कार्बाईड | ४% | ५% |
| २८. | इलेक्ट्रीक गॅस लाईटर, गॅस लाईटर, पेटविण्याच्या वस्तु व त्याचे सुटे भाग | २% | ३% |
| २९. | ड. बुट पॉलिश व धातु पॉलिश | २% | ३% |
| ३०. | अखाद्यतेल बिया, लिंबोळी, सरकी, एरंजडी अखाद्यतेल, शुध्दतेल कॉटन वॉश, ऑईल एरंड तेल. इ. आयात केलेले राईस ब्रॅंड ऑईल, आयात केलेल्या खाद्य व अखाद्य तेलाची निर्मिती. | १% | ३% |
| ३१. | आद्योगिक अल्कोहल जसेः झाईलीन टाऊलिन ॲसीटोन औषधीत वापरण्यात येणारे क्लोरोफॉर्म बेनझिम, सोलॅक्स इथाईल, ऑसिटेक्स आणि इथाईल, अल्कोहल, आयसोप्रोपिल, अल्कोहल, सेटेस्टॉरियो अल्कोहल इत्यादी. | १.५% | ४% |
| ३३. | ग्रिस व पेट्रोलियम जेली, पॅरोफिन जेली, पॅरोफिन टॅक्स | २% | ३% |
| ३४. | ड. औषधी तयार करण्यासाठी सर्वप्रकारची रसायने (औषधी गुणधर्म ग्रंथात विनिर्दिष्ट केलेले रसायने) | १% | ३% |
| ३६. | आगपेटी | १% | २% |
| ३८. | उर्वरित मस, बाल क्ले, चायना क्ले, सिलिका टेल, बॅन्टोनाईट आणि फाऊंडरी सॅड, सिलिका सॅड, प्लॅस्ट ऑफ पॅरिस, फायर ब्रिक्स, ॲल्युमिना ब्रिक्स, सिलिका ब्रिक्स, क्रोम मॅग्नासाईट ब्रिक्स, इंम्यलेशन ब्रिक्स, बी.पी. सेटस, लेंडल स्लीव्हज, डेड बर्नट मॅगनाईट पावडर. | २% | ४% |
| अ.क्र. | मालाचे वर्णन | प्रचलित दर | प्रस्तावित दर |
| ४०. | अ. ओले डांबर, बिल्युमिन, फरनिश दगड, मॅगनजि, करुंद दगड, फ्लोअर मिलसाठी वापरण्यांत येणारा दगड, धार लावण्याचा दगड, दगडी पावडर, एमरी स्टोन, डोलामाईट पावडर, ग्राइंडिंग व्हील्स, लाईम स्टन | २% | ४% |
| | ब. विटा आणि खंगर | २% | ४% |
| ४१. | ब. लाकुड व दगड यावर कोरीव काम केलेल्या वस्तु आणि सर्व प्रकारच्या मुर्ती (पुतळे) | २% | ४% |
| ४४. | डिस्टेंपर इमातरीस रंग देण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तु, वार्निश, उकळलेले सरकीचे तेल, | ३% | ४% |

| | | | |
|---|---|---|---|
| | तागाचे तेल, फ्रेंच पॉलिश, टरपनटाईन, झींक, ऑक्साईड, जलरोधक साहित्य, रंग ट्युनिंग एक्सट्रक्सटस, निळ आणि नायट्रो सेल्कुकोज, थिनर आणि क्लीअर लिकर, औद्योगिक वापरात येणारे रंगद्रव्य, जयसॉल ब्ल्यु, ६ वी रंग रसायने, सिलिकाडाय ऑक्साईड, वस्तु निमिर्तीच्या कारखान्यात मुद्रणासाठी उपयोगात आणले जाणारे ॲल्युमिनियम पेस्ट प्रिटींग पेस्ट, आणि पीव्हीसी कंपाऊंड तयार करण्याच्या प्रयोजनासाठी रंग पांढरे शिसे, लाल शिसे | | |
| ४५ | सर्व प्रकारचे सॅनिटरी गुडस व फिटींग्स आणि सिमेंट रिंग, कर्व्हस चिनी मातीच्या वस्तु, मेटल व्हाल्वस, ब्रास आणि स्टील कॉकस काचेचा मुलामा चढविलेल्या वस्तु इमारतीच्या सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तु. | ३% | ४% |
| ४६. | रुफिंग फेन्ट | २% | ४% |
| ४८. | प्लायवूड, फोरमाईका, सनमाईका, किटप्लाय, हार्डबोर्ड, कार्डबोर्ड, स्टॉबोर्डस, माऊंट बोर्डस, मिल बोर्डस, मसोनाईट, सॉफ्टबोर्डस किंवा कोणत्याही प्रकारच्या लाकडा पासून कृत्रिमरित्या तयार करण्यात आलेल्या वस्तु. | ३% | ४% |
| ४९. | स्टील फर्निचर, बांबु बेत फर्निचर, फायबर फर्निचर, लाकडी फर्निचर, ॲल्युमिनिअम फर्निचरअणि फर्निचरसाठी वापरलेला कच्चा माल. | ३% | ५% |
| ५०. | अ. केश तेल, सुवासिक तेल, सर्व प्रकारच्या सुगंधी वस्तु, अगरबत्त्या, सर्व प्रकारचे सुवासिक साबन, टॉयलेट साबन, कासवछाप अगरबत्ती, गुडनाईट, दंतमंजने टुथपेस्ट, टुथब्रशे, पोमेड कंगवे, आरसे हेअरपिन्स, मार्टर्स सस्पेंन्डर्स, लीवान, कोकाराज, केसांकरिता कोकोनट, पॅराशुट तेल, सर्व प्रकारची सौंदर्य प्रसाधने, फिनेल, चंदनी तेल, ॲन्टीसेफ्टीक सोंदर्य क्रिम बेरियर क्रिम, कुंमकुम, काजळ, सिंदुर, आल्टा आणि महावर, सीनेस्टीक शेविंग क्रिम, शेविंग स्ट्रीक्स, पोमेड ब्रशेस, इमिटेशन पर्ल्स | २.५०% | ४% |
| | ब. कात्र्या, वस्तरे, सेफ्टी वेअर्स, बेलइस, चाकू, सर्व प्रकारचे कटलरी वस्तु, सर्व प्रकारच्या सुया, कुलूप आणि किल्ल्या आणि कटलरी वस्तु, स्टोव्ह, इलॅस्टीक्स, कार्डस, कोट हँगर्स, पेट्रोमॅक्स आणि त्याचे भाग. | २.५% | ४% |
| | क. लेसेस, टेपस, लाडी व धातुच्या रिंग, भरत | २.५% | ४% |

| | | | |
|---|---|---|---|
| | कामाच्या वस्तु स्लीव्हलाईड, ऑर्टीकल्स, बॅकलाईट व बकेलाईच्या वस्तु, हस्तीदंताच्या अर्टीकल्स, बॅकलाईट व बॅकेलाईच्या वस्तु हस्तीदंताच्या व हाडाच्या बनविलेल्या वस्तू आणि सर्व प्रकारच्या गुंड्या, भरतकाम आणि हॅबर डॅशरी टेलरिंग साहित्य. | | |
| | ड. छत्र्या, रेनकोट, हॅट, कॅप्स आणि पावसाळी प्रावरणे, ताडपत्री | २.५% | ३% |
| | फ. नटबोल्ट, वायसर, हेक्साब्लेड, सब्बल, होतोडा, कुदळी, फावडे, घमेला, साखळी, तराजू आणि वजने, खिळे, हत्यारे, हॅन्डड्रॉप्स, ताडी, डोअरचेन, आय पिसेस, डोअर हॅन्ड, अूंगल, स्क्रु, डोअर क्लोसर्स, ड्रिल्स, कुदळी, एक्सलॅड, ड्राईंग पिन्स, इथे विनिर्दिष्ट न केलेले सर्व प्रकारचे लोखंडी समान व हुक्स. | २.५% | ४% |
| ५१. | अ. सोने व त्या पासून बनविलेले दागिने | १% | २% |
| | ब. चांदी व त्यापासून बनविलेले दागिने | १% | २% |
| | क. हिरे, मणिक, मोती व त्यापासून बनविलेल्या इतर मौल्यवान वस्तु व दागिने | १% | ५% |
| | ड. इमिटेशन दागिने | | |
| ५२. | ग्लास, काच व काचेच्या बाटल्या शोभिवंत काच (रंगित काच) काचेच्या वस्तु, बांधकामात इमातरीच्या सजावटीसाठी वापरल्या जाणाऱ्या काचा, (सॅनेटरी वेअर्स वस्तु वगळून) | ३% | ४% |
| ५५. | बिडी आणि तपकिर | १% | २% |
| ५६. | बिडी तयार करण्याकरिता वापरण्यात येणारी पाने (तेंदु पत्ता) | १% | २% |
| ६०. | कच्चे किंवा पिंजलेले लोकर, हॅम्प तागा, नॅट, इतर कच्चे धागे आणि रॉस्पन, हातमाग धागा. | २% | ३% |
| ६१. | सुती धागे, फायबर, पॉलीस्टर, सिथेटीक दोरा, आणि सर्व प्रकारचे दोरे आणि दोर हॅंडलूम दोरे, नायलॉन दोर, ज्युटरोप कॉयर (तागाचे दोर काथ्या) | १.५% | ३% |
| ६२. | कातडे आणि चामडे | १.२५% | २.५% |
| ६४. | सर्व प्रकारचे रबर टायर्स व ट्युब | २% | ३% |
| ६५. | रबर आणि रबराच्या वस्तु, गड्डा परचा आणि त्यापासून बनविलेल्या वस्तु (पुर्णतः व अंशतः) रबराचे द्रावण, कच्चे रबर, लॅटेक्स रबर आणि फोमच्या सर्व प्रकारच्या वस्तु (दाब क्र. ६४ आणि खेळणी वगळून) | २% | ३% |
| ७३. | क. इ.पी.ए.बी. एक्स, पी.बी. एक्स, सेटे फॅक्स | ४% | ६% |

| | | | |
|---|---|---|---|
| | मशिन, एस. टी. डी. पल्स मशिन आणि प्रिंटर, टेलीप्रिंटर मशिन स्कॅनिंग मशीन, फोटो कॉपिंग, झेरॉक्स मशिन, संगणीक आणि डि.टी.पी. इलेक्ट्रॉनिक टंकलेखन यंत्र आणि त्योच सुटे भाग, आणि त्याच्या उत्पादनात वापरले जाणारे भाग, दूरध्वनीसंच व त्याचे सुटे भाग गॅसकिट, संगणक विषयक लेखन सामुग्री, वायरलेस आणि त्याच्या उत्पादनात वापरात येणारे सुटे भाग. | | |
| ७९. | अ. लिहिण्याची शाई, मुद्रणालयात वापरली जाणारी शाई व पुस्तक बांधणीसाठी वापरण्यात येणारी प्रिटींग पेस्ट | १% | ३% |
| | ब. लेखन सामुग्री, फाऊन्टन पेन, बॉलपेन, निप, रिफील्स, जाहिरात साहित्य कार्बन, अमोनिया प्रिंट पेपर, ट्रेसिंग पेपर, डायरी, रजिस्टर व पात विनिर्दिष्टत न केलेले सर्वप्रकारचे लेखन सामुग्री. | १% | ३% |
| | क. कोरा कागद, कागद, शालेय वह्या पुस्तके, महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षणाची सर्व पुस्तके, ग्रंथालयीन पुस्तके, मासिके, कॅलेंडर्स आणि कायद्याची पुस्तके | १% | ३% |
| | ड. कोणत्याही मिश्रणाचा व जाडीचा सर्व प्रकारचा कागद, लिफाफ, निमंत्रण पत्रिका, व रद्दी कागद. | २% | ३% |
| ८१. | लाख, बुच व त्यापासून तयार केलेल्या वस्तु, क्राऊन कॉर्क व त्यापासून तयार केलेल्या वस्तु | २% | ३% |
| ८५. | क. सर्व प्रकारची खेळणी | १% | ३% |
| | ड. सर्व प्रकारचे खेळाचे साहित्य | २% | ४% |
| | ई. फॅकींग मटेरियल जसेः- फ्लेक्झीबल कन्टेनर्स जिलेटीन, कॉर ग्युटेड व यात विनिर्दिष्ट न केलेले सर्व प्रकारचे पॅकींग मटेरिअल | २% | ३% |

**संवाद :**

मा. महापौर : सदर प्रस्ताव जकात दरवाढ बाबतचा असून अर्थसंकल्पाशी निगडीत असून स्थायी समितीकडे पाठविण्यात येतो.

**ठराव क्र. २१८/९ :**

सभागृहातील चर्चेनुसार सदर प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २१९/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, निजामोद्दिन रोड (शहागंज) येथील सय्यद सादात निझामी दर्गा येथे पत्र्याचे शेड बनविण्याबाबत वॉर्ड क्र. ३६ च्या स. नगरसेविका यांनी मागणी केल्यानुसार सदरील दर्ग्यावर पत्र्याचे शेड बनविणे

त्यांच्या नगरसेवक स्वेच्छानिधीतून बनविण्याबाबत मागणी केली आहे. हा दर्गा रस्त्याच्या मधेमध आहे. सदरील कामासाइी सन १९९७-९८ च्या सा. बां. खात्यांच्या जिल्हा दरसूचीनसार अंदाजपत्रक र. रु. २२,८५०/- चे तयार करण्यात आले आहे.

करिता सदरील पत्र्याचे शेड बांधण्याचे धोरणात्मक निर्णयास्तव व विचारार्थ प्रस्ताव सादर.

**संवाद :**

मा. महापौर : सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. २१९/१० :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे निजामोद्दिन रोड शहागंजच्या मधोमध असलेल्या सय्यद सादात निझामोद्दिन दर्गा येथे वॉर्ड क्र. ३६ च्या नगरसेविका यांच्या स्वेच्छा निधीतून पत्र्याचे शेड उभारण्याच्या कामासाठी रक्कम रुपये २२,८५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२०/११ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिध्देश्वरनगर हर्सूल येथे पाणी पुरवठा व्यवस्था करणे बाबतच्या कामाचे र. रु. ४,०७,०२२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील वासाहत ही पूर्णपणे अनाधिकृत आहे. या वसाहतीत राहणाऱ्या नागरिकांकडून विकास निधी किंवा इतर कोणतेही उत्पन्न महानगरपालिकेस मिळत नाही. त्यामुळे या प्रभागातून १००% विकास निधी उपलब्ध झाल्यानंतर पाईपलाईनचे काम करणे योग्य राहील. तसेच एन-७ येथील जमीनीखालील टाकी पूर्ण होण्यास एक वर्षाचा कालावधी लागणार असून त्यानंतरच पाणी पुरवठा केला जाईल. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. कुमावत अविनाश : प्रस्तावात १००% विकास निधी जमा करून सदरचे काम करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. त्याऐवजी २५% विकास निधी जनतेकडून वसूल करून तशी प्रस्तावास मंजुरी द्यावी.

मा. महापौर : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विषय क्र. ११,१२ मध्ये सदर प्रभागात नागरिकांकडून १००% विकास निधी जमा करण्याऐवजी २५% विकास निधी जमा करून काम करण्यात यावे तशी प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. २२०/११ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्देश्वरनगर हर्सूल ही वसाहत पूर्णपणे अनाधिकृत असल्याने या प्रभागातून १००% ऐवजी २५% विकास निधी उपलब्ध झाल्यानंतर पाईप लाईन टाकण्याचे कामासाठी रक्कम रु. ४,०७,०२२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२१/१२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, राजे संभाजीनगर हर्सूल येथे पाणीपुरवठा व्यवस्था करणे बाबतच्या कामाचे र.रु. ३,४९,५९६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील भाग हा संपूर्णपणे अनाधिकृत विकसित झालेला आहे. महानगरपालिकेस विकास निधी किंवा इतर कोणतेही आर्थिक उत्पन्न तेथून उपलबध होत नाही. सिडको भागात तंतोतंत पाणी पुरवठा सुरू आहे. नवीन भाग वाढविल्यास सिडकोतील पाणी पुरवठा विस्कळती होण्याचा दाट संभव आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जलस्त्रोतापासून शहर व सिडको भागास पाणी पुरवठा करण्याकरिता ६७ कोटीचा प्रकल्प तयार केला असून, हा प्रकल्प पूर्ण होण्यास सुमारे दोन वर्षाचा कालावधी लागणार आहे. त्यामुहे या परिसरात सध्या पाणी पुरवठा वाहिनी टाकणे इष्ट होणार नाही. कारण दोन वर्षानंतर टाकलेली जलवाहिनी हायड्रॉलिक टेस्टींगला उतरणार नाही व महानगरपालिकेस परत त्यावर खर्च करावा लागेल.

तरी प्रस्तावित करण्यात येते की, या भागातून १००% विकास निधी जमा करून वाढीव पाणी पुरवठा झाल्यावरच काम करणे योग्य राहील. प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २२१/१२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाने जलस्त्रोतापासून शहर व सिडको भागसाठी तयार केलेल्या वाढीव पाणी पुरवठा प्रकल्प झाल्यानंतर राजे संभाजीनगर हर्सूल ही वसाहत पूर्णपणे अनाधिकृत असलेले वासाहतीस १००% ऐवजी २५% विकास निधी वसूल करून पाणी पुरवठा पाईप लाईन टाकण्याचे कामासाइी रक्कम रु. ३,४९,५९६/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२२/१३ :**

सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडून सर्वसाधारण सभेसमोर प्रस्तव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराचे मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ७५ "पार्क" करिता आरक्षित असलेल्या जमिनीचे विशेष भूमिसंपादन अधिकाऱ्याकडून रितसर संपादन कार्यवाही करून सन १९८१-८२ मध्ये संपादित करण्यात आली. ह्या मध्ये न.भू.क्र. १३९१९,१३९१५,१३५२ चा भाग, ५५२८ व १३५३४/२ भाग ताब्यात घेण्यात आला आहे. ह्या जागेवर महापालिकेने शॉपिंग सेंटर बांधले आहे. यापूर्वी महापालिकेने ८३-८४ साली आरखण क्र. ७५ "पार्क" च्या वापरात बदल करणेस्तव मु.प्रा. व न. र. अधिनियम १९६६ चे कलम ५० अनवये ही जागा "सार्वजनिक वापरासाठी" अशी करून घेतली आहे. त्याचा आदेश क्र. टीपीएस/३०८३/२०८२/सीआर-२/३ युडी-६ दिनांक ०६/०३/१९८४ असा आहे. तसच प्रारुप वि.यो. मध्ये ही जागा आरक्षण क्र. ७७ ने शॉपिंग सेंटर करिता आरक्षित केलेले आहे.

वरील मिळकतीपैकी न. भू.क्र. १३९१६ चे मिळकत धारकाचे मुख्यत्यारआम श्री. कुलभूषण उर्फ भूषण रामचंद्र आग्रवाल ह्यांनी महापालिकेने सुरू केलेल्या शॉपिंग सेंटरच्या बांधकामास आक्षेप घेतला व न्यायालयात दावा दाखल केला, दावा क्र. २०९८/९० असा आहे. ह्या दाव्यात न्यायालयाने स्थगिती आदेश दिला आहे. त्यामुळे महापालिकेने बांधलेल्या शॉपिंग सेंटरच्या समोरील भाग महापालिकेस वापरता येत नाही. त्याचे क्षेत्र २१८०.२० चौ. मी. एवढे आहे. ही जागा मिळकत धारकांनी २३-७-७६ रोजी नगर परिषदेस दिली व रितसर भुसंपादन कार्यवाही होऊन १९८१ मध्ये निवाडा जाहिर झालेनंतर

मिळकतधारकास रु.१,२०,३४७.०५ एवढा मोबदला देण्यात आला. ह्यानंतर मिळकत धारक भूसंपादन अधिनियम १९९४ चे कलम १८ अन्वये कोर्टात गेले व त्यांना वाढीव मावेजा ( ) रु. ९,५०,८८६/- सन १८९६ मध्ये देण्यात आला आहे. ह्या जागेची मालकी १९८२ पासून महापालिकेची आहे.

आता अर्जदार, व सदर जागेचे आममुखत्यार श्री. अग्रवाल यांनी वरील दावा मागे घेण्याबाबत पुढील प्रस्ताव मांडला आहे.

१) सदर न.भू.क्र. १३९१६ च्या क्षेत्रावर शासकीय पत्र क्र. टीपीएस/१०९४/सीआर/१४/९४ नवि-९ मंत्रालय मुंबई दि. ०७/०४/९४ अन्वये समावेशक आरक्षण विकास नुसार विकास परवानगी द्यावी.

२) महापालिकेने दाव्यातील २१८०.२० चौ. मी. जागेवर विकास परवानगी द्यावी ह्या जागेच्या निवाड्यानुसार मिळालेला मावेजा व वाढीव मोबदला मनपास परत करण्यात येईल.

३) महापालिकेने जागेचे भूसंपादन कार्यवाही करतांना व जागा ताब्यात घेतांना "पार्क" ह्या आरक्षणासाठी घेतली व प्रत्यक्षात वापर करतांना बदल करून "शॉपिंग सेंटर" म्हणून वापर करीत आहे त्यामुळे दावेदारांसही भूखंडाचा वापर तसा करता यावा.

४) महापालिकेने दिलेल्या विकास परवानगीनुसार पूर्ण भूखंड विकसित करून देण्यात येईल.

वरील दावा क्र. २०९८/९० व अर्जदाराचा प्रस्ताव ह्या बाबत उच्च न्यायालयाचे सरकारी वकील श्री. अनंत भूषण कानडे यांचे लेखी मत मागविण्यात आलेले आहे. त्यानुसार त्यांचे संक्षिप्त मत पुढील प्रमाणे आहे.

१) श्री. भूषण अग्रवाल यांना उपरोक्त जागेचा मोबदला दिला असल्याने न्यायालयात विनंती करून न्यायालयात प्रकरण लवकर निकाली काढण्याची विनंती करणे.

२) शासनाचे दि. ०७/०४/९४ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही केल्यास न्यायालयात कार्यवाही अडचण येणार नाही. सदर प्रकरण तडजोडीने निकाली काढतांना प्रस्ताव मनपाचे हिताचा आहे का हे तपासणे आवश्यक आहे. तसेच सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

विधिज्ञाचे अभिप्राय, मत व अर्जदारांची विनंती न्यायप्रविष्ठ प्रकरणी तडजोड करण्याची विनंती विचारात घेता सर्वसाधारण सभेने खालील मुद्यावर निर्णय घ्यावा.

१. अर्जदार त्यांचे मूळ आरक्षणाप्रमाणे जमीन उद्यानासाठीच विकसित करावी किंवा कसे?
२. आरक्षणात केलेल्या बदलाप्रमाणे शॉपिंग सेंटरसाठी वापर करावा किंवा कसे.
३. उच्च न्यायालयाचा निकाल प्राप्त होईपर्यंत काहीही कार्यवाही.
४. अर्जदार यांचा तडजोडीचा प्रस्ताव स्विकारून प्रकरण कायमचे निकाली काढावे किंवा कसे?

वर नमूद चार पर्यायाबाबत निर्णय होण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येत आहे.

या प्रकरणीचे ३ प्रमाणेच्या तडजोड प्रस्तावास सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यास सदरील जमनी प्रारुप वि.यो. मध्ये दुकान केंद्राकरिता आरक्षण क्र. ७७ ने आरक्षित असल्यामुळे अर्जदारास सदरील आरक्षण, महाराष्ट्र शासनाने म.प्रा. व न. र. अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्र. परिपत्रक

१०९४/सीआर-१४/९४ नवि-९ दि. ०४/०४/९४ ने वि.यो. नगरपालिका/ महापालिका जमीनमालक यांनी विकसित करावयाची आहेत, म्हणून जे निर्देश दिलेले आहेत त्या तहत समावेशक आरक्षण विकासाकरिता खालील अटी वर मान्यता द्यावी लागेल.

१. एकूण भूखंड क्षेत्राच्या २५% दुकाने मनपास मोफत बांधून द्यावयाची, त्यापेक्षा जास्तीचे बांधकाम असेल तर त्याचा खर्च मनपा देईल.

२. १५% जास्त रक्कम देण्योवजी महापालिकास द्यावयाचे क्षेत्राचे १५% क्षेत्रा एवढे वाढीव चटई क्षेत्र उर्वरित जमिनीकरिता वाढवून देण्यात येईल.

३. महापालिकेस द्यावयाची दुकाने व अर्जदार यांची दुकाने बांधण्यास एकत्र बांधकाम परवानगी घेऊन दोन्ही बांधकामे एकाच वेळी करावयाची आहेत.

४. महापालिकांची दुकाने बांधून पूर्ण झाल्यानंतरच बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र तथा भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येईल.

करिता वरील पैकी सर्वसाधारण सभेपुढे निर्णयाकरिता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**संवाद :**

मा. महापौरः विषय क्र. १३ मा. सचिव यांनी वाचून दाखवावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

श्री. रशिद खॉन (मामू) : एका वर्षापूर्वी हा प्रस्ता मी महापौर असतांना मंजुरीसाठी आलेला होता त्यावेही सभागृहात तो रद्द करण्यात आलेला होता पुन्हा मंजुरीसाठी प्रस्ताव येतो यात काही तरी गैरप्रकार आहे असे दिसून येते. प्रस्तावात उल्लेख केलेला आहे ९ लाख दिले किती लाख दिले त्याची सभागृहाला देणे घेणे नाही. सदर आरक्षण जागा उद्यानाची होती किंवा कोणत्या विकास कामासाठी होती त्याचा उल्लेख यावयास पाहिजे होता. सदर प्रस्ताव कुणाच्या तरी दबावाखाली सभागृहात मंजुरीसाठी आलेला आहे.

श्री. प्रभाकर विधाते : स. सदस्य यांनी विषयाला धरून चर्चा करावी.

श्री. प्रदिप कुमार जैस्वाल : आताच सभागृहात चर्चा झालेली आहे विकास कामासाठीचे आरक्षणामध्ये ६०-४० असे प्रमाणाकनुसार देण्यात यावे.

श्री. सय्यद अली मिरा सलामी : प्रस्तावास मंजुरी देण्यात येऊ नये. मागील वर्षी मंजुरीसाठी आलेला प्रस्ताव रद्द होता. पुन्हा सभागृहात प्रस्ताव मंजुरीसाठी कसा येतो कसा रद्द करण्यात यावा सभागृहात चुकीचे निर्णय घेऊ नये.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : आरक्षणातील जागा अशा विकास कामासाठी देण्यात येऊ नये या ठिकाणी सभागृहाची दिशाभूल होत आहे. याची प्रशासनाने दखल घ्यावी. (याचवेळी सभागृहात स. सभासदांचे मोठमोठ्याने बोलणे चालू असते.)

मा. महापौर : तडजोड प्रस्तावास स्विकृतीसह मान्यता देण्यात येते व पुरवणी विषय पत्रिकेस, ऐनवेळचे सर्व विषयास मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. २२२/१३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ७५ पार्क व प्रारुप विकास योजना (सुधारित) चे आरक्षण क्र. ७७ दुकान केंद्रासाठी आरक्षित असलेल्या जागेपैकी नगरभूमापन क्रमांक १३९१६ चे मिळकतधारक श्री. कुलभूषण अग्रवाल यांनी दाखल केलेल्या तडजोड प्रस्तावास महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्रमांक परिपत्रक १०९४/सीआर-१४/९४/९४ नवि-९ दि. ०७/०४/९४ ने मंजूर विकास योजना

नगरपालिका/ महापालिका जमिन मालक यांनी विकसित करावयाची आहे. म्हणून जे निर्णय दिलेले आहेत त्या तहत समावेशक आरक्षण विकासाकरिता २१८०.२० चौ. मी. क्षेत्रासाठी खालील अटीवर स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. एकूण भूखंडा क्षेत्राच्या २५% दुकाने महानगरपालिकेस मोफत बांधून द्यावयाची त्यापेक्षा जास्तीचे बांधकाम असेल तर त्याचा खर्च महापालिका देईल.
२. १५% जास्त रक्कम देण्योवजी महापालिकास द्यावयाचे क्षेत्राचे १५% क्षेत्रा एवढे वाढीव चटई क्षेत्र उर्वरित जमिनीकरिता वाढवून देण्यात येईल.
३. महापालिकेस द्यावयाची दुकाने व अर्जदार यांची दुकाने बांधण्यास एकत्र बांधकाम परवानगी घेऊन दोन्ही बांधकामे एकाच वेळी करावयाची आहेत.
४. महापालिकांची दुकाने बांधून पूर्ण झाल्यानंतरच बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र तथा भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येईल.

तसेच नियमाप्रमाणे संपूर्ण मोबदल्याची रक्कम महानगरपालिकेस परत करावी. व न्यायालयातील प्रकरण तडजोडीने काढून घेण्यात यावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ***पुरवणी विषय पत्रिका***

**विषय क्र. २२३/१ :**

औरंगाबाद शहरास भेट देणाऱ्या विविध मान्यवर व्यक्ती, क्रीडा क्षेत्रात विशेष नैपुण्य मिळालेल्या खेळाडु कामगार (गुणवंत) प्रतिष्ठित नागरिक यांचा औरंगाबाद महानगरपालिकतर्फे नेहमीच वेळोकाळी परत्वे सत्कार केला जातो.

तथापी या शहराच्या सर्वांगिण विकासासाठी आपल्या आयुष्याची मोलाची व उमेदरीची कमीत कमी तेहतीस तनमन व एकनिष्ठेने सेवा महापालिका अधिकारी / कर्मचारी सेवा समाप्तीचे वेळी त्याची कोणाचीही दखल घेतली जात नाही. अशा सेवा निवृत्त होणाऱ्या महापालिका अधिकारी / कर्मचाऱ्याचा महानगरपालिकेतर्फे १ मे, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी अशा राष्ट्रीय सणाच्या वेळी यथोचित सत्कार करून त्यांचा गौरव करण्यात यांवा.

सुचक - श्री. व्ही. व्ही. देशमुख
अनुमोदक - श्री. संजय केनेकर
दिनांक - ०२/०२/९९

**ठराव क्र. २२३/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहराच्या सर्वांगिण विकासासाठी आपल्या आयुष्यातील मोलाची व उमेदीची कमीत कमी ३३ वर्षे तन-मन व एकनिष्ठेने सेवा करून सेवानिृत्त होणाऱ्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना १ मे, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी अशा राष्ट्रीय सणाच्या वेळी मनपातर्फे यथोचित सत्कार करून त्यांचा गौरव करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२४/२ :**

औरंगपुरा येथील महापालिका प्राथमिक आरोग्य केंद्रा जवळच नाथ मार्केट इमारतीमध्ये उपलब्ध असलेल्या जागेत पॅथॉलॉजी लॅबोरेटरी सुरू करण्यांत यावी.

सुचक - सौ. लता दलाल.
अनुमोदक - श्री. अविनाश कुमावत
दिनांक - १२/०२/९९

**ठराव क्र. २२४/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चालू आर्थिक वर्षापासून औरंगपुरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राजवळच नाथ मार्केट इमारतीमध्ये उपलब्ध असलेल्या जागेत पॅथॉलॉजी लॅबोरेटरी सुरू करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२५/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपातर्फे स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून शहरातील गरीब नागरिकांना ह्रदयावरील बायपास शस्त्रक्रिये करिता व ब्लड कॅन्सर शस्त्रक्रियेकरिता मदत करण्यात येते. परंतु ह्रदयाच्या बायपास शस्त्रक्रिये व्यतिरिक्त ह्रदयावरील सर्व शस्त्रक्रिया व ब्लड कॅन्सर व्यतिरिक्त इतर सर्व कॅन्सरच्या उपचारासाठी स्वेच्छा निधीतून मदत देण्यात येते नाही.

तरी चालू आर्थिक वर्षापासून स. नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून ह्रदयावरील सर्व शस्त्रक्रिया व कॅन्सर वरील सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियेकरिता व उपचाराकरिता आर्थिक मदत देणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक - डॉ. भागवत कराड
अनुमोदक - श्री. राजकुमार बचाटे
दिनांक - १२/०२/९९

**ठराव क्र. २२४/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ह्रदयावरील शस्त्रक्रिया व कॅन्सर सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियेकरिता व उपचाराकरिता स. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२६/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र. ६३ हमालवाडा हे रेल्वेस्टेशन व रेल्वे पटरीला लागून असून रेव्ले स्टेशनच्या दक्षिणेला सिल्कमील कॉलनी, हमालवाडा, हमीद कॉलनी, धनगरवाडी, शहाकॉलनी, गुलशनकॉलनी, अबरार कॉलनी इ. अनेक वसाहती झालेल्या आहेत. रेल्वे स्टेशनच्या उत्तरेस शहरी भागातून रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेकडील वसाहतीस पादचाऱ्यांची येणे जाणेसाठी रेल्वे रुळावरून पादचारी पुल तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. १९९५ पासून तेथील लोकांची सातत्याने मागणी असल्याने सिल्क-मिल कॉलनीला मागणी असलयाने सिल्क-मिल कॉलनीला लागून एक पादचारी पुलाला मंजुरी मिळाली आहे. त्याचे अर्धवट काम झालेले आहे. हमालवाडा वॉर्डातील नागरिकांना व हमालवाडा शाह सुकता कॉलनी (जुन गांव) स्लम व इतर वसाहतींना सोयीचा व योग्य पादचारी मार्ग उपलब्ध होण्यासाठी आणखी एक रेल्वे रुळावरून पादचारी पुल

हमालवाडा, शाहवाडा शहा सुकला कॉलनी, जुने गांवलगत बांधल्यास रहदारी सोयीची होईल आणि जास्त गर्दी आळण्यास मदत होईल करिता दुसरा पादचारी पुल बांधण्याचा प्रस्ताव पुढील वर्षाच्या १९९९-२००० या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पातून तरतूद उपलब्ध करून पूर्ण करण्यांस प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. अब्दुल रशिद खॉन (मामू) |
| अनुमोदक | - | श्री. अविनाश कुमावत |
| | | श्री. प्रदिपकमार जैस्वाल |
| | | श्री. अफसरखॉन यासीन खॉन |
| दिनांक | - | १०/०२/९९ |

**ठराव क्र. २२६/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ६३ हमालवाडा हा प्रभाग रेल्वे पटरीला लागून असून या प्रभागात सिल्कमील कॉलनी, हमालवाडा, हमीर कॉलनी, धनगरवाडा, शहाकॉलनी, गुलशनकॉलनी, अबरार कॉलनी इ. अनेक वसाहती असून येथील नागरिकांना रेल्वे पटरीवर ये/जा करणे सोईचे व्हावे व रहदारी सुकर व्हावी या दृष्टीने हमालवाडा शाह शोकता कॉलनी जुने गांवा लगत रेल्वे पटरीवर पादचारी पुल बांधण्याच्या प्रस्तावासाठी सन १९९९-२००० चे आर्थिक अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध करून पूर्ण करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२७/५ :**

औरंगाबाद महानगरपालिके मार्फत औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या "पत्रकार भवन" निर्मितीसाठी वरद गणेश मंदिर लगत समर्थनगर नालयावरील जागा ३० वर्षाचे भाडेपट्ट्यावर देऊ केलेली असून सदर जागा ३० वर्षाऐवजी ९९ वर्षाचे कालावधीसाठी भाडे पटट्याने देणे आवश्यक आहे.

नियोजित पत्रकार भवन उभारणेसाठी महानगरपालिकेच्या सर्वही स. नगरसेवकांचे स्वेच्छा निधी मधून प्रत्येकी ५,०००/- रुपये आर्थिक मदत देणे आवश्यक आहे, जेणे करून महापालिकेचा व लोकप्रतिनिधीचा पत्रकार भवन उभारणीस हातभार लागेल. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. अविनाश कुमावत |
| अनुमोदक | - | श्री. अफसरखॉन |
| दिनांक | - | १५/०२/९९ |

**ठराव क्र. २२७/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पत्रकार भवन निमिर्तीसाठी वरद गणेश मंदिरालगत समर्थनगर नाल्यावरील जागा ३० वर्ष ऐवजी ९९ वर्षाचे कालावधीसाठी भाडे पट्ट्याने देण्यास व पत्रकार भवन उभारणीसाठी सर्व नगरसेवकांचे स्वेच्छा निधीतून प्रत्येकी रुपये ५,०००/- या प्रमाणे आर्थिक मदत देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२८/४६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अभिनय रोड ते मोंढा रोड व रस्त्यावर एक चौक असून या चौकात गेल्या दहा वर्षापासून सम्राट अशोक चौक नावांची पाटी आहे.

या चौकाचे नामकरण सम्राट अशोक चौक असे करण्यांत यावे अशी तेथील सर्व नागरिकांची मागणी आहे.

तरी सदरील चौकास सम्राट अशोक चौक नांव देणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - डॉ. भागवत कराड
अनुमोदक - सौ. पद्मा बाबुराव शिंदे

**ठराव क्र. २२८/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अभिनय चौक ते मोंढा चौक या रस्त्यावरील चौकास सम्राट अशोक चौक असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२९/७ :**

महानगरपालिका हद्दित सध्या नविन टपऱ्या टाकण्यासाठी जागा देणे बाबत खालील प्रमाणे अटी व शर्तीनुसार जागा देण्यांस यावे म्हणून प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

१. ज्या ठिकाणी अर्जदारांनी टपरी टाकण्यासाठी जागाची मागणी केलेली आहे. त्यासाठी पोलिस कार्यालयातर्फे ना हरकत प्रमाणपत्र मागविण्याची गरज नाही.
२. सध्या ज्या ठिकाणी विना परवानगी टपऱ्या चालू आहे त्यांना त्वरित रेग्युलाईज करून भाडे वसूल करण्यांत यावे.
३. या अगोदर ज्या टपरी धारकांना ८० फुट रोडवर मनपा तर्फे परवानगी दिली आहे. त्याच ठिकाणी ज्या अर्जदारांनी टपरीसाठी जागा मागणी केली असून हि. ८० फुट रोडवर जागा भाड्याने देण्यांत यावे.
४. ठराव क्र. २८/८ दि. १२/०६/९८ प्रमाणे सदरील समितीत पदाधिकाऱ्यांचा समावेश नाही म्हणून मा. सभागृहनेता मा विरोधी पक्ष नेता यांचा सदरील समितीत समावेश करण्यांत यावे.

तरी वरील प्रमाणे प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. अफसरखॉन
अनुमोदक - श्री. अविनाश कुमावत
श्री. अ. रशिदखॉन (मामू)

**ठराव क्र. २२९/७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ.क्र. १ ते ५ च्या अटी व शर्तीनुसार शहरात टपऱ्यासाठी जागा देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ऐनवेळचे विषय

**विषय क्र. २३०/१ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, अर्जदार श्री. दयाराम झालमसिंग चौधरी यांना स्वर नलिकेचा कर्करोग असून या रोगास वैद्यकीय देयक मदत देण्याची नियमात तरतूद नाही. परंतु रुग्णाची परिस्थिती बघून व त्यांची आर्थिक परिस्थिती बघता विशेष बाब म्हणून मा. नगरसेवक स्वेच्छा निधीतून रु. १०/- हजार वैद्यकीय मदत देणे बाबत मा. आयुक्त यांना मंजुरी दिली आहे. करिता रुग्ण दयाराम झालमसिंग चौधरी यांना रु. १० हजार आर्थिक वैद्यकीय मदत म्हणून देणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्ताव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २३०/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वर नलिकेच्या कर्क रोगासाठी आर्थिक मदत देण्यांची नियमात तरतूद नसली तरी अर्जदार श्री दयाराम झालमसिंग चौधरी यांची आर्थिक व रोगाची परिस्थिती विचारात घेता संबंधितास विशेष बाब म्हणून स. नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून रक्कम रु. १०,०००/- ची आर्थिक मदत देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३१/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सध्या महानगरपालिके तर्फे चालविण्यांतयेणाऱ्या बालवाड्यावर नेमणू केलेल्या बालवाडी शिक्षिकांना रु. ५००.०० दरमहा मानधन देण्यांत येते. बालवाडी शिक्षिकांनी मानधनात वाढ करण्यांसाठी विनंती केली आहे. बालवाडी शिक्षिकांचे काम लक्षात घेता दरमहा रु. ५००.०० ऐवजी मानधन रु. ७००.०० करण्यांस प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २३१/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बालवाडी शिक्षिकांचे काम लक्षात घेता दरमहा रु. ५००/- ऐवजी रु. ७००/- या प्रमाणे मानधन देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३२/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विधी सल्लागार हे पद नामनिर्देशनाने भरणेबाबत तरतूद असून खालीलप्रमाणे पात्रता दर्शविलेली आहे.

१. द्वितीय श्रेणीतील एल.एल.बी. पदवी.
२. ३ वर्षे विधी व्यवसाय वकीली.
३. औरंगाबाद महानगरपालिकेत आधीपासून असल्यास ते खेरीज करून ३० वर्षाहून अधिक वय नसावे.

तथापी दर्शविण्यात आलेली पात्रता व पद भरतीबाबत खालील प्रमाणे दुरुस्ती प्रस्तावित करण्यांत येते.

उपरोक्त पदासाठी दर्शविण्यांत आलेली पात्रता

१) ३ वर्ष विधी व्यवसाय ही अपुरी असून सक्षम विधी तज्ञ असणे आवश्यक असल्याने ३ वर्ष-विधी व्यवसाय (वकीली) ऐवजी ७ वर्ष विधी व्यवसाय अशी दुरुस्ती करणे योग्य.
२) तसेच वयोमर्यादेच्या बाबतीत औरंगाबाद महानगरपालिकेत सेवेत असल्यास ते खेरीज करून त्या ऐवजी ४० वर्षाहुन अधिक वय नसावे अशी दुरुस्ती करणे योग्य.
३) सदर पद भरण्याबाबत उक्त नामनिर्देशनाने भरण्याची तरतूद करण्यांत आलेली आहे.

सबब प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २३२/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विधी सल्लागार पदासाठी दर्शविण्यांत आलेली पात्रता व पद भरणे बाबत खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१) ३ वर्षे विधी व्यवसाय ही अपुरी असून सक्षम विधी तज्ञ असणे आवश्यक असल्याने ३ वर्ष-विधी व्यवसाय (वकीली) ऐवजी ७ वर्ष विधी व्यवसाय अशी दुरुस्ती करणे योग्य.
२) तसेच वयोमर्यादेच्या बाबतीत औरंगाबाद महानगरपालिकेत सेवेत असल्यास ते खेरीज करून त्या ऐवजी ४० वर्षाहुन अधिक वय नसावे अशी दुरुस्ती करणे योग्य.
३) सदर पद भरण्याबाबत उक्त नामनिर्देशनाने भरण्याची तरतूद करण्यांत आलेली आहे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३३/४ :**

नगरसचिव यांनी प्रस्ताव सादर केला की, मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडील पत्र क्र. ९८/ग्रापानि/कृउबास/प्र.नि./कावि-१७०१ दिनांक २५ जानेवारी १९९९ अन्वये महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ चे कलम १३(इ) तथा नियम १९६७ चे नियम ४०(१)(२)(३) व ४० अ नुसार महापालिका स्थानिक प्राधिकारी संस्थेतर्फे औरंगाबाद कृषि उत्पन्न बाजार समितीवर आपल्या प्रतिनिधीची निवड करून २५ फेब्रुवारी-९९ पर्यंत अशा प्रतिनिधीचे नांव कळविण्यांस कळविलेले आहे. त्यानुसार औरंगाबाद कृषि उत्पन्न बाजार समितीवर महापालिकेचा सभासद प्रतिनिधी निवड करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

(सभागृह नेता श्री. अविनाश कुमावत यांनी सभागृहात दाखल केलेल्या लेखी प्रस्तावानुसार स. सभासद श्री. त्र्यंबक तुपे यांचे नाव सुचविले असून त्यास स. सदस्य श्री. प्रदिपकुमार जैस्वाल यांनी अनुमोदन दिलेले आहे.)

**ठराव क्र. २३३/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियम) अधिनियम १९६३ चे कलम १३(इ) तथा नियम १९६७ चे नियम ४०(१)(२)(३) व ४० अ नुसार औरंगाबाद महानगरपालिका स्थानिक प्राधिकारी संस्थेचे स. नगरसेवक श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे वॉर्ड क्र. ३७ यांची महापालिका प्रतिनिधी म्हणून औरंगाबाद कृषि उत्पन्न बाजार समितीवर निवड करण्यांस स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३४/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सध्या विभागीय अधिकारी / मालमत्ता अधिकारी, जकात अधिक्षक इ. वर्ग-२ च्या संवर्गातील १२ पदे अस्तित्वात आहे. सध्याच्यासेवा भरती नियमानुसार ही पदे १००% पदोन्नतीने कार्यालय अधिक्षक, या संवर्गातून भरण्यांची तरतूद आहे. सध्या कार्यालय अधिक्षक या संवर्गात ६ पदे मंजूर असून ज्यापैकी ४ पदावरच कर्मचारी कार्यरत आहे. विभागीय अधिकारी या संवर्गाची रिक्त पदे असतांना सेवा भरती नियमानुसार कार्यालय अधिक्षक या संवर्गातून पुरेसे उमेदवार उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे ही पदे रिक्त आहे. तसेच कार्यालय अधिक्षक व विभागीय अधिकारी या संवर्गातील पद संख्या व्यस्त प्रमाणात आहे. तसेच ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे स्थापन करावयाच्या प्रभाग समित्या व त्यावरील प्रमुख कार्यकारी अधिकारी हा विभागीय अधिकारी असल्याने त्या पदावर सक्षम अधिकारी असणे आवश्यक आहे. मिनी आयुक्तालयाच्या अंमलबजावणीमुळे विभागीय अधिकारी हे पद अत्यंत महत्वाचे ठरत आहे. त्यामुळे विभगीय अधिकारी या पदावर निवड करतांना सेवा भरती नियमात दुरुस्ती करणे आवश्यक ठरले आहे.

**अ] <u>अर्हता पदोन्नतीसाठी</u>**

१) कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक.
२) कार्यालय अधिक्षकांच्या संवर्गातील किमान २ वर्षाचा अनुभव.

**ब] <u>नामनिर्देशनाने</u>**

१) कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक
२) विधी, प्रशासन कार्यालयीन व्यवस्थापक यामधील पदवी किंवा पदविका असल्यास प्राधान्याने विचार करण्यांत येईल.
३) अधिक्षक दर्जाच्या किंवा तत्सम संवर्गाचा शासकीय / निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था यामधील जबाबदारीच्या पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.
४) महानगरपालिकेच्या सेवेत नसल्यास अधिकतम वयोमर्यादा ३५ वर्षे वय इतके राहील.

**<u>नियुक्तीच्या पध्दती</u>**

१) ५०% नामनिर्देशनाद्वारे व ५०% पदोन्नतीने नियुक्ती करण्यांत येईल.

प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २३४/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सध्या विभागीय अधिकारी / मालमत्ता अधिकारी, जकात अधिक्षक, इ. वर्ग-२ च्या संवर्गातील पद संख्या आणि लेखा सेवा भरती नियमानुसार १००% पदोन्नतीने कार्यालय अधिक्षक या संवर्गातून भरावयाच्या तरतूदीनुसार या संवर्गातील पदसंख्या व्यस्त असल्याने विभागीय अधिकारी या संवर्गातील पदे रिक्त राहत आहे. तसेच ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार आणि मिनी आयुक्तालयाच्या अंमलबजावणीमुळे विभागीय अधिकारी हे पद अत्यंत महतवाचे ठरत असल्याने या पदावर निवड करतांना सेवा भरती नियमात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**अ] <u>अर्हता पदोन्नतीसाठी</u>**

१) कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक.
२) कार्यालय अधिक्षकांच्या संवर्गातील किमान २ वर्षाचा अनुभव.

**ब] <u>नामनिर्देशनाने</u>**

१) कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक
२) विधी, प्रशासन कार्यालयीन व्यवस्थापक यामधील पदवी किंवा पदविका असल्यास प्राधान्याने विचार करण्यांत येईल.
३) अधिक्षक दर्जाच्या किंवा तत्सम संवर्गाचा शासकीय / निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था यामधील जबाबदारीच्या पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.
४) महानगरपालिकेच्या सेवेत नसल्यास अधिकतम वयोमर्यादा ३५ वर्षे वय इतके राहील.

**<u>नियुक्तीच्या पध्दती</u>**

५) ५०% नामनिर्देशनाद्वारे व ५०% पदोन्नतीने नियुक्ती करण्यांत येईल.
प्रस्ताव विचारार्थ सादर.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्र गिताने सीाा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १६/०३/९९ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

**मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली दि.१३/०३/९९ रोजी विशेष सर्वसाधारण सभा (सन १९९८-९९ चे सुधारित व सन १९९९-२००० चे मुळ अंदाजपत्रक) चे आयोजन करण्यांत आले होते. सदरील सभा "वंदे मातरम्" या गिताने सकाळी ११=३० वा. झाली. या बैठकीस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. डॉ. कराड भागवत | उप-महापौर |
| २) | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स. सभासद |
| ३) | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | --//-- |
| ४) | स.स.श्री. अफसरखॉन यासिनखॉन | --//-- |
| ५) | स.स.श्री. लोखंडे रुख्मिणीबाई खंडेराव | --//-- |
| ६) | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ७) | स.स.सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ८) | स.स.सौ. रजनी रमेश जोशी | --//-- |
| ९) | स.स.सौ. मुंडलिक विमलबाई नंदकुमार | --//-- |
| १०) | स.स.श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --//-- |
| ११) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १२) | मा. श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| १३) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| १४) | स.स.सौ. शिंदे पद्मा बाबुराव | --//-- |
| १५) | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| १६) | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| १७) | स.स.श्री. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| १८) | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| १९) | स.स.सौ. फरहदबानो मो. नवाज | --//-- |
| २०) | स.स.श्री. फजलउल्ला खॉन अजमत खॉन | --//-- |
| २१) | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो. मुश्ताफा | --//-- |
| २२) | स.स.श्रीमती नुरजहॉं बेगम अ. रहेमानखॉन | --//-- |
| २३) | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| २४) | स.स.श्री. हाजी मोहसीन अहमद हाजी बशिर अहमद | --//-- |
| २५) | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखोराद्दिन | --//-- |
| २६) | स.स.श्री. जावेद रज्जाक | --//-- |
| २७) | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| २८) | स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| २९) | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ३०) | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ३१) | स.स.श्रीमती गंगावाल पुष्पाबाई सुरेशचंद्र | --//-- |
| ३२) | स.स.श्री. हमीदउद्दिन ताबा फसीयोद्दिन | --//-- |
| ३३) | स.स.श्री. म.अ.रऊफ अ. माबुद | --//-- |
| ३४) | स.स.श्री. स.अ. इकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३५) | स.स.श्री. प्रदिपकुमार जैस्वाल | --//-- |
| ३६) | स.स.श्री. सय्यद अली मिरा सलामी | --//-- |
| ३७) | स.स.श्री. रमेश लाहोट | --//-- |
| ३८) | स.स.श्री. संजय केनेकर | --//-- |
| ३९) | स.स.श्री. फैय्याज अहमद महमंद हाजी कुरेशी | --//-- |
| ४०) | स.स.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ४१) | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | --//-- |
| ४२) | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | --//-- |
| ४३) | स.स.सौ. शकुंतला हरिदास धांडे | --//-- |
| ४४) | स.स.श्री. अब्दुल रशिदखॉन (मामू) | --//-- |
| ४५) | स.स.कु. माया लिंबाजी लाडवाणी | --//-- |
| ४६) | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ४७) | स.स.सौ. अब्दुल अ. सत्तार | --//-- |
| ४८) | स.स.श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | --//-- |
| ४९) | स.स.श्री. गंगाधर सुखदेव गाडे | --//-- |
| ५०) | स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ५१) | स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ५२) | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | --//-- |
| ५३) | स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | --//-- |
| ५४) | स.स.सौ. ज्योत्सना दौलत हिवराळे | --//-- |
| ५५) | स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --//-- |
| ५६) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ५७) | स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | --//-- |
| ५८) | स.स.सौ. काळुसे मंदा धनंजय | --//-- |
| ५९) | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ६०) | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | --//-- |
| ६१) | स.स.श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

**संवाद** :

मा. महापौर : कोरम अभावे सभा १५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. वेळ ११=३२ वा. सभेला सुरुवात अंदाजे ११=५० वाजता.

श्री. प्रफुल्ल मालाणी : ज्ञानपिठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज यांचे नुकतेच दुःखद निधन झाले त्यांना सभागृहात १=०० मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात यावी.

महापौर : ठिक आहे. सभागृहात १.०० मिनिटे स्तब्ध उभे राहून ज्ञानपीइ पुरस्कार विजेते कै. कुसुमाग्रज उर्फ वि.वि. शिरवाडकर यांना आदरांजली वाहण्यात आली.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : डी.आय.जी. कमेटीवर श्री. अ. रशिदखॉ (मामू) यांची नियुक्ती झाली आहे. सभागृहाने त्यांचे अभिनंदन करावे.

मा. महापौर : श्री. अ. रशिदखॉन (मामू) यांची डी.आय.जी. कमेटिर नियुक्ती झाल्याने त्याचे अभिनंदन करण्यात येते.

**विषय क्र. २३५/१ :**

सन १९९८-९९ चे सुधारित आणि १९९९-२००० चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

मुख्य लेखा अधिकारी : महानगरपालिकेचे सन १९९८-९९ चे सुधरित व सन १९९९-२००० चे मूळ अंदाजपत्रक स्थायी समितीने मंजूर करून सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे. सदरचा अर्थसंकल्प मा. सभापती यांनी मा. महापौर महानगरपालिका औरंगाबाद यांना सादर करावे व आपले मत प्रगट करावे.

मा. सभापती : सन १९९८-९९ चे सुधारित व सन १९९९-२००० चे मूळ अंदाजपत्रक महानगरपालिकेस सादर केले व आपले मत मांडत असतांना संभाजीनगर (औरंगाबाद) असा शब्दप्रयोग (उल्लेख) केले. (त्यावेही सभागृहात विपक्ष सदस्यांकडून एकच गोंधळ सुरू झाला. त्याचबरोबर सत्ताधारी सदस्यांकडूनही सभागृहात सारखा आवाज होत होता. प्रतिस्पर्धी आवाजाने व आरडाओरड सुरू झाल्याने काहीही ऐकू येत नव्हते. काही विपक्षाकडील स.स. मा. महापौर यांच्या आसनाकडे धावून येत होते. व संभाजीनगर शब्द उच्चारलेले मागे घ्यावे. हे अंदाजपत्रक आहे. कुणाचा वैयक्तिक कार्यक्रम नाही. त्याच वेळी सत्ताधारी पक्षातील काही स.स. सदस्य मा. सभापती श्री. ओक यांचेकडून जाऊन आपण उच्चारलेले शब्द मागे घेण्याबाबत सारखे विनवनी करत होते. परंतु मा. सभापती स्थायी समिती त्यांकडे दुर्लक्ष करून आपल्या भूमिकेवर ठाम होते. हा गोंधळ जवळपास १०-१५ मिनिटे चालू होता.)

मा. महापौर : (सभागृहातील एकंदरीत गोंधळाच्या वातावरणाने) सभा तहकूब करण्यात येत असल्याची घोषणा कली (वेळ १२=१५ वा.) (सभेला सुरुवात अंदाजे १२=२५ वा.)

श्री. जयवंत ओक : सभागृहाच्या भावना लक्षात घेता व सभागृहात शांतता राहावी या दृष्टीने मी संभाजीनगर असा केलेला शब्द प्रयोग मी मागे घेत आहे. सन १९९८-९९ चे सुधारित व सन १९९९-२००० चे मूह अंदाजपत्रकातील सभापतीचे मनोगत व स्थायी समितीने केलेल्या काही मुद्यांचे वाचन करून दाखविले.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सदरील अर्थसंकल्पात सन १९९८-९९ चे रु. ८२ कोओी ८० लाख २६ हजाराचे सुधारित अंदाजपत्रक असल्याने नमूद केले. परंतु या अंदाजपत्रकात जवळपास १०.०० कोटीची तूट असून सदरील अंदाजपत्रक हे सभागृहाची दिशाभूल करणारी आहे. कारण ३१ मार्च ९९ पर्यंत सुधारित अंदाजपत्रकातील ८२.०० कोटीची तरतूद केलेली शक्य नसून विविध विभागांकडून ठेवण्यात आलेली तरतूद ही त्या प्रमाणाचे उद्दिष्ठ पूर्ण करणे शक्य नाही. सध्या प्रशासकीय खर्च एकंदरीत अंदाजपत्रकाच्या ३४% आहे की, त्यापेक्षाही जास्तीची होत आहे. यासाठी अंदाजपत्रकातील तरतूदीनसार एकंदरीत जमा व खर्च व प्रत्यक्षात प्रशासकीय खर्चाचही माहिती द्यावी.

श्री. अफसर खॉन : अंदाजपत्रक ९३.०० कोटीवरून ८२.०० कोटीचा सुधारित अर्थ संकल्प मांडलेला आहे. मागील वर्षी जकातीचे उद्दिष्ठ ४८.०० कोओीचे ठेवलेले होते. परंतु प्रत्यखात ४२.०० कोटीचीही वसूली झालेली नाही. ३८.५५ कोटी

वसूली झाली. त्यामुहे हे सादर करण्यात आलेले अंदाजपत्रक योग्य नाही. ४८ कोटी ऐवजी ३८ कोआी वसूली झालेली आहे.

डॉ. विजयकुमार मेहेर : शहरातील गारखेडा व पुंडलिकनगर या भागातील बऱ्याचशा वसाहतीत दैनंदिन पाणी पुरवझ पुरेसा नसून तो पूर्णत विस्कळीत आहे. त्याचप्रमाणे इतर भागातील विकास कामासाठी लागणारा पुरेसा निधीही उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती द्यावी.

श्री. गंगाधर गाडे : हा महानगरपालिकेस सादर केलेला अर्थसंकल्प असून स्थायी समितीने मा. सभापती यांनी शिफारस करून केलेला आहे. त्यामुळे प्रत्येक स. स. नी विचारलेल्या प्रश्नांची सविस्तर माहिती संबंधित अधिकारी यांचेकडून न घेता मा. सभापती यांनीच मुद्देसूद सांगावे.

श्री. जावेद रज्जाक : स. स. गाडे यांनी केलेली सूचना योग्य असून या सभागृहात स.स.नी केलेल्या विकास विषयक कामांच्या माहितीची व करण्यात तरतूदीची माहिती मा. सभापती यांनी द्यावी.

उप-आयुक्त (म) : जकातीचे उद्दिष्ठ मागील वर्षी प्रशासनातर्फे रु. ४६.०० कोटीचे ठेवलेले होते. मात्र सर्वसाधारण सभेने तीत वाढ करून रु. ४८.०० कोटीचे केले. यावर्षी सध्या १४ मार्च ९९ पर्यंत रु. ३८.५० कोटी वसूली झालेली असून मार्च अखेर पर्यंत उर्वरित उद्दिष्ठ पूर्ण होण्याची शक्यता आहे. तरिही या वर्षी मालाच्या आयातीत एक्सार्टमुळे बराचशा प्रमाणात जकातीवर परिणाम झ ालेला आहे. तसेच जगातिक मंदिनेही जकातीवर फार मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला आहे. या बाबत माहे नोव्हें महिण्यात सविस्तर खुलासा केलेला आहे. (सभागृहात जकाती बाबतचे निवेदन वाचून दाखवितात.)

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : केलेल्या खुलासा सभागृहात योग्य वाटत नसून आपल्याला माहिती असूनही जवळपास १०.०० कोटीची तूट धून ही रु. ८२ कोटीची होत नाही. सध्या अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार जवळपास ५०% खर्च प्रशासकीय खर्च होत आहे. ३१ मार्च पर्यंत ६ कोटीची तुट होणार आहे. तर महानगरपालिकांचे अर्थसंकल्प प्रशासकीय खर्च ४२% आणण्यासाठी वाठवून दाखविण्यात येत आहे. हा अर्थसंकल्प मुळात चुकीचा आहे. यामध्ये दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : जकातीचे उद्दिष्ठ पूर्ण करणे यासाठी औद्योगिक क्षेत्रातील (एमआयडीसी) काही कारखानदारांची आयात व निर्याती बाबत प्रशासनाने जकात बाबत व्यवस्थितपणे खुलासा केलेला दिसून येत नाही. व्यवसाय कमी झाले असे म्हणणे योग्य नाही. गेल्या वर्षात एमआयडीसी मध्ये एकही कारखान्यात संप नाही. गेल्या वर्षी प्रमाणेच त्यांचा बजेट आहे. बराचसा औद्योगिक क्षेत्रातील माल हा जकाती चुकवू इतरत्र नेल्या जातो. म्हणजेच महानगरपालिका याचा काहीही फायदा झालेला नाही. पर्यायाने जाणीवपूर्वक प्रशासनातील कर्मचाऱ्यांनी कार्यवाही केलेली नाही.

श्री. अफसरखॉन : जकातीमध्ये फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालू आहे. याबाबत मी अनेकदा प्रशासनाकडे पत्राद्वारे कळविलेले असून प्रशासनाने काहीही कार्यवाही केलेली नाही. मागे एकदा १८ गाड्यांच्या बाबतीत प्रशासनाला माहिती दिलेली होती. व त्या गाड्यांची ओपन डिलेव्हरी करण्यास सूचना केलेली असतांनाही तसे काहीही केलेले नाही. म्हणून प्रशासनाने बरीचशी जकात वसूली न केल्याने मनपास आर्थिकदृष्ट्या भुर्दंड झालेला आहे.

यासाठी मागे एकदा जकात मधील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या होत्या त्यापैकी काही कर्मचारी बदली ठिकाणी रुजू झाले तर काही कर्मचाऱ्यांपैकी श्री. मोकाशी व श्री. लोखंडे हे कर्मचारी अद्यापही आहे त्याच ठिकाणी आहेत त्यांना प्रशासनाने संबंधित ठिकाणी रुजू होण्याचे का आदेश दिलेले नाहीत? त्यामध्ये काय गोडबंगाल आहे याचे नेमके कारण काय? त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांकरवी जकातमध्ये भ्रष्टाचार होत आहेत. व त्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : माझ्या माहितीप्रमाणे श्री. मोकाशी कनिष्ठ लिपीक पदावरील कर्मचारी असून त्यांची बदली एका वर्षातून तिनदा झालेली आहे. तरीही संबंधित कर्मचारी त्या ठिकाणावरून बदली झालेल्या ठिकाणावर रुजू होत नाहीत याचे नेमके कारण समजत नाही. ज्यामुळे मनपा प्रशासनाचे दडपण राहत नाही व भ्रष्टाचार वाढतो.

श्री. अफसरखॉन : जकातीमधील भ्रष्टाचारामुळे जवळपास १०.०० कोटीची तूट अंदाजपत्रकात होत आहे. संबंधित कर्मचारी श्री. मोकशे व लोखंडे यांच्या आपसी लपंडाव त्यामुळे भ्रष्टाचार वाढत असून जे विविध प्रकारचे ट्रक शहरात दाखल होतात. त्याच्या कडून नियमितपणे हे दोन्हीही कर्मचारी आळीपाळीने पैसे घेतात व जकात माल चुकविण्याचे काय करून मनपास आर्थिकदृष्ट्या खाईत टाकीत आहेत. अशा कर्मचाऱ्यांविरुध्द प्रशासनाने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : विरोधी पक्ष नेता यांनी जे सभागृहात निवेदन केले. तया नुसार त्यांनी मा. आयुक्त यांचेकडे याच संदर्भात तक्रार द्यावयास पाहिजे होते. व त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे अबकारी कर हे कोणकोणत्या ठिकाणावरून कमी आलेले आहे याची माहिती द्यावी.

श्री. अफसर खॉन : मी केलेल्या सूचनेनुसार ज्यावेळेस १७ गाड्या जकात फारडण्यास आलेल्या असतांनाही त्यांचे ओपन डेलिव्हरी होऊन गेल्या नाही. जकात न भरताच गेलेले आहे.

श्री. गिरजाराम हाळनोर : जया १७ गाड्यांचे मालाचे लोडींग करून जकात फाडण्यासाठी ट्रक आलेले होते. त्यामध्ये मोणत्या प्रकारच्या माल होता याची माहिती द्यावी.

उप-आयुक्त(म.): वेगवेगळ्या ट्रक मध्ये वेगवेगळ्या प्रकारचे माल असतात. ज्यामध्ये छोटे-मोठे साहित्य व काही इतर किरकोळ माल असतात.

श्री. अफसरखॉन : ज्या ठिकाणी ४ गाड्या मी स्वत: चेक केल्या होत्या. त्या गाड्या मोंढ्यात गेल्या असतांना त्यापैकी कोणत्याही गाड्यांची चेकींग झालेली नाही. अथवा ओपन डिलेव्हरी केलेली आढळून आलेली नाही. जर तसे केले असते तर बराचसा फायदा मनपाला झालेला आढळून आले असते.

उप-आयुक्त (म.) आपल्या जकात विभागातील कर्मचारी वर्गाना नेमून दिलेले कामे ते करतात. तया व्यतिरिक्त भरारी पथकाद्वारे कोणाचाही जकात नाक्यावर अचानक पाहणी करून व वेळोवळी चेकींग करून कार्यवाही केल्या जाते. एखादी गाडी अचानक गेलेली असल्यास त्याबाबत माहिती मिळाल्यास त्याचा पाठलाग करून तातडीने कार्यवाही करण्यात येते. गाड्याची ओपन डिलेव्हरी हे दोनच गाड्यांची एकदा करता येऊ शकते कारण प्रत्येकी खिडकी निहा ते-ते काम वाटून दिलेली असतात. ती त्यांना पार पाडावी

लागते. व संबंधित ठिकाणी आवश्यक तो कर्मचारी काम पार पाडत असतो. शहरात ज्या दिवस-रात्र गाड्या येतात. पैकी प्रत्येक गाड्यांमध्ये छोटे-छोटे साहित्य तर काही गाड्यांमध्ये मोठमोठे साहित्य व काही किरकोळ आयातीचे साहित्य असते. व त्या मालांच्या वस्तुंवर ठरवून दिलेल्या दरान्वये जकातीचे आकारणी करण्यात येते. फक्त छोटे साहित्यांची ओपन डेलिव्हरी करता येऊ शकते. मोठ्या साहित्यांची करता येत नाही.

श्री. अफसरखॉन : ज्या पत्राद्वारे मी सूचना केलेल्या होत्या त्या १७ गाड्यापैकी किती गाड्यांचे ओपन डिलिव्हरी केली. व माझ्या माहिती प्रमाणे एकाही मागडीची ओपन डेलिव्हरी केलेली नाही व न करण्याचे कारण हे प्रशासनातील कर्मचाऱ्यांना माहिती आहे. त्याच प्रतिबंध करणे आवश्यक आहे.

श्री. रशिदखॉन (मामू) : अंदाजपत्रकीय सुधारित रु. ४८.०० कोटीवरून ३८.०० कोटीची जकात वसूल झालेली आहे. म्हणजे याचमध्ये जवळपास १०.०० कोटीची तूट दिसून येते. तर मालमत्ता व पाणीपट्टी करापौकी १३ कोटीची उद्दिष्ठ ठेवण्यात आले होते. पैकी रु. ७.०० कोटीची वसूली झालेली आहे. त्यमुळे या महानगरपालिकेत महसूली विभागच्या अधिकारी म्हणून आपण ज्यांच्याकडे वसूली व महसूली भाग प्रशासनाने सोपविला तो त्यांनी योगय रित्या सांभाळलेला दिसत नाही. जेवढे उद्दिष्ठ ठरविलेले होते पैकी उपआयुक्त (म) यांनी तेवढ्या प्रमाणात वसूली व महसूल गोहा केलेला नाही. परिणामी मनपा प्रशसनावर व विकास कामावर परिणाम होतो. खरे पाहिले तर महसूली खात्याचा अधिकारी हा महाराष्ट्र शासनाचा डेपूटेशनचा असल्याने त्यांचा वचक प्रशासनावर व संबंधित विभाग प्रमुखांवर असणे आवश्यक असते. परंतु तसे या मनपात संबंधित अधिकाऱ्यांना वचक दिसत नसून महसूली उत्पन्न त्यांच्यामुळे एकदम कमी झालेले दिसू यते. ज्यामुळे विकास कामावर उद्दिष्टानुसार परिणाम होईल.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सन १९९९-२००० या मूळ अंदाजपत्रकीय मध्ये रु. १०१ कोटी ७८ लक्ष ९१ हजाराचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे परंतु दिलेल्या उद्दिष्टानुसार सुधातिर अंदाजपत्रकातील उद्दिष्ट प्रशासनाने पूर्ण केलेले नाही. तर यावर्षीचे उद्दिष्ठ पूर्ण होणे शक्य नाही. कारण यावर्ष्जी जकातीचे उद्दिष्ठ पूर्ण ५२.०० कोटीचे दाखविलेले आहे. मागील वर्षीचे रु. ४८.०० कोटीच्या उद्दिष्ठापैकी साधारणत: १०.०० कोओीची तूट गृहित धरलेली असून यावर्षी रु. ५२.०० काटीच्या मध्ये रु. १२.०० कोटीची जकातमध्ये तूट मिळणार आहे. कारण प्रशासनाने स्पष्ट केलेले आहे की, जागतीक मंदि असल्याने व ही मंदि रजवळपास दोन वर्ष असल्याने या वर्षी जकात आयातीवरील वसूली आहे. तशीच राहणार आहे त्यासाठी अर्थसंकल्पात १०१ कोटीची न ठेवता कमी करावे व तशी दुरुस्ती करावी. विनाकारण एवढा मोझो अर्थसंकल्प फुगवून सभेची दिशाभूल करू नये. एकंदरीत प्रशासकीय खर्च प्रशासन किती प्रमाणात करते याचीही माहिती द्यावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : १८% जी वसूली जकातीचे कमी झालेली आहे. ती कोणत्या विभागातून झालेली आहे.

उप-आयुक्त (म) एकंदरीत औरंगाबाद विभागातून कमी आलेली आहे.

श्री. मोहसीन अहमद : प्रशासनाने जे जकात साठी उद्दिष्ठ ठेवलेले आहे. ते पूर्ण होत नसल्यास व रु. १०.०० कोटीची तुह येत असल्यास याबाबत प्रशासनाने

संबंधित कर्मचारी / अधिकारी यांच्या बदल्या कराण्यात व जकाती बाबत खाजगीकरण करण्याचा प्रस्ताव ठेवावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : जकाती संदर्भात जे कर्मचारी निलंबीत होतात. त्यांना सभागृहाने सहानुभूतीपूर्वक विचार करून कामावर घेतले जाते परंतु अशा प्रकारची जकाती वसुलीची परिस्थिती असल्यास व कम्रचारी योग्यरित्या कामाचे उद्दिष्ठ पूर्ण करीत नसल्यास अशा निलंबित कर्मचारी यांना सहानुभूती दाखवू नये. मागील काळात माजी महापौर श्री. गजानन बारवाल यांनी काही कम्रचाऱ्यांना तयांच्या कामावरील हलगर्जीपणामुळे प्रत्यक्षात पाहणी करून प्रशासनामार्फत निलंबित केलेले होते. त्यांना सभागृहाने परत घेतले होते. या ठिकाणी मा. सभापती वारंवार बोलतात कोणत्याही कर्मचाऱ्यांवर / अधिकाऱ्यांवर काहीही झाल्यास कठारे कार्यवाही करावी. परंतु तेस या ठिकाणी होत नाही. एकीकडे कम्रचाऱ्यांना निलंबित केले जाते तर दुसरीकडे कम्रचा४यांना घेतले जाते. ही बाब योग्य नाही.

श्री. प्रदिप जैस्वाल : मागील वर्षी ठेवण्यात आलेले जकातीचे उद्दिष्ठ रु. ४८.०० कोटी व यावर्षी शिफारस करण्यात आलेले उद्दिष्ठ रु. ५२.०० कोटी पूर्ण होणार काय? याची माहिती द्यावी. कारण प्रत्येकी वर्षी स्थायी समितीने सर्वसाधारण सभेकउे शिफारस करून अंदाजपत्रकात उद्दिष्ठ वाढविल्या जाते. ते उद्दिष्ठ प्रशासनाकडून पूर्ण हो नाही. ही बाब गंभीर असून योग्य नाही. तेंव्हा मागील वर्षीच्या उद्दिष्ठा प्रमाणे प्रशासकातर्फे काटेकोरपणे अंमलबजावणी का होत नाही याची माहिती द्यावी.

उप-आयुक्त (म.) मागील वर्षीचे ठेवण्यात आलेले उद्दिष्ठ रु. ४८.०० कोटी पैकी एस्काट्र फिस मुळे रु. १.०० कोटी अप्राप्त आहे. त्याचप्रमाणे जागतील मंदिने जकात आयात कमी झालेली आहे. सध्या उद्दिष्ठापैकी रु. ४२.०० कोटीची वसूली ३१ मार्च पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. व यावर्षी शिफारस करण्यात आलेले जकातीचे उद्दिष्ठ पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

श्री. रशिदखॉन (मामू) : जकात मध्ये काही मालावर वाढ करण्यासाठी सर्वसाधारण सभेने मंजुरी करून शासनाकडे पाठविलेले आहे. परंतु गेल्या ६ महिण्याच्या कालावधीत अद्यापही काहीही कार्यवाही झालेली नसून मागील वर्षी रु. १०.०० कोटीची तूट दिसून येते. तर या वर्षीच्या अंदाजपत्रकात रु. ५२.०० कोटीचे उद्दिष्ठ ठेवल्यास कसे पूर्ण होईल. याबाबत प्रशासन कोणती काय्रवाही किंवा उपाय योजना करणार याची माहिती द्यावी.

श्री. अविनाश कुमावत : याबाबत चर्चा करून अर्थसंल्पात बाबतचे जे उद्दिष्ठ ठेवलेले आहे. ते वर्षभरात पूर्ण होऊ शकेल काय याबाबत प्रशासनातील अधिकाऱ्यांशी चर्चा करून निर्णय घ्यावा.

श्री. भगवान घडामोडे : जवळपास १३ ते १४ कोटीचा सध्याच्या अंदाजपत्रकात तूट होणार असून मागील वर्षी ज्यामुळे १३ ते १४ कोटीचे विकास कामे शहरातील झालेली नाहीत.

श्री. रशिदखॉन (मामू) जकातीचे उद्दिष्ठ ठरविल्यानुसार पूर्ण होईल. त्याचप्रमाणे वाढ अपेक्षित धरावे ज्यादा दरवाढ करणे योग्य नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : मागील वर्षी जकातमध्ये रु. १०.०० कोटीची तूट आलेली आहे. आणि यावर्षी प्रशासनातर्फे सन १९९९-२००० चे मुळ अंदाजप९ाक रु. १०१.०० कोटीचे सादर करते. एवढया मोठ्या प्रमाणात फुगवून प्रशासनाने

अंदाजपत्रक दाखवू नये जेणे करून नागरिकांच मूलभूत गरजा व विकास कामे करण्यास अनेक अडचणी येतात. यासाठी अंदाजपत्रकक न फगविता वास्तविकता दाखवून तरतूद करावी. व महसूली उत्पन्नात वाढ कशी होईल. त्याच प्रमाणात प्रशासनाने काळजी घ्यावी.

डॉ. विजयकुमार मेहेर : १४.०० कोटीची तूट यामध्ये दिसूत येते. यावर्षी फुगवून ठेवलेल्या जकातीच्या उद्दिष्ठामुळे फार मोठ्या प्रमाणात गैर उपयोग होण्याची शक्यता आहे. कारण ठेवलेले उद्दिष्ठ पूर्ण होत नाही. प्रशासन कम्रचाऱ्यांवर योगयरित्या अंकूश ठेत नाही. महसूलल उत्पन्न वाढ होत नाही. त्यामुळे न परवडणारा प्रशासकीय खर्च जास्त प्रमाणात करू नये.

सौ. अलका पाटील : मागील वर्षीप्रमाणे या वर्षीही अंदाजपत्रक फुगवून ठेवलेले असून त्यामुहे ठेवलेले उद्दिष्ठ साध्य होत नसल्यास काहीही उपयो गहो नाही. यापैक्षा अदांजपत्रकात दुरुस्ती करून सादर करावे.

श्री. गंगाधर गाडे : सभागृहात याबाबत जास्त प्रमाणात चर्चा न करता फक्त पदाधिकारी व काही स. स. यांनी एकत्रितरित्या बसून विचार विनिमय करावा. व तसा एकत्रित निर्णय घ्यावा. तो सर्वमान्य राहील. तोपर्यंत सभा तहकूब करावी.

उप-आयुक्त (म.) जकातीचे उद्दिष्ठ या वर्षी रु. ५२.०० कोटीचे ठेवलेले आहे. त्यामध्ये दरवर्षी एकूण उत्पन्नाच्या १५% वाढ लक्षात घेवून प्रशासनाने उद्दिष्ठ ठरविलेले आहे. ज्यामध्ये मालमत्ता कर १५.०० कोओी तर पाणीपट्टी रु. १०.०० कोटीचे उद्दिष्ठ ठरविलेले आहे. म्हणजे मागील वर्षापेक्षा यावर्षी रु. ४.०० कोओीची जकातीचे उद्दिष्ठ वाढ ठरलेले आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : कर वाढ करण्याचे प्रस्तावित करावयाचे झाल्यास व दिलेले उद्दिष्ठ पूर्ण करणेच्या दृष्टीने प्रशासनाने हमीपत्र द्यावे की, ठरविण्यात आलेले उद्दिष्ठ पूर्ण करण्यात येईल.

श्री. रशिदखॉन (मामू) : मालमत्ता कर रु. ३५.०० कोटीवरून रु. १५.०० कोटीवर आणलेले आहे. तर जकातीचे उद्दिष्ठ ठेवलेले रु. ४८.०० कोटीचे ते पूर्ण न झाल्याने रु. ३८.०० कोटीवर वसूली झाले. त्यामुळे महाराष्ट्र शासनाकडून डेपुटेशनवर नियुक्ती केलेले अधिकारी यांनी वसूली पूर्णपणे केलेली नसल्याने मनपाचे फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झालेले आहे. यासाठी शासनाकडील डेपुटेशनवरील संबंधित अधिकाऱ्यास परत पाठविण्यात यावे.

उप-आयुक्त (म.) मालमत्ता कराचे रु. ३५.०० कोटीपैकी रु. १०.०० कोटी वसूली ही थकबाकीपौकी सिडकोची आहे. सन १९९९-२००० या आर्थिक वर्षासाइी विभागावर मालमत्ता कराची मागणी खालील प्रमाणे आहे.

| विभाग | मागणी |
|---|---:|
| १ | ९०,००,०००/- |
| २ | १,६६,८७,८०३/- |
| ३ | १,७३,९८,२८०/- |
| ४ | १,२५,८०,९६०/- |
| ५ | २,७३,३३,४४९/- |
| ६ | १,२५,००,०००/- |

| | |
|---|---|
| ७ | १,५६,०२,०००/- |
| **एकूण** | **१२,११,०२,४९२/-** |

म्हणजेच सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात १५ कोटी रुपये मालमत्ता कर वसूल होऊ शकेल. सर्वसाधारण सभेने सिडको हस्तांतरण झाल्यापासून मालमत्ता कर वसूल करावा म्हणून ठराव पारित केलेला असल्याने, सिडकोतील १०.०० कोअीची थकबाकी वगळता व चालू मागणी लक्षात घेता यावर्षी मालमत्ता करापोटी १५ कोटीचे उद्दिष्ठ निश्चित करण्यात आलेले आहे. मालमत्ता कराची प्रभावी वसूली व्हावी यासाठी "झा समितीने" शिफारस केल्यानुसार प्रति २५०० मालमत्तासाठी एक कर निरिक्षक, एक कनिष्ठ लिपी व एक शिपाई या प्रमाणात कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात यावा.

औरंगाबाद शहरात साधारणतः एक लाख मालमत्ता आहेत "झा" समितीने ठरवून दिलेल्या निष्कर्षाप्रमाणे मालमत्ता कर वसुलीसाठी ४० कर निरिक्षक, ४० कनिष्ठ लिपीक व ४० जवान देण्यात यावे. सध्या ७ विभागीय कार्यालयामधून १८ कर निरिक्षक, १६ कनिष्ठ लिपीक कार्यरत आहेत.

श्री. हमीद ताबा, श्री. अफसर खॉन :

जकातीचा मागील वर्षीचा जो १०.०० कोटीचा तूटीचा अर्थसंकल्प उद्दिष्ठानुसार कमी वसूली झालेली आहे. त्याबाबतची माहिती द्यावी.

उप-आयुक्त (म) : मागील वर्षी रु. ६.०० कोटीची मालमत्ता कर वसूल केलेली होती. परंतु या वर्षी त्यापेक्षा जास्त म्हणजे रु. ७.३३ कोअी वसूल झालेली आहे. तर पाणी पुरवठा (पट्टीची) वसूली रु. ३.०० कोटीची होती ती या वर्षीरु. ४.०० कोटी वसूल झालली आहे.

मा. महापौर : ३०.०० मिनिटांसाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ १.४० वा) (सभेला सुरुवात ४=१०वा.)

श्री. मोहसीन अहमद : आतापर्यंतच्या चर्चेनुसार काय निर्णय झाला कृपया सभागृहात माहिती द्यावी.

श्री. गिरजाराम हानौर : १ ला प्रस्ताव पृष्ठ क्र. ५० मधील प्रभावी मालमत्ता कर वसूली करणे यामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती व्हावी जे नागरिक खालील निर्धारित वेळेच्या आंत मालमत्ता कराचा पूर्ण भरणा करतील त्यांना खालीलप्रमाणे सवलत देण्यात येईल.

१. ३० एप्रिल पूर्वी पूर्ण रक्कमेचा भरणा केल्यास ७% सवलत.
२. ३१ मे पूर्वी भरणा केल्यास ६% सवलत.
३. ३० जून पूर्वी भरणा केल्यास ५% सवलत.
४. ३० सप्टेंबर पूर्वी भरणा केल्यास २% सवलत.
५. ३१ ऑक्टोंबर पूर्वी भरणा केल्यास १% सवलत.

त्याचप्रमाणे पृष्ठ क्र. ७४ मध्ये सार्वजनिक दवाखाने या शिर्षातील दंतविभागासाठी रु. ३.०० लाख व इतर वैद्यकीय साहित्यासाठी रु. ९ लक्ष तरतूद करावी अशी दुरुस्ती व्हावी.

श्री. मोहसीन अहमद, श्री. मोहसिना बिल्कीस :

अर्थसंल्पीय पुस्तिकेत आतापर्यंत कोणत्याही स्थायी समितीचे सदस्यांचे फोटो छापण्यात येत नव्हते याच वर्षी छापण्याचे मुख्य कारण काय?

मा. आयुक्त : स्थायी समितीने सदरील अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेस सादर केलेले असून ते पूर्णपणे विचारपूर्वक केलेले आहे.

श्री. अविनाश कुमावत : सर्व पदाधिकारी व काही स. स. यांनी एकत्रित बसून केलेल्या चर्चेनुसार पृष्ठ क्र. ६ पासूनच्या प्रस्तावापासून शेवटपर्यंत ज्या दुरुस्तीसह प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सर्वसाधारण सभेने मंजुरी द्यावी.

श्री. मोहसीन अहमद : माझा एक प्रस्ताव असा आहे की, शहरात बरेचसे राष्ट्रपुरुषांचे पुतळे बसविण्यात आलेले आहे व काही पुतळ्यांसाठी तरतूदही केलेली आहे. त्याचप्रमाणात स्व. इंदिरा गांधी व स्व. राजीव गांधी माजी पंतप्रधान या राष्ट्रनेत्यांचे पुतळे उभारणीसाठी तरतूद करावी.

श्री. प्रफुल्ल मालानी : जकातीतील काही मालांबाबत दुरुस्त्या कराव्यात सन ९८-९९ च अर्थसंकल्पात प्रशासनाची शिफारस व ठराव तुावत आहे. ते पुन्हा सर्वसाधारण सभेपुढे ठेवून त्यास मान्यता घेवून ते शासनास पाठवावे. तरी त्यानुसार दुरुस्ती करून घेणे योग्य वाटते. ठराव चाचून दाखविले. त्यात दुरुस्ती करण्यांस मंजुरी द्यावी.

श्री. वसंत देशमुख : पृष्ठ क्र. ४८ पुस्तके आणि शैक्षणिक साहित्य खेरदी / निर्मिती यामध्ये जागदा आर्थिक तरतूद करावी.

श्री. प्रफुल्ल मालानी : शासन नगर विकास विभागचे दि. ११/०२/९९ चे पत्र आलेले आहे. त्यानुसार काही बाबीं वस्तुवरिल जकात दर निश्चित करण्याबाबत मंजुरी घेणे आवश्यक आहे.

सर्वसाधारण सभेचा इराव क्र. ५३/१ दिनांक २१/०६/९७ प्रमाणे व ठराव क्र. १९५/१ दि. ३१/०३/९८ अन्वये जर दर अनुसूची ओ मध्ये दर्शविलेले आहेत त्यांना मंजुरी द्यावी.

| अ. क्र. | अनुसूची ओ मधील क्र. | मालाचे वर्णन | प्रचलित दर | ठराव क्र. ५३/१ | ठराव क्र. १९५/१ | मंजूर |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ब | सर्व प्रकारचे तांदुळे | १% | ०.५०% | रु. ५ प्रति क्वि. | ०.२५% |
| २. | ४ व २१ | तेलबिया | १% | ०.५०% | रु. ४ प्रति क्वि. | ०.२५% |
| ३. | ४ | सरकी (नव्याने प्रस्तावित) | १% | - | रु. २/- | ०.२५% |
| ४. | ५८(अ) | कापूस | १% | ०.२५% | ०.२५% | माफ |
| ५. | ६७(ब) | लोखंड, पोलाद भंगार | २% | रु. ६/- प्रति टन | रु. ६० प्रति टन | रु. ६० प्रति टन |
| ६. | ८५(अ) | रासायनिक खते | १% | रु. २/- प्रति टन | रु. २/- प्रति टन | रु. २/- प्रति टन |
| ७. | ७२ | मोटार पार्ट | २.५% | १.५% | १.५% | १.५% |
| ८. | ३९ | सिमेंट | ३% | - | रु. ४/- प्रति गोणी | ३/- |
| ९. | ५ | अनरिफाइन्ड ऑईल | १% | - | रु. १० प्रति क्वि. | ०.२५ प्रति क्वि. |

तरी वरील प्रमाणे विविध वस्तुपैकी अ.क्र. १ ला ०.२५%, अ.क्र. २ ला ०.२५%, अ.क्र. ३ ला ०.२५%, अ.क्र. ४ ला पूर्ण माफी द्यावी, अ.क्र. ८ ला

रु. ३% व अ.क्र. ९ ला ०.२५% अशी दुरुस्ती करण्यात यावी. (स्टेटमेंअ मा. महापौरांकडे सादर केले.)

मा. महापौर : वरील प्रमाणे दुरुस्तीस मंजुरी देण्यात येते. तसेच वखार्ड रिसर्च सेंटर साइी रसायने, उपकरणे, संशोधन मशिनरी इ. साठी सूट देवून जकात कराची ०.५०% प्रमाणे आकारणी करण्यास कापसावरील जकात माफ करणेस मंजुरी देण्यात येते.

श्री. मोहसीन अहमद : नेहरू भवनचे दर जास्त आहे तेथे डायसवर पंख्याची व्यवस्था नाही. पडदे व्यवस्थित नाही. तरी दर कमी करण्यात यावा.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : गुरतेग बहाद्दुर यंची ३०० वी असल्याने सिंधी कॉलनी येथील वाहतूक बेटाच्या कामासाठी रु. १०/- लक्ष ची तरतूद करण्यात यावी.

श्री. अब्दुल रशिद खॉन (मामू) : उर्दू लायब्ररीसाठी १० लक्ष, मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रासाठी रु. १ कोटी, कत्तलखाना साठी १५ लक्ष ठेवावे.

श्री. मोहसीन अहमद : पान क्र. १७ वरील वाचनालयासाइी रु. ५ लक्ष ठेवले त्यास रु. १० लक्ष करावे.

श्री. महादेव सुर्यवंशी : पान क्र. १७ अ.क्र. ९ नारेगांव ट्रेनिंग ग्राऊंड वर खताचा कारखाना होत आहे. वखार्ड ते नारेगांव १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी आहे. ती २०० मी.मी. करण्यासाठी ५ लक्ष ऐवजी १५ लक्ष ठेवावे.

श्री. वसंत देशमुख : पान क्र. २५ ऋणनिर्देश मध्ये मा. दिवाकरजी रावते, आ. शालीग्राम बसैय्ये यांचा निधी वापरला. त्यांचे नांव ऋणनिर्देशन मध्ये टाकावे.

मा. महापौर : मंजूर

श्री. अब्दुल रशिदखॉन (मामू) कत्तलखाना आधूनिक पध्दतीने करणार होते. त्याबद्दल माहिती द्यावी.

पशुधन विकास अधिकारी : आधुनिक पध्दतीने कत्तलखाना बांधणे संबंधिचा रु. ३.८० कोटीचा प्रकल्प अहवाल (प्रोजेक्ट रिपोर्ट) राज्यशासनातर्फे केंद्र शासनाला पाठविण्यात आलेला असून जितका खर्च येईल. त्याची ५०% रक्कम केंद्र शासनाकडून मिळणार आहे.

श्री. मोहसीन अहेमद : दवाखान्यावरील खर्चात वाढ होणार आहे. नविन कर्मचारी भरती व दवाखान्याच्या खर्च वाढल्याने बजेट वाढवावे. एक्सरे, सोनोग्राफी इ. साहित्य घ्यावे. कैसरकॉलनी येथे प्रसुती गृह बांधण्यासाठी रु. १०/- लक्षाची तरतूद करण्यात यावी.

श्री. अविनाश कुमावत : सोबतच्या तक्त्यात दुरुस्ती केल्याप्रमाणे मंजुरी द्यावी. तक्ता वाचून दाखवितात.

मा. महापौर : दुरुस्त्यासह मंजुरी देण्यात येते.

वरील सर्व फरेुार नुसार आता १०० कोटी ८८ लाख ९१ हजार व खर्च रु.१०० कोटी ८५ लाख ९७ हजार नुसार २.९४ लाखाच्या शिल्लकी अर्थसंकल्पास सर्वानुमते स्विकृतीसह मान्यता देण्यात येते.

**ठराव क्र. २३५/१ :**

स्थायी समितीने शिफारस करून सर्वसाधारण सभेपुढे दाखल केलेल्या सन १९९८-९९ चे सुधारित व सन १९९९-२००० चे मुळ अर्थसंकल्पावर सभागृहात आलेल्या चर्चेनुसार खालील प्रमाणे दुरुस्त्या करून सन १९९९-२००० चे मुळ अर्थ संकल्पास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**जकात**

| अ.क्र. | मालाचे वर्णन | प्रचलित दर | प्रस्तावित दर | स्थायी समितीने शिफारश केलेल दर | सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १८. | पोटेश, रिठे, तुरटी, सरस, शिकेकाई, सोडा, आंडी, कपडे, आणि फरशी घासण्यासाठी वापरले जाणारे शुध्द मीठ | १% | ३% | ३% | २% |
| १९(अ) | पांढरी व लात सुपारी व इतर सर्व प्रकारची मसाला सुपारी | १% | ३% | ३% | २% |
| २६ब | कोळसा व कोल (दगडी कोळसा) हार्ड कीक | ३% | ४% | ४% | ३.५% |
| ३०. | अखाद्यतेल, बिया, लिंबोळी, सरकी, एरंडी, खाद्यतेल, शुध्दतेल, कॉलावॉश ऑईल, एरंड तेल इ. आयात केलेले राईस ब्रेड ऑईल, आयात केलेल्या खाद्य व अश्वाद्य तेलाची निर्मिती. | १% | ३% | २% | ०.२५% |
| ३१ | औद्योगिक अलेहल जसे ऑईलीन, टॉऊनलिन, ॲसीअल औषधीत वापरण्यात येणारे क्लोरोफॉम, बेनझिन सोलॅक्स इथाईल, ॲमिटेक्स आणि इथाईल ऑल्कोहल, आयसीप्रो फित्त अल्होहिल, शेटेस्टॉरिधो अल्होहिल इत्यादी. | १.५% | ४% | ४% | २% |
| ३४ ड | औषधी तयार करण्यासाठी सर्व प्रकारची रसायने | १% | ४% | ३% | १% |
| ३७ | जळावू लाकूड | ०.३० प्रति क्वि.% | २% | १% | ८०.५% |
| ३८ | उर्वरित मस, बॉटल क्ले, सिलिया टेल बॅन्टोनाईट आणि फाउंडरी सॅड, सिलिका सॅड, प्लॅस्टर ऑफ पॅरिस, फायर क्रीक्स इश्युलेशन, ब्रीक्स बी.पी. सेटस, लेंटल स्लीव्हज डेड बर्नर, मॅग्नाईट पावडर | २% | ४% | ४% | ३% |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ४० ब | विटा आणि खंगर | २% | ४% | ४% | २.५% |
| ४० ब | लाकूड व दगड यावर कोरीव केलेल्या वस्तु आणि सर्व प्रकारच्या मुर्ती (पुतळे) | २% | ४% | ४% | २% |
| ४६ | रुफींग फेल्ट | २% | ४% | ४% | ३% |
| ४८ | प्लायवूड, फोरमाईका, सनमाईका, फिटप्लास हार्डबोर्ड, कार्डबोर्ड, स्टॉबोर्डस, माऊंट बोर्डस, मिल बोर्डस, मसोनाईट, सॉफ्टबोर्डस किंवा कोणत्याही प्रकारच्या लाकडापासून कृत्रिमरित्या तयार करण्यात आलेल्या वस्तु. | ३% | ४% | ४% | ३.५% |
| ४९ | स्टील फर्निचर, बांबु बेत फर्निचर, फायबर व प्लॅस्टीक फर्निचर, लाकडी फर्निचर, ॲल्युमिनिअम फर्निचर आणि फर्निचरसाठी वापरलेल्या कच्चा माल | ३% | ५% | ५% | ३.५% |
| ५०क | लेप्सेस, टेपस, लाकडी व धातुच्या रिंग भरत कामाच्या वस्तु, स्लीव्ह लाईट, आर्टिकलस बॅकलाईन व बॅकलाईटच्या वस्तु, हस्तीदंताच्या व हाडाच्या बनविलेल्या वस्तु आणि सर्व प्रकारच्या गुंड्या, भरतकाम आणि हॅबर डिशरी, टेलरिंग साहित्य | २.५% | ४% | ३.५% | ३% |
| ५१क | हिरे माणिक, मोती व त्यापासून बनविलेल्या इतर मौल्यवाण वस्तु व दागिणे | १% | ५% | ५% | ३% |
| ६० | कच्चे किंवा पिंजलेले लोकर, हिम्प तागा, नेट, इतर कच्चे धागे आणि रॉस हातमाग धागा | २% | ३% | ३% | २.५% |
| ६४ | सर्व प्रकारचे रबर टायर्स व ट्युब | २% | ३% | ३% | २% |
| ६५ | रबर आणि रबराच्या वस्तु गुट्टा, परचा आणि त्यापासून बनविलेल्या वस्तु (पूर्णतः व अशतः) रबराचे द्रावक, कच्चे रबर, लॅटेक्स, रबर आणि फोमच्या सर्व प्रकारच्या वस्तु (बाब क्र. ६४ आणि खेळणी वगळून) | २% | ३% | ३% | २% |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ७३क | इ.पी.ए.बी. एक्स, पी.बी. एक्स, सेट, फॅक्स मशिन, एस.टी.डी पल्स मशीन आणि प्रिंटर, टेली प्रिंटर, टेलीप्रिंटर मशिन, स्कॅनिंग मशीन फोटो कॉपिंग, झेरॉक्स मशिन, संगणक आणि डि.टी.टी इलेक्ट्रोनिक मशिन, इलेक्ट्रॅनिक्स टंकलेखन यंत्र त्याचे सुटे भाग आणि त्याचा उत्पादणात वापरलेले जाणरे भाग आणि दुरुस्ती संच व त्याचे सुटे भाग, गॅसकिट, संगणक विषयक लेखन सामुग्री (कागद वगळून) वायरलेसेस आणि त्याच्या उत्पादनात वापरात येणारे सुटे भाग | ४% | ६% | ५% | ४% |
| ७९ अ | लिहिण्याची शाई, मुद्रणालयात वापरली जाणारी शाई व पुस्तक बांधणीसाठी वापरण्यात येणारी प्रिटींग पेस्ट | १% | ३% | २.५% | १% |
| ब | लेखन सामुग्री, फाऊन्टन पेन, बॉलपेन, निप रिफिल्स, जाहिरात साहित्य कार्बन, अमोनिया, प्रिंट, पेपर, ट्रेसिंग पेपर, डायरी रजिस्टर व यात विनिर्दिष्ठ न केलेले सर्व प्रकारचे लेखन सामुग्री | २% | ३% | २.५% | २% |
| ड. | कोणत्याही मिश्रणाचा व जडीचा सर्व प्रकारचा कागद लिफाफे, निमंत्रण पत्रिका व रद्दी कागद | २% | ३% | २.५% | २% |
| ८५ई | पॅकिंग मटेरिअल असे फलेक्झीबल वान्टेनर्स, जिलेटीन कॉरग्युटेड पेपर, ॲल्युमिनियम फाईल्स, कॉरग्युटेड बॉक्सेस व यात विनिर्दिष्ठ न केलेले सर्व प्रकारचे पॅकींग मटेरियल. | २% | ३% | ३% | २.५% |
| १.अ | धान्य, पीठ, दाळी, ज्वारी, भाजलेले धान्य, रवा, मैदा, गव्हाचे पीठ आणि ज्वारी (कण्या) लाह्या, मुरमुरे, फटाणे, पोहे व कडधान्य. | ०.५० पैसे प्रति क्वि. | रु. १.०० प्रति क्वि. | ०.५० पैसे प्रति क्वि. | रु. १/- प्रति क्वि. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| १४ अ | सर्व प्रकारची ताजी फळे | ०.५० पैसे प्रति १० कि. | १% | १% | २५ पैसे प्रति १० किलोस. |
| १७क | अंडी | ०.५० पैसे प्रति १० कि. | १% | १% | रु. १/- प्रति १०० नग |
| २३ | बैल, म्हशी, गाय, कालवडी, घोडे, गाढव, उंट व हत्ती | रु. १.०० प्र. नग | रु. ५.०० प्र.नग | रु. ५.०० प्र. नग | रु.०.५० पै. नग |
| २४. | कोबड्या, बदके आणि सर्व प्रकारचे पक्षी | ०.२०पै. प्र. नग | ०.५० पै. प्र.नग | रु. १/- प्र.नग | ०.५०पै. प्र.नग |
| ३२ड | घासलेट | ०.०२ पै. प्र. १० लिटर | ०.५०% प्र. १० लिटर | ०.५०% प्र. १० लिटर | १० पैसे प्र. १० लिटर |
| ४२अ | खडी दगडाचा चुरा | रु. ५.०० प्रति ट्रक | १०.०० प्रति ट्रक | रु.१५.०० प्रति ट्रक | रु. १० प्र. ट्रक |
| ब | माती, वाळू आणि मेटल डब्बर मुरुम | रु. ५.०० प्रति ट्रक | १०.०० प्रति ट्रक | रु.१५.०० प्रति ट्रक | रु. १० प्र. ट्रक |
| ८४ | मळी | रु. १.०० प्रति टनास | ४% प्रति ट्रक | ४% प्रति ट्रक | २% प्रति टनास |
| १. | ऑर्केस्ट्रा | | | | |
| अ. | मुळभाडे रु. २०००/- | | रु. २५००/- | रु. २५००/- | रु. २२००/- |
| २. | नाटक / सांस्कृतिक कार्यक्रम अ. मुळभाडे १२००/- | | रु. १८००/- | रु. १८००/- | रु. १५००/- |
| **३.** | **नेहरू भवन** | | | | |
| | अ. ३ तासासाठी रु. ७५०/- | | रु.१००० | रु.१००० | रु.१००० |
| | ब. ६ तासासाठी रु. १०००/- | | रु.१२०० | रु.१२०० | रु.११०० |
| | क. ६ तासापेक्षा जास्त रु. १२००/- | | रु.१५०० | रु.१५०० | रु.१३०० |
| | ड. लग्न कार्यासाठी रु. २०००/- | | रु.२५०० | रु.२५०० | रु.२२०० |
| | इ. मंडप रु. ५००/- | | रु.७०० | रु.७०० | रु.५०० |

ठराव क्र. १९५/१ दिनांक ३१/०३/९८ अन्वये जे दर अनुसूचि ओ मध्ये दर्शविलेली आहेत त्यांना मंजुरी द्यावी.

| अ. क्र. | अनुसूची ओ मधील क्र. | मालाचे वर्णन | प्रचलित दर | ठराव क्र. ५३/१ | ठराव क्र. १९५/१ | मजूर |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ब | सर्व प्रकारचे तांदुळे | १% | ०.५०% | रु. ५ प्रति क्वि. | ०.२५% |
| २. | ४ व २१ | तेलबिया | १% | ०.५०% | रु. ४ प्रति क्वि. | ०.२५% |
| ३. | ४ | सरकी (नव्याने प्रस्तावित) | १% | - | रु. २/- | ०.२५% |
| ४. | ५८(अ) | कापूस | १% | ०.२५% | ०.२५% | माफ |
| ५. | ६७(ब) | लोखंड, पोलाद भंगार | २% | रु. ६/- प्रति टन | रु. ६० प्रति टन | रु. ६० प्रति टन |
| ६. | ८५(अ) | रासायनिक खते | १% | रु. २/- प्रति टन | रु. २/- प्रति टन | रु. २/- प्रति टन |
| ७. | ७२ | मोटार पार्ट | २.५% | १.५% | १.५% | १.५% |
| ८. | ३९ | सिमेंट | ३% | - | रु. ४/- प्रति गोणी | ३/- |
| ९. | ५ | अनरिफाइन्ड ऑईल | १% | - | रु. १० प्रति क्वि. | ०.२५ प्रति क्वि. |

तरी वरील प्रमाणे विविध वस्तुपैकी अ.क्र. १ ला ०.२५%, अ.क्र. २ ला ०.२५%, अ.क्र. ३ ला ०.२५%, अ.क्र. ४ ला पूर्ण माफी द्यावी, अ.क्र. ८ ला रु. ३% व अ.क्र. ९ ला ०.२५% अशी दुरुस्ती करण्यात यावी.

जकात नियमातील नियम १९८४ मध्ये वखर्ड संशोधन केंद्रासाठी आणण्यात येणारे रसायणे, उपकरण, संशोधन मशिनरीसाठी जकात करात सवलत देवून ०.५०% ठेवण्यास आणि कापूस यावर १००% सुअ देण्याबाबत दुरुस्त करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

२) अर्थसंकल्पात थकबाकीसह चालू वर्षात मालमत्ता कराचा भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांचा (पान क्र. ५०) थकबाकीसह चालू वर्षात मालमत्ता कर भरण्यासाठी सुट दर्शविलेली आहे. त्यात त्याऐवजी जे नागरिक थकबाकीसह संपूर्ण मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना चालू वर्षाचे थकबाकीसाइी अनुज्ञेय होणार नाही.

| अ.क्र. | | प्रस्तावित सुट | सर्वसाधारण सभेत मूंर केलेली सुट |
|---|---|---|---|
| १ | ३० एप्रिल पूर्वी थकबाकीसह पूर्ण रककमेचा भरणा केल्यास | - | ७% |
| २ | ३१ मे पूर्वी भरणा केल्यास | - | ६% |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | ३० जून पूर्वी भरणा केल्यास | ५% | ५% |
| ४ | ३१ जुलै पूर्वी थकबाकीसह पूर्ण रक्कमेचा भरणा केल्यास | ४% | ४% |
| ५ | ३१ ऑगस्ट पूर्वी थकबाकीसह पूर्ण भरणा केल्यास | ३% | ३% |
| ६ | ३० सप्टेंबर पूर्वी थकबाकीसह पूर्ण भरणा केल्यास | २% | २% |
| ७ | ३१ ऑक्टोबर पूर्वी थकबाकीसह भरणा केल्यास | १% | १% |

अर्थसंकल्पातील सार्वजनिक दवाखाने (पान क्र. ७४ अ.क्र. ३(२) मध्ये करण्यात आलेल्या १२ लाखाचे तरतूद दर्शविलेली आहे. त्यातून दंत विभागासाठी रु. ३.०० लाख व उर्वरित रक्कम ९ लाख इतर साहित्यासाठी खर्च करण्यात येतील अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**जमा बाजु**

| अ.क्र. | पान क्र. | लेखाशिर्ष | स्थायी समितीने सुचविलेली तरतूद | सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|
| १ | ५६ | जकात | ५१००००/- | ५०१०००/- |
| | | **खर्च बाजू** | | |
| १ | ८८ | विकास आराखड्याच्या अंमलबजावणी साठी जमीन आणि इतर स्थावर मालमत्ता संपादन करणे | २०००० | १५०००/- |
| २ | ९१ | ट्रिटमेंट प्लॉट बांधणे व जलनिःसारण वाहिनी (झाल्टा) | १२५००/- | ८५००/- |

उपरोक्त फेरुार १०० कोटी ८८ लाख ९१ हजार व खर्च १०० कोटी ८५ लाख ९७ हजार नुसार ०१/०२/९४ लाखाच्या शिलकी अथसंकल्पास सर्वानुमते स्विकृतीसह मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापोर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०/०३/९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

**शनिवार दिनांक २०/०३/९९ रोजी सकाळी मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेतील मुख्य कार्यालयातील "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या बैठकीस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. डॉ. कराड भागवत | उप-महापौर |
| २) | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स. सभासद |
| ३) | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | --//-- |
| ४) | स.स.श्री. अफसरखॉन यासिनखॉन | --//-- |
| ५) | स.स.श्री. लोखंडे रुख्मिणीबाई खंडेराव | --//-- |
| ६) | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ७) | स.स.सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ८) | स.स.श्री. खरात गौतम भागाजी | --//-- |
| ९) | स.स.सौ. रजनी रमेश जोशी | --//-- |
| १०) | स.स.श्री. लांडगे गौतम लिंबाजी | --//-- |
| ११) | स.स.श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --//-- |
| १२) | स.स.श्री. नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १३) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १४) | स.स.श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग | --//-- |
| १५) | स.स.सौ. शिंदे पद्मा बाबुराव | --//-- |
| १६) | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| १७) | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| १८) | स.स.श्री. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| १९) | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २०) | स.स. | |
| २१) | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो. मुश्ताफा | --//-- |
| २२) | स.स.श्री. मोहमंद मुस्तफा अहमद | --//-- |
| २३) | स.स.श्रीमती नुरजहॉं बेगम अ. रहेमानखॉन | --//-- |
| २४) | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| २५) | स.स.श्री. हाजी मोहसीन अहमद हाजी बशिर अहमद | --//-- |
| २६) | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखोराद्दिन | --//-- |
| २७) | स.स.श्री. जावेद रज्जाक | --//-- |
| २८) | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| २९) | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ३०) | स.स.श्रीमती गंगावाल पुष्पाबाई सुरेशचंद्र | --//-- |
| ३१) | स.स.श्री. हमीदउद्दिन ताबा फसीयोद्दिन | --//-- |
| ३२) | स.स.श्री. म.अ.रऊफ अ. माबुद | --//-- |
| ३३) | स.स.श्री. स.अ. इकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन | --//-- |
| ३४) | स.स.श्री. प्रदिपकुमार जैस्वाल | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३५) | स.स.श्री. स. अली मिरा सलामी | --//-- |
| ३६) | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | --//-- |
| ३७) | स.स.श्री. संजय किसनराव केनेकर | --//-- |
| ३८) | स.स.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ३९) | स.स.सौ. दलाल लता श्रीनिवास | --//-- |
| ४०) | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | --//-- |
| ४१) | स.स.सौ. शकुंतला हरिदास धांडे | --//-- |
| ४२) | स.स.श्री. अब्दुल रशिदखॉन (मामू) | --//-- |
| ४३) | स.स.कु. माया लिंबाजी लाडवाणी | --//-- |
| ४४) | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ४५) | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | |
| ४६) | स.स.श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | --//-- |
| ४७) | स.स.श्री. गंगाधर सुखदेव गाडे | --//-- |
| ४८) | स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ४९) | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | --//-- |
| ५०) | स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | --//-- |
| ५१) | स.स.सौ. ज्योत्सना दौलत हिवराळे | --//-- |
| ५२) | स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ५३) | स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --//-- |
| ५४) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ५५) | स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ५६) | स.स.श्री. जाधव विठ्ठल किसन | --//-- |
| ५७) | स.स.सौ. काळुसे मंदा धनंजय | --//-- |
| ५८) | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | --//-- |

**संवाद** :

श्री. जावेद रज्जाक : सभागृहात कोरम नसल्यामुळे १५=०० मिनिटासाठी तहकूब करावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : तहकूब करावी.

मा. महापौर : ठिक आहे कोरम अभावी सभा १५=०० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ सकाळी ११.३२ वा. सभेला सुरुवात दु. १२.०० वाजता)

श्री. हमीद ताबा, श्री. अफरसखॉन, सौ. मोहसिना बिल्कीस :

मा. पालकमंत्री यांच्या सुचनेवरून मनपातील कोणत्याही प्रकारची कामे निविदा न काढता काम केल्या जाते ही बाब प्रशासनाची योग्य नसून मात्र आम्ही सांगितलेली व आवश्यक कामांच्या बाबतीत मात्र निविदा काढूनच कामे केल्या जाते. त्यामुळे बराचसा वेळ वाया जातो. तेंव्हा अशा प्रकरचा भेदाभेद प्रशासनाने करू नये. व नियमाप्रमाणेच कोणत्याही कामाची कार्यवाही व्हावी.

श्री. अविनाश कुमावत : मा. पालकमंत्री यांच्या निधीतील जेवढे काही कामे शहरातील विकासाच्या बाबतीत होतात ती सर्व कामे निविदा काढूनच होतात.

श्री. रशिद खॉन (मामू) : बऱ्याचशा स.स. चे म्हणने असे आहे की, मा. पालकमंत्री यांनी सांगितलेल्या कामाचे बाबतीत त्या कामाचे निविदा न मागविता कामे पार पाडल्या जाते या बाबत प्रशासनाने माहिती द्यावी.

मुख्य लेख अधिकारी : माझ्या माहिती प्रमाणे सर्व कामांच्या निविदा ह्या लेखा विभागामार्फत प्रसिध्दीस देवून उघडण्यात येतात अशी कोणतीही निविदा बिना निविदा लेखा विभागामार्फत नाही.

श्री. हमीद ताबा : मा. पालकमंत्री यांचे बरीचशी कामे ही निविदा न मागविताच सुरवात करण्याचे आदेशित केले जाते. परंतु विरोधी पक्षातील काही स. सदस्यांनी या बाबत आक्षेप घेतल्याने ती कामे थांबलेली आहेत.

मा. महापौर : या बाबत अशा प्रकारच्या काही सूचना असतील तर त्या स. सदस्यांनी मांडाव्यात इतिवृत्ता संबंधी बोलावे इतर चर्चा करू नये.

श्री. अफसरखॉन : ज्या बाबत मा. पालकमंत्री यांनी सूचना केलेल्या आहेत त्यापैकी कोणते कामे करणार नाहीत व कोणती कामे करणार याची माहिती द्यावी.

श्री. प्रदिप जैस्वाल : महाराष्ट्र शासनाने जवळपास ६५००० कोटीची योजना महानगरपालिकेच्या हद्दित वेगवेगळ्या कामासाठी राबविणे साठी अनुदान देऊ केलेले आहेत. त्या अनुदानातून योग्य ते नियोजन व कार्यवाही त्या-त्या कामाचे बाबतीत शासनातर्फे करणे आवश्यक आहे. यामध्ये पाणीपुरवठा व जलनिःसारण योजनेचा समावेश असून मा. पालमंत्री यांचे हस्ते संपूर्ण अनुदानाच्या खर्चाचे नियोजनबध्द कार्यक्रम आखून कार्यन्वित होणार आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : या सभागृहात बैठकीची सुरुवात झाल्यानंतर ऐनवेळचे प्रस्ताव स. सदस्य यांना का वाटप करण्यात येतात या शिवाय आजच्या सभेसाठी डॉक्टरांचे पगारवाढीचा प्रस्ताव ऐनवेळेस आणने प्रशासनाचे धोरण चुकीचे आहे.

श्री. हमीद ताबा : मा. पालकमंत्री यांच्या सुचनेवरून बरीचशी कामे शासकीय अनुदान व स्वेच्छा निधीतील कोणलाही कोणत्याही प्रकारची निविदा न मागविता प्रशासन करते. मात्र आमच्या सारख्या स. सदस्यांच्या वॉर्डातील तातडीचे कामे अशा स्वरुपात केले जात नाहीत. याचे कारण काय?

श्री. प्रदिप जैस्वाल : मा. आयुक्त यांच्या अधिकारात मुंबई प्रा. मनपा अधिनिमय ६७(३) सी चा वापर करून कामाचे बाबतीत कार्यवाही केलेली असल्यास तसे सांगावे. कोणत्याही कामांची निवड लक्षात घेता कोणती कामे तातडीने करावयाची सभागृहात चर्चा करून धोरण ठरवावे.

श्री. नरेंद्र पाटील : स.स. नी ज्या प्रकारे चर्चा करीत आहेत. त्युानसार प्रशासनाने कोणतीही निविदा न मागविता काही कामे केलेली असल्यास तशी सभागृहात माहिती अवगत करावी.

श्री. अफसरखॉन : बऱ्याच वेळेस दुपारनंतर अधिकारी / कर्मचारी आपल्या जागेवर बसत नाहीत मी काल दुपारला काही अधिकाऱ्याकडे दूरध्वनीद्वारे संपर्क केला असता ते जागेवर मिळू शकले नाहीत. त्याचप्रमाणे उप-आयुक्त (महसूल) हे सुध्दा दुपारी ४=०० वाजेपर्यंत जागेवर नव्हते जर अधिकारी जागेवर नसतील तर त्याचे अधिपत्याखालील कर्मचारी हे सुध्दा जागेवर राहणार नाही. पर्यायाने कर्मचाऱ्यांवर नियंत्रण राहत नाही. याबाबतची माहिती द्यावी. (याच वेळेस सभागृहात शेम-शेमच्या आवाज स.स. कडून होतो.)

मा. महापौर : स.स. नी इतर बाबतीत चर्चा न करता विषय क्र. १ इतिवृत्तावर चर्चा करावी.

श्री. अफसरखॉन : संजय न्यायाधीश या कर्मचाऱ्याने जवळपास २०-४० हजाराचा भ्रष्टाचार केलेला आहे. परंतु अशा कर्मचाऱ्यावर पोलीस कार्यवाही का केली नाही.

आणि जे कर्मचारी वेगवेगळ्या प्रकरणात गुंतलेले आहेत त्यांचेवर मात्र कार्यवाही होते ही बाब प्रशासनाची योग्य नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे : आता उन्हाळा सुरू झाला असून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सिडको हडको भागातील नागरिकांना पाण्याविना हाल सोसावे लागत आहेत. पाणी पुरवठा सुरळीत होत नसून अत्यंत कमी दाबाने पाणी येते. त्यामुळे नागरिक त्रस्त झालेले आहेत. पाण्याची वेळी निश्चित नाही. या भागातील सर्व नागरिक पाण्याचे बिले मात्र वेळेवर व पूर्णपणे भरत असूनही पाणी भरपूर प्रमाणात मिळत नसल्याने आंदोलनाचा पवित्रा उभारावा लागेल कारण जर पाणी सिडको हडको वासियांना पुरेशा प्रमाणात मिळत नसल्यास पाण्याचे बिलच न भरण्याचे नागरिकांना सांगावे लागेल कारण गेल्या महिन्यात फक्त २२५ तास पाणीपुरवठा झालेला आहे. तर मुकूंदवाडी सिडको भागात तर पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा झालेला नाही. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी याबाबत २७-२८ एम एल पाणीपुरवठा सिडको भागात व्हावयास पाहिजे असतांनाही पाणी अत्यंत कमी प्रमाणात पुरविल्या जाते. याकडे संबंधित अधिकाऱ्यांना सांगूनही दुर्लक्षित करतात याबाबत सोबत मी महिन्याभराचा चार्ट आहे तो वाचून दाखविता. सिडकिो हडको दि. १७/०२/९९ ते १७/०३/९९, १ महिना पाणी पुरवठा विस्कळीत २-२,३-३, गॅप झाले जनतेला फिरावे लागते. दिनांक १७/०२/९९ ला ६$^{१/२}$ तासबंद, १८/०२/९९ ला ४$^{१/२}$ तास बंद दि. १९/०२/९९ ला २$^{१/२}$ तास बंद एक महिन्यात १०१$^{१/२}$ तास बंद याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

श्री. जयवंत ओक : स.स. श्री. काशिनाथ कोकाटे यांनी सिडको-हडको भागसाठी गेल्या महिन्याभरात पाणी पुरवठा कमी प्रमाणात झाला त्याबाबतचा तक्ता सभागृहात वाचून दाखविला त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

श्री. रशिदखॉन मामू : स. स. श्री. जयवंत ओक हे स्वतः वर्षभर सभापती पदावर असतांना त्यांनी काय कार्यवाही केली.

श्री. जयवंत ओक : सिडको-हडको भागच्या विविध सुविधांसाठी रु. २.०० कोटीची तरतूद अंदाजपत्रकात केलेली आहे.

सौ. शिंदे : सिडको-हडको भागातील नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा असून याबाबत कमी दाबाने पाणी न देता भरपूर प्रमाणात पाणी कसे मिळेल यासाठी सभागृहात चर्चा करून निर्णय घ्यावा.

श्री. कंवरसिंग बैनाडे : गेलया काही दिवसापासून हडको भागात नळाद्वारे पाणी कमी दाबाने येत असून टॅक्स मात्र पूर्णपणे वसूल केला जातो. यासाठी पुरेसे पाणी मिळण्यासाठी प्रशासनाने संबंधित अधिकाऱ्यांनी योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. अन्यथा आंदोलन उभे करावे लागेल.

श्री. अशफाक सलामी : पाण्याचा प्रश्न सिडको-हडको भागासाठीच नसून शहरातही फार मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. यासाठी प्रशासनाने तातडीने उपाय योजना करणे आवश्यक आहे.

श्री. रशिदखॉन (मामू) यापूर्वी शहर व सिडको-हडको भागातील नागरिकांना पुरेसे पाणी मिळणेसाठी अनेक वेळा बैठका झालेल्या आहेत आणि बैठकीत ठरलेल्या मुद्याप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही केलेली आहे काय? त्यांचेकउे कर्मचारी वर्ग सध्या पुरेसा आहे. जायकवाडी हस्तांतर कर्मचाऱ्यांसाठी

होऊनही शहर व सिडको हडको भागासाठी पाणी पुरेसा प्रमाणात का मिळत नाही? यापुर्वी संबंधित अधिकाऱ्यांनी असा खुलासा केलेला आहे. की, येत्या दोन महिण्यात संपूर्ण शहरात पाणीपुरवठा सुरळीत व मुबलक होईल. परंतु अद्यापपर्यंत काहीही कार्यवाही झालेली नाही. आता संबंधित अधिकाऱ्यांनी काय कार्यवाही केली हे सांगण्यापेक्षा कामे तातडीने होणे आवश्यक आहे.

श्री. जावेद रज्जाक : पाणीपट्टी संबंधी विश्वास घात केला. रु. ७००/- वरून रु. १०००/- केले मिान दोन वेहा पाणी पुरवठा होत नाही. शासनास बदनाम करीत आहे असा माझा आरोप आहे. पैसे उकळतात. आता उन्हाळा सुरू होत आहे. पाणी देण्याचे आश्वासन द्यावे.

श्री. जयवंत ओक : मागे अशी सूचना केलेली होती की, शहरात दोन वेळात पाणी पुरवझा होईल. परंतु अद्यापही तसे झालेले नाही. सध्या जो पाणी पुरवठा होत आहे. तो वक्तशीर नसून कमी दाबाने पाणी पुरवठा होतो. त्यासाठी मा. महापौर यांनी सभागृहात पाण्याचा प्रश्नाबाबत तातडीने उपाय योना करावयास लागले. भरपूर प्रमाणात पाणी नागरिकांना मिळेल असे आश्वासन द्यावे.

श्री. अफसरखॉन : मनपाचे जनसंपर्क अधिकारी यांनी पत्रकारांना आजच्या बैठकीत इतिवृत्ताच्या प्रति दिलेल्या नाहीत अशी तक्रार पत्रकारांनी केलेल्या आहेत. यापुर्वी सुध्दा अनेकदा पत्रकारांनी जनसंपर्क अधिकाऱ्याबाबत तक्रारी केलेल्या आहेत. परंतु प्रशासनाने का कार्यवाही`लेली नाही. पत्रकार कक्षात पत्रकारांना पंखे लागले जात नाही. त्यांना चहापाणसाठी जनसंपर्क अधिकाऱ्याकडील कर्मचारी वर्ग दिसत नाही. तेंव्हा जनसंपर्क अधिकारी स्वतः ही नसल्यामुळे त्याच्या निष्काळजी पणा बद्दल त्यांचेवर प्रशासनाने तातडीने काय्रवाही करावी.

मा. महापौर : ठिक आहे. प्रशासनाने जनसंपर्क अधिकारी यांचे बद्दल झालेल्या तक्रारीची दखल घेऊन कार्यवाही करावी.

सौ. मोहसिना बिल्कीस : शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थित व सुरळीत का होत नाही सध्या उन्हाळा सुरू झालेला असून बऱ्याचशा भागात पाणी अत्यंत कमी दाबाने येते. त्यामुळे नागरिक पाण्यासाठी सारखे ओरडतात. गेल्या २-३ दिवसापासून पाणी वेळेवर येत नसल्याने लोक ओरड करित आहेत. संबंधित विभागाने कार्यवाही करावयास पाहिजे पाईप लाईन व्यवस्थित नाही ती दुरुस्त करून पाणी योग्य दाबाने येण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे. २ दिवसापासून पाणी नाही. परवा बकरी ईद आहे. ३ दिवस २ वेळा पाणी द्यावे.

श्री. जयवंत ओक : सिडको भागात एन-९ व एन-११ येथील लोकांना पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. येथील लोकांची सारखी ओरड असते. त्याचप्रमाणे स.स. श्री. काशिनाथ कोकाटे यांनी सूचना केल्याप्रमाणे त्यांच्या भागातही पाणी पुरवठा वेळेवर व पुरेसा होत नाही. ज्याप्रमाणे २७-२८ एमएलडी पाणी मिळवण्यास पाहिजे तेवढया प्रमाणात मिळत नाही. स.स. पांचाळ अक्का, मोहसिना बिल्कीस, लोखंडे बाई यांच्या वॉर्डातील पाण्याच्या समस्या अधिक वाढत आहेत. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही करावयास पाहिजे. फारोळा येथे १४००, ७००, व ३००, चे पंप आहेत. ते सर्व किती प्रमाणात चालू आहेत व किती प्रमाणात बंद आहेत. याबाबतची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना द्यावी. कारण जे पंप आहेत त्या पंपद्वारे पुरेसे पाणी

शहरात व नक्षत्रवाडीवरून क्रांतीचौक पाण्याच्या टाकीत येते काय? फोराळ्यातील पंपाद्वारे पाणी प्रेशरने येते काय? जर येत नसल्यास किंवा पंप बंद असल्यास याची नेमके कारण काय? याबाबत सविस्तर अहवाल सभागृहात संबंधित अधिकाऱ्यांनी द्यावा बरेचसे लाईनवरील वॉल ओपन केले जातात. त्यामुळे पाणी परस्पर घेतल्या गेल्याने पाणी दाब राहत नाही. याची तपासणी करावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सिडको हस्तांतरण होणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या ६५.०० कोटीचे अनुदान शासनाकडून मिळणे आवश्यक आहे. पाणी पुरवठ्याचा प्रश्न हा मनपा म्हणते त्यानुसार विद्युत मंडळाच्या मुळे होतो हे लक्षात घेता याबाबत येथील पदाधिकारी यांनी मिळून विद्युत मंडळाचे अधिकाऱ्यांस भेटून चर्चा करावी व नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेण्यास सांगावे.

श्री. प्रभाकर विधाते : छावणी भागातील पाणीपुरठा हा जिवन प्राधिकारण विभागा अंतर्गत होतो किंवा कसा याची माहिती द्यावी.

कार्यकारी अभियंता (पा. पु.) : दि. ०५/०३/९९ पासून १९/०३/९९ पर्यंत महाराष्ट्र राज्य, विद्युत मंडळ चे वीज पुरवठा हे कमी दाबाने होत आहे. जवळपास या दिवशी ५०% विज पुरवळा झाल्यने शहर व सिडको - हडको भागासाठी होणाऱ्या पाणी पुरवठ्यावर परिणाम होत आहे. याबाबत विज मंडळास अनेकदा पत्र देऊन संबंधित विभागाकडे प्रत्यक्ष जाऊन कार्यवाही केलेली नाही. विज कमी जास्त प्रमाणात येत असल्याने प्रत्यखात पाणी शहराला मिळत नाही. व सिडको-हडको भागासाठी टाकी न भरल्याने त्रास होतो. याबाबत आम्ही सतत संपर्कात राहतो व नागरिकांना त्रास होणार नाही याबाबत काळजी घेतो. विज मंडळाने अशी सूचना केली की, चंद्रपुर औष्णीव विज केंद्रात बिघाड झाल्याने विजेचा दाब कमी पडतो व ते ५०% ने विज येत असल्याने जायकवाडी ते फारोळा व पंपींग वरून नक्षत्रवाडी व शहर तसेच सिडको-हडको भागास पाण्याचा पुरवठा होण्यास कमी दाबामुळे त्रास होतो. पर्यायाने पाणी पुरवठा व्यवस्था पुरेसे होत नाही. याबाबत माझे काही म्हणणे खोटे वाटत असल्यास सभागृहाने चार स.स. ची एखादी समिती नेमून प्रत्यखात पाहणी करून फारोळा येथे ७ पंपाची माहिती घ्यावी. व काही चूक आढळल्यास समितीने जी शिक्षा ठरवेल ती शिक्षा भोगावयास मी तयार आहे. जर पूर्णपणे विज यंत्राचा दाब असल्यास सिडको - हडको भागासाठी २७ ते २८ एमएलडी चा पाणी पुरवठा होऊ शकतो.

श्री. प्रदिप जैस्वाल : मागील बैठकीत सूचना केल्याप्रमाणे सिडको-हडको भागासाठी २७ ते २८ एमएलडी पाणी पुरवठा होतो काय? पाणी पुरवठ्यात वाढ होण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री. नरेंद्र पाटील : २७-२८ एमएलडी प्रमाणे सिडको-हडको भागासाठी पाणी पुरवठा करूनही प्रेशरने पुरवठा होत नाही. या ठिकाणी विद्युत मंडळाकडूनही पूर्णपणे अखंडीत विज पुरवठा जरी झाला तरीही सिडको भागातील पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. याचे कारण काय?

कार्यकारी अभियंता : या संदर्भात महाराष्ट्र शासनाने श्री. कुलकर्णी व त्याचे दुसरे अधिकारी याचेशी बोलणी झालेली आहे. नेमके कारण काय असावयास पाहिजे. त्यासाठी सविस्तर आखणी करून कार्यवाही होणार आहे.

श्री. भगवान घडामोडे : सिडको-हडको भागात कोणत्याही सणाच्या दिवशी पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. संबंधित अधिकारी हे सभागृहात दिशाभूल करीत असून जायकवाडी ते फारोळा या भागातील पाईप लाईन कधीही पाहणी करीत नाही. त्या ठिकाणची पाईपलाईन फुटलेली आहे काय किंवा लिकेज झालेली आह काय? संबंधित अधिकारी दुर्लक्ष करीतात. त्यामुळे फारोळा येथील पंपिंगचे कारण न सांगता पाणी पुरवठा व्यवस्थित होणे आवश्यक आहे. विज दिवसभर बंद असते असे नाही. अधिकाऱ्यांना नेमके कारणच पाहिजे. गेल्या दोन महिण्यापासून सिडको भागातील पाणी पुरवठा पूर्णतः विस्कळीत झालेला आहे. त्यमुळे नागरिक पाणी पट्टी भरणा करूनही त्रस्त झालेले आहेत. दोन भाग करण्यात यावे. पाणी पुरवठा वेगळा व ड्रेनेज वेगळे करण्यात यावे.

श्री. गंगाधर गाडे : अधिकाऱ्यांनी माहिती घेतांना विघुत मंडळाची विज खंडीत झाल्याने पाणी पुरवझा विस्कळती होतो असे म्हणलेले आहे. तर यासाठी युतीचे शासन असून या जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून त्यांनी शासनाचे संबंधित विभागाचे अधिकाऱ्यां बरोबर चर्चा करून प्रकरण एकदाचे निकाली काढावे. या ठिकाणी औद्योगिक क्षेत्रातील सर्व भागात पाणी पुरवठा सुरळीत होतो. मात्र नागरिकांना पाणीपुरवठा होत नाही. यासाठी स.स. नी आपले स्वतःचे वजन खर्च करून मा. उप-मुख्यमंत्री व उर्जामंत्री यांचेकडे एक शिष्ठमंडळ घेऊन जाऊन चर्चा करावी. व या शहरातील पाणी पुरवठा विजेमुळे विस्कळीत होते. हे नजरेस आणून द्यावे. व कार्यवाही करणेस सांगावे. किंवा शासनाकडून पाणी पुरवठा योजनेचा निधी मागवून कार्यवाही करावी. सिडको-हडको हे घरे व जागा विकून धंदा सुरू केलेला आहे. तो सर्व पैसा मनपाने घ्यावा. तरच मनपाने सिडकोसाठी सुविधा पुरवाव्यात अन्यथा नाही. ज्या मुळे मनपास आर्थिक बोजा पडत आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सिडको हस्तांतरण एकदाचे शासनाने करून घ्यावे. व सिडकोकडून सर्व पैसा वसूल करावा.

श्री. गंगाधर गाडे सिडको कडील मालमत्ता कर व पाणी पट्टीचा सर्व पैसा मनपाने वसूल करून नंतरच सिडको हस्तांतरण व्हावे. व मगच इतर सुविधा पुरविण्यात याव्या.

श्री. गौतम खरात : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ हे मनपा प्रशासनास बदनाम करण्यासाठी दरवर्षी विज खंडीत करण्याचे प्रकार करतात. यासाठी स.स. नी सभागृहात एकत्रित निर्णय घेऊन विद्युत मंडळाकडे जाउुन सांगावे. मागील वर्षी विद्युत मंडळाला रु. २५.०० लाखावरून रु. ७५.०० लाख वाढवून दिलेले होते. तेंव्हा शहरातील पाणी पुरवठा सुरळीत झाला. नतसा मनपाची बदनामी विद्युत मंडळामुळे झाली असती. याचसाठी विद्युत मंडळाचे अधिकारी व मनपाचे अधिकारी / पदाधिकारी व संबंधित अधिकारी यांनी एकत्रित बैठका घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे. नसता विद्युत मंडळावर स.स. नी मार्चा काढावा.

श्री. अविनाश कुमावत : विद्युत मंडळ व मनपा यांना विजेच्या लंपडावा बाबत संयुक्त बैठक घेऊन निर्णय घेणे आवश्यक राहील.

श्री. रशिदखॉन (मामू) गेल्या दोन-तीन वर्षापासून विजेच्या खंडात प्रवाहामुळे पाणी पुरवठ्यावर फार मोठा परिणाम होत आहे. हा प्रकार सारखा वाढल्याने यावर तातडीने उपाय योजना करणे आवश्यक आहे.

श्री. भगवान घडामोडे : एकंदरित परिस्थिती लक्षात घेता दि. ०५/०३/९९ ते १९/०३/९९ पर्यंतचा विजेच्या लंपडाबाबत विद्युत मंडळाने दिलेले तक्ता माझ्याकडे आहे. तो सभागृहाने लक्षात घ्यावे किंवा पहावे. मी यासाठी सागू इच्छितो की, विद्युत मंडळाच्या खंडीत पुरवठ्याने शहर व सिडको-हडको भागसाठी पाणी पुरवठा विस्कळीत होतो. यावर माझ्याबाबतीती विश्वास नसल्यास प्रतक्षात फारोळा व इतर ठिकाणी पाहणी करावी व त्यासाठी पदाधिकाऱ्यांची समिती नेमून संपूर्ण विज खंडीत होत असल्याने हा सर्व प्रकार होतो आहे.

श्री. प्रफुल्ल मालानी : शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थित व सुरळीत होणेसाठी काही तरी उपाय योजना करावी.

श्री. गिरजाराम हाळनोर : सिडको-हडको भागातील लोक पाण्यामुहे हाल सहन करीत आहेत. दिलेल्या वेळेत पाणी येत नाही. अपुरा पाणी पुरवठा त्यामुळे नागरिक त्रस्त झ ाालेले आहेत. गेल्या ४-५ वर्षापासून ही परिस्थिती सध्याही कायम आहे.

श्री. प्रदिम जैस्वाल : सिडको -हडको भागासाठी मनपाकडून ३० एमएलडी चा पाणी पुरवझा कधीच झालेला नाही. असे आमचे स्पष्ट मत आहे. याबाबतचा प्रशासनाने खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : सिडको एन-७ या ठिकाणी २०.०० लाख लिटर्स क्षमतेची साठवण टाकी बांधकाम चालू करण्यात येणार आहे. आणि ती चार-पाच महिन्यातून पूर्ण. त्याच वेळेस या भागात ३० एमएलडी पाणी मिळणार आहे. त्याचप्रमाणे एप्रिल महिण्यात एन-११,१२, व १३ येथे एक पाण्याची टाकी पूर्ण होणार आहे. याचा फायदा या सर्व भागांना होईल. यासाठी २ ते २.२५ कोटी चा प्रकल्प पुढील महिन्यात येणार आहे. (याच वेळीस सिडका-हडकोला पुरेसे पाणी मिळालेच पाहिजे अशा घोषणा काही सिडको- हडकोचे स.स. व सत्ताधारी सदस्य जोरजोरात देतात तर निपक्ष स. स. विद्युत मंडळाचा धिक्कार असो अशा प्रती घोषणा जोरजोरात सभागृहात देतात.)

मा. महापौर : (याच वेळस) अर्ध्या तासासाठी सभा तहकूब करण्यात येते.
(वेळ अंदाजे १.२० व सभेला सुरुवात १=३५ वा)

श्री. अविनाश कुमावत : आता फक्त पाणी पुरवठा सुरळीत व व्यवस्थित होणेसाठी निर्णय घ्यावा. आणि मनपा व विद्युत मंडळ यांना एकत्रितरित्या संयुक्त बैठक घेऊन उपाययोजना आखावी.

मा. महापौर : सिडको-हडको भागातील नागरिकांना पाणी पुरवठा सुरळीत होणेसाठी विद्युतम मंडळ व मनपास याची संयुक्त बैठक घ्यावी. यास र्व स.स. सहकार्य करावे. सदरील बैठक सायं ५=०० वाजता घेऊन चर्चे अंती निर्णय घ्यावा. तोपर्यंत सदरची सभा उद्या दि. २१/०३/९९ पर्यंत तहकूब करण्यात येते. ही सभा सकाळी ११.३० वा. घेण्यातयेईल. (अंदाजे वेळ दु. १=४० वा) अे. मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २१/०३/९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

**दिनांक २१/०३/९९ रोजी तहकूब झालेली सर्वसाधारण सभा दि. २१/०३/९९ रोजी ११.३० वाजता मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला अधिकारी वर्गासह खालील प्रमाणे स. सभासद हजर होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. डॉ. कराड भागवत | उप-महापौर |
| २) | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स. सभासद |
| ३) | स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण | --//-- |
| ४) | स.स.श्री. अफसरखॉन यासिनखॉन | --//-- |
| ५) | स.स.श्री. लोखंडे रुख्मिणीबाई खंडेराव | --//-- |
| ६) | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ७) | स.स.सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ८) | स.स.श्री. म. सलीम म. हनिफ | --//-- |
| ९) | स.स.श्री. खरात गौतम भागाजी | --//-- |
| १०) | स.स.सौ. रजनी रमेश जोशी | --//-- |
| ११) | स.स.श्री. लांडगे गौतम लिंबाजी | --//-- |
| १२) | स.स.श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --//-- |
| १३) | स.स.श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ | --//-- |
| १४) | स.स.श्री. नरेंद्र यादवराव पाटील | --//-- |
| १५) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १६) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| १७) | स.स.श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग | --//-- |
| १८) | स.स.सौ. शिंदे पद्मा बाबुराव | --//-- |
| १९) | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २०) | स.स.श्री. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २१) | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २२) | स.स.श्री. फजलउल्ला खॉन अजमत उल्लाखॉन | --//-- |
| २३) | स.स.श्रीमती आबेदा बेगम अजमत उल्लाखॉन | --//-- |
| २४) | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो. मुश्ताफा | --//-- |
| २५) | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| २६) | स.स.श्री. हाजी मोहसीन अहमद हाजी बशिर अहमद | --//-- |
| २७) | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखोराद्दिन | --//-- |
| २८) | स.स.श्री. जावेद रज्जाक | --//-- |
| २९) | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| ३०) | स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३१) | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ३२) | स.स.श्री. हमीदउद्दिन ताबा फसीयोद्दिन | --//-- |
| ३३) | स.स.श्री. म.अ.रऊफ अ. माबुद | --//-- |
| ३४) | स.स.श्री. स.अ. इकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन | --//-- |
| ३५) | स.स.श्री. प्रदिपकुमार जैस्वाल | --//-- |
| ३६) | स.स.श्री. स. अली मिरा सलामी | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३७) | स.स.श्री. लाहोट रमेश दिपचंद | --//-- |
| ३८) | स.स.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ३९) | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | --//-- |
| ४०) | स.स.सौ. शकुंतला हरिदास धांडे | --//-- |
| ४१) | स.स.श्री. अब्दुल रशिदखॉन (मामू) | --//-- |
| ४२) | स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण | --//-- |
| ४३) | स.स.कु. माया लिंबाजी लाडवाणी | --//-- |
| ४४) | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ४५) | स.स.श्री. अब्दुल रशिद अ. सत्तार | --//-- |
| ४६) | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | --//-- |
| ४७) | स.स.श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | --//-- |
| ४८) | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ४९) | स.स.श्री. गंगाधर सुखदेव गाडे | --//-- |
| ५०) | स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ५१) | स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ५२) | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | --//-- |
| ५३) | स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | --//-- |
| ५४) | स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --//-- |
| ५५) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ५६) | स.स.सौ. काळुसे मंदा धनंजय | --//-- |
| ५७) | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | --//-- |
| ५८) | स.स.श्रीमती दलाल लता श्रीनिवास | --//-- |
| ५९) | स.स. श्रीमती गंगवाल पुष्पाबाई रमेशचंद्र | --//-- |

**संवाद :**

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : सदरील बैठकीस कोरम नसल्यामुळे बैठक तहकुब करण्यात यावे असे माझे मत आहे.

मा. महापौर : नगर सचिव यांनी माहिती द्यावी.

नगरसचिव : (याबाबत माहिती वाचून दाखविली)

मा. महापौर : १०=०० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते.
(अंदाजे वेळ ११=३५ वा. सभेला सुरुवात ११=५५ वा.)

श्री. जावेद रज्जाक : काल आपल्याकडे विद्युत मंडळ व मनपा अधिकारी, पदाधिकारी, यांचे पाणी पुरवठ्यासाठी विज खंडित होत असल्याबाबत संयुक्त बैठक झाली. तेंव्हा या संदर्भात काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी.

मा. महापौर : उपआयुक्त (म) यांनी माहिती द्यावी.

मा. उप-आयुक्त (प्र) : काल मा. महापौर यांचे दालनात विद्युत मंडळातील अधिकारी व मनपातील स. पदाधिकारी व अधिकारी यांची संयुक्त बैठक घेतल्या गेली यामध्ये खालील मुद्यावर चर्चा झाली.

१) ३८० व्होल्टचा पुरवठा होणे आवश्यक आहे. कारण आतापर्यंत ३२० व्होल्टचा पुरवठा विद्युत मंडळ करीत असल्यामुळे शहर व इतर सिडको हडको भागात पाणी पुरवठा सुरळीत होत नव्हता तेंव्हा ३८० व्होल्टचा खर्च

बराच असून ३२० ऐवजी ३८० व्होल्टचा बदल करून घेण्याबाबत या संयुक्त बैठकीत एकमताने ठरले.

२) कॅपिसीटी सर्किटची एमएसईबी ने आपल्या अधिकाऱ्या समक्ष तपासणी करून निर्णय घेण्याबाबत संयुक्त बैठकीत ठरले.

३) ट्रान्सफार्मरचे डिझाईन मध्ये बदल करणेसाठी ६-७ महिने लागेल तसा बदल करणे आवश्यक आहे. त्यामुळे भविष्यात पुन्हा पाणी पुरवठा करणेसाठी कोणत्याही प्रकारचे प्रश्न उपस्थित होणार नाहीत.

४) व्होल्टेज कमी प्रमाणत मिळत असल्यास त्यास स्वंतत्र विद्युत वाहिणी टाकणेसाठी कार्यवाही करण्यात येईल ६-७ लोकांना या वाहिनी करून विद्युत पुरवठा केलेला आहे. त्यामुळे फरक पडत असल्यास तयाची तपासणी करावी. याची पाहणी संयुक्तरित्या होईल. संबंधित समिती कक्षाला क्रांतीचौक पासून पाहणी करीत, रेल्वेस्टेशन, नक्षत्रवाडी, फरोळा, जायकवाडी इ. ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन पाहणी करेल.

श्री. प्रदिप जैस्वाल : ३८० व्होल्टच विद्युत मंडळाकडून पॉवर लावणार आहत तर याचा खर्च किती येईल याची माहिती द्यावी.

श्री. नरेंद्र पाटील : मनपाचे स्वतंत्र जनरेटर पांच ठिकाणी बसवावे याबाबत गेली दोन वर्षापासून सूचना करीत आहे. तरी काहीही कार्यवाही झालेली नाही. याबाबत विद्युत मंडळावर विसंबुन राहू नये.

श्री. जयवंत ओक : पाणी पुरवठ्याचा प्रश्न गेल्या १०-१२ वर्षापासून सारखा होत आहे. त्यामुळे इक्वीपमेंट लागणारा खर्च विद्युत मंडळ करणार कि. मनपा करणार याची माहिती द्यावी.

कार्यकारी अभियंता (पा.पु) काल सर्वसाधारण सभेने निर्णय घेतल्यानंतरच विद्युत मंडळ व मनपाचे अधिकारी पदाधिकारी यांची संयुक्त बैठक घ्यावी त्यानंतर मा. महापौर यांच्या दालनात बैठक घ्यावी लागणार व्होल्ट कमि पडते असे सांगितले असता पडेगांव येथे ३३ के. व्ही. स्टेशन आहे. तेथून १००-१२५ के. व्ही. पॉवर कमी मिळते हे विद्युत मंडळाने मान्य केले. बिडकीन / फारोळा / ढोरकीन येथे ट्रान्सफर बुस्टर बसवावे असे सांगितले असता याबाबतचा खर्च बाबत उद्या माहिती मिळणार आहे. आणि याचा खर्च जवळपास रु. ७४.०० लाख येणार आहे. यास विद्युत वाहिनी वरून टेस्टींग करून त्यावर काय कार्यवाही करता येईल याची पाहणी करून निर्णय घेण्यात येईल ( ) नविन घ्यावे लागेल.

श्री. अफसरखॉन : विद्युत मंडळाचे अधिकारी यांनी सांगितले की, ३८० व्होल्टचा अभ्यास बाबत सर्व चूक मनपाचे आहेत. त्यामुळे आमचे चुका नाहीत . यामध्ये आपलेकडील उप अभियंता व अभियंता यांनी आतापर्यंत काय कार्यवाही केली, एमएसईबी ची चूक आहे असे सांगतात.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) त्यांना व्होल्टेज कमी मिळत होते ते त्यांनी मान्य केले आहे.

श्री. प्रदिप जैस्वाल : एका महिन्यात किती वेळेस लाईन राहत नव्हती याचा चार्ट आहे. त्यानुसार मनपाने कशा प्रकारे पाणी पुरवठा केला याची तपासणी करावी.

श्री. अफसरखॉन : विद्युत मंडळाने चुका केलेल्या नाहीत रोज थोडेच विद्युत प्रवाह बंद होते. आपली चूक लपविण्यासाठी एमएसईबी ला दोष देण्यात येतो.

सौ. मोहसिना बिल्कीस : शहरात मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठा होत नाही. त्यामुळे नागरिक वैतागले आहेत. उन्हाळ्यातच का घट होते. याचा खुलासा करावा.

श्री. जयवंत ओक : विद्युत मंडळ व मनपा यांच्या संयुक्त बैठीकत ठरले तो पुढचा प्रश्न आहे. परंतु नागरिकांना सुरळीत पाणी पुरवठा होणेसाठी लागणाऱ्या यंत्रणे खर्चास रु. १६.०० लाखाचा बोजा पडणार आहे. त्यास मंजुरी द्यावी जेणे करून तातडीने कामे करता येतील.

श्री. अविनाश कुमावत : जी कमिटी स्थापन केलेली आहे. त्या कमिटीची निर्णय जो झोईल तो सभागृहाला अवगत करावे.

श्री. अफसरखॉन : कमिटीच्या निर्णयानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. परंतु पंप जे बसविले आहेत ते सुस्थितीत आहेत काय?

कार्यकारी अभियंता (पा.पु.) : जायकवाडी ते नक्षत्रवाढी या पर्यंत ६ पंपगृह आहेत यामध्ये काही बिघाड आलेली आहेत. त्या ठिकाणी बुस्टर बसविलेले आहेत.` सध्या कार्यरत आहेत. विद्युत मंडळाचे म्हणणे आहे की, विद्युत प्रवाह कमी असल्याने त्या ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बसवून त्यातून विज निर्मिती करून (ऑन लाईन टान्सफर) करावयाचे उदा. पाहणी करून निर्णय घेण्यात येईल. ट्रान्सफर, बुस्टर व्यवस्थित चालू आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : विद्युत मंडळ व मनपा यांनी संयुक्त बैठक घेतली त्याचा अहवाला उपआयुक्त (म) यांनी वाचून दाखविला मुळ प्रश्न एमएसईबीचा प्रश्न कधी सुटेल आता १०० ते १०५ एमएलडी पाणी येते. परंतु सिडको हडको येथील नागरिकांना २८ ते ३० एमएलडी प्रमाणे किती प्रमाण आतापर्यंत पाणी पुरवठा होऊ शकला याचा खुलासा होणे आवश्यक आहे. सध्या १७-१८ एमएलडी पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे प्रश्न सुटरणार नाही. यासाठी पाणी पुरवठा व्यवस्थित सुरळीत होणेसाठी कोणत्या प्रकारे वाढ करण्यात येईल. कोणती उपाय योजना आखणार याची माहिती द्यावी.

श्री. संजय जोशी : माझ्या वॉर्डात अद्यापही पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. त्यामुळे नागरिक माझ्याकडे सारख्या तक्रारी येऊन नोंदवितात ज्या प्रेशरने पुरवठा व्हावयास पाहिजे तेवढ्या प्रमाणात पुरेसे पाणी या भागातील लोकाना मिळत नाही. त्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यानी सतर्क राहुन कार्यवाही करणे आवश्यक आहे. व ती जबाबदारी त्याचीच आहे. इतर कारणे आम्हाला नकोत. नागरिकांना ऐन उन्ळाळ्याचया दिवसात पुरेसे पाणी व वेळेवर येणे आवश्यक आहे.

सौ. लता दलाल : सध्या शहर आणि सिडको भागातही ऐन उन्हाळ्याच्या काळात पाणी प्रेशरने व वेळेवर येत नसल्याच्या तक्रारी वाढलेल्या आहेत. गेल्या कित्येक वर्षापासून पाण्याच्या प्रेशर काळात सारख्या तक्रारी वाढतच परंतु प्रशासन संबंधित अधिकारी मात्र यावर पर्यायी व्यवस्था करतांना दिसून येत नाही. यासाठी शहर व सिडको भागातील नागरिकांच्या गैरसोय टाळण्याच्या दृष्टीने भागात एक-एक पाण्याची टाकी स्वंतत्ररित्या बांधावी. कारण सध्या शहरातील ज्या ज्या भागात पाण्याच्या टाक्या आहेत त्या टाक्यातून सर्वानांच भरपूर प्रमाणात पाणी मिळते असे नाही. ज्युब्लीपार्क च्या पाण्याच्या टाकीतून अनेक भागांना पुरेसे मिळत नाही. यासाठीच स्वंतत्र टाक्या नविन तयार करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करून बांधणे येत राहील. सध्या ३२० व्होल्टेज मिळत नाही. यासाठीच स्वंतत्र टाक्या नवीन तयार करण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करून बांधणे योग्य राहील सध्या ३२० व्होल्टेज मिळते ३८० व्होल्टेज मिळाल्यास अडचण राहणार नाही.

श्री. रशिदखॉन (मामू) : सिडको हडको भागात पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. या बाबत जे काही गाऱ्हानी व तक्रारी आहेत ते संबंधित वॉर्डाचे नगरसेवकांकडून एकावे नंतरच शहराच्या पाणी पुरवठ्याबाबत बोलावे.

श्री. महादेव सुर्यवंशी : सन १९८२ ला महानगरपालिका अस्तित्वात आली त्यावेळी महानगरपालिकेला १८ खेड्याचा समावेश करण्यांत आलेला होता. व सिडको सहित या सर्व भागांना पाणी पुरवठा केला जतो या महानगरपालिकेच्या स्लम भागांना पाणी पुरवठा केला जातो या महानगरपालिकेच्या स्लम भागांना फक्त आजपर्यंत ३० मिनिटे पाणी पुरवठा होता. त्यामुळे अनेक नागरिक त्रस्त झालेले आहेत सन १९८२ सालापासून आतापर्यंत संबंधित विभागाच्या पाणी पुरवठा सुरळीत व व्यवस्थित होत नाही. संपूर्ण शहराला १०५ एमएलडी प्रमाणे पाणी पुरवठा होतो. त्या प्रमाणात सिडको हडकोची लोकसंख्या लक्षात घेता पुरेसे पाणी मिळत नाही. या तक्रारी गेल्या कित्येक वर्षापासून आहेत व या भागासाठी ३० एमएलडी पाणी पुरवठा केल्यास नागरिकांना ऐन उन्हाळ्यासाठी इकडे तिकडे भटकावे लागणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी.

सौ. नुरजहाँ बेगम : आतापर्यंत या पाणी प्रश्नावर बरीच मोठी चर्चा सभागृहात होत असून त्यावर चर्चेअंती निर्णय होणे आवश्यक आहे.

श्री. भगवान घडमोडे : सिडको हडको च्या नागरिकांना ३० एमएलडी प्रमाणे पाणी पुरवठा कसा होईल याची शहानिशा करूनप्रशासनाने उपाय योजना आखावी.

(याच वेळेस स. सदस्य श्रीमती अलका पाटील सभागृहात एक पाण्याची बाटली घेऊन येतात. नळाद्वारे घाण पाणी येते ती बाटलीत भरून आणलेली सभागृहात दाखवितात. त्याच वेळेस सभागृहात एकच आवाज होतो व शेम-शेम चाआवाज ऐकावयास मिळतो. नंतर सभागृहात स. सदस्याचे आप आपसात बोलत असल्याने काही ऐकू येत नाही (वेळ दु. १२.३० वा. स. सदस्य श्रीमती अलका पाटील यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी शांतता बाळगावी व आपल्या ठिकाणी बसून घ्यावे.

मा. महापौर : (परंत यावेळी श्रीमती अलका पाटील या मा. महापौरांच्या आसनाजवळ दूषित पाणी भरलेली पाण्याची बाटली घेऊ जातात व जोर-जोराने बोलून उंचावून दाखवितात. त्यामुळे सभागृहात सारखा आवाज होतो. काही एके येत नाही.)

मा. महापौर : मी स. सदस्य श्रीमती अलका पाटील यांना पुन्हा विनंती करते की, त्यांनी सभागृहात शांतता राखावी अन्यथा त्याचे नगरसवेक पद रद्द करण्यात येईल.

[तरीही श्रीमती अलका पाटील काहीही ऐकत नाही. व दूषित पाणी सभागृहात दाखवितात त्याचे सोबत विपक्ष चे काही स. सदस्य ओरडून सांगू लागतात.] सभागृहास सारखा आवाज होत असल्याने स. स. श्रीमती अलका पाटील यांचे ३ दिवसाचे नगरसेवक पद रद्द करण्यातयेते. त्यांनी सभागृहाबाहेर जावे व सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना सभागृहाबाहेर घेऊन जावे (याच वेळी पुन्हा मा. महापौरांच्या असनासमोर स. सदस्य चा सारखा आवाज होतो. काहीही ऐकू येत नाही.)

श्री. गिरजाराम हाळनोर : सिडको- हडको भागातील नागरिकांच्या ३० एमएलडी पाणी पुरवठा या प्रमाणे वेळेवर व्हावी व घरोघरी जाण्यासाठी तक्रारी जो पर्यंत

राहणार नाहीत. तोपर्यंत आमची मागणी सारखी राहील. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी काय उपाय योजना केली याची माहिती द्यावी.

श्री. भगवान घडमोडे, श्री. रविंद्र इंगळे, सौ. पद्मा शिंदे :
सिडको-हडको भागात जोपर्यंत पुरेसे पाणी मिळत नाही तोपर्यंत आम्ही जनतेच्या पाठीशी राहुत.
(याच वेळी सिडको हडकोला पाणी पुरवठा झालाच पाहिजे अशा घोषणा सभागृहात जोरजोरात दिल्या जातात.)

सौ. पद्मा शिंदे : सिडको - हडको या भागातील नागरिकांना ३० एमएलडी पाणी पुरवठा झालाच पाहिजे नाही तर मा. महापौर व उप-महापौर यांना सभागृहात जाऊ देणार नाही.

श्री. कवंरसिंग बैनाडे : सिडको हडको भागासाठी होणारा पाणीपुरवठा कशा प्रकारे दैनंदिन होतो याबाबतचा तक्ता वाचून दाखवितात.
(काहीही ऐकू येत नाही. सभागृहात सारखा आवाज आपसात होत असतो.)

मा. महापौर : शहर व सिडका`हडकोला पुरेसे पाणी मिळत नाही. यासाठी पदाधिकारी व विद्युत मंडळाच्या अधिकाऱ्या समवेत संयुक्त बैठका घेऊन निर्णय घेण्या संबंधान समिती स्ाापन केलेली असून सदरील समिती आपला निर्णय लवकरच देईल.
१) सिडको हडको भागासाठी ३० एमएलडी ऐवजी २० एमएलडी पाणी पुरवठा होईल याची दक्षता घ्यावी.
२) शासनाच्या अनुदानाप्रमाणे गारखेडो येथील ६७.०० कोटीतून खर्चापैकी पाणी पुरवठ्याच्या योजनेसाठी काम करण्यास प्राधान्य.
३) सिडको हडको भागातील नागरिकांना पुरेसे पाणी मिळणार याची शाश्वती.
४) सिडको हडको भागातील ज्या भागात पाणी पुरवठा भरपूर प्रमाणात मिळत नाही व शहरी भागातही काही ठिकाणी पाणी मिळत नाही. त्या ठिकाणी दोन-दोत हातपंप बसवून देण्यांची व्यवस्था तातडीने अंमलात आणावी.
आता विषय क्र. १ इतिवृत्तावर चर्चा करावी.

**विषय क्र. २३६/२ :**

दि. १८/०२/९९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. हमीद ताबा : इतिवृत्तामध्ये काही ठिकाणी दुरुस्ती करावी.

सौ. पद्मा शिंदे: ठराव क्र. २२८/६ चे मी अनुमोदक होते. ठरावाच्या वेळी मी सभागृहात नव्हते. स्थगित करावे.

श्री. गिरजाराम हाळनोर : इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १८ मध्ये ज्या खाजगी संस्थाना इमारती भाड्यान देण्या संदर्भात मागील बैठकीत सूचनाकेलेल्या होत्या त्या मान्य केलेल्या होत्या. परंतु ठरावात तयाची नोंद आलेली नाही त्याची दुरुस्ती व्हावी.

मा. महापौर : पृष्ठ क्र. १८ मध्ये स. सदस्य नी ज्या सूचना मांडलेल्या होत्या त्याबाबत नोंद ठरावात घेण्याबाबत दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

श्री. भगवान घडमोडे : पृष्ठ क्र. ४३ वर विषय क्र. २३४/५ मध्ये अर्हता पदोन्नतीसाठी दाखविण्यांत आलेली आहे. मनपा सेवेत ज्याची सेवा जास्त झालेली आहेत व ते पदविधर नाहीत व यापुढे कोणत्याही शाखेचे पदविधर होणार नाहीत अशा जास्त सेवा काळ नौकरीत घालविलेल्या कर्मचाऱ्यांचाही या पदाच्या अर्हता मध्ये समाविष्ठ करावा अशी दुरुस्ती व्हावी.

श्री. अफसर खॉन : जेष्ठेतेनुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री. रशीद खॉन (मामू) : इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २९,३०, व ३१ मधील विषय क्र. २०२/३ मध्ये मागील बैठकीत मंजुरी देण्यात आली होती ती मंजुरीत देता स्थगिती ठेवण्यात आली होती अशी दुरुस्ती व्हावी.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १५ व १६ विषय क्र. २१२/३ मध्ये हॉटेलच्या मोकळया जागेला "ड" नुसार प्रस्तावात दर्शविलेल्या प्रमाणे रु. ४.८४ प्रति चौ. मी. ऐवजी रु. ५.०० चौ. मी. आकारण्यात आले असून हॉटेलला मोकळ्या जागेवर कोणत्याही प्रकारचे कर आकरण्यात येऊ नये व अशी दुरुस्ती करून प्रस्ताव सभागृहात पुन्हा मंजुरीसाठी ठेवावा. व सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

श्री. गिरजाराम हाळनोर : हॉटेलच्या समोरील मोकळ्या जागा ह्या हॉटेल मालम वापरण्यासाठी उपयोग करतात त्यामुळे त्यांना भाडे आकारणे आवश्यक आहे. प्रस्ताव रद्द करण्यात येऊ नये.

श्री. गौतम खरात : स्थायी समिती कडून हा प्रस्ताव मंजूर करून आलेला आहे. सर्वसाधारण सभेने तो मंजूर करावयाचा कि रद्द करावयाचा निर्णय घेऊ शकतात.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय : मोकळ्या जागे बाबतचा प्रस्ताव वेगळ्या पध्दतीने यावयास पाहिजे "ड" नुसार ८५ च्या जुन्या घरांना लागू पडतो परंतु प्रस्ताव मांडलेला असून तो चुकीचा आहे. सभागृहाची दिशाभूल होत आहे. याबाबतचा वेगळा प्रस्ताव यावयास पाहिजे. हा प्रस्ताव रद्द करण्यांत यावा. हॉटेल मालक सध्या महापालिकेला हॉटेल इमातरीच्या कर मोबदला म्हणून ११.३०% नी सध्या कर भरत आहे जर त्या अंतर्गत मोकळी जागा असेल तर १२.००% रु. ५/- चे प्रमाणे कर भरतात. मोकळ्या जागेवर इमारत झाल्यानंतर ११.३० प्र. चौ. प्रमाणे "अ" नुसार कर आकरण्यात यावयास पाहिजे.

करमुल्य निर्धारण अधिकारी : हॉटेलच्या मोकळ्या जगोवर जे हॉटेल मालक मोकळ्या जागेवर टेबल खुर्च्या टाकून व्यवसाय करतात त्या जागे पुरता प्रति. चौ. मी. ५.०० रु. प्रमाणेकर आकारण्या बाबतचा प्रस्ताव ठेवलेला होता. स्थायी समितीने त्या मंजुरी दिलेली आहे. सर्वसाधारण सभेने सुध्दा मंजुरी दिलेली आहे. "अ" आणि "ड" हा प्रकार असून फक्त अबकड हे टाईप ऑफ स्ट्रक्चर होते त्यांच्या ऐवजी मध्यम जे "ड" आहे त्याबाबतचा वेट ४.८४ हा प्रस्तावित केलेला होता. मागच्या वर्षीच्या बजेटमध्ये प्रस्तावीत केले होते की, हॉटेलच्या मोकळ्या जागेवर कर लावण्यात यावे म्हणून तसे प्रस्तावित करण्यात आले आहे.

श्री. अफसर खॉन : शहरातील इमातरीवर किती व कशा प्रकारचे कर आकारणी करण्यात आली या बाबतची माहिती मागविली असता त्याचे उत्तर अद्यापर्यंत मिळालेले नाही. तेंव्हा सदरील प्रस्ताव स्थगित ठेवून यावर चर्चा करावी.

श्री. अशफाक सलामी : इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ३५ व ३७ मधील विषय क्र. २२२/१ प्रस्ताव हा मंजूर म्हणून दाखविण्यात आलेला आहे. तो मंजूर नसून सभागृहातील गोंधळ चालू असतांना मंजूर करण्यात आलेला आहे. तो जाणीवपूर्वक मंजूर केलेला आहे. आणि त्या प्रस्तावावर शासन स्तरावर "तारांकित प्रश्न" झालेला असून सध्या सदरील प्रस्ताव मंजूर करू नये. या प्रस्तावावर गैर मार्गान कार्यवाही होणे आहे. तेंव्हा प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी व प्रस्ताव स्थगित ठेवावा.

श्री. विखारोद्दिन : सदरील प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यावर निर्णय नको.

श्री. अविनाश कुमावत : सभागृहाने एकले होते.

मा. महापौर : विषय क्र. २२२/१३ हा प्रस्ताव स्विकृतीसह मंजूर झालेला होता. आपणास काही आक्षेप नोंदवावयाचा असल्यास तो नोंदवावा (याच वेळी स. सदस्य श्री. अशफाक सलामी मा. महापौर यांच्या असनासमारे जाऊन राजदंड पळवून नेण्याचा प्रयत्न करतात व इतर स.स. देखील मा. महापोर यांच्या असनाजवळ जाऊन मोठमोठ्याने बोलणे चालू असते.)

श्री. अविनाश कुमावत : स. सदस्य श्री. अशफाक सलामी याचे एक दिवसाचे सभासदत्व रद्द करावे. त्यांनी मा. महापौरांचा अपमान केलेला आहे.

मा. महापौर : स. सदस्य श्री. अशफाक सलामी यांचे एक दिनसाठी सभासदत्व रद्द करण्यता येते. त्यांनी सभागृहाबाहेर जावे.

श्री. अशफका सलामी : सदरचा निर्णय मंजूर करू नये अन्यथा आम्ही कोर्टात जावू.

श्री. गौतम खरात : सभा कामकाज चालवावयाचे असेल तर कोणत्याही विषयावर चांगल्या प्रकारचे मा. महापौर यांनी घेतले पाहिजे. सदर विषय क्र. २२२/१३ या विषयावर चर्चा होऊन निर्णय घ्यावयास पाहिजे होता. स. सदस्यचे असे म्हणणे आहे. की. विषयाबाबत कोर्टात प्रकरण चालू असल्याने कोणताही निर्णय घेऊ नये. त्याचे म्हणणे आपण ऐकूण घेतलेले नाही आणि स. सदस्य चे सभासदत्व रद्द केले ते मागे घेण्यांत यावे. संबंधितांनी असे कोणतेही वेगळे कृत्य केलेले नसून झालेल्या प्रकाराबाबत ते सभागृहात माफी मागतील.

मा. महापौर : स. सदस्य श्री. अशफाक सलामी यांनी राजदंड पळवून नेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे त्यांनी महापौरांचा आपमान केला म्हणून त्यांचे सभासदत्व १ दिवसासाठी रद्द करण्यात आले त्यांनी सभागृहा बाहेर जावे. सुरक्षा रक्षकांनी स. सदस्यांना बाहेर काढावे असे दोन-तीन वेळेस बोलतात.

श्री. गौतम खरात : भूषण अग्रवाल यांच्या जमिनीच्या प्रकरणामध्ये महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे. भूषण अग्रवाल यांना दोन वेळेस पैसे दिलेले आहेत असे असतांना परत त्याच व्यक्तिला पुन्हा ती जागा देण्यात येते. हे मनपाच्या हिताचे नसून या बाबत शहरातील वातावरण वेगळे झालेले आहे. यात सभागृहाची व प्रशासनाची बदनामी होत आहे. त्यावर चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा. अन्यथा न्याय मागणेसाठी कोर्टात जावे लागेल.

श्री. गंगाधर गाडे : सन १९८७ मध्ये संबंधित जागे बाबतचा मोबदला देण्यात आलेला आहे तर ९६ मध्ये परत ती जागा त्यांना देण्याचा विचार करावा काय? याचे कारण स्पष्ट व्हावे.

मा. महापौर : हा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. याबाबत ज्यांना आक्षेप घ्यावयाचा आहे. त्यांनी आक्षेप नोंदवावीत सदरील प्रकरणात आपण न्यायालयात जावू शकतात.

श्री. काशिनाथ कोकाटे : न्यायालयीन प्रकरण या जाग बाबत चालू असतांना तडजोड करून निर्णय घेतला कसा या बाबत खुलासा व्हावा.

श्री. अविनाश कुमावत, सौ. लता दलाल : (१) ठराव क्र. २३४/५ या मध्ये दुरुस्ती करण्यांत यावी. त्याच प्रमाणे कामगार अधिकारी हे पद विभागीय अधिकारी या सवंर्गात वर्ग करण्यात यावे व विभागीय अधिकारी या रिक्त पदावर नेमणूक करण्यांत यावे.

मा. महापौर : दुरुस्तीस मंजुरी देण्यात येते.

श्री. रशिद खॉन (मामू) (२) ठराव क्र. २१२/३ दि. १८/०२/९९ प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा. त्याचप्रमाणे ठराव क्र. २१०/१ व २ दि. १८/०२/९९ अन्वये स्थगित ठेवलेला होता तरी ठराव क्र. २०३/४ दि. १८/१/९९ अन्वये मंजूर करण्यात आलेला असून स्थगिती उठवून ठराव क्र. २०३/४ प्रमाणे मंजूर करण्यात यावा.

मा. महापौर : दुरुस्तीस मंजुरी देण्यात येते.

श्री. नरेंद्र पाटील : ठराव क्र. २१०/१/१ यामध्ये मुळ मंजुरीप्रमाणे ३०% व ७०% अशी दुरुस्ती करावी.

मा. महापौर : ठिक आहे. स. सदस्यांनी सूचित केल्यानुसार दुरुस्तीसह मंजुरी देण्यात येते. विषय क्र. १ इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करण्यांस मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. २३६/२ :**

सर्वसाधारण सभा दिनांक १८/०२/९९ च्या इतिवृत्तातील

१) ठराव क्र. २१४/५ या मंजुर केलेल्या ठरावात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अ) अ.क्र. १ मध्ये ज्या संस्था धर्मदाय आयुक्त, सहकार निबंधक यांच्या पंजीकृत असेल तर त्यांना वापरण्यास द्याव्यात जर त्या संस्थाचा वापरासाठी नकार असेल तर इतर संस्थाना देण्यात यावे.

ब) अ.क्र. १२ मध्ये दरवर्षी भाड्याच्या रक्कमेत ५% वाढ करण्यात येईल ऐवजी ४% वाढ करण्यांत येईल.

क) अ.क्र. १३ मध्ये मालमत्ता कर संबंधित संस्थेकडून व वसूल करण्यात येईल हे वाक्य वगळ्यात येते. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

२) ठराव क्र. २३४/५ मंजूर करण्यात आलेला असून त्यात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

कामगार अधिकारी हे पद विभागीय अधिकारी या पदाच्या संवर्गात वर्ग करण्यास व त्यानुषंगाने पदस्थापना करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

३) ठराव क्र. २१२/३ मंजूर करण्यात आलेला असून सदर ठरावास स्थगिती देण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

४) सर्वसाधारण सभा दि. १८/०२/९९ चा ठराव क्र. २०३/४ मंजूर करण्यात आलेला असून त्याचे इतिवृत्त कायम करतांना ठराव क्र. २१०/१ दिनांक

१८/०२/९९ अन्वये सदर ठराव स्थगित करण्यांत आलेला होता. आता सदर ठरावास दिलेली स्थगिती उठविण्यास व दिनांक १८/०१/९९ रोजी ठराव क्र. २०३/४ अन्वये दिलेल्या मंजुरी नुसार खालील प्रमाणे कायम ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार मौजे जसवंतपुरा येथील आरक्षण नं. २०५ माध्यमिक शाळा पैकी २.३५ जागा १९८५ ला खाजगी तडजोडीने संपादन करण्यात आली असून क्षेत्राच्या संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्याने व स्थगिती आदेश झाल्याने विकास कामे थांबलेली आहेत. व दिवानी दावा क्र. ७१४/८९ या प्रकरणात निकाल महानगरपालिकेच्या विरुध्द गेलेला असून अपिल प्रकरण प्रलंबित आहे. तसेच या आरक्षणा व्यतिरिक्त याच सर्व्हे नं. १० पैकी दावेदार च्या मालकीच्या जमिनीतून नाला जात असून न्यायालयीन स्थगिती आदेशानुसार नाला संरक्षित भिंत व ड्रेनेजचे काम बंद करावे. लागेल या परिस्थितीचा विचार करून व जनतेला विकास सुविधा तत्परतेने पुरविता यावे म्हणून प्रस्तावित केलेल्या प्रमाणे वरिल आरक्षणाच्या जागे पैकी

१) प्राथमिक शाळा व क्रीडांगण करिता २ एकर २४ गुंठे आणि आरक्ष्ज्ञण व्यतिरिक्त
२) १२ मोटर रुदं विकास योजना रस्त्यासाठी ७.२० गुंठे.
३) नाला संरक्षित भिंतीसाठी व ड्रेनेज लाईनसाइी २६.४० गुंठे

एकूण ३ एकर १७.६० गुंठे

क्षेत्र मुळ जमीन मालकाने महानगरपालिकेस देण्यात यावी. गुंठे शासनास सादर केलेल्या प्रारुप विकास योजनेत महानगरपालिकेच्या जागेसाठी महानगरपालिकेसाठी वापर आणि उर्वरित अर्जदाराची जमीन आरक्षणातून वगळून निवास भागात सामिल करण्यास खालील अटीवर सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अ) या जमिनीच्या संदर्भात महानगरपालिका विरुध्द न्याय प्रविष्ठ असलेली सर्व प्रकरणी जमिन मालकांना काढून घ्यावी. दाव्याचा खर्च अर्जदाराने स्वतः च सोसावा.
ब) या जमिनीच्या संदर्भात महानगरपालिका विरुध्द न्याय प्रविष्ठ असलेली सर्व प्रकरणे जमिन मालकांना काढून घ्यावी. दाव्याचा खर्च अर्जदाराने स्वतः च सोसावा.
ब) आता पुन्हा वर प्रस्तावित ३ ए. १७.६० गुंठे जागा रितसर हस्तांतर करून महानगरपालिकेच्या ताब्यता द्यावी.
क) न्यायालयामध्ये तडजोड प्रस्ताव सादर करून न्यायालयचे प्रस्तावाप्रमाणे ७/१२ च्या मालकी हक्कात महानगरपालिकेन प्रस्तावा प्रमाणे नावे वरील क्षेत्राची दुरुस्ती करून देण्यात यावी.
ड) वरील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगरपालिकेसह आवश्यक ती नोंदणीकृत करारनामा करून घ्यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.
४) सर्वसाधारण सभा दिनांक १८/०१/९९ चा ठराव क्र. २०२/३ "अ" नुसार ३०%-७०% आरक्षण वगळण्यास मंजुरी देण्यात आली असून इतिृत्त

कायम करतांना ठराव क्र. २१०/१ मध्ये ३०%-७०% ऐवजी ४०%-६०% अशी दुरुस्ती करण्यांत आलेली आहे. तथापि सहाय्यक संचालक नगर रचना, मनपा औरंगाबाद यांनी त्याचे पत्र क्र. मनपा/नरवि/३८५/९९ दि. १९/०३/९९ अन्व्ये कळविले आहे की. ४०%-६०% सुधारणेला जमिन मालक तयार नाही व उच्च न्यायालयाने मोबदल्याची रक्कम देण्याचे आदेश दिलेले आहेत. वरील सर्व बाबींचा विचार करता दिनाक १८/०१/९९ च्या सर्वसाधारण सभेत प्रशासनातर्फे प्रस्तावित केलया प्रमाणे ठराव क्र. २०२/३ ला दिलेली मंजुरी काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

५) ठराव क्र. २२८/६ मंजूर करण्यात आलेला असून त्या स्थगिती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : विषय क्र. २ वर चर्चा करावी.

श्री. वसंत देशमुख : विषय क्र. १ वर मला चर्चा करावयाची आहे.

[याच वेळी सभागृहात स. सदस्य मा. महापौर यांच्या आसनाजवळ जाऊन मोठमोठ्याने बोलतात व मला चर्चा करावयाची असा आग्रह धरतात व मा. महापौरांचा राजदंड पळविणेचा प्रयत्न करतात या वेळी सभागृहात सदस्यामध्ये आरडा ओरड होते. काहीही ऐकू येत नाही. स. सदस्य श्री. देशमुख अजंडा फाडून मा. महापौरांच्या दिशेने भिरकवतात.]

मा. महापौर : स. सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. सभागृहात शिस्तभंग होईल असे कोणतेही कृत्य करू नये अन्यथा सभासदत्व रद्द करण्यात येईल.

(याच वेळी पुन्हा स. सदस्य आआपल्या जागेवर न बसता मा. महापौरा यांच्या आसनाजवळ येऊ मोठमोठ्याने बोलतात. काहीही ऐकू येत नाही. वेळ १=१० वाजता)

मा. महापौर : विषय पत्रिकेवरील सर्व प्रस्ताव व पुरवणी विषय पत्रिकेवरील व सभागृहात सादर केलेले सर्व विषयास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३७/२ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, शासन पत्र क्र. जीईएन-१०९८/१३५७/प्र.क्र.-१६६/९८/नवि-२४ नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी दिनांक ०१/३/९९ अन्वये पत्र पाठवून कळविले आहे. की, वित्तीय शिस्तीच्या अनुषंगाने शासनाच्या अधिपत्या खालील असलेले सर्व सार्वजनिक महामंडळे, महानगरपालिका यांनी त्यांच्याकडे होत असलेल्या कंत्राटी कामाचा विमा "शासकीय विमा निधीपाशी" उतरविणे आवश्यक असून कंत्राट कामाच्या करारनाम्यात अट अंतर्गत करणे आवश्यक आहे.

उपरोक्त शासनाच्या परिपत्रकान्वये औरंगाबाद महानगरपालिकेत अंमलबजावणीसाठी मनपा कडून काढण्यात येणाऱ्या निविदेमध्ये निविदा फार्म मध्ये शासनाची उपरोक्त अट समाविष्ट करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २३७/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वित्तीय शिस्तीच्या अनुषंगाने शासनाच्या अधिपत्याखालील असलेले सर्व सार्वजनिक महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका यांनी त्यांच्याकडे होत असलेल्या कंत्राटी कामाचा "विमा शासकीय विमा निधीपाशी" उतरविणे आवश्यक असून कंत्राट कामाच्या करारनाम्यात अट अंतर्गत करणे आवश्यक असल्याने

महानगरपालिकेकडून काढण्यात येणाऱ्या निविदे च्या निविदा फार्म मध्ये शासनाच्या प्रस्तावात नमूद केलेली अट समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्या येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३८/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दि अंतर्गत सिडको परिसरात अद्ययावत वाताणूकुलीत नाट्यगृह बांधणे या कामाचा शासकीय अनुदानातून हाती घ्यावयाचे कामा मध्ये समावेश आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने शासकीय अनुदानाच्या प्राप्त रक्कमेतून सिडकोस सदर नाट्यगृह बांधण्यासाठी रक्कम रु. २५=०० लक्ष दिले होते. परंतु सिडकोने अद्याप सदर नाट्यगृह बांधणे बाबत कुठलीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे मनपाने दिलेले र.रु. २५ लक्ष सिडकोकडून परत घेवून व सिडको कडून मोफत भूखंड घेवून त्यावर महानगरपालिके तर्फे शासकीय अनुदानातून अंदाजे र. रु. २=०० कोटी खर्चाचे अद्यावत वातानुकूलीत नाट्यगृह बांधणो बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २३८/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको परिसरात अद्यावत वातानुकलीत नाट्यगृह बांधणेसाठी सिडकोला रु. २५ लक्ष दिले होते परंतु सिडकोने नाट्यगृह बांधणे बाबत काहीही कार्यवाही केली नसल्याने महानगरपालिकेने दिलेले रु. २५ लक्ष सिडकोकडून परत घेवून व तसेच सिडकोकडून मोफत भूखंड घेवून त्यावर महानगरपालिकेतर्फे शासकीय अनुदानातून अंदाजे रक्कम २.०० कोटी खर्चाचे अद्यावत वातानुकुलीत नाट्यगृह बांधणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३९/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने नगर सचिव पदासाठी नामनिर्देशनाने पद भरण्यासाठी खालील पात्रता दर्शविलेली आहे.

१) सध्या महानगरपालिकेच्या सेवेत बसतील तर ३० वर्षाहून अधिक वयाचे नाही.
२) कला, वाणिज्य, अथवा विज्ञान या शाखेतील पदवीधारक.
३) विधी शाखेतील पदवीधारक.
४) ज्या स्थानिक स्वराज्य संस्था निमशासकीय अथवा शासकीय खात्यामधी्ल जबाबदारीच्या जागेचा कमीत कमी १० वर्षाचा अनुभव.

तथापि दर्शविण्यात आलेली वयोमर्यादाचे उमेदवार उपलबध होत नसल्याने नगर सविच पदासाठी पात्रतेतील (२) अ.क्र. १ मध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती प्रस्तावित करण्यात येते.

सध्या महानगरपालिकेच्या सेवेत नसतील तर १० वर्षाहून अधिक वय नसतील व महानगरपालिका सेवेतील कर्मचाऱ्यास उक्त वयाची अट लागू राहणार नाही. सबब प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. २३९/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगर सचिव पद नामनिर्देशनाने भरण्यासाठी महानगरपालिका सेवा भरती नियमात शैक्षणिक पात्रतेली (२) अ.क्र. १ मध्ये सध्या महानगरपालिकेच्या सेवेत नसतील तर ४० वर्षाहून अधिक नसतील व महानगरपालिका सेवेतील कर्मचाऱ्यास उक्त वयाची अट लागू राहणार नाही. अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र. २४०/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, महानगरपालिकच्या विविध दवाखान्यात एम.बी.बी.एस., बी.डी.एस, बी.एम.एस डॉक्टर्स फक्त रु ३५००/- (रुपये तीन हजार पाचशे फक्त) प्रति महा मानधनावर काम करीत आहेत.

सदरील मानधन खुपच कमी असून डॉक्टर्सना रुपये पाच हजार (रु. पाच हजार फक्त) प्रति महा मानधन देण्यात यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण मंजुरीसाठी सादर.

सुचक : डॉ. भागवत कराड
अनुमोदक : श्री. अफसरखॉन
श्री. अविनाश कुमावत
श्री. मोहसिन अहमद
दिनांक : १२/०२/९९

**ठराव क्र. २४०/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध दवाखान्यात काम करणारे डॉक्टरांना रु. ३५००/- प्रतिमहा मानधन ऐवजी रु. ५०००/- (रु. पाच हजार प्रतिमहा) मानधन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४१/२ :**

श्रीरम कृष्ण आश्रम ही संस्था संध्याच्या बिड बायपास रोडवर, एम.आय.टी व पैठण रोड दरम्यान आहे. तिचा तीन एकराचा रम्य परिसर असून एक सुंदर वास्तुमध्ये जनसेवेच्या व जनप्रबोधनाच्या सर्वसामान्य अशा उपक्रमाद्वारे तो कार्य करत आहे.

स्वामी विवेकानंदांनी स्थापन केलेल्या रामकृष्ण मिशन या जगदविख्यात संस्थेचे मार्गदर्शन व संलग्नता तिला लाभली असून जनसेवेच्या अनेक कार्यकालावशी तो वचनबध्द आहे. रामकृष्ण मिशनच्या भारतातील व जगातील अनेकानेक केंद्रातून अनेक संस्थाशी व विवेकानंद प्रेमी पर्यटक व भक्त येथे आवर्जून भेटी देतात बीड बायपास रोड हे सध्याचे संबोधन अपुरे आहे व ते तेथे येणाऱ्यांना अनेकदा गोंधळात टाकणारे आहे. असा अनेकाचा अनुभव आहे. तरी बीड बायपास रोडचे नामकरण "रामकृष्ण मिशन रोड" किंवा रामकृष्ण अश्रम असे करण्यात यावे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : डॉ. भागवत कराड.
अनुमोदक : श्री. मोहसीन अहेमद
दिनांक : १५-०२-९९

**ठराव क्र. २४१/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एम.आय.टी ते पैठण रोड रस्त्याच्या जक्शन बीड वळण रस्त्याला रामकृष्ण आश्रम मार्ग असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४२/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १८/०१/९९ च्या सर्वसाधारण सभेत वर्ग-४ चे ठरावीक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनावर घेऊन व सध्या दैनिक वेतनावरील वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांना फेब्रुवारी, ९८ पासून दैनिक वेतनामध्ये प्रति दिन १५/- रु वाढ करण्यात आलेली आहे. असा ठराव मंजूर झालेला आहे.

त्याच प्रमाणे वर्ग-३ चे कर्मचारी जे ठरावीक वेतनावर आहेत आणि जे कर्मचारी सध्या दैनिक वेतनावर आहेत या सर्वांना शासनाच्या इतर कार्यालयात देण्यात येणारे दैनिक वेतन रुपये ९४/- प्रति दिन प्रमाणे आहे. फेब्रुवारी-९८ पासून लागू करण्यात यावे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | : | श्री. जयवंत (बंडू) ओक |
| | | श्री. नरसिंग डगे |
| अनुमोदक | : | श्री. अफसर खॉन |
| | | श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय |
| | | श्री. अविनाश कुमावत |
| दिनांक | : | १६/०२/९९ |

**ठराव क्र. २४२/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका ठरावीक वेतनावर व दैनिक वेतनावर काम करणाऱ्या सर्व वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या इतर कार्यालयात देण्यात येणारे दैनिक वेतन रुपये ९४/- प्रति दिवस प्रमाणे देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४३/४ :**

हर्सूल येथे हरसिध्दी माता मंदिर असून सदर मंदिरात देवीचे दर्शनासाठी भाविकांची सतत गर्दी होत असते. सदरचा परिसरात मोकळा असून देवी मंदिर परिसरात संरक्षित भिंत बांधणे बाबत. भाविकांची तसेच नागरिकांची सतत मागणी होत आहे.

ही बाब विचारात घेता सदर देवी मंदिर परिसरात संरक्षित भिंत बाधण्यात यावी. सदर कामासाठी लागणारा खर्च संबंधित वॉर्डाचे सन्माननिय सदस्य यांचे स्वेच्छा निधीतून करण्यात यावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | डॉ. भागवत कराड |
| | | श्री. गिरजाराम हाळनोर |
| अनुमोदक | - | सौ. लता दलाल |
| | | सौ. सविता आव्हाड |
| दिनांक | - | १६/०२/९९ |

**ठराव क्र. २४३/४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सूल येथील हरसिध्दी माता मंदिर च्या परिसराला संरक्षित भिंत बांधण्यासाठी येणारा खर्च संबंधित प्रभागचे सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून करून संरक्षित भिंत बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४४/५ :**

आपल्या महापालिके तर्फे वेळेवर मालमत्ता कर भरणाऱ्या करदात्यांना विशेष सवलती दिल्या जातील जसे कि, जून मध्ये भरणाऱ्यांना ५% सवलत इत्यादी.

आमच्या असे निदर्शनास आले आहे की, एप्रिल मध्ये म्हणजे आर्थिक वर्षाच्या सुरुवातीच्या पहिल्या महिन्यात बऱ्याच करदाऱ्यांना कर भरण्याची इच्छा असते जास्तीत जास्त लोकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून एप्रिल मध्ये चालू वर्षाचा मालमत्ता कर भरणाऱ्या करदात्यांना ७% सवलत देण्यात यावी व पुढे पूर्वी ठरल्याप्रमाणे सवलती देण्यातयावी.

सुचक - श्री. गिरजाराम हाळनोर
श्री. संजय जोशी
अनुमोदक - सौ. रजनी जोशी
- श्री. सुदाम सोनवणे
- सौ. लता दलाल

**ठराव क्र. २४४/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मालमत्ता कर वेळेवर भरणाऱ्या करदात्यांना महानगरपालिके तर्फे विशेष सवलत देण्यांत येतात. त्यानुसार जास्तीत जास्त लोकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून थकबाकी सह चालू वर्षाचे मालमत्ता कर भरणाऱ्या कर दात्यांना जे एप्रिल मध्ये भरणा करतील त्यांना ७% व जे मे महिण्यांत भरणा करतील त्यांना ६% सवलत देण्यांस आणि ही सवलत थकबाकी रक्मेवर देय होणार नाही. फक्त चालू वर्षाच्या मालमत्ता कराच्या सामान्य करात सवलत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४५/६ :**

श्रेयनगर, क्रांतीचौक वॉर्डातील खुली जागा सिटी सव्हे नं. १५८५६/२ सिट नं. १४० ही जागा कृती संस्कृती विद्या केंद्र ह्याना दिली होती. ती जागा पुन्हा तया भागातील रहिवाश्यांसाठी परत मिळावी व सदरील खुली जागा दिल्याचे हस्तांतर रद्द करण्यांत येऊन ती जागा उद्यानासाठी पुन्हा ठेवण्यात यावी.

सुचक - श्री. प्रदिपजी जैस्वाल
- श्री अविनाश कुमावत
- श्री. गजानन बारवाल
- श्री. अफसरखॉन
- श्री. डॉ. भागवत कराड
अनुमादक - श्री. प्रफुल्ल मालानी
- सौ. निर्मलाताई कांबळे
- श्री. गिरजाराम हाळनोर
- सौ. लता दलाल

**ठराव क्र. २४५/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांती चौक प्रभागातील श्रेयनगर येथील आलेख क्र. १४० नगर भूमापन क्रमांक १५८५६/२ ही कृषि संस्कृती विद्या केंद्रास दिलेली जागा त्यांचे कडून परत घेवून व केलेले हस्तांतर रद्द करून या भागातील नागरिकांना उद्यानाच्या वापरासाठी ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ऐनवेळचे विषय

**विषय क्र. २४६/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, औरंगाबाद जिल्हा श्रमीक पत्रकाराच्या पत्रकार भवनास रु. ११.०० लाखाचे अनुदान देणे बाबत पूर्वीचे घोषणा करण्यांत आलेली होती. तयानुसार पत्रकार भवनास अकारा लाखाचे अनुदान देणे बाबत सन ९८-९९ च्या सुधारित अंदाजपत्रकात या बाबत तरतूद उपलब्ध करून देण्यात यावी. व पत्रकार भवनास रु. ११.०० लाख मनपा तर्फे अनुदान देण्यांत यावे.

सुचक - श्री. अविनाश कुमावत,
अनुमोदक - श्री. अफसरखॉन

**ठराव क्र. २४६/१ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद जिल्हा श्रमीक पत्रकाराच्या पत्रकार भनास सन ९८-९९ च्या सुधारित अंदाजपत्रकातून तरतूद उपलब्ध करून महानगरपालिके तर्फे रु. ११.०० लक्ष अनुदान देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४७/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका स. सदस्यांचे स्वेच्छा निधीतून सर्व प्रकारचे कर्क रोगाच्या रुग्णांसाठी आर्थिक मदत देण्याबाबत सभागृहाने मंजुरी दिलेली आहे. श्रीमती शरिफा बेगम भ्र. स. अब्दुल्ला ही महिला देखील कर्क रोगाने पिडीत असून घाटी रुग्णलयातील रेडीओथेरपी चे विभाग प्रमुखांनी त्यांना ओवीकर्क रोगाचा (कॅन्सर) असून त्यांना सुमारे रु. २५००/- हजार खर्च अपेक्षित असल्याचे तसेच दिनांक १७/०३/९९ चे प्रमाण डी. आर. टी/६०/९९ अन्वये प्रमाणे प्रमाणित केलेले आहे, तरी स्वेच्छानिधी मधून त्याना २५०००/- हजार रुपये विशेष बाब म्हणून आर्थिक मदत करण्यास प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

तसेच स्वेच्छा निधी प्रत्येकी रु. १०००/- पर्यंत ऐकूण रु. २५००/- हजार पर्यंत आर्थिक मदत करण्यास प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सुचक - श्री. प्रदिप जैस्वाल
- सौ. मोहसिना बिल्कीस
- प्रभाकर विधाते
अनुमोदक - श्री. अ. रशिदखॉन (मामू)
श्री. म.अ. रऊफ
- श्री. फजलउल्लाखॉन
- श्री. अफसर खॉन
- श्री. एकबालोद्दिन मुजाहद भाई
- श्री. अविनाश कुमावत

**ठराव क्र. २४७/२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती शरीफ बेगम भ्र. स. अब्दुल्ल ही महिला कर्क रोगाने पिडती असून त्यांना ओवीकर्क रोग असल्याचे शासकीय रुग्णालयातून प्रमाणित करण्यांत आलेले असल्याने यांच्या उपचारासाठी लागणारा खर्च स. सदस्य यांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येक रक्कम रुपये १०००/- पमाणे रु. २५०००/- विशेषबाब म्हणून अर्थसाह्य करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४८/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिटी स. नं. १६३१७ क्षेत्र १ एकर ०६ गुंठे जागा शिट क्र. २७१,२०३-अ, २७४-अ स नं. ४१ ही जमीन प्रारुप विकास योजना सुधारित मध्ये स्मशाभूमी (क्रीमीशन ग्राऊंड) म्हणून विद्यमान जमिनीचा वापर दाखविण्यात आले आहे.

सदरची जमीन ही पूर्णपणे खाजगी असून स.नं.४१ चा ७/१२ चा मालकी हक्काचे जमीन मालकांचे नांव असून मनपा ने आतापर्यंत ही जमीन कोणत्याही प्रकारे ट्रान्सफर करून घेतलेली नाही. तसेच शहरातील जनतेला स्मशानभूमीची सुविधा उपलबध व्हावी म्हणून आणि महानगरपालिकाला बंधनकारक असल्याने सदर जमीन स्मशान भूमीसाठी (क्रिमीशन ग्राऊंड) मनपा ने रितसर ताब्यात घेऊन हितसंबंधी मोबदल्याची रककम शासकीय दराने (रेडी रेशन) अदा करण्यात यावी आणि भूसंपादन अधिनियम १८९४ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये भूसंपादन रितसर कारवाई करण्यास भूसंपादनाचे खर्चासह मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. हमीद उद्दिन ताबा |
| अनुमोदक | - | श्री. अ. रऊफ अ. माबुद |
| | | श्री. अफसरखॉन |
| दिनांक | - | ०२/०३/९९ |

**ठराव क्र. २४८/३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सि स. नं. १६३१७ सर्व्हे नं. ४१ चे क्षेत्र १ एकर ०६ गुंठे ही जमीन प्रारुप विकास योजना सुधारित मध्ये स्मशानभूमी (क्रिमिशन ग्राऊंड) म्हणून विद्यमान जमीन वापर दाखविण्यात आलेली आहे. सदर जागा खाजगी मालकाची असल्याने व स्मशानभूमीची सुविधा जनतेला उपलब्ध करून देण्यासाठी भूसंपादन आणि १९८४ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार भूसंपादन रितसर कारवाई करून जागा ताब्यात घेण्यासाठी भूसंपादनाकरिता येणाऱ्या खर्चास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४९/४ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, शहरातून नागरी प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम राबविण्यासाठी शासनाने केंद्र शासनाच्या आदेशानुसार प्रस्ताव मनपाने तयार करून शासनास दिनांक ४/२/९९ रोजी जी.क्र.मनपा/आरोग्य/११२/९९ अन्वये शहरातून १४ आर.सी.सी. एच केंद्र शासनाने औरंगाबाद शहरातून राबविण्यासाठी आर. सी. एच/१०/९९ प्र.क्र./५/९९ दि. १५/०३/९९ रोजी मान्यता दिली आहे. या प्रकल्पास शासनातर्फे १००% अनुदानीत चार वर्षासाठी असून

पुढे आर्थिक भार नियमित स्वरुपात मनपास करावा लागेल व हा प्रकल्प संपूर्णतः राबेल या प्रस्तावात मंजुरी द्यावी. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. २४९/४ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रसतावित केल्या प्रमाणे शहरातून नागरी प्रजनन व बाल आरोगय कार्यक्रम राबविण्यासाठी प्रस्तावित केल्या प्रमाणे १४ आर.सी. एच केंद्र व ३ फिरते आर.सी. एच केंद राबविण्यास मंजुरी देण्यात येते. व चार वर्षाचा कालावधी संपल्यानंतर मनपा स्वतः ह्या प्रकल्पाचा आर्थिक भार सोसण्यास तयार आहे. व पुढे संपूर्णतः हा प्रकल्प नियमित स्वरुपात राबवेल या तत्वावर या प्रकल्पास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच राज्य शासनाने मागितलेले हमीपत्र देण्यास ही सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. नियमानुसार वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५०/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, पीरबाजार ते गारखेडा या ८० फुट विकास रस्तयाचे मजबुतीकरण व तयावर सरफेस ड्रेसिंग करणेच्या कामासाठी सन १९९८-९९ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या जिल्हा दरसूचीनुसार ढोबळ अंदाजपत्रक र. रु. ४२,९७,८०६/- चे तयार करण्यात आले असून सदरील खर्च सन १९९९-२००० च्या भांडवली रस्ते (नविन खडी रस्त) या लेखा शिर्षकातून तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. २५०/५ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पीरबाजार ते गारखेडा या ८० फुट रुंद विकास योजना रस्त्याचे मजबुतीकरण व त्यावर सरफेस ड्रेसिंग करण्याच्या कामासाठी रक्कम रु. ४२,९७,८०६/- चे तयार केलेल्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५१/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, जिनिंग मिल मध्यवर्ती जकात नाक्यापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ सार्वजनिक बांधकाम खातयाचे डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. २३,४०,०००/- चे तयार करण्यात आले असून सदर कामाचा खर्च अर्थसंकल्पीय तरतूद सन १९९९-२००० च्या पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षकामधून करण्याचे प्रस्तावित आहे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २५१/६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिनिंग मिल ते मध्यवर्ती जकात नाक्यापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी रक्कम रु. २३,४०,०००/- चे तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५२/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, बारी कॉलनी अंतर्गत रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९७-९८ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. १४,८१,६००/- चे तयार करण्यांत

आले असून सदरचा खर्च अर्थसंकल्पीय तरतूद सन १९९९-२००० च्या पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षकामधून प्रस्तावित आहे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २५२/७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बारी कॉलनी अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी रक्कम रु. १४,८१,६००/- चे तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५३/८ :**

सहाय्य संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराच्या भावसिंगपुरा भागातील औरंगाबाद शहर मंजूर विकास योजने व्यतिरिक्त सर्व्हे क्र. ४७/१ भावसिंगपुरा ह्या जमिनीपैकी दोन एकर क्षेत्राची जागा भिमनगर (घोषित झोपडपट्टी) साठी तेथील जनतेच्या मागणी नुसार आरोग्य केंद्र व गार्डन करणेसाठी भूसंपादित करणे आहे.

करिता भूसंपादन प्रस्ताव भूसंपादन प्रस्तावासाठी लागणाऱ्या खर्चासह मंजुरीस्तव सादर.

**ठराव क्र. २५३/८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमनगर भावसिंगपुरा घोषित झोपडपट्टीच्या नागरिकांकासाठी मंजूर विकास भिमनगर योजने व्यतिरिक्त मौ. भावसिंगपुरा येथील स. नं. ४७/१ पैकी क्षेत्र २ एकर इतकी जमीन आरोगय केंद्र व उद्यानासाठी भूसंपादन करण्याकरिता भूसंपादनासाठी लागणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५४/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये विद्युत यांत्रिकी व स्थापत्य विभागात सुमारे ५५ कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता नसून त्या पैकी सुमारे ४० टक्के अभियंता आय.टी.आय धारकातून पदोन्नतीने कनिष्ठ अभियंता शाखा अभियंता झालेले आहेत. शासनाने सन १९९४ साली मंजूर केलेल्या सेवा भरती नियम प्रमाणे अनुक्रमांणे १४ अ,ब,क, प्रमाणे पदविधारकांना ५ वर्ष पदविका धारकांना वर्ष व आय.टी.आय. धारकांना १३ वर्ष सेवा नंतर उप अभियंता पदावर पदोन्नतीची तरतूद आहे. भुतपूर्व नगरपरिषदे पासून आय.टी.आय. धारकांची संख्या जास्त आहे. यांना पदोन्नतीची योग्य संधी लाभावी व उपअभियंता पदांनावर त्यांना पुढील पदोन्नतीची संधी लवकर नसल्याने सेवा भरती नियमात १३ वर्षे ऐवजी १० वर्ष कनिष्ठ अभियंता म्हणून सेवा ठेवल्यास आणि शासन मंजुरी म.न.पा. सेवा भरती नियमाप्रमाणे अभियंता पदोन्नतीसाठी चे गुणोत्तराचे प्रमाण ४०:४०:२० मध्ये कोणताही बदल न करता वरील प्रमाणे दुरुस्ती करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजरीसाठी सादर.

सुचक - श्री. अविनाश कुमावत
अनुमोदक - श्री. संयय केनेकर

**ठराव क्र. २५४/९ :**

प्रस्तावात दर्शविण्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील विद्युत यांत्रिकी व स्थापत्य विभागीतील कनिष्ठ / शाखा अभियंता पैकी सुमारे ४०% आय.टी.आय. धारकामधून कनिष्ठ / शाखा अभियंता आलेले आहेत त्यांना उप अभियंताच्या पदौन्नतीनंतर पुढील पदोन्नतीची संधी लवकर नसल्याने व आय.टी.आय. धारकांची संख्या जास्त असल्याने शासन मंजुर सेवा भरती नियमात पदविका व आय.टी.आय धारका अभियांचे पदोन्नतीचे गुणोत्तर प्रमाण ४०:४०:२० मध्ये कोणताही बदल न करता सेवा भरती नियमातील अ.क्र.१४ मध्ये आय.टी.आय धारक कनिष्ठ/ शाखा अभियंताना १३ वर्षे सेवेनंतर उपअभियंता पदावर पदोन्नती अनुज्ञेय होते. ऐवजी १० वर्षाच्या सेवेनंतर उप अभियंता पदावर पदोन्नती देण्याबाबतची दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५५/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद येथील कै. मोहनराव पचलोरे शिक्षण प्रसारक मंडळ ही नोंदणीकृत संस्था आहे. ह्या संस्थेचे हर्सूल गावांत व हर्सूल परिसरात सामाजिक कार्य आहे. तसेच हर्सूल येथे व्यायाम शाळा ह्याच्या संस्थेतर्फे चालविण्यात येते आहे. ह्या संस्थेला ह्या भागात नागरिकांसाठी वाचनालय, स्वतंत्र मोठी व्यायामशाळा चालवायची आहे. तरी ह्यासाठी संस्थेस लागणारी जागा श्री. भिकुलाल वर्मा यांच्या गअ नं. १९४/२ हर्सूल मधील मंजूर रेखाकनातील खुली जागा देण्यात यावी प्रस्ताव मंजुरीस्ताव विचारार्थ सादर.

सुचक - डॉ. श्री. भागवत कराड.
अनुमोदक - श्री. जयवंत (बंडू) ओक

**ठराव क्र. २५५/१० :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे हर्सूल येथील स. नं. १९४/२ श्री. भिकुलाल वर्मा याची रेखाकनातील अनुज्ञेय होणारी खुली जागा "कै मोहनराव पचलोरे" शिक्षण प्रसारक मंडळ यांना वाचनालय, व्यायाम शाळासाठी देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५६/११ :**

औरंगाबाद मनपा तर्फे विविध महापौर चषक स्पर्धाचे आयोजन केल्या जाते या अशा स्पर्धातूनच खेळाडू चा विकास होतो. त्या दृष्टीने मनपाअधिकारी व कर्मचारी यांच्या क्रीडा पाल्यासाठी विचार होणे आवश्यक आहे. मनपाच्या सांस्कृतिक अधिकारी सौ. ज्ञानदा कुलकर्णी यांची मुलीगी कु. शर्वरी कुलकर्णी हीची चिन, लंडन, हॉलंड, अशा अनेक ठिकाणी महत्वाच्या अंतराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यंची संधी मिळाली होती. त्याची दोन ठिकाणी (चिन/लंडन) या ठिकाणी स्पर्धेत सहभागी होवून यशस्वी झाली त्याबद्दल मनपाच्या वतिने तिचे अभिनंदन.

अशा गुणी खेळाडूंची कदर मनपाने करावी व भविष्यात अशा प्रकारची संधी करिता कु. शर्वरिस स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत चालू आर्थिक वर्षात त्यांना (एप्रिल-९९) निधीतून प्रत्येकी रुपये दोन हजार फक्त (रु. २०००/-) कु. शर्वरी कुलकर्णी हिच्या नांवे आर्थिक मदत देणे करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. जयवंत (बंडू) ओक.
अनुमोदक - सौ. लता दलाल.
- अविनाश कुमावत

**ठराव क्र. २५६/११ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबार महानगरपालिकेचे सांस्कृतिक कार्यक्रम अधिकारी सौ. ज्ञानदा कुलकर्णी यांची मुलगी कु. शर्वरी कुलकर्णी हिने चिन, लंडन येथे अंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच सहभागी होऊन स्पर्धेत यशस्वी झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात येते. तसेच त्यांना भविष्यात अशा प्रकारची संधी उपलब्ध झाल्यास सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाच्या स. सभासदाच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येकी दोन हजार प्रमाणे आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५७/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वंजारी विकास मंडळ औरंगाबाद व धन्ववंतरी एज्युकेशन ट्रस्ट ही रजिस्टरर्ड संस्था असून या संस्थेकरिता हॉस्पीटल व शैक्षणिक कार्यकरिता नागरेश्वरवाडी येथील नालयावरील पूर्ण व पश्चिमेकडील अनुक्रमे चार हजार स्वके फुट मिर (४००० चौ. मी जागा मनपा तर्फे) लिजवर देण्यात यावी.

तसेच औरंगपुरा नाथ सुपर मार्केट जवळील पुलाच्या पुर्वेकडील व मराठी महासंघास दिलेल्या जागेला लागून असलेली ४००० मिटर जागा कै. मोनहराव पचलोरे हे शिक्षण प्रसारक मंडळास महानगरपालिके तर्फे लिजवर देण्यात यावी. उपरोक्त दोन्ही नव्यान्नव वर्षाच्या भाडे पट्टीवर देण्यात याव्यात.

करिता उपरोक्त दोन्ही संस्थेस महानगरपालिकेतर्फे वरील दर्शविलेल्या ठिकाणची जागा लिजवर देणे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. राजकुमार बचाटे
अनुमोदक - श्री. भगवान घडामोडे

**ठराव क्र. २५७/१२ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वंजारी विकास मंडळ औरंगाबाद व धन्वंतरी ऐज्युकेशन ट्रस्ट या नोंदणीकृत या नोंदणीकृत संस्थेला दवाखाना व शैक्षणिक कार्यासाठी नागरेश्वरवाडी येथील नाल्यावरील पूर्व व पश्चिमेकडील अनुक्रम ४००० चौ. मी. आणि कै. मोहनराव पचलोटे शिक्षण प्रसारक मंडहास औरंगपुरा नाथ सुपर मार्केट जवळील पुलाच्या पूर्वेकडील व मराठा महासंघास दिलेल्या जागेस लागून उपलब्ध असलेली नाल्याची जागा ९९ वर्षाच्या भाडे तत्वावर महानगरपालिके तर्फे देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५८/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला भावसिंगपुरा भागातील महानगरपालिकेच्या पाण्याच्या हौदाला लागून रस्त्यालगत सार्वजनिक महानगरपालिकेची जागा आहे. त्या जागेमध्ये महानगरपालिकेने माझ्या स्वेच्छा निधीतून शहाबाद फरशी बसविण्यात यावी. स्वेच्छा निधी सन १९९९-२००० च्या आर्थिक वर्षातून खर्च करण्यात यावा.

सुचक - सौ.रुख्मीनीबाई लोखंडे
अनुमोदक - श्री. गिरजाराम हाळनोर

**ठराव क्र. २५८/१३ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला भावसिंगपुरा भागातील महानगरपालिकेच्या पाण्याच्या हौदाला लागून रस्त्यालगतची महानगरपालिकेच्या जागेस स. सदस्या सौ. रुख्मीनीताई लोखंडे यांचे सन १९९९-२००० आर्थिक वर्षातील स्वेच्छा निधीतून शहाबाद फरशीचे काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५९/१४ :**

औरंगाबाद महानगरपालिका हद्दित विकास योजनेस अंतर्गत आरक्षण क्र. ८० मोहल्ला जाफरगेट बहादुरपुरा मधील सी.टी. एस नं. १३४६० जमीनीचा भाग माध्यमिक शाळा व क्रीडांगणासाठी राखीव होतो. त्यातुन सदरील आरक्षणासाठी १२३७३ चौ. मी. क्षेत्र सन १९८४-८५ खाली मनपा ला संपादित झालेला आहे. व त्यावेळी सदर ठिकाणी जी दर्गा आहे. नाव हजरत खाजा मोहनुल्ला शहा यासाठी अंदाजे ७५x७५ चौ.मी. ची मोकळी जागा आरक्षणातून वगळण्यात आलेली आहे.

विकास योजने अंतर्गत वगळण्यात आलेली जागा आहे. ती कब्रस्तानची जागा वगळून उरलेली जागा अंदाजे क्षेत्र २८०० चौ. मी. जागा मनपा आरक्षण क्र. ८० मध्ये बाधित होत आहे. म्हणून सदरील उरलेली जागा आरक्षणातून वगळण्यात यावे किंवा वरील प्रमाणे सदरील जागा संपादित करून शासनाच्या दराप्रमाणे संबंधित जमीन मालकास मोबदला देण्यात यावे. तरी आरक्षण क्र. ८० नगर भूमापन क्र. १३४६० सदर जमीन आरक्षणातून वगळणे किंवा मोबदला देणे बाबत निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर करण्यात येतो.

सुचक - श्री. हमीदउद्दिन ताबा
अनुमोदक - श्री. मो. सलीम कुरेशी

**ठराव क्र. २५९/१४ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला जाफरगेट येथील आरक्षण क्रमांक ८० पैकी सिटी सर्व्हे नंबर १३४६० मधून पूर्वी संपादित केलेली जमीन वगळता तसेच हजरत खाजा मोईनुल्लाशाह दर्गाह लगत सोडण्यात आलेली मोकळी जमीन सोडून आणि कब्रस्तानची जागा देखील वगळून या आरक्षा क्र. ८० ने बाधित होणारी मिळकत रितसर संपादन करून हितसंबंधिताना मोबदल्याची रक्कम देण्यास भूसंपादनच्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६०/१५ :**

महानगरपालिका विकास योजने अंतर्गत गट क्र. ३९ व ९ कांचनवाडी मधील आ.क्र. ५,६,७, व ८ ही जमीन स्थायी समितीने ठराव घेऊन शैक्षणिक कार्यासाठी संपादन करून आरक्षीत केलेली आहे. सदर जमीनीचे एकूण क्षेत्रफळ सुमारे १३,६०० चौ. मी. आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती महात्मा फुले नगर, औरंगाबाद सरकार मान्य शैक्षणिक संस्था असून ही संस्था दलित मागास वर्गास व आर्थिक दुर्बल घटक सामाजिक कार्या करीत आहे. कांचनवाडी येथील गट क्र. ३९ मधील आरक्षित क्र. ५,६,७ व ८ जी जमीन मनपाने शैक्षणिक कार्यासाठी राखीव ठेवली असल्याने सदर जमीनीतील २ हेक्टर जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, महात्मा फुलेनगर, औरंगाबाद ह्या संस्थेस शैक्षणिक कार्यासाठी देण्यात यावी म्हणून प्रस्ताव सादर करीत आहे.

सुचक - श्री. प्रकाश निकाळजे
अनुमोदक - श्री. अभिमन्यु भालेराव
- श्री. अविनाश कुमावत
- श्री. नरेंद्र पाटील.

**ठराव क्र. २६०/१५ :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका विकास योजने अंतर्गत मौजे कांचनवाडी येथील गट क्र. ९ व ३९ मधील आरक्षण क्र. ५ ते ८ ही शैक्षणिक वापरासाठी राखीव ठेवलेली असून त्यापैकी महानगरपालिकेने १३,६००/- चौ. मी. जमीन संपादित केलेली आहे. गट नं. ९ व ३९ मधील आरक्ष्ण क्र. ५,६,७, व ८ पैकी २ हेक्टर जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, महात्मा फुलेनगर औरंगाबाद ह्या संस्थेस शैक्षणिक कार्यायासाठी देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या नंतर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ३१/०३/९९ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

**बुधवार दिनांक ३१/०३/९९ रोजी "मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सर्वसाधारण सभा (स्थायी समितीच्या ८ स. सदस्यांची निवड करणेसाठी) सकाळी ११=०० वा आयोजित करण्यात आली होती. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गितानेझाली.**

**बैठकीस मा. आयुक्त व रजिष्टरप्रमाणे स. सदस्य तसेच संबंधित अधिकारी वर्ग उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. डॉ. कराड भागवत | उप-महापौर |
| २) | स.स.श्री. ओक जयवंत केशवराव | स. सभासद |
| ३) | स.स.श्री. अफसरखॉन यासिनखॉन | --//-- |
| ४) | स.स.श्री. लोखंडे रुख्मिणीबाई खंडेराव | --//-- |
| ५) | स.स.श्री. विधाते प्रभाकर सिताराम | --//-- |
| ६) | स.स.श्री. अविनाश लक्ष्मणराव कुमावत | --//-- |
| ७) | स.स.सौ. साजेदा बेगम | --//-- |
| ८) | स.स.श्री. म. सलीम म. हनिफ कुरेशी | --//-- |
| ९) | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | --//-- |
| १०) | स.स.श्री. ॲड. वानखेडे गणेश किसनराव | --//-- |
| ११) | स.स. श्रीमती जोशी रजनी रमेश | --//-- |
| १२) | स.स.सौ. उषाबाई दिलिप गायकवाड | --//-- |
| १३) | स.स.सौ. मुंडलिक विमलबाई नंदकुमार | --//-- |
| १४) | स.स.श्री. गौतम लिंबाजी लांडगे | --//-- |
| १५) | स.स.श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी | --//-- |
| १६) | स.स.श्री. भालेराव अभिमन्यु रामभाऊ | --//-- |
| १७) | स.स.श्री. नरेंद्र यादव पाटील | --//-- |
| १८) | स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ | --//-- |
| १९) | मा. श्री. सोनवणे सुदाम रामदास | --//-- |
| २०) | स.स.श्री. इंगळे रविंद्र बाबुराव | --//-- |
| २१) | स.स.श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग | --//-- |
| २२) | स.स.सौ. शिंदे पद्मा बाबुराव | --//-- |
| २३) | स.स.श्री. टाकळकर सुभाष भिकाजी | --//-- |
| २४) | स.स.श्री. मालानी प्रफुल्ल लालचंद | --//-- |
| २५) | स.स.श्री. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ | --//-- |
| २६) | स.स.सौ. धनश्री अशोक विसपुते | --//-- |
| २७) | स.स.सौ. फरहद बानो मो. नवाज | --//-- |
| २८) | स.स.श्री. फजलउल्ला खॉन अजमत खॉन | --//-- |
| २९) | स.स.श्री. अजिजखॉन गणी खॉ | --//-- |
| ३०) | स.स.श्रीमती आबेदा बेगम मो. मुश्ताफा | --//-- |
| ३१) | स.स. श्री. महंमद मुश्ताफ अहेमद | --//-- |
| ३२) | स.स.श्रीमती नुरजहॉं बेगम अ. रहेमान खॉन | --//-- |
| ३३) | स.स.श्री. देशमुख वसंत विनायकराव | --//-- |
| ३४) | स.स.श्री. मुजीब आलमशहा मीर आलमशहा | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ३५) | स.स.सौ. मोहसिना बिल्कीस विखोराद्दिन | --//-- |
| ३६) | स.स.श्री. अ. जावेद रज्जाक | --//-- |
| ३७) | स.स.श्रीमती जाहेदा बेगम म. जमिर | --//-- |
| ३८) | स.स.श्री. तुपे त्र्यंबक गणपतराव | --//-- |
| ३९) | स.स.सौ. यशोदा धनंजय वाडेकर | --//-- |
| ४०) | स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल | --//-- |
| ४१) | स.स.श्रीमती गंगावाल पुष्पाबाई सुरेशचंद्र | --//-- |
| ४२) | स.स.श्री. म.अ.रऊफ अ. माबुद | --//-- |
| ४३) | स.स.श्री. स.अ. इकबालोद्दिन स. मो. कुतुबुद्दिन | --//-- |
| ४४) | स.स.श्री. हमीद उद्दिन ताबा फसियोद्दिन | --//-- |
| ४५) | स.स.श्री. खाखोरडिया धिरज शांतीलाल | --//-- |
| ४६) | स.स.श्री. प्रदिपकुमार जैस्वाल | --//-- |
| ४७) | स.स.श्री. सय्यद अली मिरा सलामी | --//-- |
| ४८) | स.स.श्री. रमेश लाहोट | --//-- |
| ४९) | स.स.श्री. संजय केनेकर | --//-- |
| ५०) | स.स.श्री. फैय्याद अहेमद महमंद हाजी कुरैशी | --//-- |
| ५१) | स.स.सौ. वाघमारे मुक्ताबाई सुदाम | --//-- |
| ५२) | स.स.सौ. लता दलाल | --//-- |
| ५३) | स.स.श्रीमती अलका रमेश पाटील | --//-- |
| ५४) | स.स.श्रीमती धांडे शंकुतला हरिदास | --//-- |
| ५५) | स.स.श्री. अ. रशिदखॉन (मामू) | --//-- |
| ५६) | स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण | --//-- |
| ५७) | स.स.डॉ. कु. माया लिंबाजी लाडवाणी | --//-- |
| ५८) | स.स.सौ. आव्हाड सविता संजय | --//-- |
| ५९) | स.स.सौ. निर्मला विठ्ठल कांबळे | --//-- |
| ६०) | स.स.सौ. अब्दुल रशिद अ. सत्तार | --//-- |
| ६१) | स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग | --//-- |
| ६२) | स.स.श्री. विखारोद्दिन पि. खुदबोद्दिन | --//-- |
| ६३) | स.स.श्री. जैन विकास रतनलाल | --//-- |
| ६४) | स.स.श्री. गंगाधर सुखदेव गाडे | --//-- |
| ६५) | स.स.श्री. बारवाल गजानन रामकिशन | --//-- |
| ६६) | स.स.श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग | --//-- |
| ६७) | स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | --//-- |
| ६८) | स.स.श्री. जोशी संजय रामदास | --//-- |
| ६९) | स.स.श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर | --//-- |
| ७०) | स.स.सौ. ज्योत्सना दौलत हिवराळे | --//-- |
| ७१) | स.स.श्री. राजकुमार उर्फ सांडू बचाटे | --//-- |
| ७२) | स.स.सौ. राधाबाई तळेकर | --//-- |
| ७३) | स.स.श्री. ढगे नरसिंग मुरलीधर | --//-- |
| ७४) | स.स.श्री. जाधव विठ्ठल किसन | --//-- |
| ७५) | स.स.श्री. मेहेर विजयकुमार गजानन | --//-- |
| ७६) | स.स.सौ. काळुसे मंदा धनंजय | --//-- |

| | | |
|---|---|---|
| ७७) | स.स.सौ. कोल्हे सुनंदा उत्तम | --//-- |
| ७८) | स.स.श्री. गांगवे बन्सी तुळशीराम | --//-- |
| ७९) | स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास | --//-- |
| ८०) | स.स.श्री. नवपुते कचरू चंद्रभान | --//-- |

**संवाद** :

मा. महापौर : कोरम अभावी सभा अर्धा तास तहकूब करण्यात येते.
(वेळ ११.३२ वा.) पुन्हा सभेला सुरुवात १२.४५ वाजता

श्री. जयवंत ओक : स. सदस्य तथा माजी महापौर श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या मातोश्री स्व. मानकोर भ्र. बि करमसिंग ओबेरॉय यांचे नुकतेच दु:खर निधन झाले. त्यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सौ. लता दलाल : त्याचप्रमाणे मुंबईचे माजी महापौर स्व. शरद आर्चाय यांचेही दु:खद निधन झाले. त्यांनाही स्भागृहात श्रध्दाजली अपर्ण करावी.

मा. महापौर : ठिक आहे. (त्याचे वेही स. सदस्य तथा माजी महापौर श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांच्या मातोश्री स्व. मानकोर भ्र. बी. करमसिंग ओबेरॉय व मुंबईचे माजी महापौर स्व. श्रद आचार्य यांना सभागृहात १.०० मिनिट स्तब्ध उभर राहून श्रध्दांजली वाहण्यात आली) आता सचिवानी निष्णुक विषयी माहिती द्यावी.

नगरसचिव : (माहिती वाचून दाखविलइ व उमेदवारांनी अर्ज परत घेण्यासाठी त्यांना आर्धा तासाचा अवधी देण्यात येतो. ज्या ज्या उमेदवारांनी निवडणुकीत स्थायी समितीचे स्दस्यासाइी उभे राहण्यासाठी अर्ज भरलेले आहेत अशा उमेदवारांचे नांवे वाचून दाखविली व उमेदवारी अर्ज पर घेण्यासाठी अर्धा तासाचा अवधी देण्यात येईल असे सांगितले.)

मा. महापौर : जे उमेदवार निवडणूकीत उभे आहेत. त्यांनी उमेदवारी परत घ्यावयाची असल्यास अर्धा तासाचा अवधी देण्यात येतो. (वेळ १२=५० वा) तो पर्यंत सभा तहकूब करण्यात येते.
(वेळ सुरुवात दुपारी १=२० वाजता)

नगरसचिव : (ज्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतले त्याची नांवे वाचून दाखविली व जे उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत त्यांचीही नांवे वाचून दाखविली.)

श्री. नरेंद्र पाटील : एकाच उमेदवाराने दोन-दोन उमेदवारी अर्ज भरलेले असतील तर आणि संबंधितांनी एकच अर्ज परत घेतलेले असल्यास काय करावे त्याबाबत माहिती द्यावी.

नगरसचिव : अशा प्रकारे संबंधित उमेदवाराचे सुचक व अनुमोदक एकच असल्याने व त्यांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतलेले असल्यास ते ग्राह्य धरले जाईल. परंतु एकाच उमेदवार वगेवगळे सुचक व अनुमोदकांची नांवे उमेदवारी अर्जात भरलेले असल्यास आणि त्यांनी आपली एकच उमेदवारी परत घेतलेली असल्यास फक्त एकच उमेदवारी अर्ज परत घेतल्याचे समजावे.

मा. महापौर : बॅलेट पेपर तयार करण्यासाठी एका तासाचा अवधी देण्यात येतो.
(वेळ दुपारी १=३० वाजता अंदाजे सभेला सुरुवात दुपारी ३=०० वा.)

मा. महापौर : आता मतदान प्रक्रियेस सुरुवात होत असून सर्व स. सदस्यांनी शांतपणे खाली बसावे. मतदान प्रक्रिया सुरू असतांना कुणीही आवाज करू नये.

श्री. अविनाश कुमावत : निवडणूक प्रक्रिये बाबतची नियमावलइ माहिती सभागृहात द्यावी.

नगरसचिव : स. सभासदाचे मतदान प्रक्रिये वेळी वॉर्डनिहाय नांव पुकारल्या जातील त्यावेही त्यांनी मतदान करण्यास जावे. प्रत्येक स. सदस्यांना ८ उमेदवारांना मतदान करता येईल ( निवडणूक रिंगणात उभे असलेल्या उमेदवारांची नावे वाचून दाखविली व तसेच निवडणूकी संबंधिचे नियम वाचून दाखविले.)

मा. महापौर : मतदान प्रक्रियेस सुरुवात करण्यापूर्वी मतदान पेटी सभगृहात रिकामी असल्याचे दाखवावे. (त्यानुसार मतदान पेटी सर्वासमोर रिकामी असल्याचे दाखविले. मा. महापोर यांची स्वाक्षरी करून मतदान पेटीला सिल लवण्यात आले व चावी मा. महापौरांकडे दिली.)

श्री. मोहसिन अहेमद : मतपत्रिका ऊर्दूतू तयार करावी नतसा यास आमचा आक्षेप आहे.

मा. महापौर : आता मतदान प्रक्रियेस सुरुवात करावी व जनसंपर्क अधिकारी यांनइ स. सदस्यांची मतदानासाठी नावे पुकारावे.

(वेळ अंदाजे दुपारी ३=०० वा.)

जनसंपर्क अधिकारी श्री. रमेश चंद्र जैस्वाल यांनी वॉर्ड निहाय स. सदस्यांची नांवे पुकारण्यास सुरुवात केली वॉर्ड क्र. १ ते ४ यांनी मतदान केले. वॉर्ड क्र. ५ च्या उमेदवारास सहकार्य म्हणून श्री. एस. आर जरारे यांना मदत करण्याचे मा. महापौर यांनी आदेशीत केले. तयानुसार मतदान झाले. वॉर्ड क्र. ६ ते ८ च्या स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला व तसेच मा. महापौर यांच्या आदेशनुसार वॉर्ड क्र. ७० चे स. सदस्य श्री. गिरजाराम हाळनोर यांची प्रकृती ठिक नसल्या कारणाने त्यांना अगोदर मतदानासाठी नाव पुाकरावे असे आदेशित केले असता त्यानुसार स. सदस्यांना मतदानाचा हक्क बाजवण्याची संधी दिली. व मतदान केले. त्यानंतर वॉर्ड क्र. ९ ते १० चे स. सदस्यांनी मतदान केले व वॉर्ड क्र. ११ चे मा. महापौर यांचे नाव पुकारले असता मा. महापौर यांनी मा. उप-महापौर यांना महापारैरांच्या खुर्चीवर बसण्याची सूचना केली. तयानुसार मा. उप-महापौर हे उठून मा. महापौरांचे आसन गृहन केले व मा. महापौर सौ. शिलाताई गुंजाळे यांनी मतदानात भाग घेतला. त्यानंतर वॉर्ड क्र. १२ ते १६ चे स. सदस्यांना मतदानाचा हक्क बजावला. याच वेळी मा. महापौर आपले स्थावर स्थानापन्न होणेसाठी आले असता सभापती म्हणून आसन गृहन करीत असलेले. मा. उप-महापौर हे जागेवरून उठले व मा. महापौर यांनी आपले खुर्चीवर स्थानापन्न झाले. वॉर्ड क्र. १७ ते २२ पर्यंतच्या स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वॉर्ड क्र. २३ च्या स. सदस्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी उप-आयुक्त (प्र.) यांनी मतद करावी असे मा. महापौरांनी सांगितले. त्याच प्रमाणे स. सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यानंतर वॉर्ड क्र. २४ चे स. सदस्य यनी मतदानात भाग घेतला तर वॉर्ड क्र. २५ चे स. सदस्य यांना मुख्य लेखा परिक्षक यांनी मतदानासाठी सहकार्य करावे असे मा. महापौर यानी आदेशित केले. तया नुसार संबंधित सदस्यांनी मतदान केले. तसेच वॉर्ड क्र. २६ ते २७ चे स. सदस्यांनी मतदानात आपला सहभाग नोंदविला तर वॉर्ड क्र. २८ चे स. सदस्यांना मुख्य लेखा परिक्षक यांनी सहकार्य करावे असे मा. महापौरांनी आदेशित केले. त्यानुसार संबंधित स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला व वॉर्ड क्र. २९ ते ३५ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वॉर्ड क्र. ३६ च्या स. सदस्यांना डॉ. कुर्तउीकर यांनी सहकार्य करावे असे मा. महापौर यांनी आदेशित केले. त्यानुसार संबंधित स

सदस्य यांनी मतदानात सहभाग घेतला यानंतर वॉर्ड क्र. ३७ ते ४१ चे स. सदयांनी मतदानासाठी भाग घेतला, याच वेळेस सस. सदस्य श्री. जावेद रज्जाक हे मतदान करून आल्यानंतर मतपेटीमध्ये मतपत्रिका टाकण्याच्या प्रसंगी सदरील मतपत्रिका खराब झाल्यचे पिठासन अधिकाऱ्यांना दाखविले असता पिठासन अधिकाऱ्यांनी सदरील मतपत्रिका जप्त करून दुसरी मतपत्रिका देवून पुन्हा मतदान करण्याचे आदेशित केले. त्यानुसार स. सदस्य यांनी पुन्हा मतदानाचा हक्क बजावला वॉर्ड क्र. ४२, व ४३ चे स. सदस्यांनी यावेळी मतदानाचा हक्क बजावला तर वॉर्ड क्र. ४४ चे स. सदस्य यांना सभागृहात उप-आयुक्त (प्र.) यांनी मतद करावी असे. मा. महापौर यांनी आदेशित केले. तयानुसार स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वॉर्ड क्र. ४१ व ४६ च्या स. सदस्यांनी मतदान केले व वॉर्ड क्र. ४७ चे स. सदस्य यांना उप-आयुक्त (प्र.) यांनी मदत करवी असे मा. महापौर यांनी घोषित केले. तयानुसार संबंधित स. स. नी मतदानात भाग घेतला. वॉर्ड क्र. ४८ व ४९ चे स. सदस्य यांनी मतदान केले. तर वॉर्ड क्र. ५० च्या स. सदस्य यांना उप-आयुक्त (प्र.) यांनी मतद करण्याचे मा. महापौर यांनी आदेशित केले. त्यानुसार संबंधित स. सदस्य यांनी मतदानात भाग घेऊन मतदान पूर्ण केले.

मा. महापौर : मतदानाची संपूर्ण प्रक्रिया आता संपली असून आता मतमोजणीसाठी उमेदवारांनी स्वत: अथवा आप-आपले प्रतिनिधी पाठवावे (याच वेळेस सीागृहात सर्वासमोर मतपेटीला सिल असलेली मतपेटी दखविण्यात आली व पिठासन अधिकारी यांचे समोर त्यांचे कडून चाची घेवून उघडण्यात येऊन प्रत्येक मतपत्रिकेवर पिठासन अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी करून छाननी अधिकाऱ्यांकडे दिले व छाननी अधिकारी यांनी मतपत्रिका केली.) मतमोजणी संपली

**खालील प्रमाणे उमेदवार स्थायी समितीचे सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत.**

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | पडलेली मते |
|---|---|---|
| १ | स.स.श्री. काशिनाथ कोकाटे | ८४ विजयी |
| २ | स.स.श्रीमती विमलबाई मुंडलीक | ८४ विजयी |
| ३ | स.स.सौ. लता दलाल | ७७ विजयी |
| ४ | स.स.श्री. वसंतराव देशमुख | ७७ विजयी |
| ५ | स.स.श्री. रमेश लाहोट | ७७ विजयी |
| ६ | स.स.श्री. अजिज खान गणी खॉन | ७३ विजयी |
| ७ | स.स.श्रीमती पुष्पाबाई गंगवाल | ६९ विजयी |
| ८ | स.स.श्री. अली मिरा सलामी | ५१ विजयी |
| ९ | स.स.श्री. तरवेंद्रसिंग धिल्लन | ६३ विजयी |
| १० | स.स.श्री. गौतम खरात | ०० |
| ११ | स.स.श्री. कचरू नवपुते | ०० |
| १२ | स.स.श्री. गौतम लांडगे | ०० |

या वेळी विजयी उमेदवारांचे पुष्पगुच्छाने स्वागत केले. व निवृत्त झालेल्या स. सदस्यांच स्वागत करून निरोप देण्यात आला.

या बरोबर "जन गण मन" या राष्ट्र गीताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
मा. महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.